# महाभारत

## खंड १८ : अज्ञातवासपर्व १

मराठी अनुवाद :

**श्री. अशोक कोठारे**



# महाभारत

## महाभारत खंड अठरावा

## अज्ञातवास पर्व भाग पहिला

## विराट पर्व

अशोक कोठारे

**ई साहित्य प्रतिष्ठान**

विशेष सुचना - महाभारताचे सर्व खंड वाचण्यासाठी कृपया खालील लिंक वर जा.

http://www.esahity.com/2309234323812351236623402381235O.html

# महाभारत

मराठी अनुवादक : श्री. अशोक कोठारे

ashokkothare@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क अनुवादकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी अनुवादकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

**ई साहित्य प्रतिष्ठान**

G1102, Eternity, Eleventh floor

Eastern Express Highway. Thane, 400604

**www.esahity.com**

**esahity@gmail.com**

©esahity Pratishthan®2018

• विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

• आपले वाचून झाल्यावर आपण हे फॉरवर्ड करू शकता.

• हे पुस्तक वेबसायटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

**प्रकाशन : १० जूलै २०१९**

## - अनुवादकाचे दोन शब्द -

हिंदू मान्यतेत ज्या कांहीं रचना सर्वमान्य आहेत त्यातील एक महाभारत आहे. हिंदूंच्या सगळ्या परंपरा, चालीरिती, संस्कार ह्यांची मुळं महाभारतात आहेत. चौकस हिंदू व्यक्तिला बर्याच वेळा अमुक प्रथा कां प्रचारात आली असा प्रश्न पडतो परंतु, त्याचे समाधानकारक उत्तर मात्र त्याला मिळत नाही. चार जण चार कल्पना सांगतात व त्याचा गोंधळ उडतो. ते होऊ नये व त्या वहिवाटी, प्रथा ह्यांचे मूळ कोठे आहे ते लक्षात यावे ह्यासाठी हा प्रयत्न आहे, हा अनुवाद वाचला कीं, त्या प्रश्नांची समाधानकारक उत्तरं मिळतील अशी माझी अपेक्षा आहे. म्हणून, मी महाभारत ह्या महाकाव्याचा मराठीत अनुवाद करण्याचे ठरवले. आता पर्यंत महाभारतावर बरेच लिहीले गेले आहे व ह्यापुढेसुद्धा पुष्कळ लिहीले जाईल पण महाभारत, जसें आहे तसें, एक शैक्षणिक माध्यम म्हणून वाचकांना मिळणे आवश्यक आहे व ते ह्या भाषांतराने मी वाचकांना देत आहे.

महाभारत हे एक महाकाव्य आहे. असें म्हणतात, हा सर्वात मोठा ग्रंथ आहे. मी मात्र अनुवाद करतांना तो गद्यात केला आहे कारण, मला कवितेचे अंग नाही. महाभारताच्या उपलब्ध प्रतिंत कांहीं भेद आढळतात. त्यासाठी सगळे भेद भाषांतरात घेतले आहेत म्हणजे, कांहीं राहून जावू नये. त्या शिवाय, सामान्य वाचकांना कथाभाग अधिक चांगल्या प्रकारे समजावा म्हणून कांहीं टीपा दिल्या आहेत .

माझे वाचक साधे मराठी आहेत ज्यांचे ज्ञान मोजके आहे असें गृहीत धरून मी अनुवादाची भाषा बाळबोध मराठी ठेवली आहे, त्यामुळें कोणालाही ते सहजपणे वाचता येईल व समजेल. कांहीं लेखक अशा ग्रंथाचे अनुवाद करतांना प्राचीनतेचा अनुभव यावा म्हणून मुद्दाम प्राचीन (Archaic) शब्दप्रयोग वापरतात परंतु, माझा असा अनुभव आहे किं, बहुतेक वाचकांना ते वाचण्यास त्रास होतो. म्हणून भाषा आपली नेहमीचीच ओघवती ठेवली आहे.

महाभारताचे अठरा पर्व आहेत व त्या आधीचा असा आदिपर्व म्हणून एक जोडला आहे. आदिपर्वामुळे महाभारतातील मुख्य कथाभागाचा पूर्वेतिहास

वाचकांना समजेल. आदिपर्वात हिंदूंच्या अनेक पुराणांच्या मुळसुत्राची कल्पना येते. म्हणून तो माझ्यामते फार महत्वाचा आहे. मी मात्र अनुवाद करण्याच्या सोयीसाठी संपूर्ण महाभारत चाळीसांपेक्षां जास्त खंडांत विभागून दिले आहे. त्यामुळें इंटरनेटवर चढवतांना व उतरवतांना सोपे जाईल अशी अपेक्षा आहे. त्यातील हा अठरावा खंड आपण आता वाचणार अहात, त्यात पांडव प्रवेश पर्व, समय पालन पर्व, किचक वध पर्व, गोहरण पर्व, वैवाहीक पर्व आपण पहाणार आहोत.

महाभारत कधी लिहीले गेले असा प्रश्न नेहमी ते वाचणार्याच्या मनात डोकावतो म्हणून त्याबद्दल थोडे लिहीत आहे. महावीर व गौतम बुद्ध आपल्याला माहीत आहेत, साधारणपणे इसवीसन पूर्व ५५० वर्षे ते दोघे महानुभाव होऊन गेले. जर महाभारताची रचना त्या आधीची असती तर त्याचा उल्लेख त्या काळातील जैन व बुद्ध साहित्यात निश्र्चितच आला असता. बुद्धाला सांख्यमुनी असें संबोधतात. कारण, त्याचे तत्त्वज्ञान सांख्य विचारावर आधारीत आहे. व्यासांची भगवत गीता वेदांताचे तत्त्वज्ञान मांडते जे तुलनेने अर्वाचीन आहे व सांख्य विचार हा हिंदू तत्त्वज्ञानातील पहिला म्हणजे, सर्वात जास्त जुना समजला जातो. जर ते बुद्धाच्या आधीचे असते तर निश्र्चितच त्याचा प्रभाव बुद्धाच्या विचारांवर झालेला दिसला असता. विशेष करून हे दोघे राजघराण्याचे होते म्हणजे त्यांचे शिक्षण त्या काळातील सर्वोत्तम असणारच मग त्याच्या अभ्यासात गीता, कृष्ण हे आले असते. विशेषकरून जर ते दोघे धर्मावर काम करत होते तर हे अपेक्षित आहे. परंतु, प्रत्यक्ष असें दिसते किं, त्या दोघाच्याही तत्कालिन साहित्यात तो उल्लेख आढळत नाही. ह्याचा अर्थ महाभारत त्या नंतरच्या काळात रचले गेले असावे. दुसरा अंदाज असा कीं, वेदांत तत्त्वज्ञान लिहीणारे व्यास व महाभारतकार व्यास एकच व्यक्ति होती असें साधार मानले जात आहे. वेदांताचा सार महाभारतातील गीतेत आहे. वेदांत तत्त्वज्ञानाचा उगम त्याच सुमारास झाला हे सर्वमान्य आहे. महाभारत लिहीणारे व्यास सांगतात, वेदांचा विसर पडत चालला आहे तरी ते ज्ञान सोप्या भाषेत सामान्यानां समजावे म्हणून

कथारुपातून ते उपलब्ध व्हावे ह्यासाठी त्यांनी महाभारत ही काल्पनिक रचना केली आहे. असें सर्व पहाता आपण अंदाज करू शकतो किं, महाभारत इसवीसन पूर्व ४००च्या सुमारास म्हणजे, सम्राट अशोकाच्या आधी लिहीले गेले असावे.

महाभारतात स्वतः व्यास एक पात्र अशी भूमिका करतांना दिसते. त्याप्रमाणे कृष्ण म्हणून जे पात्र आहे त्याचे सगळे कर्तव्य पहाता व्यास ज्यांचे खरे नांव कृष्ण द्वैपायन आहे, तेंच करीत आहेत असे वाटते. म्हणजे महाभारतकार व्यास त्यांच्या रचनेत दोन भूमिका करतांत असें म्हणावे लागेल. त्यामुळें असे समजण्यास हरकत नसावी कीं, महाभारत त्यांच्या कल्पनांचाच एक भाग आहे. कदाचित असें म्हणता येईल कीं, महाभारत हा एक दंतकथांचा संग्रह आहे व त्याद्वारा नैतिकमुल्ये शिकवण्याचा प्रयत्न झाला आहे.

माझ्या मते, अशा चर्चेत वेळ व्यर्थ न घालवतां हिंदूंनी महाभारतातील कथांतून काय सांगावयाचे आहे ते पहावे. एक ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून महाभारत उपयोगी येईल असें वाटत नाही. महाभारतातील कथा पहाता, त्यातील अतिरंजित प्रसंग हेंच सांगतात किं हे सगळे कपोलकल्पित आहे. परंतु, त्यांतून जे शिकवण्याचा प्रयत्न झाला आहे तो अप्रतिम आहे.

आपल्याकडे इंग्रजांनी सांप्रतची शिक्षण पद्धती आणली त्या आधी हिंदूंतील द्विज, पाठशाळांतून प्राथमिक शिक्षण घेत असतं. त्यात प्रथम, अक्षर ओळख नंतर गणित व महाभारत शिकवले जाई (पुरोहित ब्राह्मणांच्या पाठशाळांतून त्याशिवाय कर्मकांडाच्या पोथ्या शिकवल्या जात) हे लक्षात घेतले पाहिजे. कारण, महाभारतातून माणसाला जीवन कसे जगावे त्याबद्दलचे मार्गदर्शन मिळते. महाभारत हे एक शैक्षणिक माध्यम म्हणून वापरात होते. आपल्या शिवाजी राज्यांचे शिक्षण महाभारतातूनच झाले होते. त्यातून जे नितीशास्त्र शिकवले आहे तेंच आपले शिक्षण होते. माझ्यामते, हांच उद्देश वाचकांनी डोळ्यासमोर घेऊन महाभारत वाचावे, धार्मिक ग्रंथ समजून भाबडेपणे वाचू नये कारण तो धार्मिक ग्रंथ नाही असे माझे मत आहे. महाभारतात अनेक बौद्धीकं आहेत जसें भगवत गीता, विदूर गीता, कणिक गीता, व्याध गीता

वगैरे. ते सगळे जीवनाचे ज्ञान आहे म्हणून प्रत्येक शहाणा हिंदू, महाभारत वाचण्यात ठेवेल तर त्याचे भले होईल. त्यांना ते सहजपणे मिळावे म्हणून हा प्रपंच आरंभला आहे. ई-साहित्य त्याचे विनामुल्य वितरण करणार आहेत म्हणून त्यांना शतशः

धन्यवाद.

अशोक कोठारे



माझा ई-मेल –

ashokkothare@gmail.com
ashokkothare@yahoo.co.in

ह्या वरून आपण माझ्याशी संपर्क करू शकता.

ह्या पुस्तकाचे मुद्रण करण्यासाठी अनुवादकाची आधी परवानगी घेणे आवश्यक आहे. न घेतल्यास तो गुन्हा ठरेल व त्यावर योग्य कारवाई होईल.

ह्या ई-पुस्तकाचे विनामुल्य वितरण ई-साहित्य करणार आहेत परंतु, हे ई-पुस्तक कोणीही कोणालाही विनामुल्य भेट देऊ शकतो.

Ashok Kothare, http://ashokkotharesblog.blogspot.com/ for stories
I reckon, http://kotharesviews.blogspot.com/ for philosophy

Ideas and tips on any subject, http://kotharay.blogspot.in/ for intelligent discussions.

Freedom of Expression, http://kothare-thinks.blogspot.in/

My Marathi Blog, http://kothare-marathi.blogspot.in/ □□□ □□□ □□□□□□

# विराट पर्व

## पांडव प्रवेश पर्व

### भाग पहिला

ओम, असे बोलून नारायणाला व नराला वंदन करून जे सर्व पुरूषात श्रेष्ठ आहेत, त्यानंतर देवी सरस्वतीला वंदन करून त्यानंतर जय असा उद्घाघोष करून विराट पर्वाचे वाचन आपण करणार आहोत.

जनमेजय बोलतात, अहो वैशंपायन, मला सांगा माझे पणजोबा त्यांचे अज्ञातवासातील जीवन दुर्योधनाला घाबरून विराटाच्या राज्यात कसे व्यतीत करत होते. त्यात द्रौपदी माता जी तिच्या सगळ्या पतींशी प्रामाणिक होती, तिने विराटाच्या राज्यात स्वताला त्या अज्ञातवासाच्या काळात कसे सांभाळून घेतले ते सांगा.

वैशंपायन बोलतात, ऐका अहो राजश्री, तुमचे पणजोबा विराटाच्या राज्यात अज्ञातवासात कसे रहात होते. त्यांना यमाकडून वर मिळाले होते, तसे ते त्यांच्या आश्रमात आले व तेथे असलेल्या ब्राह्मणांना ते सगळे सांगितले. तो पुढे तेथे जमलेल्या सगळ्यांना व त्याच्या भावांना सांगतो, "आता आपल्याला हे शेवटचे वर्ष अज्ञातवासात काढावयाचे आहे. ते सर्वात जास्क मुष्कील आहे. तरी अरे अर्जुना तू एक जागा निवड जेथे आपण सुरक्षितपणे ते एक वर्ष अज्ञातवासात व्यतीत करू शकू".

अर्जुन त्याला बोलतो, "यमदेवाच्या आशिर्वादामुळें आपण हे एक वर्ष शत्रूंना न सांपडता आरामात काढू शकतो. तरी, कोठेतरी आपल्याला रहाण्याची सोय करून घ्यावी लागणार आहे. मी कांहीं जागा निवडल्या आहेत ज्या आल्हाददायक आणि एकांताच्या अशा आहेत. त्यांपैकी तुम्ही कांहीं तुमच्या पसंतीच्या आहेत कां ते पहा. त्यात पांचाल आहे. जेथे धान्य भरपूर आहे. मत्स्य, सुरेशन, पट्टाछर, दसम, नवराष्ट्र, मल्ल, सल्व, युगंधर, सौराष्ट्र, अवंती अशा त्या जागा आहेत. त्या शिवाय प्रशस्त कुंतीराष्ट्र आहेच. त्यातील कोणतेही आपण निवडू शकता व तेथे आपण हे वर्ष अज्ञातवासात व्यतीत करू.

युधिष्ठीर बोलतो, "ते सगळे योग्य आहे परंतु, यमदेवांने जे सुचवले ते आपण स्वीकारावयाला पाहिजे असें मी समजतो. अशी जागा जेथे आपण लपून व सुरक्षितपणे राहू शकू. त्याप्रमाणें मत्स्य देशाचा राजा वृद्ध विराट ह्याची जागा जास्त प्रशस्थ वाटते. तेथे ते सगळे आहे जे आपल्याला हवे आहे. तेथे राजाच्या नांवाने एक नगरी आहे, विराट. तेथे आपण जाऊन रहावे असे मला सुचवावयाचे आहे. तेथे माझ्यामते आपण सहाजण त्या राजाच्या परिवाराची सेवा करण्याच्या निमित्ताने रहावे असें मला वाटते. म्हणजे आपण त्या राज्याच्या कुटूंबात त्यांचे सेवक म्हणून राहू जेथे कौरव पोहोचू शकणार नाहीत. तेथे विविध प्रकारच्या सेवांची आवश्यकता असते त्यात आपण सामावून घेतले जाऊ असें मला वाटते. कोणी आपल्याला आपल्या पूर्वानुभवाबद्दल विचारले तर आपण सांगावे कीं, तुम्ही इंद्रप्रस्थात राजा युधिष्ठीराच्या सेवेत होतात".

अर्जुन युधिष्ठीराला विचारतो, "आपण कोणते काम निवडाल? तेथे कोण म्हणून आपण रहाणार? आपले गुण असें सांगतात कीं, आपण ब्राह्मणाचे काम करण्यासाठी अगदी योग्य अहात, त्याशिवाय ते काम आपण चांगलेच जाणता. त्याशिवाय ब्राह्मण होण्याची आपली हौससुद्धा त्या निमित्ताने पूर्ण होईल".

युधिष्ठीर बोलतो, "माझ्या भांवांनो ऐका मी तेथे काय करण्याचे ठरवले आहे. मी कंक नावाच्या ब्राह्मणाचे रुप घेणार आहे. मी द्युत खेळण्यात हुशार आहे असें सांगेन. मी त्या राजाच्या दरबारातील एक ब्राह्मण बनून राहीन. तेथे त्या द्युताच्या पटावरील विविध रंगाच्या सोंगट्या ज्यात कांहीं लाल, कांहीं निळ्या, कांहीं पिवळ्या आणि फांसे लाल व काळ्या रंगाचे असें खेळवून मी राजाची करमणूक करू शकेन. मी राजाशी तत्त्व चर्चा करून त्याचे मनोरंजन करीन. तेथील पंडीतांशी बोलून मित्र परिवार वाढवेन. त्या स्वरुपात मला कोणीही ओळखणार नाही ह्याची मला खात्री आहे. जर माझ्या पूर्व जीवनाबद्दल राजाने विचारले तर मी सांगेन कीं मी युधिष्ठीर राजाच्या दरबारात होतो. अशारितीने मी माझे हे एक वर्ष गुप्तपणे घालवीन".

आता भिमाची पाळी येते, तो तेथे काय करणार त्या बद्दल सांगण्याची. अशारितीने पांडव प्रवेश पर्व, विराट पर्व भाग पहिला संपला.

## पांडव प्रवेश पर्व
## भाग दोन

भिम बोलतो, "मी विराटाच्या घरात खानसामा (स्वयंपाकी) म्हणून काम करण्याचे ठरवले आहे. माझे नांव मी ठरवले आहे, ते असेल वल्लभ. मला सैपाक चांगला येतो ते तुम्ही चांगलेच जाणता त्यामुळें त्या सोंगात मी सहजपणे लपू शकेन असें समजतो. राजाचे जेवण मी बनवणार व त्या प्रकारे मी राजाची मर्जी संपादन करणार आहे. सैपाकासाठी लागणारी भलीमोठी काष्ठ मी मोठ्या प्रमाणात सहज उचलून आणीन व तेथील इतर खानसाम्याची मर्जी संपादन करीन. त्यामुळें तेथे असलेल्या सगळ्या खाद्यपदार्थांवर माझी नजर असेल. त्यामुळें माझी भूक मी विनासायास भागवू शकेन. मी सहसा फार बाहेर वावरणार नाही, कारण त्यामुळें मी कोणाच्याही सहजपणे नजरेत येणार नाही. माझ्या अवाढव्य आकारामुळें माझा संशय येऊ शकतो म्हणून मी ती खबरदारी घेणार आहे. त्याशिवाय मी कुस्तीगिर म्हणून काम करू इच्छितो त्या प्रकारे मी राजाची करमणूक करू शकेन. तेथे मी कोणाला कुस्तीत ठार मारणार नाही फक्त चीत करीन त्यामुळें माझा कोणाला संशय येणार नाही. जर राजाने माझ्या पूर्वानुभवा बद्दल विचारले तर मी सांगेन कीं, मी युधिष्ठीराच्या कडे काम करत होतो". आता पाळी असते, अर्जुनाची, तो प्रथम अर्जुनाची स्तुती करतो, "अरे धनंजया सदेह स्वर्गारोहण करणार्या कुंतीपुत्रा, जो सदैव अजिंक्य राहीला आहे, ज्याने श्रीकृष्णाबरोबर राहून खांडववनातील पापशक्तींचा नायनाट केला, त्या प्रकारे तू अग्नीला संतुष्ट केले आहेस, त्या वनातील राक्षस, नांग अशा सगळ्यांचा नाश केला आहेस, जसें उष्णता देण्यात सूर्य अव्वल असतो, ब्राह्मण माणसांत श्रेष्ठ असतात, वज्र सर्व

शस्त्रांत श्रेष्ठ असते, सर्व पशुंत वशींडधारी वृषभ श्रेष्ठ असतो, सर्व जलाशयात समुद्र श्रेष्ठ असतो, पाऊस टाकणारे ढग सगळ्या ढगांत उत्तम असतात, अनंत नागांत व ऐरावत सगळ्या हत्तीत श्रेष्ठ असतात, जसे स्वताचा मुलगा सर्वात जास्त प्रिय असतो, सगळ्या मित्रात बायको सर्वात श्रेष्ठ मित्र असते, तसा तू गुडाकेशा, सगळ्या धनुर्धार्यात श्रेष्ठ आहेस, तू स्वर्गात पांच वर्षे राहून कमालीची शस्त्र साधना करून आलेला आहेस, साक्षात इंद्रच जणू असा बनून आला आहेस, शिवाकडून त्याची शस्त्र अस्त्र शिकून तू आता दुसरा रुद्रच जसा झाला आहेस, अशा तू आता मला सांग विराटाच्या राज्यात कोठे व कसे रहाण्याचा तुझा मानस आहे ते सांग. तुझे दोनही हात धनुष्याच्या दोरीच्या मारामुळें दगडासारखे घट्ट झाले आहेत. हे लक्षात घेऊन तू काय ठरवले आहेस ते आम्हाला ऐकण्याची उत्सुकता वाढत आहे.

अर्जुन सांगतो, मी ठरवले आहे कीं, विराटाच्या दरबारात व नृत्यशाळेत एका नपुसकाची भूमिका करणार आहे. माझे हात जरी युद्धाच्या कामामुळें खराब झालेले असले तरी ते मी दोनही हातात भरपूर बांगड्या घालून झाकणार आहे. त्याशिवाय मला मी स्वर्गात असतांना उर्वशीने जो शाप दिला होता तो आता मला उपयोगी येणार आहे. तुम्हाला मी सांगितले आहे कीं, जेव्हां मी स्वर्गात होतो तेव्हां माझा व आपल्या आजे पणजीचा संपर्क झाला होता तेव्हां मी तिला माझी आजे पणजी म्हणून समजून तिचा सन्मान केला तेव्हां रागावून तिने मला एक शाप दिला होता तो वृतांत प्रथम सांगतो म्हणजे माझ्या योजनेला आपण चांगले समजू शकाल. ते असें झाले कीं, मी तिला माझी आजेपणजी म्हंटल्यावर तिचा, उर्वशीचा राग आणखीन वाढला, ती संतापाने थरथरू लागली. आपल्या भुवया उंच करून ती अर्जुनाला शाप देते. तो शाप असा, "अरे पार्था, तू माझा अव्हेर केला आहेस. मी तुझ्या पित्याच्या आज्ञेने व माझ्या मर्जीने तुझ्याकडे वासनिक उपशमन करुन त्या द्वारा तुला संतुष्ट करण्यासाठी आले असतांना मला मातेचा दर्जा देऊन माझ्या स्त्रित्वाचा उपमर्द केला आहेस. म्हणून तू तुझ्या जीवनातील एक वर्ष

बायकात घालवशिल, तेथे तू नृत्य करशिल व तू एका नपुसकाचे जीवन जगशिल".

तसा शाप ऐकल्यावर मी घाबरलो व इंद्राला भेटून त्याबद्दल काय करावयाचे त्याची पृच्छा केली. तेव्हां तो माझा पिता मला म्हणाला, माझ्या पाठीवरून हात फिरवत तो देवांचा राजा त्याच्या मुलांस सांगतो, "तुला तिने नपुसक ठरवले कारण तुझे तिला ह्या कारणांने नाकारणे ती मुळात समजलीच नाही. ती असें समजते कीं, तू तिला नाकारलेस कारण तू वस्तुतः नपुसक आहेस आणि म्हणून तिने असा शाप दिला. परंतु, त्याबद्दल तुला काळजी करण्याचे कारण नाही. जेव्हां तुम्हाला तेराव्या वर्षी अज्ञात वासात रहावे लागणार आहे तेव्हां हे तुझे नपुसकपण उपयोगी येणार आहे. तू एक वर्ष त्या अवस्थेत रहाणार असल्यामुळें अज्ञातवासात तुला रहाणे सोपे होणार आहे". शक्राचे ते स्पष्टीकरण ऐकल्यावर अर्जुनाला समाधान वाटले. अर्जुन पुढे सांगतो कीं, "ते माझे नपुसक होणे व हा अज्ञातवास जमवून घेण्याचे काम शक्र वहाणार आहेत ते बोलले कीं, त्या प्रकारचे प्राक्तन रचणे ही त्यांची जबाबदारी असेल. त्याप्रमाणे, आपण जर इंद्राला विनवणी केली तर त्यांच्या कृपेने तो शाप आपल्याला वरदान ठरू शकतो".

ते ऐकून सगळें पांडव आणि ब्राह्मण आनंदाने टाळ्या वाजवू लागले. कोठल्या शापाचा कोठे कसा उपयोग होईल त्याबाबत ते नवल करत होते.

त्या नंतर अर्जुन पुढे त्यांना त्याची योजना समजावून देतो. मी ठरवले आहे कीं, "मी एका किन्नराची भूमिका करणार आहे. माझे धनुष्याच्या दोराचे व्रण जे माझ्या मनगटावर आहेत ते लपवता येणार नाहीत परंतु, कदाचित इंद्राच्या कृपेने जर मी त्या सुमारास किन्नर स्वाभाविकपणे झालो तर त्या व्रणाचा प्रश्न रहाणार नाही".

"माझे नांव असेल बृहन्नला, तेथे मी त्या राज परिवारात मिसळू शकेन व त्यांना विविध गोष्टी सांगून व तेथे असलेल्या मुलींना नृत्य व संगीत शिकवून माझा काळ व्यतीत करू शकेन". जर राजाने माझ्या पूर्वायुष्याबद्दल

विचारले तर मी सांगेन, मी युधिष्ठीराच्या राजवाड्यात त्यांची राणी द्रौपदी राणीची खास दासी होत्ये.

वैशंपायन पुढे सांगतात, ते सांगून अर्जुन गप्प बसतो. त्यानंतर नकुलाची पाळी असते तो कसे स्वतःला लपवणार आहे ते सांगावयाची.

अशारितीने पांडव प्रवेश पर्व, विराट पर्व दुसरा भाग संपला.

## पांडव प्रवेश पर्व

## भाग तिसरा

युधिष्ठीर नकुलाला विचारतो, "अरे माझ्या देखण्या भावा, तुझा काय विचार आहे विराटाच्या ठिकाणी रहाण्याबाबत"?

नकुल सांगतो, "ग्रंथीक नांवाने मी तेथे राहू इच्छितो, मी घोड्यांच्या विद्येत पारंगत आहे म्हणून मी तेथे घोड्याच्या पागेत काम करण्याचा विचार करत आहे. ते काम मला करावयाला आवडेल. मला घोडे फार आवडतात जसे आपल्याला आवडतात. माझ्या काम करण्याच्या पद्धतीमुळें कोणताही घोडा शांत होतो. तेथे मला कोणी विचारले कीं ह्या आधी मी कोठे काम करत होतो तर मी सांगेन कीं, मी पांडवांच्या पागेत काम करत होतो. अशा रुपात मी त्या नगरात खुषाल राहू शकेन". आता वेळ येते सहदेवाची, तो सांगतो, "मी विराटाच्या पशुधनाची व्यवस्था पहाण्याची नोकरी करू इच्छितो. मी गाई पाळण्याचे काम सहजपणे करू शकतो, त्यांचे दूध काढणे, त्यांना चारा

खाण्यास देणे व त्यांची व्यवस्था पहाणे हे काम मला फार आवडेल. गुरांना शांत करण्याची कला मला अवगत आहे. माझे नांव असेल तंत्रिपाल. ते काम मी मोठ्या इमानदारीने करीन म्हणजे कोणाला माझा संशय येणार नाही. तुम्हाला माहीत आहे, कीं, मी आपली गुरं सांभाळत होतो त्यामुळें तेंच काम मी तेथे करू इच्छितो. गुरांच्या मुताच्या वासावरून मी ओळखत होतो ते जनावर किती सद्धृढ आहे. मला त्या गुरांना पाळायला आवडत असल्याने मी ते काम करू इच्छितो. कौरवांपैकी कोणालाही माझ्या आवडींची माहीती नसल्याने ते मला तेथे शोधण्याचा प्रयत्न सुद्धा करणार नाहीत व मी तेथे लपून राहू शकेन. तेथे कामाच्या जोरावरल मी विराट राजाये मन प्रसन्न करून घेईन".

युधिष्ठीर विचारतो त्यांच्या पत्नीला, तिला कोणते काम तेथे करता येईल? तो पुढे बोलतो आपली पत्नी आपल्याला आपल्या जीवापेक्षा जास्त प्रिय आहे व आता ती आपल्या सगळ्यांना मातेप्रमाणे अथवा भगिनीप्रमाणे झालेली आहे, तेव्हां आपण जाणून घेऊ, ती काय ठरवत आहे ह्या अज्ञातवासाच्या दरम्यान काय रुप ती घेणार आहे?

आपण जाणतो कीं, ती कोणत्याही प्रकारचे सेविकेचे काम करण्याचा तिला अनुभव सुद्धा नाही, अशा परिस्थितीत ती काय ठरवते ते समजून घेऊ. एका राजाची कन्या त्या विराटाच्या घरात कोणते काम करणार ते तिने ठरवावयाचे आहे.

द्रौपदी बोलते, "मला माहित आहे राणीवशात एक प्रकारच्या सेविका असतात त्यांना सैरींध्री असें म्हणतात. त्या राण्यांच्या व त्यांच्या मुलींची मैत्रीणीचे अथवा सहाय्यकाचे काम करत असतात. विराटाच्या राणीवशातसुद्धा असें काम असेल तर ते मला करावयाला आवडेल. राण्यांचे कपडे, दागिने सांभाळणे, त्यांची देखभाल करणे अशी काम सैरिंध्री करतात. मला जर विचारले कीं, मी आधी कोठे काम करत होते, तर मी सांगीन कीं, मी द्रौपदीची सैरिंध्री होते. जेव्हां ते इंद्रप्रस्थाचे राजे होते. तेथे मी त्या राणीवशात सहजपणे लपू शकेन. तेथे विराटाची राणी सुदेशना हीची मी सैरींध्री बनून राहू

इच्छिते. ते काम करावयाला मला आवडेल. सुदेशनाला मी संतुष्ट ठेवीन. त्याबद्दल मला खात्री आहे".

युधिष्ठीर मात्र थोडा कष्टी झालेला असतो कारण त्याला चिंता वाटत असते कीं, द्रौपदीने आजवर पूर्ण सुरक्षित असें जीवन व्यतीत केले आहे व आता ह्या परिस्थितीत ती परपुरूषांच्या सहवासात तिचा काळ व्यतीत करणार आहे तेथे जर तिच्यावर कोणता अतिप्रसंग गुदरला तर ती त्याला कशी सामोरी जाईल. ह्या चिंतेने तो अस्वस्थ झालेला दिसतो. तो तिला विनंती करतो की, त्या राणीवशातील पुरूषांच्या नजरा तुझ्यावर पडणार नाहीत अशाप्रकारे ती राहिल ह्याची दक्षता तिने बाळगली पाहिजे.

अशारितीने पांडव प्रवेश पर्व, विराट पर्व तिसरा भाग संपला.

## पांडव प्रवेश पर्व

## भाग चौथा

युधिष्ठीर पुढे सांगतो, आपल्या ठरल्या प्रमाणे आपण सगळे आपापली कामे बिनतोड करणार आहेतच असे मी समजत आहे. तेथे आपण एकमेकांना ओळख न देण्याची खबरदारी बाळगली पाहिजे. तेव्हां आता आपले सगळे रथ, आपले पुरोहित, ब्राह्मण आणि स्वयंपाकी द्रुपदाच्या घरी जातील. आपले अग्नीहोत्र तेथेच तेवत ठेवण्याची व्यवस्था करायला पाहिजे ते काम आपले ब्राह्मण करतील. इंद्रसेन आपल्या रिकाम्या गाड्या घेऊन द्वारकेकडे जातील. द्रौपदीच्या सगळ्या सेविकांना सुद्धा पांचालकडे जाण्यास सांगावे. मुख्य

म्हणजे, त्या सगळ्यांना शिकवून ठेवा कीं, कोणी विचारले कीं पांडव कोठे गेले तर त्यांनी सांगावयाचे कीं, त्यांना त्याबद्दल कांहीं माहिती नाही. आणि जेव्हां आम्ही निघालो तेव्हां ते द्वैतवनातच होते असें सांगावयाचे.
वैशंपायन पुढे सांगतात, अशारितीने एकमेकांशी बोलून व सगळे ठरवून ते पांडव त्यांची प्रत्येकाची कामं समजून घेतात. त्यात त्यांचे पुरोहित धौम्यऋषींचा ते सल्ला घेत असतात. धौम्य त्यांना सांगतात कीं, त्यानी केलेली व्यवस्था उत्तम आहे. पवित्र अग्नीची जबाबदारी ते घेतात. ते बोलतात कीं, द्रौपदीची व्यवस्था चांगली केली आहे हे एक चांगले आपण केले आहे. पुण्य, हित आणि फायदा ह्यांचे सुंदर संतुलन आपण राखले आहे ते धौम्यांना जास्त चांगले वाटल्याचे ते सांगतात. आता सांगतो तेथे तुम्ही कसे राजाकडे वागाल, ते सांगण्याचे कारण, आपण आजवर सामान्य माणसासारखे राहिलेले नाही त्यामुळें कदाचित तुमच्यातील राजा जर एकदम जागा झाला व त्याप्रमाणे तुम्ही वागू, बोलू लागलात तर कोणालाही त्याचा संशय येऊ शकतो. म्हणून त्या पद्धती समजून घ्या. राजच्या घरात कसे नजरेत येणार नाही असें कसे रहावयाचे ते समजून घ्या. राजा हा सामान्य लोकांसाठी देवासमान असतो. त्याची कृपा मिळवावी लागते. त्या करता त्याच्या दरबारात कसे तुम्ही शिराल ते पाहू. प्रथम द्वारपाला कडून परवानगी घेऊन तुम्ही राजाच्या दरबारात जाल. तेथे यथावकाश तुम्हाला राजापुढे सादर केले जाईल. राजाच्या पुढे उभे राहिल्यावर तेथे आपल्याला दाखवलेल्या आसनावरच आपण बसाल. विचारल्या शिवाय आपण कांहीं बोलणार नाही. राजाला मध्येच बोलणारे व व्यर्थ बडबड करणारे, न विचारता बोलणारे असें लोक आवडत नाहीत. आपले काम बरे व आपण असें त्रयस्थासारखे वागावयाचे असते राजवाड्यात हे लक्षात असू द्या. नाहीतर राजाची मर्जी बिघडू शकते. अगदी किमान महत्वाचे कामसुद्धा राजाला विचारून करावयाचे असते. अशारिताने कामं केली तर नुकसान होणार नाही. माणूस कितीही मोठ्या पदावर गेलेला असला तरी त्यांने राजाने विचारल्या शिवाय असें वागावयाचे असते कीं, त्याला कांहींच कळलेले नाही. किंवा तो जणू अंध

आहे. राजाचा मान राखण्यासाठी, राजा त्याच्या मुलाबाळांना, नातवांना, भावंडांना सुद्धा क्षमा करत नाही. म्हणून त्याची मर्जी सांभाळूनच सगळे करावयाचे असते. राजाची सेवा करतांना फार सावधानता बाळगावी लागते. त्याचा मान राखला गेला पाहिजे. जसे अग्नीची काळजी घेतली जाते तशी त्याची घ्यावयाची असते. जर कांहीं चुका झाल्या तर सर्वनाश होण्याची शक्यता असते. चांगला विचार करून मग राजापुढे आपले मत मांडावयाचे असते. जरी एकादा मुद्दा तापदायक असला तरी जर त्यात राजाचे हित आहे ह्याची खात्री वाटत असेल तर तो मुद्दा राजापुढे जरूर मांडावा. आपले मुद्दे राजापुढे मांडताना त्यांची मांडणी खुबीने करावी म्हणजे राजाला त्यात रस वाटेल. राजा जरी थोडा दुर्लक्ष करतो असें वाटले तरी त्याकडे जास्त ध्यान न देता आपली बाजू मांडत रहावयाची असते. जो राजाच्या विरुद्ध असलेल्यांशी दोस्ती करतो त्यानी राजाच्या कृपेची अपेक्षा करू नये. विद्वान माणूस राजाच्या उजव्या किंवा डाव्या बाजूस बसेल. राजाच्या मागे तो बसणार नाही कारण ती जागा राजाच्या संरक्षकाची असते. राजाच्या समोर बसणे अयोग्य समजले जाते. राजाने खोटे सांगितले असें कधीही कोणाला सांगू नये. कारण, जे असें सांगतात त्यांच्यावर राजाची अवकृपा होत असते. राजापुढे आपल्या प्रौढी दाखवू नये. जे स्वतःला विद्वान म्हणवतात त्यांना राजा भाव देत नाही. तुम्ही कसेही गुणी असा त्याची शेखी राजापुढे मिरवावयाची नसते. राजा जेवढे महत्व देईल त्यावर समाधान मानण्यात शहाणपण असते. संपत्ती व यश मिळण्यासाठी राजाची कृपा आवश्यक असते. राजापुढे जास्त बोलावयाचे नसते. जास्त हालचाली करावयाच्या नसतात. राजाने बोलण्याची परवानगी दिली तर बोलावयाचे, नाहीतर गप्प बसावयाचे असते. त्याच्यापुढे जोरानी हसावयाचे नसते. ते राजाला आवडत नाही. राजापुढे थुकावयाचे नाही. तरी कांहीं हास्यास्पद घडत असले तरी जर राजा हसत नसेल तर राजापुढे जोराने हसावयाचे नाही. परंतु, जर राजा हसू लागला तर आपण सुद्धा जोरांने हसण्यास हरकत नसते. सगळ्या वागणूकी नेमस्त असाव्यात जेव्हा राजा तेथे हजर असेल. जो नियम राजाबाबत असतो तोंच राणी बाबतसुद्धा असतो.

राजाकडून कांहीं चुकीचे घडत असलेले जाणवले तरी त्याची जास्त वाच्यता कोणापुढे करावयाची नसते. त्या गोष्टींकडे दुर्लक्ष करावयाचे असते. जो राजाच्या हिताचे पहातो व जो कोणत्याही कृपेमुळें फार खूष किंवा नाराज होत नाही असेंच राजाच्या घरात रहाण्यासाठी योग्य समजले जातात. राजाची मर्जी सांभाळणारे व त्याची मुलं त्या घरात रहाण्यास योग्य समजली जातात. राजाची मर्जी घालवलेला जर त्यानंतरसुद्धा राजाविरुद्ध कांहीं बोलत नसेल तर तो पुन्हा राजाच्या मर्जीत येऊ शकतो. ज्याला त्या राज्यात रहावयाचे आहे तो राजाविरुद्ध कांहीं बोलणार नाही. जो दरबारी राजाविरुद्ध कारवाई करण्याचे ठरवतो तो कदाचित मारला जाऊ शकतो. कोणत्याही परिस्थितीत राजाच्या शत्रूशी तो संपर्क ठेवणार नाही. आपण राजापेक्षा जास्त हुशार आहोत असें दाखवणारा राजाच्या मर्जीत रहात नाही. जो राजाच्या सावलीसारखा असतो तो राजाला आवडतो. तसा माणूस राजाच्या घरात राहू शकतो. राजाने एकादे काम सांगितले तर ते त्वरित करणारा राजाला आवडतो व तो त्याच्या बरोबर राहू शकतो. राजाच्या वस्त्राची नक्कल करावयाची नाही. राजाच्या चुकांची चर्चा करावयाची नसते, त्या विसरावयाच्या असतात. राजघरातील लोकांची कांहीं खास गुपित असतात ती जरी समजली तरी ती कोणाला सांगावयाची नसतात. राजाचे वस्त्र, दागिने, गाडी, रथ, वापरावयास देतो ते आवर्जून वापरावयाचे असतात. त्यामुळें राजा खूष होत असतो. एवढे सांगितल्यावर ऋषी धौम्य पुढे बोलतात, माझ्या मुलांनो अशारितीने सर्व खबरदारी बाळगून तुम्ही त्या घरात रहाणार अहात. त्या मार्गाने तुम्ही तुमचे राज्य पुन्हा मिळवणार अहात.

युधिष्ठीर त्यावर बोलतो, आपण आम्हाला चांगले मार्गदर्शन केले आहे. आपले भले हो. अशाप्रकारचे मार्गदर्शन आमच्या आईने आम्हाला दिले होते. आणि आमचे काका आम्हाला असें सांगत असतं. आता आम्हाला अज्ञातवासात जाण्याची वेळ आली आहे. आमच्या ह्या वर्षातील अज्ञातवासाच्या कामासाठी व नंतरच्या युद्धातील यशासाठी आम्हाला आपल्या शुभेच्छा द्याव्यात.

वैशंपायन पुढे सांगतात, युधिष्ठीर त्याप्रमाणे धौम्यांना विनंती करतो व त्याप्रमाणे धौम्य निघण्याच्या विधीची सुरूवात करतात. ते पवित्र अग्नी पेटवतात. मंत्रोच्चारण सुरू होते. विविध देवतांचे आळवणे सुरू होते. पुढील कार्यासाठी यश व समृद्धी ह्यासाठी प्रार्थना केली जाते. सगळे जग जिंकण्याच्या तयारीने ते होत असते. त्या होमाभोवती ते सहा प्रदक्षिणा घालतात. त्यानंतर ते ब्राह्मणांभोवती सहा प्रदक्षिणा घालतात. त्यानंतर धौम्य तो पवित्र अग्नी घेऊन इंद्रसेनाबरोबर पांचाल कडे रवाना होतात. इतर मंडळी आधीच यादवांच्या कडे रवाना झाले होते. तेथे ते पांडवांच्या गोष्टींची देशभाल करत त्यांचा समय आनंदात घालवणार असतात.
अशारितीने पांडव प्रवेश पर्व, विराट पर्व चौथा भाग संपला.

## पांडव प्रवेश पर्व

## भाग पांचवा

वैशंपायन सांगतात, पांडव त्याची शस्त्रं घेऊन यमुना नदीच्या दिशेने त्यांचा विराट नगरी कडील प्रवास सुरू करतात. आपले गेलेले राज्य मिळवण्यासाठी उत्सुक असलेले ते पंडुचे पांच पुत्र त्या निर्जन अरण्याचा त्याग करून मानव वस्ती असलेल्या प्रदेशाकडे जाऊ लागतात. यमुनेच्या दक्षिण किनार्याकडून ते चालत असतात. गेली बरीच वर्षे ते अरण्यातून शिकार करण्यासाठी वावरत होते. ते यक्रीलोमा व सुरसेना वरून पुढे जातात. त्यांना पांचाल प्रदेश आता मागे टाकलेला आहे. त्याच्या डावीकडे देसर्न येते. पांडवाच्या दाढ्या व केस खूप वाढलेले असतात. त्यानंतर ते मत्स्य देशाच्या सीमेवर येऊन पोहोचतात. तेथे लोक त्यांना व्याध असल्याचे समजतात. एकदाचे ते मत्स्य देशात पोहोचतात. तेथे पोहोचल्यावर द्रौपदी युधिष्ठीराला विचारते, "ते पहा आपण पायवाट तयार असलेली पहात आहोत. आणि पलिकडे शेते दिसत आहेत, म्हणजे आपण आपल्या अपेक्षित ठिकाणी पोहोचलो आहोत वाटते, कदाचित विराटाचे वस्तीस्थान अजून दूर असावे. मी आणि आपण सगळे थकलो आहोत तेव्हां थोडी विश्रांती घेतली पाहिजे".

युधिष्ठीर तिला बोलतो, "अरे धनंजया तू तुझ्या पत्नीला उचलून घे कारण अजून आपल्याला बरेच अंतर काढावयाचे आहे. मी सुद्धा खरे तर फार थकलो आहे. हे क्षेत्र संपले कीं, विराट नगर सुरू होईल".

वैशंपायन सांगतात, हत्तीच्या कळपातील प्रमुख हत्ती सारखा अर्जुन पुढे होतो व द्रौपदीला उचलून घेतो. तसे ते चालत असतात. थोड्याच वेळात ती विराटाची नगरी ते गाठतात. तेव्हा तो कृष्णाला खाली ठेवतो. तोवर तिचा थकवा निघालेला असतो. ते एकदाचे नगरात प्रवेश करतात. ती भल्या पहाटेची वेळ असते. अजून झुंजुमुंजू असते. युधिष्ठीर विचारतो, "आता बोला, आपण आपली शस्त्रं आणि अस्त्रं कोठे ठेवावयाची? शहरात शिरण्या आधी ती आपल्याला लपवावी लागणार आहेत". जर आपण ह्या शस्त्रांसह नगरात शिरलो तर निश्चितच त्याची चर्चा होईल व ते आपल्याला परवडणारे नाही. आपली शस्त्र नेहमीपेक्षा वेगळी व मोठी आहेत ती कोणाच्याही नजरेत येतील. तुझे गांडीव किती भारीभक्कम आहे ते तुला माहीत आहेच. अशा मुळे आपण

सहज पकडले जाऊ. तसे झाले तर तुला माहीत आहे काय होईल ते. नगरै बाहेर उंच पहाडावर एक शमीचा प्रचंड वृक्ष आहे. त्याच्या खोडात एक भला मोठे विवर (जुन्या वठलेल्या झाडामधील खड्डा, डोली) पाहिला आहे. त्यामध्ये ही सगळी शस्त्रं सामावतील असें मला वाटते. तेथे ती ठेवली तर कोणाला समजणार नाही, कारण, तो प्रदेश निर्जन आहे. त्या भल्यामोठ्या झाडावर चढणे सोपे नाही. तेथे वर चढून मी माझी व आपली सगळ्यांची शस्त्रं लपवून ठेवू शकू. त्या वृक्षाच्या परिसरात हिंस्र श्वापदांचा संचार असतो व जहरी नांग आहेत हे मी पाहिले आहे, तेथे ठेवता येतील. तेथे जर आपली शस्त्र ठेवली तर मला नाही वाटत कांहीं काळजी करावा लागेल. युधिष्ठार त्याला मान्यता देतो. मग ते सगळे त्यांची शस्त्रं त्या उंच झाडावर ठेवतात. अर्जुनाला अनेक युद्धांत जिंकवणारे गांडीव सुद्धा त्यात असते. त्याशिवाय युधिष्ठीर त्याच्या मंत्रसामर्थ्याने ती जागा कोणाच्या लक्षात येणार नाही असें करतो. पांचालांच्या व सिंधच्या लढ्यात मोठे काम केलेले भिमाचे धनुष्यसुद्धा त्यात असते. त्याच प्रमाणे, नकूलसुद्धा त्याचे धनुष्य ज्यांच्या मदतीने त्याने अनेक लढाया राजसूय यज्ञाकरतां खंडण्या मिळवण्यासाठी यशस्वीपणे लढल्या होत्या तेसुद्धा तेथे ठेवले जाते. सहदेव सुद्धा त्याची शस्त्रं जी त्यांनी वापरली होती दक्षिणेच्या स्वारीत, तेथे ठेवण्यासाठी देतो. ती सगळी शस्त्र ते चांगली घट्ट बांधून ठेवतात अशी कीं, पावसात ती खराब होणार नाहीत. त्यानंतर त्यावर ते असे झाकम घालतात कीं, सहसा कोणाला ते काढता येणार नाही. आपली सगळी शस्त्र सुरक्षित आहेत ह्याची त्यांनी पक्की खात्री केली व नंतर ते सगळे त्या भल्या मोठ्या आपट्याच्या झाडावरून खाली उतरतात. तेथे कोणी चढू नये म्हणून ते एक वाटेत मिळालेले प्रेत आणतात व तेथे टांगून ठेवतात. कोणी गुराखी त्यांना विचारतो कीं, हे काय असे टांगले आहे, तर ते त्याला सांगतात कीं, ही आमची म्हातारी मेलेली आहे तिचे वय एकशे चाळीस होते व आमच्या रिवाजानुसार आम्ही तिचे प्रेत तेथे शमीच्या वृक्षावर टांगून ठेवले आहे म्हणजे तिच्या आत्म्यास शांती मिळेल. अशारितीने सगळी व्यवस्था केल्यावर ते पांचजण नगरात प्रवेश करतात. युधिष्ठीर त्याच्या

भावाला, भिमाला जवळ घेऊन विनंती करतो कीं, ह्यापुढे त्यांने त्याचा क्रोध आवरून राहिले पाहिजे. जर त्याच्या क्रोधामुळें त्यांचे बिंग फुटले तर सगळाच खेळ संपेल. भिम त्याला आश्र्वानस देतो कीं, ह्यापुढे तो बिलकूल रागावणार नाही व त्याचे चित्त शांत ठेवील. नकूल व सहदेवांना कांहीं सांगण्याची आवश्यकता नव्हती कारण ते नेहमीच मर्यादाशील होते.

आता ते नगरात प्रवेश करण्या आधी पुन्हा एकत्र येतात व तेथे युधिष्ठीर त्यांना त्यांची टोपण नांवं कोणती ते सांगतो. जय, जयंत, विजय, जयत्सेन, जयत्वल अनुक्रमे ती असतात. तेरावे वर्ष सुरू होणार असते व त्या सुमारास ते विराटाच्या राज्यात गेलेले असतात. त्यांना माहीत असते की, आता कौरव त्यांच्या हेरांच्या मदतीने त्यांना हुडकण्यास सुरूवात करणार आहेत.

अशारितीने पांडव प्रवेश पर्व, विराट पर्व पांचवा भाग संपला.

# पांडव प्रवेश पर्व

## भाग सहावा

वैशंपायन पुढे सांगत असतात, ते प्रसन्न विराट नगरात शिरल्यावर युधिष्ठीर दुर्गा मातेची आळवणी करू लागतो. त्यामध्यें तिचा महिषासुराच्या वधाची गोष्ट तो आळवत असतो.

"अहो महादेवी, विश्र्वतारीणी, तू नारायणाला मदत करण्यासाठी यशोदेच्या उदरात जन्म घेतलास नंदाच्या वंशात, परंतु, कंसाने तुला आकाशात फेकले तेव्हां तू बोललीस त्याच्या विनाशाचे भाकीत आणि अंतर्धान पावलीस. अशा जगन्मातेला माझा नमस्कार. कंसाने तुला नंतर एका दगडावर आपटले. तू वासुदेवाची सख्खी बहिण आहेस. तू, दैवी अलंकाराने सजलेली असतेस. तुझ्या अंगावर दैवी पोषाख असतो. गळ्यात माळा असतात, हातात तलवार असते, दुसर्या हातात ढाल असते, तू पापात रुतलेल्याला त्यांने मनापासून भक्ती केली प्रायश्र्चित्त झाल्याने, तर त्यातून बाहेर काढतेस. म्हणून तूला दुर्गा म्हणजे अडचणीत असलेल्या भक्तासाठी धावणारी असें नांव प्राप्त झाले. तुझ्या खर्या भक्तांचे सगळे पापं तू धुऊन टाकतेस". एवढे बोलल्या नंतर युधिष्ठीर तिची विविध नांव, जी सुक्तात दिली आहेत ती घेऊन तिचे स्मरण करू लागतो. युधिष्ठीर तिला नमन करतो.

तो प्रार्थना करतो, "अहो वरदाईनी, तू कृष्णाचेच एक रुप आहेस. तू सदैव ब्रह्मचर्याचे पालन करतेस. उगवत्या सूर्यासारखे तुझे तेज आहे. तुझे मुख चंद्रासारखे सुंदर आहे, तुला माझा नमस्कार. तुझे चार हात शस्त्रधारी आहेत, चार मुख सगळ्या जगाकडे निरीक्षकाच्या दृष्टीने पहात असतात. तुझ्या मनगटात रत्नजडीत बांगड्या असतात. तुझ्या दंडावर दंडालंकार आहेत. तुझे तेज अविस्मरणीय आहे. तुझे आसन कमळात आहे. तू नारायणाची स्त्रीरुप आहेस. तुझा संचार तिन्ही जगात असतो. तुझे दोन हात इंद्राचे स्वागत करण्यासाठी पुढे केलेले असतात. तू जेव्हां काली असतेस तेव्हां तुझ्या हातात

कलश, कमळ, फासा, धनुष्य, सुदर्शन चक्र आणि कुर्हाड अशी सहा आयुधं असतात ज्यांच्या सहाय्याने तू जगाचे संरक्षण करत असतेस. तुझ्या अंगावर सापांचा विळखा असतो व तेंच तुझे वस्त्र असते. तुझ्या चेहर्यावर भयानक भेसूर भाव असतात. तुझी जिव्हा लाल व मुखातून लांब बाहेर आलेली असते. सगळ्या पाप शक्तींना तू आव्हान देत असतेस. तुझ्या कमरेला मुंडमाळा लटकत असतात. तू साक्षात मंदार पर्वतासारखी भव्य दिसतेस. तुझ्या माथ्यावर मोरपिसांची तुरा शोभेसाठी तू धारण केलेला आहेस. तू नित्य कुमारीका आहेस. त्या रुपात तू महिषासुराचा वध केला आहेस असें सांगतात. देवसुद्धा तुझी प्रार्थना करतात व तुला पुजतात राक्षसांपासून संरक्षण मिळवण्यासाठी. बिंबासुराचा मुलगा, महिषासूर त्याचा अनेक वर्षे लढून तू नाश करून स्वर्गाचे संरक्षण केले आहेस.

माझे तुला त्रिवार अभिवादन आहे. मला तुझ्या कृपेची गरज आहे, तू माझ्या भाग्याची देवता हो. तू जय व विजय आहेस. युद्धात जिंकण्यासाठी तुझ्या कृपेची आवश्यकता असते. मला असा वर दे कीं, मी जे युद्ध करीन त्यात मला जय प्राप्त हो. तुझे स्थान विंध्य पर्वत आहे. तुला काली म्हणून सुद्धा सांगतात, कारण तू काळ आहेस. तुझ्या प्रसादात मद्य, मांस आणि बळी द्यावे लागतात. तू सर्वसंचारणी, सर्वशक्तीमान, सर्वज्ञानीनी, तुझ्यामध्ये सदैव ब्रह्माचा संचार असतो. देव तुझ्या मदतीने त्यांची जोखमीची कामं करत असतात. युगांती सगळे तुझ्यातच विलीन होत असते. तुझी कृपा झाली कीं, काय मिळणार नाही असें नसते. तू तुझ्या भक्तांना सर्व प्रकारच्या संकटातून वाचवतेस. प्रवाशांना तूंच त्यांचा मार्ग दाखवतेस. तुझ्या संरक्षणात असलेले कधीच पराजित होत नाहीत. म्हणून मी तुझ्या कृपेची भिक मांगत आहे. यश, संपत्ती, पुत्रप्राप्ती असें सगळे गृहस्थाला हवे ते तुझ्या कृपेने मिळते. जर भक्त सात्विक गुणाचा असेल तर तू चटकन त्याच्यावर कृपा करतेस. रजोगुणी असेल तर थोडा अवधी घेतेस व तमोगुणी असेल तर त्याला त्याचे गुण सुधारण्यास प्रवृत्त करतेस अशी तुझी ख्याती आहे, परंतु, तू कोणालाही नाउमेद करत नाहीस. तू बुद्धी, प्रज्ञा आहेस. तू म्हणजेच सगळे ज्ञान आहेस.

तूंच प्रकाश आहेस जे सूर्य चंद्राकडून येत असतात. तूंच क्षमा आहेस, तूंच सौंदर्य आहेस, तूंच दयाबुद्धी आहेस व तूंच दंड आहेस. तुझ्या कृपेने अज्ञान रुपी अंधार नाहीसा होतो. तुझ्या भक्तांने तू संरक्षण करतेस, रोगांपासून, चोरांपासून, राजाच्या अवकृपेपासून, म्हणून मी तुझी भक्ती करत आहे, मी सात्त्विक आहे म्हणून माझ्यावर लवकर कृपा कर. माझ्या संकटातून माझी सुटका कर. मी तुला शरण आलो आहे. आम्ही पांडव सत्याने वागणारे आहोत म्हणून आम्हाला तुझी मदत मिळावी अशी मी विनंती करत आहे".

वैशंपायन पुढे सांगतात, अशारितीने पांडवांनी तिची स्तुती केल्यानंतर ती साक्षात देवता त्याच्यापुढे प्रकट होते. आणि युधिष्ठीराला सांगते, "अरे महाबली राजा, माझे ऐक, माझ्या कृपेने तू कौरवांचा नाश केल्यावर तुला यश प्राप्त होणार आहे. तू पुन्हा एकदा ह्या पृथ्वीचा राजा होणार आहेस. तू सगळी पृथ्वी पाप विरहीत करून टाकशिल. त्या कमात तुला तुझे बंधू मदत करणार आहेत. त्यामुळें तुला परमानंद होणार आहे, आरोग्य, धन संपत्ती आणि वैभव असें सगळे जे एक गृहस्थ मागत असतो ते सगळे तुला व तुझ्या परिवाराला उदंडपणे मिळणार आहे. तुमची सगळ्या पापापासून मुक्तता होईल. मी तुम्हाला संतती, संपत्ती, राज्य योग देणार आहे ज्याचे मार्कंडेय प्रत्यक्षदर्शी साक्षीदार असतील. ज्या दिवशी तुमचा विजय होईल तो दिवस सगळे आनंदाने माझी पुजा करून साजरा करतील. आणि अरे राजा, तुझ्या प्रमाणे जे माझी स्तुती करतील त्यांच्या सगळ्या इच्छा पूर्ण होतील मग तो कोणीही असो. कोठेही असो. कसाही असो. माझ्या कृपेमुळे तुम्हाला तुमचे शत्रू हुडकून काढू शकणार नाहीत. तुम्ही विराटाच्या नगरीत पूर्णपणे सुरक्षित अहात. अशाप्रकारे त्याला धीर देऊन ती महादेवी अंतर्धान पावते.

अशारितीने पांडव प्रवेश पर्व, विराट पर्व सहावा भाग संपला.

## पांडव प्रवेश पर्व

## भाग सातवा

वैशंपायन पुढे सांगतात, देवीची कृपा संपन्न केलेला तो पांडव त्याच्या ब्राह्मण वेशात द्युताच्या सोंगट्या व फांसे जे सोने व निलमणी ह्यांच्यापासून बनवलेले होते, त्याच्या धोतरात गुंडाळून खाकेत पकडून तो विराटाच्या दरबाराच्या दिशेने निघतो.

तो कुरुवंशाचा राजा, ज्याच्या मुखावर ते राजबिंडेपण प्रत्यक्ष जाणवत होते, ज्याच्या तोंडावर दैवी तेज झळकत होते, परंतु, काळ्या ढगाने मळलेला सूर्य जसा मंदपणे चमकतो तसा कांहींसा झालेला तो सामर्थ्यवान राजा त्याच्या अज्ञातवासातील पहिली पावलं टाकत असतो. राजा विराट युधिष्ठीराला पहातो व त्याच्याकडे एकटक पहातच रहातो. तो त्याच्या कारभार्यांना आमात्यांना विचारतो कीं, "हा कोण नवीन चेहरा आपल्या दरबारात आला आहे"? त्याच्या चेहर्यावरील तेज विलक्षण होते. तो कोणी ऋषीमुनी अथवा उच्च कोटीचा ब्राह्मण असावा असें राजाला वाटते. तो आपल्या राज्यातील नेहमीचा ब्राह्मण निश्चितच नाही. मग आहे तरी कोण? राजा विचारू लागतो. हा कोणी श्रेष्ठ प्रतीचा इसम आहे हे निश्चित हो विराट राजा समजतो. तो त्याच्या कारभार्यांना सांगतो कीं हा इसम कोण आहे त्याची चौकशी करावी. तो एकटाच आहे. त्याच्या बरोबर कोणी नोकर, गुलाम अथवा गाडीघोडासुद्धा नाही. मग हा आहे तरी कोण? त्याच्या मुखावरील प्रभा विलक्षण होती

त्यावरून हा कोणी सामान्य इसम नाही हे राजा समजतो. राजाची त्याच्या बद्दलची उत्कंठा वाढत जाते. त्याच्या बटा जटा पाहून राजा ओळखतो कीं, हा इसम उच्च कुलिन क्षत्रिय आहे. युधिष्ठीर त्याची वेळ येते तेव्हां राजाला सहजपणे पुढे होऊन वंदन करतो. ते पाहून राजा समजतो कीं, ह्याला दरबारी रितीरीवाजांची चांगलीच माहीती आहे. विराटाच्या मनात युधिष्ठीराबद्दल विशेष आस्था वाटू लागते जसें कांहीं ते विधीलिखीत होते. राजा त्याच्या विचारात गुंग असतांना युधिष्ठीर त्याच्या समीप जातो व स्वतःची ओळख करून देतो जसे पद्धतीत असते.

तो राजाला विनंती करतो, "अहो नृपाधिश, मी एक ब्राह्मण आहे, माझे नांव आहे कंक. माझे सगळे संपले आहे म्हणून मी आपल्या आश्रयाला आलो आहे. आपली ख्याती मी खूप ऐकली आहे. म्हणून मी आपली सेवा करण्याची फार इच्छा धरून आलो आहे व आपल्या पाशी रहाण्याच्या इराद्याने येथे आलो आहे". ते ऐकून राजा खूष होतो. तो युधिष्ठीराला बोलतो, "तुझे स्वागत आहे माझ्या राज्यात. तुला मी माझ्या पदरी ठेवण्यास तयार आहे. युधिष्ठीराला त्याच्या जन्मदात्याच्या कृपेमुळें तेथे काम मिळते. त्यानंतर तो वृद्ध राजा त्याला विचारतो, "अरे मुला, ह्या आधी तू कोठे काम करत होतास. तुझे खरे नांव काय व तुझे कुटूंब कोठले ते सांग". युधिष्ठीर त्याला सांगतो, "माझे नांव कंक आहे. मी वैयाघ्र गोत्राचा आहे. मी द्युत खेळण्यात तरबेज आहे परंतु, खोटा खेळ मी खेळत नाही. मी ह्या आधी राजा युधिष्ठीराकडे कामाला होतो. त्याचे व माझे संबंध चांगले होते परंतु, त्याच्यावर दुर्दैवाचा घाला झाला आहे म्हणून मी इतरत्र काम शोधत आहे".

ते ऐकून राजा विराट त्याला सांगतो कीं, "तो कंक ब्राह्मणाला काम देण्यास तयार आहे. तुला जे पाहिजे माझ्या राज्यातले ते सगळे मिळेल. मला द्युत खेळणारे आवडतात. त्यांची चतुराई मला फार आवडते. तू माझ्या मते एक राजा असावास असें वाटते. तू खरे पहाता एका राज्याची अधिपती असायला पाहिजेस परंतु, तू सांगतोस कीं तू एक ब्राह्मण आहेस तर ठीक आहे. मी त्यावर विश्र्वास ठेवतो".

युधिष्ठीर त्याला बोलतो, "माझी आपल्याला एक विनंती आहे कीं, मला द्युतावरून वाद करावयाला आवडत नाही. जर मी हरले तर हरलो व जर जिकलो तर जे मी जिंकेन ते माझे होईल. मला हा वर आपण द्यावा".
विराट राजा त्याला मान्यता देतो. राजा त्याला बोलतो जर कोणी तुझ्याशी वाद केला तर मी त्याला ठार मारीन. नाहीतर त्याला माझ्या राज्यातून हाकलून देईन. त्यानंतर राजा त्याच्या सभेकडे पाहून जाहिर करतो कीं, ऐका सर्वांनी, कंक हा माझ्या इतकाच महत्वाचा असेल आज पासून. तो माझ्या गाडीतून प्रवास करेल. त्याला माझ्या सारखे मौल्यवान कपडे घालावयाला मिळतील. त्याला जे खाण्यापिण्यास पाहिजे ते दिले जावे. माझ्या घराचे दरवाजे कंकसाठी सदैव खुले असतील". नंतर कंक कडे पाहून राजा बोलतो, "जोवर तू माझ्या घरात रहात आहेस तोवर तुला कोणाचीही भिती बाळगण्याची आवश्यकता नाही. तू मला माझ्या कामात मदत करशिल. तुझ्याकडे जर कोणी कांहीं मागण्यासाठी आले तर ते तू मला सांगशिल व मी ते त्यांना तुझ्यावतीने देईन".
वैशंपायन पुढे सांगत असतात, अशारितीने विराट राजाला भेटून तो त्याला जे पाहिजे ते मिळवतो. त्यानंतर तो त्याच्या घरात आरामात राहू लागतो.
अशारितीने पांडव प्रवेश पर्व, विराट पर्व सातवा भाग संपला.

## पांडव प्रवेश पर्व

## भाग आठवा

वैशंपायन पुढे सांगत असतात, त्यानंतर त्याचा दुसरा भाऊ जो महाबली आहे तो राजाला भेटतो. एकाद्या खेळगड्यासारख्या त्याच्या हालचाली होत्या. परंतु, त्याचा बांधा पहाता कोणालीही धडकी भरेल असा होता. त्याच्या तोंडावरील तेज कमालीचे होते. परंतु, त्याच्या हातात एक पळी, एक झारा आणि कमरेला एक भला मोठा सुरा तलवारीसारखा लटकवलेला होता. तो स्वयंपाक्याच्या पेहराव्यात वावरत होता. त्याच्या अंगावर खानसाम्याचे कपडे होते, त्यात अंगावर काळा झगा होता. त्याचे रुप इतरांपेक्षा खूप निराळे होते. अशा पेहेरावात राजाने कोणाला पाहिले नव्हते. अशा स्वरुपात तो राजाला भेटतो. राजा त्याला त्याच्या एका सेवकाला पाठवून जवळ बोलावतो व त्याचे निरीक्षण करत रहातो. भिम सांगतो कीं, तो एक आचारी आहे, त्याचे नांव वल्लभ आहे. परंतु, राजाला ते पटेना. तो बोलला तू एकाद्या गंधर्वासारखा

दिसत आहेस. तुझे तेज एकाद्या राजाला लाजवेल असें आहे. राजा त्याला विचारतो, "तू कोण आहेस"? "दिसायला तू एकाद्या गंधर्वासारखा नाहीतर देवासारखाच वाटत आहेस". ते ऐकून भिम सांगतो, मी एक आचारी आहे. माझे नांव वल्लभ आहे. मी राजा युधिष्ठीराच्या पाकखान्यात काम करत असें परंतु, त्या राजाचे काय झाले ते सगळे जाणतातच, त्यामुळे मी आता कोठे काम मिळते कां, ते पहात फिरत आहे. आपल्याकडे जर काम मिळाले तर जसे युधिष्ठीर राजाला माझ्या पक्वान्नाने संतुष्ट करत असें, तसे तुम्हालासुद्धा मी खूष करीन. त्याचे ते मधूर बोलणे राजाला विशेष आवडते, राजा स्वतः स्वादिष्ट खाद्यपदार्थांचा मोठा शौकिन होता त्यामुळे तो त्याला कामाला ठेवतो. भिम त्याला त्याच्या इतर गुणांची तारीफ करत सांगतो की, तो एक शौकीया मल्लसुद्धा आहे व युधिष्ठाराची करमणूक तो मल्लयुद्ध म्हणजे कुस्त्या करून करत असें. ते ऐकल्यावर राजा विराटाला तो पसंत पडतो कारण राजा विराटाला सुद्धा कुस्त्यांचा मोठा शौक होता. राजा तरीसुद्धा मान्य करण्यास तयार नसतो कीं, हा एक सामान्य स्वयंपाकी आहे. परंतु, भिम त्याच्या बोलण्याने त्याला पटवून देतो कीं, तो कितीही रुबाबदार दिसत असला तरी तो एक आचारीच आहे. विराट त्याला बोलतो कीं, तो इंद्रा सारखा दिसत आहे. एकादा आचारी असा कसा दिसेल पण बाजूला बसलेले व नुकतेच त्याच्या दरबारात रुजू झालेले ब्राह्मण कंक त्याला सांगतात हळूंचपणे कीं, त्यांने वल्लभाला युधिष्ठीराच्या भटारखान्यात काम करत असलेले पाहिले आहे. त्याच्या हातचे खाद्य पदार्थ त्यानेसुद्धा चाखले आहेत, ते ऐकल्यावर राजा विराट त्याला त्याच्या कडे कामाला ठेवतो. वल्लभ त्याला सांगतो कीं, तो त्याची चांगलीच सेवा करून त्याला खूष करील. तो त्याच्याकडे काम करू लागतो व लवकरच तो राजाची मर्जी संपादनसुद्धा करतो. त्याच्या मधूर वागण्यामुळें त्या राजवाड्यातील सगळे त्याच्यावर खूष झालेले होते. तेथे तो त्याची खरी ओळख न दाखवता राहू लागतो. लवकरच तो विराटाचा मुख्य आचारी होतो.

अशारितीने पांडव प्रवेश पर्व, विराट पर्व आठवा भाग संपला.

## पांडव प्रवेश पर्व

## भाग नववा

वैशंपायन सांगत असतात, आता पाळी असते द्रौपदीची. तिला राजवाड्यात प्रवेश मिळवावयाचा असतो. तिचे काळोभोर कुरळे केस तिने मागे बांधलेले असतात. तिचे काळे डोळे व मुखावरील स्मित कोणालाही आकर्षित करण्या इतके प्रभावी होते. तिच्या कुरळ्या केसांच्या बटा तिने उजव्या खांद्यावर घेतलेल्या होत्या. तिच्या अगावर एकच वस्त्र काळ्या रंगाचे होते. त्याचे पोत महागडे होते परंतु, फार मलीन झालेले होते. जणू काय बरेच दिवस ते धुतलेले नव्हते. ती राजवाड्याच्या प्रवेश द्वारापाशी घुटमळत असते. लोकांना विचारत असते कीं, तिला कोणी सैरंध्रीचे काम देईल कां? परंतु, तिचे

अप्रतिम सौंदर्य पाहून कोणीही तिला कामाला लावण्याच्या बद्दल पहात नव्हते. कारण ती जशी दिसत होती एकाद्या राजघराण्याला शोभणारी होती त्यामुळें जनसामान्य तिला काम देण्यास धजत नव्हते. द्रौपदीचे ते राजवाड्याच्या सज्जात बसलेली विराट राजाची पत्नी पहात असते. अखेरीस तिला कुतूहल वाटते व ती तिच्या एका सेविकेला बोलावून सांगते कीं, त्या रस्त्यावर फिरणार्या बाईला तिच्याकडे आणावे. त्याप्रमाणे, ती सेविका रस्त्यावर धुटमळत असलेल्या द्रौपदीला वाड्यात घेऊन येते व राणी समोर उभी करते.

विराटाची राणी केकया घराण्याची कन्या असते. ती द्रौपदीला तिच्या बद्दल चौकशी करते. ती काय विचारत होती जनसामान्यांकडे असें ती विचारते. तिची ती अवस्था पाहून तिला द्रौपदीबाबत दया येते. चोकशीत द्रौपदी तिला सांगते, कीं, ती व्यवसायाने सैरंध्री आहे व नवीन काम ह्या नगरात शोधत आहे. ती सांगते कीं, ती ह्या आधी युधिष्ठीर राजाच्या पत्नीची जी पांचल नरेशाची एकुलती एक कन्या आहे, सैरंध्री म्हणून काम करत होती परंतु, जेव्हां पासून त्यांच्यावर संकट कोसळले आहे ती बेकार झाली आहे. राणी बोलते कीं, "तू दिसायला राजधराण्याची असल्यासारखे वाटते. परंतु, द्रौपदी ते नाकारते. ती राणीला बोलते, "अहो महाराणी मला राणीवशाच्या सगळ्या सवयी माहीत आहेत, जर तुम्हाला माझी सेवा पहायची असेल तर आपण मला तुमच्याकडे काम द्यावे. कारण माझ्या कडून काम करून घेण्या इतकी उच्च दर्जाची माणसे येथे मला दिसत नाहीत. ते ऐकून राणी सुदेश्ना तिच्या सौंदर्याची तारिफ करत बोलते कीं, "जर तुला मी कामाला लावले व माझ्या पतिने तुला पाहिले व त्याला तू आवडलीस तर माझे कसे होणार? तुझे सौंदर्य एका सेविकेचे नाही. ते एका राजघराण्यातील स्त्रीचे आहे, मग मी काय करणार? नोकराणी तशीच दिसली पाहिजे आणि ती राणीपेक्षा जास्त सुंदर असेल तर राणीचे काय होणार"?

ते ऐकल्यावर द्रौपदी तिला सांगते कीं, तिचा विवाह पांच गंधर्वांबरोबर झाला आहे व ते तिच्या संरक्षणात सदैव असतात. जर कोणी माझ्यावर तसा प्रसंग

आणण्याचा प्रयत्न करील तर ते तत्क्षणी तेथे प्रकट होतात व त्या माणसाचा बंदोबस्त करतात. म्हणून तसे कांहीं होणार नाही ह्याची मी आपल्याला खात्री देते. राणी पहाते कीं, ही बया फारच सुंदर आहे. तिच्या अंगातील विविध अवयव इतके प्रमाणबद्ध होते कीं, कोणाही पुरूषास ती आपल्याकडे खेचून घेईल. तिचे भरलेले स्तन, गोल व पसरलेले नितंब, तिच्या मांड्या लागून होत्या त्याच्यातून प्रकाश जात नव्हता. तिचे पाय वळणदार होते. तिच्या शरीराची ठेवण कामदेवीच्या सारखी होती, ती एकवस्त्रात असल्याने तिच्या शरीराचे सौंदर्य त्यातून खुलून येत होते. अशा स्त्रीकडे जर कोणी पुरूष आकर्षित झाला तर त्यात नवल काय, असें विचार तिच्या मनात येत होते. तिची वाणी सुमधूर होती. कोणी ऐकले तर त्याला तिचे बोलणे ऐकत रहावे अशी होती. तिच्या भरलेल्या उरोजातून तिचे स्त्रीत्व किती पूर्ण आहे ते समजत होते. कशाचीच कमी नव्हती व अशी स्त्री सैरंध्री आहे हे कोणालाही पटण्यासारखे तिला वाटत नव्हते. द्रौपदीच्या अंगाला एक सुगंध येत होता जो पुरूषाला आकर्षित करण्यात पुरेसा होता. राणी तिला बोलते, "अग सैरंध्री, तू तर साक्षात लक्ष्मी वाटत आहेस मग अशी कशी तुझी अवस्था झाली"? द्रौपदी तिला सांगते, माझे सौंदर्यच मला सामान्य लोकांत काम मिळवण्यात अडचण आहे परंतु, मी त्यात कांहीं करू शकत नाही. तू स्वतःला सैरंध्री म्हणून सांगतेस पण माझे कान ते मानण्यास तयार नाहीत. तू कांहींतरी लपवत आहेस असे मला वाटते. तू अप्सरा, गंधर्व कन्या नाहीतर नाग कन्या असे कांहीं असू शकतेस पण सामान्य मानवी स्त्री आहेस हे मला पटत नाही. एकाद्या देशाची संरक्षक देवता असते व तीसुद्धा अशीच कफल्लका सारखी फिरत असते म्हणून मला वाटते तू तशी कोण असशिल तर तुला मी कसे कामाला लावणार"? त्यानंतर यमदेवाचा पांडवाना दिलेला आशिर्वाद काम करू लागतो व एकदम राणी तिला कामाला लावण्यास तयार होते. द्रौपदी तिला निक्षून सांगते कीं, ती एक मानव आहे. मी एक सेविका आहे व सैरंध्री म्हणून काम करू इच्छिते. द्रौपदी ते तिला पुन्हा पुन्हा सांगत असते. ती सांगते की ह्या पूर्वी ती पांडवांची बायको कृष्णा हिची सैरंध्री होती तसेंच त्या

आधी ती सत्यभामाची सैरंध्री होती अशी सगळी माहीती ती त्या राणीला सांगते. जोवर मला चांगले कपडे व खाणे मिळते तोपर्यंत मी त्या ठिकाणी काम करते. मी विविध फुलांच्या माळा करून राणीला घालत असे. त्यात चंपक, मोगरा, जाई, जूई, अशा फुलांच्या माळा असतं. ती सांगते कीं, "ती स्वतःला मालिनी म्हणून सांगते. कारण, फुलांच्या माळा करण्यात तिचा हातखंडा आहे. राणीला सजवणे हे काम ती उत्तमरित्या करते. ते ऐकल्यावर राणी तिला सांगते, "ते सगळे मान्य परंतु, पुरूषांच्या नजरेतून तुला कसे दूर ठेवावयाचे हांच मला प्रश्न आहे. तुझे स्मित हास्य, तुझे बोलणे, तुझा आवाज, तुझे चालणे, तुझ्या इतर हालचाली हे सगळे कोणाही पुरूषाला भारून टाकणारे आहे त्याची मला फिकीर आहे. द्रौपदी तिला सांगते, "अहो राणी सरकार, दोन हाता शिवाय टाळी वाजत नाही हे आपण जाणता, मला तुमच्या पतीत अजिबात रस नाही त्यामुळें जर कां त्यांने कांहीं आगाऊ पणा केला तर त्याला मी साफ झिडकारीन प्रसंगी त्याचा उपमर्दसुद्धा करीन मग तो माझ्या वाटेलासुद्धा जाणार नाही. म्हणून त्या बद्दल माझे आपल्याला आश्र्वासन आहे कीं, तुमची राणी म्हणून जागा अबाधित असेल. मी एक पतिव्रता आहे व त्यामुळें आपल्याला तशा प्रकारची चिंता करण्याची अजिबात गरज नाही. द्रौपदीच्या त्या बोलण्याने सुदेश्ना सुखावते व तीला तिच्या कडे कामाला लावते. तिची जागा तिला देते. त्यानंतर द्रौपदी सुदेश्नाला सांगते कीं, ती कोणाचे उष्टे खात नाही व कोणाचे पाय चेपणार नाही. ह्या तिच्या अटी मान्य झाल्या पाहिजेत.

यमदेवाच्या कृपेमुळें सगळे व्यवस्थित होत असते. वैशंपायन सांगतात, जनमेजयाला.

सुदेश्ना तिला आश्र्वासन देते कीं, तिच्या अटी मान्य आहेत व त्यानंतर द्रौपदी विराटाच्या घरात सैरंध्री म्हणून काम करू लागते. ती सदैव राणीवसात असावयाची व कधी बाहेर येत नसें, त्यामुळे तिचे अस्तित्व कोणालीही जाणवणारे नव्हते. अशारितीने तिचा अज्ञातवास सुरू झाला. अशारितीने पांडव प्रवेश पर्व, विराट पर्व नववा भाग संपला.

# पांडव प्रवेश पर्व

## भाग दहावा

वैशंपायन सांगतात, आता सहदेवाचे काय झाले ते सांगतो, ऐक जनमेजया, सहदेव गुराख्याच्या कपड्यात राजाच्या पशुगृहाभोवती फिरत असतो, राजाचे पशुधन न्याहाळत असतो. राजाचे सेवक ते पहातात व राजाला सांगतात. त्या सरशी राजा त्या युवकांला घेऊन येण्याची आज्ञा करतो. राजा त्याला पहातो व आश्र्चर्यचकीत होतो. हा असा गुराखी इतका तेजस्वी, राजबिंडा गुराखी त्यांना आजवर पाहिलेला नसतो.

राजा त्याची चौकशी करतो व विचारतो कीं, तो ते पशुधन कशासाठी इतके जवळून न्हाहाळत होता? "तू कोण व येथे नवीनच दिसतोस तर तू माझ्या राज्यात कां आला आहेस"? सहदेव प्रथम नमस्कार करतो व राजाला रिवाजानुसार अभिष्टचिंतन देतो व मग सांगतो की, तो एक पशुविद्या जाणणारा आहे व तो नवीन नोकरी शोधत आहे. पुढे तो सांगतो कीं, "ह्या आधी मी युधिष्ठीराचे पशुधन पहात असें, सध्या काम शोधत आहे. मी वर्णाने वैश्य असून माझे नांव अरिष्टनेमी आहे. सध्या ते पांडव कोठे गेले आहेत कांहीं माहित नाही. मला नोकरीची फार गरज आहे. मी आपल्या पशुंत बरेच दोष दिसत आहेत ते काढून त्यांना चुस्तपुस्त करण्यास तयार आहे. त्या दृष्टीनेच मी आपले पशुधन न्हाहाऴत होतो दुसरा कांहीं उद्देश त्या मागे नाही. आपण जर मला संधी दिली तर, आपली गुरं युधिष्ठीराच्या पशुधना सारखी निरोगी व पुष्ठ करून देईन".

अरिष्टनेमीचे ते बोलणे ऐकून विराट राजा त्याच्या कडे नुसता पहात रहातो. थोडा वेळ तशाप्रकारे पाहिल्यानंतर राजा त्याला विचारतो, तुझी कांती, मुद्रा पहाता तू कोणी राजपुत्र आहेस असेंच प्रथम मला वाटले, एकाद्या मोठ्या राज्याचा स्वामी असावा असें तुझे स्वरुप आहे. राजा त्याच्या मंत्र्यांना सांगतो, आजच माझ्याकडे एक कंक नावाचा ब्राह्मण आला तोसुद्धा युधिष्ठीराकडेच काम करत होता. त्या कुरूवंशाच्या राजाचे काय झाले ते समजत नाही. कुटूंब कलह एकाद्या परिवाराचे कसे हाल करू शकतो त्याचे हे

उदाहरण आहे. तुम्ही कोणीही असा, जर तुमचे कुटूंब कलहात अडकले तर तुमची कशी दुरावस्था होते ते पंडुंच्या मुलांवरून आपण शिकले पाहिजे. आता हा तिसरा त्यांचा सेवक आहे जो सांगतो कीं, तो युधिष्ठीराकडे काम करत होता. युधिष्ठीराकडे काम करणारे सगळे इतके प्रसन्न मुद्रा व तेजस्वी आहेत त्याचे मला विलक्षण नवल वाटते. विराट त्याला बोलतो, तू ब्राह्मण अथवा क्षत्रिय असावास पण तू सांगतोत कीं तू वैश्य आहेस, मला ह्या सगळ्या गोष्टी ज्या आजच होत आहेत त्याचे नवल वाटते. राजाचा मंत्री त्याला बोलतो कदाचित आणखीन कांहीं असेच तज्ज्ञ लोक युधिष्ठीरा कडे काम करणारे आपल्याकडे येतील. त्यांना आपल्यात सामावून आपण आपले राज्य अधिक समृद्ध करू शकू.
राजा सहदेवाला विचारतो, "त्या तुझ्या आधीच्या मालकाच्या कडे किती पशुधन होते ते मला सांग म्हणजे मला समजेल तुझ्या क्षमतेचा अंदाज"?
सहदेव सांगतो, "पंडुच्या मोठ्या भावाचे एकट्याचे आठ लक्ष दहा हजार होते. त्याशिवाय त्याच्या भावांचे प्रत्येकी वीस हजार होते. माझ्या ज्ञानामुळें मला लोक तंत्रीपाल म्हणत असतं. मला पशुचे वर्तमान, भविष्य त्याच्या मुताची परीक्षा घेऊन सांगता येते इतका माझा त्या तंत्राचा अभ्यास आहे. माझ्या ज्ञानावर माझे आधीचे मालक फार खूष होते व मी समजत होतो कीं, मी तेथेच राहीन परंतु, भाग्या कांहीं वेगळेच ठरवत आहे. जनावरांची संख्या कशी वाढवावयाची ते मला माहित आहे. भाकड गाय माजावर कशी आणण्याचे ते तंत्र मला माहित आहे. त्यामुळें जर आपण मला कामाला ठेवले तर मी तुमच्या पशुधनात भरपूर वाढ करून देईन. गाईतील कोणती गाय पुजनीय व कोणती खाण्याच्या योग्यतेची ते मला चांगलेच समजते. त्यामुळें चुकीच्या गाई कापल्या जात नव्हत्या. सगळ्याच गाई पुजावयाच्या नसतात हे आपल्याला माहित असेलच. त्याप्रमाणे त्यांची जोपासना करावयाची असते ती कशी करावयाची ते मला चांगलेच ज्ञात आहे. कोणता वळू शेतावर न्यावयाचा व कोणता प्रजोत्पादनासाठी राखून ठेवावयाचा तसेंच धावण्याच्या शर्यतीसाठी बैल कसा तयार करावयाचा ते सुद्धा पशुविद्येत महत्वाचे असते, ते

सगळे मी जाणत आहे". विराट राजा त्याला सांगतो, "माझ्याकडे एक लक्ष गाई आहेत. त्यांची तुला वाढ करता येईल कां? तसेंच त्यांना निरोगी ठेवण्याचे कसब तुझ्याकडे असेल तर ते माझ्या कामाचे आहे". सहदेव सांगतो, "हो राजेसाहेब, ती सगळी कसब माझ्याकडे आहे". विराट त्याला त्याचा प्रमुख पशुतज्ज्ञ म्हणून नेमतो. त्याला रहाण्यासाठी चांगली जागा मिळते. अशारितीने पांडव प्रवेश पर्व, विराट पर्व दहावा भाग संपला.

## पांडव प्रवेश पर्व

## भाग अकरावा

वेशंपायन पुढे सांगतात जनमेजयाला, आता सांगतो धनंजयाची कशी वर्णी विराटाच्या राज्या लागते. त्या दिवशी विराटाच्या नगरीच्या सीमेवर एक उंचा पुरा नपुसक उभा असलेला लोक पहातात. त्याच्या दोनही हातावर वरपासून खाल पर्यंत उंची कंगण तो नेसलेला होता. त्याचे सौंदर्य कमालीचे होते. त्याच्या अगावर उंची वस्त्र होती. त्यामुळें त्याचे सगळे अंग झाकलेले होते. त्याचे लालचुटूक ओठ सूर्याच्या उन्हात चमकर होते. विराटाच्या नगरीत नपुसक होते परंतु हा वेगळाच होता. त्याच्या कानात मोठाली कर्ण कुंडलं होती जी तिच्या मानेला लागत होती. नपुसकाप्रमाणें तो थोडा झुकत झुलत चालत राजवाड्याच्या दिशेने जात होता.

इंद्राच्या किमयेने उर्वशीच्या शापाची वेळ योग्य जुळवून घेतली होती त्यामुळें ते जमत होते, वैशंपायन जनमेजयाला सांगतात.

त्या नपुसकाचे केस खूप लांब लचक त्याच्या ढुंगणा पर्यंत रुळत होते व तो ते केस खुबीने झुलवत झुलवत चालत होता. त्याची चाल एकाद्या गजगामिनी सारखी होती परंतु, तो एक हिजडा होता. तो थेट निर्भयपणे राजाच्या सभेत येतो व राजाच्या समोर उभा रहातो. तो अर्जुन तेथे उभ्या उभ्या पहातो कीं, त्याचा मोठा भाऊ आधीच राजाच्या डाव्या बाजूला असलेल्या आसनावर विराजमान झालेला आहे. ते पाहून त्याचा उत्साह द्विगुणीत होतो. त्याला येतांना पाहून राजा मोठ्याने विचारतो हा कोण आहे. नंतर त्याच्या लक्षात

येते कीं हा एक किन्नर आहे, त्याला राजवाड्यातील मुलींना नृत्य व संगीत शिकवण्याची नोकरी पाहिजे अस त्याचे कारभारी सांगतात.
राजा त्याला विचारतो, "तू कोठून आला आहेस"? मी तुला कधी आमच्या राज्यात पाहिलेले नाही. राजाचे कारभारी त्याला सांगतात कीं, ह्या इसम आपल्या राज्यातील नाही व बाहेरून आला आहे. तेव्हां राजा त्याच्याकडे पहातच रहातो. इतका सुंदर किन्नर त्याने आजवर पाहिलेला नव्हता. राजा त्याला बोलतो, "तू नपुसक आहेस हे कसे समजावयाचे? तू एकाद्या दैवी शक्ती सारखा कां दिसतोस ते समजत नाही. तुझ्या पूर्वजांची चौकशी करण्यात कांहींच तथ्य नाही. तरी तुला येथे काय काम करावयाचे आहे ते बोल. तू राजघराण्याशी निश्र्चितच संबंधित असला पाहिजेस. जर तू मुलगा असतास तर तुला मी मांडीवर घेतले असते व हे राज्य तुझ्या सुपूर्द करून बसलो असतो परंतु, तू एक किन्नर आहेस त्यामुळे माझा भ्रम होत आहे. तू हिजडा आहेस ह्यावर माझा विश्र्वास बसत नाही". ते ऐकल्यानंतर शांतपणे अर्जुन त्याला वंदन करून सांगतो, "अहो राजश्री, मी आपल्या कल्पनांची कदर करते परंतु, वस्तुस्थिती तशी नाही आहे. मी एक गाणारी व नृत्य करणारी व शिकवणारी किन्नर आहे. मला आपले राज्य नको, मला फक्त एक नोकरी द्यावी कारण मला समजले कीं, आपल्या राणीसरकारनां त्यांच्या मुलीला व इतर वाड्यातील मुलींना संगीत व नृत्य शिकवण्याची इच्छा आहे, म्हणून मी ती नोकरी मिळते कां ते पहाण्यासाठी आले आहे. मला जर ती नोकरी मिळाली तर माझे भले होईल कारण मला सध्या नोकरीची फार निकड आहे. मी उत्तम संगीत व नृत्य करते व त्याचे जर आपल्याला प्रात्यक्षिक पहावयाचे असेल तर येथे मी आत्ता एक नृत्य प्रकार सादर करून दाखवते".
राजा त्याला विचारतो, "पण, तू असा किन्नर कसा उपजलास कां आणखीन कांहीं झाले व तू असा झालास. असें विचारावयाचे कारण माझे मन मला सांगते कीं, ते खरे नाही. परंतु, प्रत्यक्ष तसेंच दिसत आहे". अशामुळे माझ्या मनाचा गोंधळ होत आहे. त्यानंतर अर्जुन सांगतो, "अहो राजश्री, माझे नांव आहे बृहन्नला. मी सर्वप्रकारचे नृत्य प्रकार करू शकते". असें झाल्यानंतर

राजाचे मंत्री तिला कोठलाही एक नृत्य प्रकार सादर करण्यास सांगतात. बृहन्नला नाचून दाखवते व त्या नृत्याने सगळे सभासद थक्क होतात. ते नृत्य विलक्षण प्रभावी होते. त्यानंतर बृहन्नला सांगते, राजाच्या सभेला कीं, "आपण माझी नृत्य कला पाहिली आता माझे गाणे ऐका म्हणजे आपल्याला समजेल कीं, मी तुमच्या मुलींना शिकवण्यासाठी लायक आहे कीं नाही".

राजाला अजून उत्सुकता असते कीं, हा हिजडा कसा झाला? त्यामुळें तो अर्जुनाला तोंच प्रश्न पुन्हा विचारतो. ते ऐकल्यावर बृहन्नसा राजाला विनंती करते कीं, "आपण थोर अहात म्हणून मला क्षमा करा परंतु, हा प्रश्न कृपया विचारू नका. मला त्या गोष्टींची आठवण सुद्धा क्लेष देते तरी तो सोडून आणखीन कोणताही प्रश्न विचारा. मला माता नाही व पितासुद्धा नाही अशी मी आहे, त्यावरून आपण काय ते समजा". विराट राजा स्वभावाने प्रेमळ होता. तो तिची अडचण कल्पनेने समजतो व तो विषय सोडून देतो.

राजा तिला विचारतो, "बरे ते राहू दे, परंतु आजवर तू कोठे होतीस व काय करत होतीस"? बृहन्नसा सांगते, "मी पांडवांच्या इंद्रप्रस्थात रहात होती व तेथे नृत्य व संगीत शिकवत होते, माझ्या कडून महाराणी प्रत्यक्ष द्रौपदी ह्यांनी संगीताचे धडे घेतले आहेत". परंतु, आता त्या राज्यात तशी परिस्थिती राहिलेली नाही. आता जे तेथे राज्य करतात त्यांना चांगल्या कलाविद्याचे कांहीं देणेघेणे उरलेले नाही. म्हणून मी ते शहर सोडून इतरत्र कोठे चांगले काम मिळते कां, ते शोधत शोधत आपल्या राज्यात आले आहे. ते ऐकल्यावर राजाच्या डाव्या बाजूला बसलेले कंक ब्राह्मण राजाकडे झुकतात व सांगतात कीं, "त्यांनी त्या किन्नराला वाड्यात द्रौपदीराणीला शिकवण्या करतांना पाहिल्याचे आठवते". ते झाल्यावर एक उपचार म्हणून बृहन्नसेला राजाच्या स्त्री सेविका घेऊन जातात व तिची चाचपणी होते कीं, खरोखरच नपुसक आहे कां ते पहावयाचे होते. त्यांच्याकडून समजते कीं, बृहन्नसा खरोखरची नपुसक आहे. त्यानंतर अर्जुनाला वाड्यातच रहावयाला मिळते व तो राजाच्या मुलीला, उत्तराला संगीत व नृत्य शिकवू लागतो. लवकरच तो वाड्यातील सगळ्या महिला मंडळींची मनं जिंकतो व आरामात राहू लागतो.

अशारितीने पांडव प्रवेश पर्व, विराट पर्व अकरावा भाग संपला.

## पांडव प्रवेश पर्व (संपले)

## भाग बारावा

वैशंपायन सांगत असतात, जनमेजया आता सांगतो नकुलानी त्या वाड्यात कसा प्रवेश मिळवला. थोड्या काळानंतर पांडवांपैकी नकूल त्या राज्याच्या प्रवेशद्वारातून आत येतो. तो जलदीने आपली पावले टाकत असतो. त्याचे पुरूषी सौंदर्य कमालीचे होते. इतका सुंदर पुरूष कदाचितच कोणी आधी पाहिला असेल असा तो दिसत होता. तो थेट राजाच्या पागेकडे जात असतो. तेथे राजाचे घोडे ठेवलेले असतात. तेथे असलेले राजाचे सेवक त्याला पहातात, ते राजाला कळवतात व राजा त्या विलक्षण देखण्या तरुणाला राजसभेत बोलावतो. तो तरुण म्हणजे आपला नकूल सभेत येतो त्याला पाहून राजा कमालीचा आश्र्चर्यचकीत होतो. त्याच्या देखणेपणाने तो भारावून जातो. त्याच्या तोंडावरील तेज सगळ्यांना प्रभावित करत असते. तो साक्षात अश्र्विनीकुमार दिसत होता, त्याच्या पित्याचे अप्रतिम सौंदर्य त्याच्यात उभारून आलेले दिसत होते.

राजा त्याला विचारतो कीं, "तू कोण आहेस व राजाच्या पागेत काय करत आहे"? तू कोणी योद्धा आहेस कां"?

राजाकडे आदरपूर्वक पहात नकूल बोलतो, "आपल्याकडे फार चांगले घोडे आहेत. मी अश्र्वविद्या जाणणारा आहे".
राजा त्याच्या प्रभावी व्यक्तीमत्वामुळें त्याला जास्त कांही न विचारता त्याच्या पागेचा प्रमुख म्हणून नेमतो, कारण त्याचा अश्र्वविद्या जाणणारा नुकतांच यमाला प्यारा झाला होता व ती एक जागा खाली होती. ती नकूलाला मिळते.
राजा त्याला त्याचा पूर्वेतिहास विचारतो तेव्हां, ठरल्या प्रमाणे तो सांगतो कीं तो युधिष्ठीराच्या पागेचा प्रमुख होता. त्यानंतर राजा त्याला विचारतो कीं, आणखीन काय काय त्याला समजते.
नकूल सांगतो युधिष्ठीराच्या पागेतील नाठाळ घोड्यांना त्यांने वठणीवर आणले आहे. तो एक व्यवसाय आहे जो त्याला खूप आवडतो. तो पुढे सांगतो कीं, तो घोड्यांबद्दल सगळे जाणतो. त्यांचे रोग, त्यांचा खुराक, त्यांचे व्यायाम, त्यांच्याकडून कसरत कशी करून घ्यावयाची वगैरे बरेच कांहीं तो चांगले जाणत आहे.
विराट त्याला पागेचा प्रमुख नेमतो व चांगला पगार सुद्धा देतो. त्याची रहावयाची सोय करतो. विराट त्याला सांगतो कीं, ह्यापुढे विराटाच्या राज्यातील राजाचे घोडे, घोड्या, रथ, इतर गाड्या ह्या सगळ्या गोष्टी त्यांने व्यवस्थित ठेवावयाच्या. असें काम त्याला दिले.
त्याच्या देखणेपणामुळें राजाला विशेष कुतूहल वाटत असते. तो नकूलाला बोलतो, अरे मुला, तू कोणाचा मुलगा ते सांग. तू राजा होण्याच्या योग्यतेचा आहेस, घोडे सांभाळणे हे काम तुला शोभत नाही. माझ्या मते मी तुला माझा जावई करून घेण्याचा विचार करत आहे.
यमाच्या आशिर्वादाचा प्रभाव सगळ्या पांडवांना जाणवत होता. कारण इतक्या सहजपणे त्यांची सगळी सोय झाली कीं, तो एक चमत्कारच म्हणावा लागेल. वैशंपायन सांगतात, विराट नकूलाला विशेष चांगली वागणूक देतो त्याचे सगळ्या सभेला नवल वाटते.

विराटाच्या घरात त्या सगळ्या पांडवांचे फार चांगले स्वागत होते व ते तेथे त्यांचा अज्ञातवास बिनदिक्कत घालवत असतात. तेथे कोणीही त्यांचे खरे रुप ओळखत नाही व कोणाला त्यांचा संशयसुद्धा येत नाही.
ते आपल्या सगळ्या दुःखाना विसरून तेथे रहातात.
अशारितीने पांडव प्रवेश पर्व, विराट पर्व भाग बारावा संपला.

## समय पालन पर्व
## भाग तेरावा

जनमेजय वैशंपायनांना विचारतो, "अहो ब्राह्मण, मला सांगा, मत्स्यदेशामध्ये रहात असतांना अज्ञातवासात माझे पणजोबा काय करामती करत होते".
वैशंपायन ऋषी सांगू लागतात, जनमेजया, ऐक तुझे पूर्वज तेथे काय करत होते त्याची कथा. ते राजा विराटाची मर्जी संपादन करून तेथे आरामात रहात होते. कोणीही त्यांना ओळखत नव्हते. ऋषी त्रिनाविंदू आणि साक्षात मृत्यूदेवांची कृपा असल्यामुळें त्याना अज्ञातवास सांभाळणे बरेच सोपे झाले होते. विराट राजा व त्याची मुलं युधिष्ठीराच्या खर्या द्युतामुळें त्याच्यावर प्रसन्न होते. युधिष्ठीर त्यांना द्युताचे विविध डाव शिकवत असें व ते तो खेळ म्हणून खेळत असत. द्युतातील राक्षस युधिष्ठीरानी त्यांना दाखवला नव्हता कारण तो स्वतः त्या राक्षसाला भित होता. अशात राजाने दिलेली संपत्ती तो ज्येष्ठ पांडव गुपचुपपणे आपल्या भावंडांकडे व पत्नीकडे पाठवत असें. त्याच प्रमाणे, भिम भटारखान्यातून मांस, मद्ये व इतर पेये आपल्या भावांसाठी

काढून आणत असें. द्रौपदी तिच्या राणीच्या निमित्ताने वेळोवेळी भटारखान्यात जाऊन भिमाशी संपर्क ठेवत असें. तेथे ती तिला जे हवे ते खात असें. अर्जुन बृहन्नलेच्या रुपात जी मिळकत होत असें ती आपल्या भावांत वाटत असें व पत्नीला चांगले चुंगले वस्त्र आणून देत असे. तेथे त्यांच्यावर सगळ्यांची उत्तम मर्जी असल्यामुळें, कोणीही त्यांच्या अशा हरकती मनावर घेत नव्हते उलट त्यांना मदतच होत असें. सगळी यमाची कृपा, हे स्पष्टपणे जाणवत होते. सहदेव भिमासाठी चरव्या भरून दूध आणून देत असे. नकूल व सहदेवांनासुद्धा बर्यापैकी मिळकत होत असें ते ती त्यांच्या भावंडांत व द्रौपदीला वेळोवेळी देत होते. कोणालाही धन संपत्तीचा लोभ नसल्यामुळें ते सगळे संतुष्ट जीवन तेथे व्यतीत करत होते. द्रौपदी स्वतः अतिदुःखी असूनही तिच्या पांचही नवर्यांकडे लक्ष देऊन असें. जरी ते शरीराने दूर होते मनाने मात्र फार जवळ होते. अशारितीने एकमेकांच्या गरजा पुरवत ते त्यांचा अज्ञातवास काढत होते. ते पांचही पंडुचे पुत्र आपल्या एकमेव पत्नीच्या सुरक्षिततेचा सुद्धा विचार करत होते. विविध सबबी करून ते एकमेकांना भेटत व बोलत पण त्याबद्दल कोणाला कांहीं शंका येण्यासारखे त्यात कांहींच नव्हते कारण वाड्यातील लोकांना माहित होते कीं, ते एकेकाळी युधिष्ठीराच्याकडे काम करत होते व म्हणून एकमेकांना ओळखत आहेत.

अशारितीने काळ सरकत होता. चौथ्या महिन्याच्या सुमारास त्या मत्स्य देशांत एक मोठा सोहळा सुरू होणार असतो. ब्रह्मदेवाच्या नांवांने तो होत असें. त्याची तयारी सुरू झाली. त्या निमित्ताने विविध देशांतून मल्ल, नाचणारे, गायक असें सगळे मनोरंजन करणारे विराट नगरात येऊ लागतात. त्या मध्ये, मल्लांचा विशेष भर होता कारण राजा विराटाला मल्लयुद्धाचा मोठा शौक होता. हजारो कुस्तीगिर तेथे आले होते. त्यांच्यासाठी रहाण्याची चांगली व्यवस्था केलेली होती. तो सोहळा साजरा करण्यासाठी स्वतः ब्रह्मदेव आणि शीव येत असतं. त्यांच्या स्वागतासाठी मोठे मोठे मल्ल आले होते. ते देवलोकातून आले होते. त्यांची शरीर फार प्रचंड होती. त्यात कांहीं राक्षस होते. त्यातील एकाचे नांव होते, कालखांज. त्यांना त्यांच्या शक्तीची घमेंड

होती व तो सगळ्यांना आव्हानं देतच फिरत होता. त्याची छाती सिंहांची होती व दंड हत्ती सारखे होते. तो लोकांना धक्के देत जात असें. परंतु, लोक कांहीं न बोलता गुपचुपपणे बाजूला होत असतं. तो कालखंज अनेक कुस्त्या जिंकलेली होता, त्याने अनेक मल्ल हरवल्यानंतर आवळून ठार मारलेले असतात. विराट राजाचा तो आवडता होता. कुस्त्याचे फड सुरू झाले तेव्हां रिंगणात उभा राहून तो सर्व मल्लाना आव्हान देत होता परंतु, कोणी पुढे होत नव्हते. अशा वेळी विराट राजा भिमाला सांगतो कीं, तू माझ्यावतीने कालखंजाशी लढावयाचे आहे. भिमाला ते नामंजून होते पण त्याचा कांहीं इलाज नव्हता. त्याला दिसत होते कीं, दूर राणीकक्षात उभी असलेली त्याची कृष्णा त्याला नको नको म्हणून खुणवत होती, पण त्याचा नाइलाज होता, तो राजाला नाही सांगू शकत नव्हता, आणि भिमाला सुद्धा त्या कालखांजाची खोडगी जिरवण्याची खुमखुमी होतीच. वृकोदर रिंगणात उतरतो. त्यांच्यात जंगी कुस्ती सुरू होते. दोन हत्ती समोरासमोर असल्यासारखे दिसत होते. भिमाने त्याची कंबर कसली तेव्हां प्रेक्षकांकडून भिमाचे कौतुक करणारे आवाज येऊ लागले. त्याच्याशी कुस्ती करण्यासाठी प्रथम कालखंजाचा खास मल्ल जिमुटी पुढे झाला व त्यांच्यात कुस्ती सुरू झाली. ते युद्ध इंद्र आणि असुर वृत्र ह्यांच्या लढाई सारखे होते. दोघेही तुल्यबळ वाटत होते. कोणाची दमछाक आधी होते त्यावर कोण जिंकणार ते ठरणार असते. दोन हत्ती चिडून एकमेकांवर हल्ला करत आहेत असें ते दृष्य होते. तेथे जमलेले इतर मल्ल त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी मोठमोठ्यानी ओरडून उत्तेजन देत होते. दोघे तुल्यबळ होते पण भिमाचा गुण असा होता कीं, तो कधीही थकणार नसतो, त्या त्याच्या गुणांमुळें त्याला हरवणे कोणालीही शक्य नव्हते, कारण बाकीचे मल्ल कांहीं काळाच्या कुस्तीनंतर थकत होते. जे बकासुराचे झाले, जे हिडींबचे झाले, जे जरासंधाचे झाले तेंच ह्याचे होणार होते. कुस्ती जोरात चालू होती. ते एकमेकांना जोरांनी चापट्या मारत होते त्या आवजाने तो परिसर दणाणून जात होता. निरनिराळ्या प्रकारचे पेंच ते एकमेकांना घालत होते, जोरांनी धडक देणे, डोक्याने टक्कर देणे, हात पिरगळणे, उचलून जमिनीवर

आपटणे, उचलून दूर फेकणे, डोक्यावर आदळणे असे सगळे अघोरी प्रकार त्या कुस्तीत चालू होते. क्षणोक्षणी ती कुस्ती अधिकाधिक चुरशीची होत होती. पंजाची बोटं पिरगळण्याचे प्रकार सर्रास होत होते. त्यानंतर ते नखानी एकमेकांना जखमा करू लागले पण कोणीही हार मानत नव्हता. ही कुस्ती फक्त हाताची होती कोणतेही इतर आयुध ते वापरत नव्हते. त्यांच्या शारिरीक कुवतीची ती परीक्षा होती. कुस्त्यात रस असलेले सगळे प्रेक्षक ती चुरशीची लढाई मजेत पहात होते. पहाणारे दोघांना उत्तेजन देत होते. त्या पलिकडील राणी कक्षात बसलेली कृष्णा तिचा नजीव मुठीत धरून कृष्णाची प्रार्थना करत होती. तिला ती कुस्ती अजिबात आवडत नव्हती. परंतु तिचा कांहीं इलाज नव्हता. ती फक्त आपल्या प्राक्तनाला दोष देत होती. मधून मधून राजाच्या डाव्या बाजूला आरामात बसलेल्या आपल्या मोठ्या पतीला शीव्यांची लाखोली वहात होती. कारण त्याच्या चुकीमुळें हे सगळे पांडवांना व द्रौपदीला भोगावे लागत होते.

तेथे जिमुटीचा दमछाक होत आहे हे वृकोदराला समजते, तसे त्याचा जोर वाढतो. तो जिमुटीला उचलतो व डोक्यावर उचलून गरगरा फिरवत सगळ्या प्रेक्षकांच्या समोर एक फेरी मारत चालतो. त्यानंतर त्याला गोल गोल फिरवत जोरानी मातीत आपटतो. जिमुट मेलेला असतो. ते पाहून राजा विराटाला परमानंद होतो कीं, त्याच्या मल्लाने ती फेरी जिंकली होती. राजा त्याच्यावर अगणित संपत्ती उधळू लागतो, जसें कुबेराने करावे. त्यानंतर बरेच मल्ल येतात व अनेक कुस्त्या होतात त्यात कित्येक मल्ल ठार मारले जातात. जे मेले त्यांनासुद्धा राजा कांहीं रक्कम देत होता.

त्यानंतर राजा त्याचा खास मल्ल म्हणून वल्लभाची नेमणूक करतो. तो भिमाला सिंहांशी, हत्तींशी, रेड्यांशी लढावयाला लावतो व त्यात भिमाला प्रत्येक वेळी भरपूर इनाम मिळत होते.

त्यानंतर नृत्याची पैज सुरू होते व त्यात बृहन्नला उत्तमोत्तम नृत्याविष्कार सादर करून सगळ्याची मन जिंकते. तिलासुद्धा भरपूर कमाई होते त्या सोहळ्यात. त्यानंतर गुराच्या परीक्षा होतात व त्यात मत्स्य देशाच्या पशुंना

अव्वल दर्जा मिळतो. त्यामुळें राजा सहदेवावरसुद्धा फार खूष झालेला होता. त्यानंतर घोड्यांच्या परीक्षा होतात व त्यात सुद्धा मत्स्य देशाचे घोडे अव्वल ठरतात. त्याकरता राजा नकूलीला मोठी रक्कम बक्षिस देतो.

ते सगळे होत असतांना त्यांची पत्नी द्रौपदी मात्र शांतपणे जीव मुठीर धरून राणीवशाच्या अंतःपुरात एकटी बसलेली होती.

वैशंपायन सांगतात, "अशारितेने तुझे पणजोबा त्या विराटनगरीत आपला अज्ञातवास काढत होते, समजलास कां जनमेजया".

अशारितीने समयपालन पर्व, विराट पर्व तेरावा भाग संपला.

## किचक वध पर्व (सुरू)

## भाग चौदावा

वैशंपायन बोलत असतात, अशा प्रकारे ते दहा महीने त्या विराटाच्या राजधानीत काढतात. कोणीही त्यांना ओळखत नाही, अथवा कौरवांचा कोणी

त्या गावाकडे फिरकलासुद्धा नाही. ही सगळी ऋषी त्रिनाविंदू आणि साक्षात मृत्यूदेवांची कृपा होती.
वैशंपायन बोलतात, अरे जनमेजया, प्रिशताची कन्या स्वतः एक राणी असूनही तेथे दुर्लक्षित अशा अवस्थेत त्या राणीवशातील अंतःपुरात रहात होती. सुदेश्नाच्या एका मोलकरणीचे जीवन ती व्यतीत करत होती. तिला अशी शिक्षा कोणत्या कारणाने मिळाली होती ते फक्त एक ब्रह्मदेवच जाणे. ते वर्ष संपायला आले होते आणि त्याच सुमारास विराटाच्या सैन्याचा प्रमुख व राणी सुदेश्नाचा भाऊ त्यांच्याकडे वाड्यात रहाण्यासाठी आला. त्याचे नांव होते किचक. त्याला अंतःपुरात असलेली द्रौपदी दिसते. तिच्या सौंदर्याने तो वेडा होतो. आपल्या बहिणीची सैरंध्री आहे तेव्हां तिच्यावर आपला हक्क आहे अशाप्रकारचे विकृत विचार त्याच्या मनात येऊ लागतात. तो ठरवतो कीं आपल्या बहिणाकडून ती मांगून घ्यावी. म्हणून तो त्याच्या बहिणीस बोलतो, "इतकी रुपगर्विता मी कधी विराटाच्या अख्ख्या राज्यात पाहिलेली नाही, आणि ती तुझ्याकडे तुझी सैरंध्री आहे, मी तिच्यावर पागल झालो आहे". तो सुदेश्नाला खोदून खोदून विचारतो, "ही कोणाची आहे? केव्हा तुझ्याकडे कामाला आली? ताई मला सगळे सांग कारण तिने माझे हृदय काबिज केले आहे. मी तिचा दास होण्यासाठी केव्हाही तयार आहे. एकाद्या देवतेसारखी ती दिसते, कोणी गंधर्व कन्या आहे कां"? नव्या दारुची जशी नशा चढते तशी ह्या बाईची नशा मला चढली आहे. माझ्या ह्या प्रेमरोगाला ही बाई हांच एकमेव उपाय आहे". पुढे तो त्याच्या भगिनीस सांगतो की, "अशी स्त्री तुझ्या सेविकांत शोभत नाही, ती एकाद्या राजाची राणी शोभते किंवा माझी राणी म्हणून शोभून दिसेल. मी तिचा दास होण्यास तयार आहे, जे माझे आहे ते सगळे तिचे मी करून टाकतो आत्ताच्या आत्ता. माझे घोडे, हत्ती, पैसा सगळे तिचे करून टाकतो".
बहिणाशी असे बोलल्यानंतर तो थेट द्रौपदीकडे जातो व तिच्याशी बोलण्याचा प्रयत्न करतो, जसे एकाद्या कोल्ह्याने सिंहीणीला मांगणी घालावी.

तो बोलण्यास सुरूवात करतो, "अहो लावण्यवती, आपण आमच्या नगरात केव्हां आलात? मला सगळे समजून घ्यावयाचे आहे कारण मी ह्या राजाचा प्रमुख सेनानी आहे. आपले सौंदर्य व मार्दव असें आहे की मला आपल्याकडे विशेष लक्ष घालावे लागणार आहे. आपले सौंदर्य विलक्षण आहे, त्याच्या तोडीचे लावण्य मी आजवर पाहिलेले नाही. आपली बोलण्याची रीत, हालचाली करण्याची अदा सगळे मोहून टाकणारे आहे. तुझ्या शरीराचा एक न एक अवयव जणू विश्र्वकर्माने कोरून बनवलेला असावा असा आहे. एकाद्या अप्रतिम सुंदर मूर्तीसारखे आपण दिसता त्यामुळे मी आपला चाहता झालो आहे. तुझ्या इतकी रुपवान महिला मी आजवर पाहिलेली नाही. मी अनेक बायकांबरोबर मजा केली आहे पण तू कांहीं वेगळींच आहेस. त्या देवता आपण पुजतो ज्यांना श्री, ह्री, किंर्ती, भुती आणि कांति ह्या सगळ्या तुझ्यात सामावलेल्या असाव्यात असे  मला वाटू लागले आहे. तू दुसरी रति असावीस असें मला वाटत आहे, जी कामदेवाचे स्त्रीरुप आहे. तुझे रुप असे आहे कीं, ते पहात रहावे. त्यापासून नजर हटत नाही. तुझे स्वर्गीय दैवी रुप माझ्या नजरेतून हटत नाही. मी तुला माझी अर्धांगिनी करण्याबद्दल माझ्या बहिणीला बोललो पण ती सांगते तो तुझा निर्णय असेल व त्याबद्दल ती कांहींही बोलणार नाही. एकापरीने ते बरोबरच आहे. म्हणून मी तुला विचारतो, तुझा माझ्याबद्दल कोणता निर्णय आहे ते लवकर सांग. मी पहातो की, तुझे स्तन गोल भरलेले व पूर्ण वाढलेले जे सुवर्णाच्या माळांनी झाकलेले पाहिजेत ते आज तसेंच उघडे आहेत हे मला योग्य वाटत नाही. तुझे नितंब, मांड्या सगळ्या दागिन्याविना आहेत. माझी जर तू झालीस तर त्यावर सोन्याच्या हिर्या माणकांनी जडवलेल्या दागिन्याने सजवलेले होतील. तुझे गोल ढुंगण असे आहे मला वाटते त्यावरून नजर हटवू नये. तुझ्या अंगा अंगात सौंदर्य भरलेले आहे अशी तू एकाद्या भिकारीणी सारखी रहात आहेस हे मला बघवत नाही म्हणून मी तुला पुन्हा पुन्हा विनती करतो कीं तू माझी हो. आपले लग्न होणे ही विधात्याची इच्छा असली पाहिजे म्हणूनच तू येथे माझ्या बहिणीकडे काम करण्याच्या निमित्ताने आली आहेस. मघा मी जे बोललो, त्या

भूती, श्री, ह्री, किर्ती आणि कांति ह्या समृद्धी, नम्रता, सौंदर्य, प्रसिद्धी आणि सामर्थ्य ह्या गुणाच्या देवता आहेत व त्या सगळ्या तुझ्यात आहेत असें मला वाटते. तुझ्याशी माझा संभोग कधी होतो त्यासाठी मी फार आतूर आहे. लवकरात लवकर मला स्वीकारून तू मला ह्या अवस्थेतून मुक्त कर. तू जर मला स्वीकारलेस तर मी माझ्या सगळ्या बायकांना सोडचिठी देईन व तुला माझी पट्टराणी करीन. तुला दागदागिन्यानी मढवीन. उत्तमोत्तम मद्य जे अमृतासारखे आहेत ते तुला माझ्या वाड्यात मिळतील. त्याशिवाय जे तुला पाहिजे ते मी तुझ्यासाठी कोठूनही मिळवून आणून देईन. ह्या अशा फाटक्या कपड्यात रहाण्याची तुझ्यावर ज्यांच्यामुळें वेळ आली, त्यांना मी ठार मारून टाकीन. पाहिजे तर मी तुझ्यासाठी स्वतंत्र वाडा बांधून घेईन ज्यात फक्त तू व मी राहू. थोडक्यात असें कीं अहो सुंदरी, तुझ्या सगळ्या इच्छा मी पूर्ण करण्याचे आश्र्वासन देतो पण तू एकदाचे मला होकार दे. एवढेच नाही तर मी स्वतः तुझा गुलाम बनून राहीन".

किचकाची ती बडबड ऐकल्यानंतर द्रौपदी त्याला बोलते, "एका हलक्या कुळातील कपडे नेसवणार्या, केस विंचरणार्या हलक्या प्रकारची नोकरी करणार्या स्त्रीची तू इच्छा करत आहेस हे फार चुकीचे आहे. आपले हे वागणे आपल्या प्रतिष्ठेला शोभणारे नाही. शिवाय मी एक पतिव्रता पत्नी आहे हे आपण लक्षात घ्या. नैतिकतेच्या नियमांची थोडी तरी आपण चाड राखावी अशी माझी आपल्याला विनंती आहे. माणसं जी नैतिकतेचे नियम पाळतात ते फक्त स्वताच्या वाङकदत्त पत्नीचाच विचार करतात. आपण अशारितीने व्याभिचाराकडे जाल तर त्यामुळें विराटांची प्रतिष्ठा धुळीला मिळेल ह्याचे भान ठेवून आपण वागावे असें मी आपल्याला सांगत आहे. खर्या सज्जनांमध्ये जे संयम अपेक्षित आहेत ते आपल्यामध्ये मला दिसत नाहीत. जे पुरूष वासनेच्या आहारी जाऊन असें चुकीचे वागतात त्यांचा प्रायः नाश होतो हे आपण जाणत असालच". एवढे बोलून कृष्णा थांबते.

वैशंपायन पुढे सांगतात, सैरंध्रीचे ते खडसावणे त्या मानी व वासनांध किचकाला रुचले नाही. त्याचे स्वतावरील नियंत्रण रहात नाही व त्याच्यातील

कःपुरूष जागृत होतो. त्याचे आता रुप बदलते व तो तिला बोलतो, "तुला अशारितीने माझी मांगणी धुडकावणे शोभत नाही. तुझ्या सारख्या देखण्या व कमनीय बाईने माझी मांगणी धुडकावणे योग्य नाही. मी तुझ्याशी इतक्या चांगल्या प्रकारे बोलत असतांना तू अशारितीने मला उलट उत्तर देतेस, तुझी योग्यता नसतांना, ह्याचे मला आश्र्चर्य वाटते. मी मन्मथाच्या प्रभावाखाली तुझ्यामुळें ते बोलत होतो. माझी मागणी अशारितीने धिक्कारून तू स्वतःला मोठ्या संकटात टाकत आहेस ह्याची कदाचित तुला कल्पना नसेल पण ह्या तुझ्या वागण्याचे वाईट परिणाम तुला भोगावे लागतील, मला आजपर्यंत कोण्याही बाईने अशारितीने धिक्कारलेले नाही. मला त्या करता तुला धडा शिकवावा लागेल असें दिसते. मी जर मनात आणले तर मी तुला असाच उचलून नेऊ शकतो परंतु, मी ते केले नाही कारण माझी बायकांशी वागण्याची ती पद्धत आहे. प्रथम मी गोड बोलून तिला पटवतो पण जर ती बाई ऐकत नसेल तर तीला मी उचलून माझ्या जनानखान्यात घेऊन जातो व तेथे कैद करून ठेवतो. माझी ताकद ह्या राज्यात किती आहे ते तुला माहीत नाही, म्हणून तू अशी हुशारी करत आहेस. विराटाचे राज्य माझ्या हिम्मतीमुळें आजवर शाबूत आहे. येथे माझे चालते. ह्या राज्यात मला ना बोलण्याची कोणातही हिम्मत नाही. परंतु, तुला हे कसे समजणार,तू ह्या राज्यात नवीन आहेस. ह्या राज्याची समृद्धी माझ्यामुळें आहे. येथील कोणी मला विरोध करू शकत नाही. अगदी राजासुद्धा मला घाबरत असतो असा मझा रुबाब येथे आहे. मी नावापुरता सरसेनापती आहे, खरेतर मीच राजा आहे. पण मी माझ्या बहिणीकडे पाहून त्या म्हातार्याला गादीवर ठेवले आहे. म्हणून पुन्हा सांगतो चांगल्या प्रकारे कीं बर्या बोलाने माझी मागणी मान्य कर व माझी राणी हो". ते किचकाचे ऐकल्यावर द्रौपदी त्याला ऐकवते, "अरे सुताच्या मुला, असा मूर्खासारखा वागू नकोस. त्यामुळें तू नाहक मारला जाशिल. मी तुला आधीच सांगितले आहे कीं मी विवाहीता आहे व माझे पती पांच आहेत व ते सगळे गंधर्व आहेत. मी पतिव्रता आहे म्हणजे मी इतर पुरूषांचा साधा विचारसुद्धा करत नाही. जर त्याना समजले कीं, तू माझ्यावर

जबरदस्ती करण्याचा प्रयत्न करत आहेस तर ते तुला मारून टाकतील. तू असे कांहीं करण्याच्या विचारात आहेस जे कोणीही शहाणा करण्याचे धाडस करत नाही. तू मला वाटते, असा मूर्ख मुलगा आहेस कीं, जो समुद्राच्या एका किनार्यावर उभा आहे आणि दुसर्या किनार्याला पोहून जाण्याच्या गोष्टी करत आहे. तू कोठेही लपलास तरी माझे पती तुला हुडकून काढतील व यमाच्या घरी पाठवतील. माझे पती गंधर्व आहेत त्यांना तू मारू शकणार नाहीस. म्हणून तू माझ्या मागे लागू नकोस. त्यामुळें फक्त तुझे नुकसान होईल. माझी अभिलाषा धरणे म्हणजे मृत्यूला आमंत्रण देण्यासारखे आहे. तुला तुझ्या सामर्थ्याचा फार घमंड आहे तो उतरेल जर तू माझा विचार करशिल. माझ्या ह्या गरीब परिस्थितीबद्दल तुला फिकीर करण्याची आवश्यकता नाही. मी तुला तुझ्या हिताचे जे आहे ते सांगत आहे".

अशारितीने किचक वध पर्व, विराट पर्व भाग चौदावा संपला.

## किचक वध पर्व
## भाग पंधरावा

वैशंपायन सांगतात, द्रौपदीने झिडकारल्यामुळें वैतागलेला तो वासनांध किचक आपल्या बहिणीला म्हणतो, "तू केकयाची कन्या असें कांहीं कर ज्यामुळें तुझी सैरध्री माझ्या बाहूपाशात येईल. असें कांहीं कर कीं, ती गजगामिनी सुंदरी मला होकार देईल. जर तू माझी खरी बहिण असशिल तर तसे करशिल कारम, मी आता तिच्या शिवाय जगणे शक्य नाही".

वैशंपायन पुढे सांगतात, आपल्या लाडक्या भावाचे ते रडणे ऐकून विराटाच्या बायकोला त्याची दया येते. तिला तिच्या भावाची काळजी असते परंतु त्याच वेळी तिला तिच्या सैरंध्रीचीसुद्धा कालजी असते, त्याप्रमाणे ती त्याला बोलते. "एकाद्या सोहळ्याच्या निमित्ताने तू माझ्या करता कांहीं उत्तम पेये घेऊन ये. ती पेये आणण्याच्या बहाण्याने मी तिला तुझ्या कक्षात पाठवीन. ती आणण्याच्या करता ती तुझ्या कक्षात येईल. तेथे तिच्याशी तू कांहीं प्रेमाचे न बोलता फक्त मैत्रीपूर्ण वागून तिला दिलासा देशिल. तसे होत गेले म्हणजे सावकाशपणे तिच्या मनात तुझ्याबद्दल सहानुभूती व आपुलकी उत्पन्न होईल. आता जे तू वागलास ते खरोखरच तद्दन मूर्खपणाचे होते. अशारितीने कोणी घरंदाज माणूस बायकांशी वागत नाही त्यामुळें तुला धिक्कार सहन करावा लागला. त्यात तिचा कांहीं दोष नव्हता. कोणतीही बाई जे करेल तेंच

तिने केले आहे. शिवाय ती विवाहिता आहे त्यासाठी अशा बाईला आपलेसे करण्यासाठी मी सांगते तसे तुला करावे लागेल नाहीतर ती तुला कधीच मिळणार नाही. अशा बायकांना मिळवण्यासाठी जी चतुराई वापरावयाची ती तू वापरली नाहीस".

वैशंपायन पुढे सांगतात, ते ऐकल्यावर तो मानी किचक तिच्या कक्षातून बाहेर पडतो. थोड्याच वेळांत तो उच्च दर्जाची सुरा मिळवतो. उत्तम स्वयंपाकी बोलावतो व उत्तम प्रकारचे रुचकर खाद्य पदार्थ बनवून घेतो. त्यांत प्रामुख्याने विविध मांसाचे प्रकार असतात, विविध प्रकारचे मसाले वापरून स्वादिष्ट केलेले असें ते तयार करून घेतो. ते सगळे तयार झाल्यावर तो आपल्या भगिनीला सांगतो कीं ते सगळे तयार आहे. त्याची बहिण आपल्या भावावरील प्रेमामुळें त्याच्यासाठी द्रौपदीला त्या सगळ्या गोष्टी किचकाच्या घरातून आणण्यासाठी पाठवते. त्यासाठी ती नाटक करते कीं, तिला मद्य पिण्याची इच्छा झाली आहे व त्या बरोबर रुचकर मांसांचे पदार्थ सुद्धा खाण्याची इच्छा झाली आहे ते सगळे तिच्या भावाच्या घरातून आणावे लागतील त्यासाठी तू त्याच्या घरी जा. असें ती द्रौपदीला सांगते. ते ऐकल्यावर सैरंध्री राणीला सांगते, "माफ करा, पण मी त्याच्या घरी जाणार नाही. आपण जाणता तो किती बेशरम आहे ते. मला त्याच्या वासनांची शिकार व्हावयाचे नाही. म्हणून मला त्याच्या घरी जाण्यास सांगू नका. कोणत्याही परिस्थितीत मी तेथे जाणार नाही. मी जेव्हां येथे नोकरी धरली तेव्हां ज्या अटी सांगितल्या होत्या त्या आपण मान्य केल्या होत्या त्याची आठवण ठेवावी. आपल्या कडे बर्याच इतर सेविका आहेत त्यांना पाठवा".

सुदेश्ना तिला आश्र्वासन देते कीं, "माझ्या घरातून तुला पाठवले आहे तेव्हां तो तुला काहींही त्रास  देणार नाही, मी त्याला त्या बद्दल चांगली समज दिली आहे. म्हणून तू तेथे निर्धास्तपणे जाऊ शकतेस". असें बोलून ती विराटाची राणी तिच्या हातात एक सुवर्ण कलश देते, ज्याच्यावर जरी केलेले कापड झाकणासारखे ठेवलेले होते, नाइलाज समजून द्रौपदी ते घेऊन किचकाच्या घराकडे निघते. मनात ती दामोदराची आठवण करत असते.

तिचा तिचे अश्रू आवरता येत नसतात. ती प्रार्थना करते कीं, मला दुसरा कोणी पुरूष माहीत नाही, किचक माझ्यावर बळजबरी करणार नाही अशी प्रार्थना ती करत तेथे जाते.

वैशंपायन पुढे सांगतात, जाता जाता ती सूर्याकडे विनंती करते कीं त्याने तिचे संरक्षण करावे. सूर्य तिची प्रार्थना ऐकतो व एका राक्षसाची नेमणूक त्यासाठी करतो. तो राक्षस अदृष्य राहून तिला संरक्षण देणार असतो. त्या क्षणापासून तो राक्षस द्रौपदीचे संरक्षण करण्याचे काम सुरू करतो. द्रौपदीला त्याच्या घराकडे येत असतांना पाहून तो वासनांध किचक आपल्या भगिनीला धन्यवाद देत खूषीने फुलून निघतो. जणूकाय त्याचा उद्देश सफल झाला आहे.

अशारितीने किचक वध पर्व, विराट पर्व पंधरावा भाग संपला.

## किचक वध पर्व

## भाग सोळावा

तिला पाहून किचक तिला बोलतो, "सुंदरी, तुझे केस तुझ्या कुल्ल्या पर्यंत रूळत आहेत, तुझे माझ्या घरात स्वागत मी करतो. आजचा दिवस माझ्यासाठी शुभदिन आहे, कीं तुझ्यासारखी लावण्यवती माझ्या दारी आली आहे. आज तू माझ्या घराची मालकीण होण्यासाठी आली आहेस असें मी समजतो. तू स्वतःहून आली आहेस हे माझे परम भाग्य असें मी समजतो. मी तुझ्यासाठी जगभरातून उत्तमोत्तम वस्त्रं दागिने आणलेले आहेत ते तू प्रथम तुझ्या अंगावर घालावेस असें मला वाटते. तुझ्यासाठी एक उत्कृष्ट शय्या तयार करून ठेवली आहे. तू व मी ही सुगंधी दारू दोघे मिळून पिणार आहोत". असें कांहींसे आचरटपणाचे तो बोलू लागतो.

ते ऐकल्यावर द्रौपदी त्याला बोलते, "मला सुदेश्नाने तुमच्याकडे तिच्यासाठी मद्य आणण्यासाठी पाठवले आहे. आपण वेळ वाया न घालवता त्वरित त्याची दारू ह्या कलशात भरून द्यावी. मी तुझ्याकडे स्वताहून आलेली नाही तर

माझ्या मालकिणीचे काम करण्यासाठी आलेली आहे. तरी मूर्खपणा करण्याचे बंद करून ती दारु ह्या कलशात घालून द्यावी".

ते ऐकल्यावर किचक त्याचा निर्लज्जपणा सोडत नाही. तो द्रौपदाला बोलतो, "दुसरे माझ्या बहिणीला जे पाहिजे ते घेऊन जातील. तू त्याचा विचार करू नकोस". असें बोलून तो सरळ तिचा हात पकडतो. त्याबरोबर ती जोराने ओरडते कीं, माझ्या बरोबर इतर कोणीही संबंध ठेवू शकणार नाही. असें बोलून ती त्याच्या हाताला जोरांने हिचडा मारते. त्यासरणी तो तोल जाऊन जमिनीवर कोसळतो. ती किचकाला शाप देते कीं एक दिवस तिचा पती त्याला यमाकडे पाठवून देईल. त्यानंतर द्रौपदी तडक तेथून धावत राजसभेमध्ये शिरते व राजाकडे किचकाविरूद्ध तक्रार करते. राजसभेत किचक तिचे केस पकडण्याचा प्रयत्न करत असतो, जणू तो राजाचे तेथे असणे मानतच नव्हता.

वैशंपायन पुढे सांगतात, द्रौपदी तिच्या मोठ्या डोळ्यांनी त्याच्याकडे क्रुद्ध नजरेने पहात असतांना तो तिचा दंड पकडतो. ते भर सभेत होत असते. सगळे दरबारी ते पहात असतात. द्रौपदीचा राग अनावर झालेला ती एकच हिसका देऊन त्याला जमिनीवर पाडते. ते पाहून राजसभेतील मान्यवर लोक जोरांने हसत द्रौपदीला शाबासकी देतात. तो नीच माणूस उठून उभा रहातो. त्यानंतर ती स्वाभाविकपणे सभेत बसलेल्या युधिष्ठीराकडे मदतीसाठी जाते. त्यावेळी तो राजाचा साला भर सभेत पुन्हा तिला पकडण्याचा प्रयत्न करत असतो. हे सगळे राजाच्या समक्ष होत असते. त्यावेळी मात्र सूर्याने कृष्णेच्या संरक्षणासाठी दिलेला राक्षस कार्यरत होतो व त्या किचकाला दूर फेकून देतो. राक्षस अदृष्य असल्यामुळे तो कसा इतका दूर फेकला गेला आपोआपच, ते लोकांना समजत नाही. किचक इतक्या जोरांने फेकला गेलेला असतो कीं, तो तेथे तसांच जमिनीवर निपचित पडून रहातो. तो बेहोष झालेला असतो. ते सगळे युधिष्ठीर आणि भिम तेथे असतात व पहात असतात किचकाचे चाळे. युधिष्ठीराच्या कपाळावर घामाच्या धारा लागलेल्या असतात. भिम त्याचे दांत ओठ चावत असतो. तो त्वेषाने कांहीं करणार असतो पण त्याचा मोठा भाऊ

त्याला आवरतो, त्याला ते ओळखले जाण्याची भिती असते म्हणून तो तसे करतो. भिम चिडलेल्या हत्तीसारखा हलत असतो पण मोठ्या कष्टाने तो स्वतःला आवरतो व गप्प बसतो. पण किचकांचा वध करण्याचा निश्र्चय करून तो थांबतो. त्या प्रसंगापासून त्यांचे लक्ष वळवण्यासाठी युधिष्ठीर भिमाला बोलतो, "अरे वल्लभा, तू सरपणाची लाकडे आणण्यास केव्हां जाणार. भिम त्यावरून ओळखतो काय करावयाचे आणि तेथून निसटतो. द्रौपदी रडत रडत परंतु, संतापाने त्या सभेत उभी राहून राजाकडे पहात बोलते, "अहो आपल्या राज्यात एक सुताचा मुलगा एका पतिव्रतेला बळजबरीने पकडतो ह्यात काय अर्थ आहे. आणि येथे लोक द्युत खेळत बसले आहेत. हे असें कसे राज्य"? "भर सभेत हे होत आहे. ते धनुष्याचे टणत्कार व वाद्यांचे निनाद आता ऐकू येत नाहीत. अशी सामर्थ्यवान लोकांची पत्नी हे सगळे भोगत आहे व त्यांना त्यांच्या गुप्ततेची पडली आहे, धिक्कार असो अशा नवर्यांचा जे त्यांच्या पत्नीची लाज राखू शकत नाहीत. एकेकाळी जो मागील त्याला संरक्षण देणारे माझे शूरवीर पती आज त्यांच्या पत्नीला संरक्षण देऊ शकत नाहीत. काय शरमेची परिस्थिती आहे ही पहा. एकाद्या नपुसकासारखे ते लपून बसले आहेत आणि त्यांची पत्नी तिचा कांहींही दोष नसतांना उघड्यावर असहाय्य अवस्थेत पडलेली आहे. हा असा कसा राजा ज्याच्या राज्यात एक विवाहीत महिला संरक्षणासाठी टाहो फोडत आहे. एका राजाला हे शोभत नाही कीं, त्याच्या राज्यात महिला असुरक्षित आहेत कारण त्याचे स्वताचे नातेवाईक बाईवर अत्याचार करत आहेत. त्या बाईपेक्षा ह्या राजाला त्याचा नातेवाईक जास्त योग्य वाटतो असें राज्य फार काल टिकणार नाही". असा ती शाप विराटाला देते. ती पुढे बोलते, "हे दरबारी जे येथे बसलेले आहेत व किचकाचे कृत्य पहात आहेत ते सुद्धा राजा इतकेच दोषी आहेत".

वैशंपायन पुढे सांगतात, अशारिताने ती चिडलेली कृष्णा राजाला दोष देत रहाते आणि न्यायाची मांगणी करत असते. ते ऐकून राजा तिला म्हणतो, "मला तुमच्या दोघात काय बिनसले आहे त्याची कल्पना नसल्याने त्यात

पडू शकत नाही. खरे काय तुमच्यात ठरले होते व नंतर काय झाले त्याची मला कल्पना नाही. त्यामुळें मी ह्यात बोलू शकत नाही. परंतु, इतर दरबारी कृष्णाची बाजू उचलून धरतात व तिच्या बाजूने कौल देतात. कित्येत तिला तिच्या धैर्या करता तिचे कौतुक करतात. किचकाच्या अशा हरकतीवर त्यानंतर तेथील दरबारी चर्चा करतात व किचक अशारितीने बर्याच बायकांना नाडत असल्याचे राजापुढे सांगितले जाते. ते सांगतात कीं, ह्या महिलेने धाडस केले, इतर किचकाच्या राजाकडील वशिल्याला घाबरून गप्प बसतात. हि महिला देवीसारखी श्रेष्ठ आहे म्हणूनच ती हे सगळे सांगण्यासाठी आली आहे व म्हणून तिचे कौतुक केले पाहिजे असा सूर सगळ्यांचा होता. ते आणखीन बोलतात की ही एकाद्या स्वर्गीय देवते प्रमाणे आहे.
वैशंपायन पुढे सांगतात, अशारितीने विराटाचे दरबारी तिचे कौतुक करत असतांना तेथे बसलेला कंक घामाने भिजून गेला होता. नंतर तो आपल्या पत्नीला सांगतो, "कृपया आता तुम्ही येथून निघून जावे. अहो सैरंध्री आपण आपल्या कक्षात सुदेश्नाच्या राणीवसात जावे". तो पुढे उद्गारतो, "शूरांच्या बायकांना त्यांच्या पुरूषांच्या व्रतस्थतेमुळें अनेक त्रासांना तोंड द्यावे लागते असा अनुभव आहे. आपले गंधर्व पती ह्या वेळी येतील असें वाटत नाही, परंतु, जसे गंधर्व करतात तसे तेसुद्धा वेळीच तुझ्या दुःखावर उपाय करतील. ते गंधर्व आहेत व त्याप्रमाणे ते तुला न्याय देतील, आत्ताच पहा किचकाला तुझ्यापासून कोण्या अदृष्य जोराने दूर फेकले ते सगळ्यांनी पाहिले म्हणजे ते तुझ्यावर लक्ष देऊन आहेत हे निश्चित. काळ सगळ्या गोष्टींवर इलाज करत असतो म्हणून आपण काळाच्या निर्णयावर भरवसा करावा. आपल्या ह्या अशा येण्यामुळें सभेतील द्युताचा डाव किती बिघडला त्याची आपल्याला कल्पना नाही. मला पूर्ण विश्र्वास आहे कीं, आपले गंधर्व पती त्याचा पुरता वचपा काढतील. युधिष्ठीराचे ते बोलणे ऐकल्यावर कृष्णा उत्तर देते, "ज्यांच्याशी माझे लग्न झाले आहे ते स्वभावतः फार कृपाळू आहेत. परंतु, त्यांच्यातील एक मोठा आहे त्याला जुगाराचे व्यसन लागले आहे. त्या त्याच्या व्यसनापायी आम्ही सगळे दुःख भोगत आहोत व तो मोठ्या मोठ्या

शहाणपणाच्या गप्पा मारत असतो. त्याला त्याच्या त्या नादाची लाज वाटत नाही हे माझे मोठे दुःख आहे".

वैशंपायन सांगतात, असें फणकारून ती रुपगर्विता आपले विस्फारलेले केस तसेंच उडवत तिच्या कक्षाकडे जाते. खूप रडल्यामुळें तिचे डोळे लाल झालेले होते. त्यामुळें तिच्या देखणेपणात वाढ झालेली होती, ती अधिकच सुंदर दिसत होती. तेथे गेल्यावर राणी सुदेश्ना तिला विचारते काय झाले? त्यांने तुझ्याशी कांहीं अक्षम्य हरकत केली कां? मी असें विचारते कारण तू फार चिडलेली व दुःखी दिसत आहेस. ते राणीचे ऐकून द्रौपदी तिला रडत रडत सांगते, "आपल्या आज्ञेनुसार मी त्या घरात दारू आणण्यासाठी गेले होते तेव्हां, त्या नीच माणसांने माझा हात पकडला, माझ्याशी लगट करण्याचा प्रयत्न करू लागला. त्याला हिसका मारून मी न्याय मागण्यासाठी राजसभेत गेले. तेथे राजाच्या समक्ष तो माझ्याशी हातापायी करू लागला, त्याला मी जोरांने ढकलून दिले".

राणी ते ऐकून बोलते, "माझ्या भावावर तुझ्या सौंदर्याचा इतका प्रभाव पडला आहे कीं, तो असें अक्षम्य कृत्य करून बसला. आपल्या राज्याच्या नियमांप्रमाणे असें कोणी एकाद्या बाई बरोबर केले तर त्याला देहदंडाची शिक्षा आहे, तर तू काय ठरवतेस, त्याला ठार मारावयाचे कां"?

द्रौपदी तिला उत्तर देते कीं, राणी सरकार, त्याला माझे पती ती शिक्षा देतील. आजच त्याला दरबारात माझ्याशी झोंबण्याचा प्रयत्न करत असतांना त्याला जोरांनी दूर फेकून दिले होते. तो त्यामुळें बेहोष पडलेला आहे त्या सभागृहात. असेंच तो करणार असेल तर त्याला यमाच्या घरी जावेच लागेल, हे निश्र्चित.

अशारितीने किचक वध पर्व विराट पर्व भाग सोळावा संपला.

## किचक वध पर्व

## भाग सतरावा

वैशंपायन पुढे सांगत असतात, सुताच्या मुलाकडून अशाप्रकारे उपमर्द वेळोवेळी झाल्यामुळे ती मानीनी कृष्णा आपल्या खोलीकडे जाते. तेथे ती स्नान करून देवांना अर्घ्य देते आणि विराटाच्या सरसेनापतीच्या मृत्यूसाठी प्रार्थना करते. "माझी ही इच्छा कशी पूर्ण होणार"? त्याच विचारात ती असते. तिला तिचे अश्रू मात्र आवरता येत नाहीत. ती तिचे दुःखा कमी करण्यासाठी काय करावे त्याचा विचार करत असते. हा नीच माणूस कसा मरेल त्याचीच तिला फिकीर पडलेली असते. मी असें काय करावे कीं हा मारला जाईल. राणींने त्याला शिक्षा देण्यात द्रौपदीला समाधान नसते. तिला त्या नीच माणसाचा स्वतःच्या योजनेने मारावयाचे असते, तरच तिला खरे समाधान मिळणार असते. ती तशा अवस्थेत रात्रभर जागी असते, सारखा विचार करत असते त्याला कसे ठार मारावयाचे. तिचे शरीर सुडाने थरथरच होते. अखेरीस ती ठरवते व पटकन आपल्या बिछान्यातून उठते व दबक्या पावलाने भिमाच्या खोलीकडे जाऊ लागते. तिचा निश्र्चय पक्का होता कीं, अशा कामात तिला फक्त आणि फक्त वृकोदरच समजू शकतो. ती भिमाच्या खोलीत शिरते कारण त्याचा दरवाजा सताड उघडा होता. ती मनातल्या मनात विचार करत असते, येथे त्यांच्या पत्नीच्या इज्जतीचा प्रश्र्न पणाला लागला असतांना हे शूरवीर शांतपणे कसे झोपू शकतात? तसे विचार तिच्या मनात येण्याचे कारण भिमाचा मोठ्याने घोरण्याचा आवाज तिला ऐकू येत असतो.

वैशंपायन पुढे सांगतात, भिमाचे जोर जोराने घोरणे चालूच होते. तो स्वप्नात त्याची पत्नी पहात असतो. द्रौपदी त्याला घोरतांना पाहून चिडते पण स्वतःला आवरते आणि त्याच्या खुशीत घुसते. त्याला घट्ट मिठी मारते. जणूकाय एकाद्या नाजूक वेलीने प्रचंड साल वृक्षाला फकडले आहे. त्या तिच्या धडपडीमुळें भिम जागा होतो. त्याला समजत कीं कृष्णा त्याच्या बाहुपाशात घुसलेली आहे. तो त्याचा पंजा तिच्या कुरळ्या केसांतून फिरवतो व विचारतो, "आज काय विशेष"? ती त्याला बोलते, "स्वामी जागे व्हा, जागे व्हा, कितीवेळ झोपाल"? जो पर्यंत तो नीच माणू ठार मारला जात नाही तोवर

मला शांति नाही मिळणार. आपल्या पत्नीशी नीचपणा करणार्याला तुम्ही शिक्षा नाही कां करणार"? असा माणूस जीवंत कसा राहू शकतो. तिचे ते ऐकल्यावर भिमाला लक्षात येतात सगळ्या गोष्टी ज्या त्या दिवशी राजसभेत घडल्या होत्या. तो कुशीवर वळून कृष्णेला जवळ घेत विचारतो, "तुझा काय विचार आहे तो मला सांग. तुझा आवाज नेहमी सारखा कोमल वाटत नाही, तू त्याच्यावर सुडांने पेटली आहेस, बरोबर नां"?

द्रौपदी बोलते, "मला झोप येत नाही जोवर तो नराधम जीवंत आहे. त्याचा नायनाट करण्यासाठी मला तुमची मदत पाहिजे". "मी सगळे राणीला सांगितले तेव्हां ती म्हणली कीं, मत्स्यदेशाच्या कायद्यानुसार त्याला देहदंड मिळाला पाहिजे. पण मी म्हणते, तो देहदंड आपणच दिला पाहिजे कारण, क्षत्रियाचे काम आहे कीं, तो निरपराध्यांना अन्यायापासून संरक्षण देईल".

वृकोदर तिला बोलतो, "तुझा काय विचार आहे तो मला नीटपणे सांग, तो किती योग्य अथवा अयोग्य आहे त्याची पर्वा करू नकोस, फक्त मला समजले पाहिजे तुझी इच्छा काय आहे. एकदा मला समजले तुला काय व्हावे, मग मी तसे करीन. त्याबद्दल तू बिनधास्त रहा". द्रौपदीला ते भिमाचे बोलणे ऐकल्यावर खूप बरो वाटते. एकादा मोठा बोजा शिरावरून उतरल्यानंतर जसें वाटावे तसे तिला वाटले. ती त्याच्या छातीवरून हात फिरवत म्हमते, "मला माहीत होते की, तू मला समजून घेशिल, बाकीच्यांची मला तेवढी खात्री नसते कारम ते सगळे मोठ्याच्या आज्ञेत रहाणे पसंत करतात". ते ऐकल्यावर भिमाला हसू येते. तो बोलतो, "त्यांत त्यांचा दोष नाही, ते कुंतीमातेच्या आदेशाचे पालन करत असतात. आता सांग, पुढे तुझी काय योजना आहे ज्यामुळें त्याचा काटा काढता येईल"? पुढे तो तिला सांगतो, "आता तू तुझ्या खोलीत जा, उजाडायला लागत आहे, माणसे जागी होण्या आधी तू तुझ्या कक्षात जाऊन शांतपणे निद्रा घे, त्याची तुला फारगरज आहे. नंतर आपण नेहमीप्रमाणे स्वयंपाकघरात भेटू तेथे तुझी योजना नीट ठरवून मला सांग". द्रौपदीला आता खूप बरे वाटत असते. ती लगबगीने त्याच्या खोलीतून निघते व तिच्या खोलीत जाते.

अशारितीने किचक वध पर्व विराट पर्व भाग सतरा संपला.

## किचक वध पर्व
## भाग अठरावा

द्रौपदी स्वगत सांगते, "जिचा एक पती युधिष्ठीर असेल त्या बाईच्या नशिबात किती दुःख असेल त्याची कोणाला साधी कल्पनासुद्धा येणार नाही. माझ्या मनस्तापाची कोणाला कल्पना कधीही येणार नाही. ह्याआधी दुःशासनाने माझी विटंबना केली तेव्हासुद्धा हा नामर्द असाच संभावितपणा करत होता. अशा माणसाची पत्नी होण्याचे दुःख फक्त त्याच बाईला समजेल जी अशा अपमानजनक परिस्थितीतून गेली आहे. मला तो कौरव दासी म्हणला पण ह्या मूर्खाला त्याची फिकीर नव्हती तो त्याच्या खोट्या नैतिकतेच्या अवडंबरात रमलेला होता. वनात असतांना त्या सिंधच्या राजाने मला पळवले तेव्हासुद्धा हा मख्खपणे बसून फालतु मुद्दे शोधत होता. तेव्हासुद्धा भिमच मला वाचवण्यासाठी आला. आणि आता पुन्हा माझा भिमच माझ्याकरता तयार आहे, ह्याला म्हणतात जीवनसाथी. राजाच्या समक्ष त्या बदमाशाने माझा केसाचा बुचडा धरला असतांना ह्या भेकडाला त्याचा द्युताच्या खेळाची पडली होती. म्हणतो कसा त्याचा जुगाराचा खेळ माझ्यामुळें बिघडला. तो एका शब्दाने त्या किचकाला दोष देण्याची हिम्मत दाखवत नव्हता. जरी सगळे सभागृह माझी बाजू घेत होते तरी हा मात्र गप्प रहातो. मला नाही कळत असा भिकारडा यमाचा मुलगा कसा असू शकतो"? पुढे ती स्वगतच बोलते, "अहो कुंतीच्या मुला मला असहाय समजू नका, माझ्या बरोबर सुद्धा खरे शूरवीर आहेत जे त्या किचकाचा काटा काढण्यात मला मदत करणार आहेत. हा हरामखोर मला म्हणतो, माझी बायको हो, त्याला माहीत आहे कीं, मी एक विवाहिता आहे तरी असे कसे तो बोलू शकतो. ह्या विराट नगरीला कांहीं नैतिकतेची चाड आहे कीं"? भले तो राजाचा मेहुणा असेल, मत्स्य देशाचा सरसेनापती असेत म्हणून तो कांहींही त्याच्या मर्जीला येईल ते समजू शकतो कां"? ज्या माणसाला नैतिक मर्यादांचे बंधन समजत नाही

त्याला जगण्याचा अधिकार नाही. जेव्हां माझा नालायक पती म्हणतो कीं, त्याचा द्युताचा डाव बिघडला तेव्हां माझे हृदय फाटले, मला समजत नाही, एकादा माणून इतका भेकड कसा असू शकतो"? आणि अशा माणसाला त्याचे गेलेले राज्य पुन्हा मिळवावयाचे आहे. ते गेले कोणामुळें? ते विचारा, ते गेले कारण हा भेकड, खेळता येत नसतांना द्युत खेळण्यासाठी गेला व तोंडघशी पडला. मला त्याच्या हरण्याची फिकीर नाही, पण त्याच्या बरोबर त्याचे चार भाऊ व मी असें सगळे त्यात भरडले गेलो, त्याची चीड मला आहे. त्यात पुन्हा पहा अगं कृष्णा, ते सगळे चारही भाऊ निमुटपणे त्या मूर्खाच्या पाठीशी मख्खपणे उभे रहातात. कां तर म्हणे त्यांच्या आईला त्याने शब्द दिला आहे कीं, ते सदैव त्याची पाठराखण करणार. काय कमालीची इमानदारी आहे ह्या लोकांत, प्रथम मला त्या बाईने ह्यां पाचांत वाटले कां तर म्हणे तिला वाटले कीं ते आणलेल्या भिक्षेबद्दल बोलत होते. आणि मी सुद्धा कशी खूळी, त्या आदेशांचे निमुटपणे पालन आजतागायत करत आहे. ही शब्द पाळण्याची तर्हा मला मेलीला अजिबात समजत नाही. त्यात कोणती नैतिकता आली आहे? वचन बद्धता, शब्द पाळणे ह्यांना कांहीं मर्यादांचे बंधन असते कां"? कांहींही झाले कसेही झाले तरी ते शब्द पाळणे, वचन राखणे कसे समर्थनीय होते हे मला समजत नाही. प्रत्येक तत्त्वाला मर्यादांचे बंधन असलेच पाहिजे तरच ते योग्य होईल, येथे तसे कोणतेही बंधन नाही, मग मी कां ते पाळते? ज्याचे आज्ञापालन करावयाचे त्याची त्या प्रकारची योग्यता आहे कां तेसुद्धा पहावयाचे असते. बरे ते सगळे घालवल्यावर ते पुन्हा मिळवण्यासाठी मात्र त्याला त्याच्या हिम्मतवान भावांची गरज आहे. किती आपमतलबी हा माणून आहे? पण मी कशाला त्याला दोष देते, माझे इतर नवरेसुद्धा त्याच लायकीचे असावेत म्हणून ते अशा मूर्खपणात अडकून घेत आहेत. त्यातल्या त्यात माझे वृकोदर मात्र खरे शाबित होतात. त्यांनी प्रत्येक वेळी ह्या भेकडाला तंबी दिली होती पण त्यात आमचे अतिशहाणे, ज्यांनी खरेतर मला जिंकून ह्या घराची स्नुषा केले, ते मध्येच पडतात व भिमाला आवरतात. हे काय चालले आहे ह्या लोकांत मला

कांहीं समजत नाही. कधी वाटते हे सगळे एकजात मूर्ख आहेत व मी त्यांच्यात रमलेली आणखीन एक अतिमूर्ख आहे. कोणी म्हणतात हा दैवाचा खेळ आहे. मला बाई कांहींही समजत नाही. आपण स्वतः कांही चुकीचे निर्णय घ्यावे व त्याचे वाईट परिणाम अंगाशी आलें कीं, दैवाच्या गोष्टी करावयाच्या हा निव्वळ मिथ्याचर आहे. दैव, वचन बद्धता ह्या सगळ्या आपले अपयश लपवण्याच्या सबबी आहेत असेंच मला वाटते, आणि त्यात ही पुरूष मंडळी चांगलीच रमतात. द्युत खेळावयाला कोणी जबरदस्ती केलेली नव्हती".

"मी त्यांचे इंद्रप्रस्थातील वैभव अनुभवले आहे. ते सगळे माझ्या इतर चार हिम्मतवान कर्तृत्ववान पुरूषांनी मिळवले होते पण हा मोठा म्हणून तो गादीवर बसणार हे कोणते नियम, ज्यांने मिळवले त्याचे त्याला मिळावयाला पाहिजे पण येथे आमच्या सासुबाईंच्या राज्यात सगळेच विक्षिप्त होते. एक नामर्द मुलगा केवळ तो कांहीं दिवस आधी जन्मला म्हणून सर्वासर्व कसा होतो व जे मिळवतात ते त्याचे प्यादे कसे ठरतात. जर इंद्रप्रस्थाची संपत्ती ह्यांने मिऴवलेली असती तर त्याने ती अशा जुगारात निश्र्चितपणे लावली नसती. फुकटची मिळालेली संपत्ती त्यांने सहजपणे द्युतात उडवली, हेच खरे कारण आहे. मला आणखीन एका गोष्टीचे नवल वाटते ते माझ्या भावाचे वागणे, दामोदराचे वागणे. तो एका शब्दाने ह्या युधिष्ठीराला कांहीं समज देत नाही. उलट जेव्हां येतो त्याच्या पाया पडतो, हे काय गौडबंगाल आहे ते समजत नाही. मी मान्य करते कीं ह्या इसमात कांहीं उत्तम गुण आहेत, तो प्रेमळ आहे, दानशूर आहे, भावांच्यावर कधी कोणतीही त्याच्या विचारांची बळजबरी करत नाही, मोठे भाऊपण गाजवत नाही. राज्य करताना तो न्यायाने वागत होता, प्रजा त्याच्यावर प्रेम करत होती, सगळे ब्राह्मण, बैरागी, ॠषी, साधू त्याला फार मान देत होते. त्याची भूतदया, चांगुलपणा, व्रतस्थता, सत्त्वशिलता, वागण्या बोलण्यातील शालिनता, लढतांना त्याचे शौर्य, त्याच्यातील माणूसकी, त्याच्यान राज्यातील अपंग, आंधळे, वेडे, मुके, अशा सगळ्यांना तो मोठ्या प्रेमांने दानधर्म करून त्यांची सेवा करत असें. आता हा माणूस स्वताला कंक म्हणवून घेतो. कंक म्हणजे कफल्लक. त्याला

असें नांव कां घ्यावेसे वाटले ते मला समजत नाही. परंतु, ते नांव त्याच्या आताच्या परिस्थितीचे तंतोतंत वर्णन करत आहे. एकेकाळी सगळ्या जगाला टमकवणारा हा पांडव आज एका सामान्य अशा राज्याचा सेवक झाला आहे. हे असें कसले दैव आहे"? ज्याच्या आज्ञेची वाट पहाणारे असंख्य होते, ते मी पाहिले आहे, आणि आज हा माणूस विराट राजाच्या आज्ञेची प्रतिक्षा करत असतो. हि काय अवस्था झाली आहे त्याची? विशेष म्हणजे त्याला त्या अधःपाताची क्षिती नाही. जणूकाय कांही झालेलेच नाही अशा प्रकारे तो त्याचे जीवन व्यतीत करत आहे. मी त्याच्या नवरेपणाची निर्भत्सना केली व सांगितले कीं ह्यापुढे मी तुझी पत्नी राहिली नाही, तेव्हां त्याची प्रतिक्रीया काय होती? तो मला माऊली म्हणून बोलायला लागला, फार तर त्याच्या मुलाची आई, प्रतिविंध्यची माता, म्हणून मला बोलू लागला. हे सगळे मला समजत नाही. ह्या माणसाला समजणे फार मुष्किल आहे. त्याचे पुनः पुन्हा माझी क्षमा मागण्याचेसुद्धा मला विचित्र वाटते. ज्याची प्रार्थना सगळे करत, तो आता दुसर्या राजाची प्रार्थना करत आहे. ह्याचे असें वागणे मला कोड्यात टाकणारे आहे. आम्ही सगळे खरोखरच दैवाच्या फेर्यात अडकलेले आहोत कां"? हा माझा नवरा खरोखरच त्याच्या व आमच्या दुःखाला जबाबदार आहे कां"? द्रौपदी तिचे विचार स्वतःला सांगत होती.

अशारितीने किचक वध पर्व विराट पर्व भाग अठरावा संपला.

## किचक वध पर्व

## भाग एकोणीसावा

अरे जनमेजया, वैशंपायन सांगत असतात, द्रौपदी विचार करत असते, मी माझ्या आणखीन एका दुःखाबद्दल बोलणार आहे. ते सांगून मी माझे हृदय हलके करू इच्छिते. त्यानंतर ती वल्लभाला तिचे दुःख सांगू लागते. "आता पहा, तू हा हलका व्यवसाय आरंभिला आहेस, जेवण बनवण्याचा. त्यापेक्षा जास्त कष्टी करणारे दुसरे काय आहे. लोक तुला विराटाचा खानसामा म्हणून ओळखणे ह्याच्यापेक्षा जास्त अपमानकारक दुसरे काय आहे"? तुझे नांव काय तर वल्लभ, त्या नांवांनेच तू खालच्या वर्गात फेकला गेलास, तुझे काम झाले कीं तू विराटाच्या बाजूला एक स्वयंपाकी म्हणून बसत असतोस. ते पाहून मला फार दुःख होते ते मी तुला कसे सांगू. खरेतर हे सगळे करण्याची काय आवश्यकता आहे, ते मला समजत नाही". ती पुढे वल्लभाला सांगते जेव्हां तुम्ही हत्तीबरोबर किंवा रेड्या बरोबर कुस्ती करता तेव्हा राणीवसातील स्त्रिया जोरा जोराने हसत असतात, ते मला अजिबात आवडत नाही. मला ते पहावत नाही हे राणींला समजते कारण, मी फार बेहोष होते जेव्हा तुम्ही त्या अजस्र प्राण्याना फेकून देता. ती कैकेयीची कन्या माझ्या त्या अवस्थेमुळें बेचैन झालेली मी पाहिली आहे. तिला कळते कीं त्या कुस्त्या मला आवडत नाहीत.

त्या सगळ्या बायका मला मदत करण्यासाठी येतात तेव्हां त्याना समजते कीं मी बेशुद्ध पडली आहे. त्या एकमेकींना सांगतात कीं, ही सैरंध्री वल्लभाच्या प्रेमात पडली आहे आणि म्हणून त्या जीवघेण्या कुस्त्या पाहून तिला भोवळ आलेली आहे. त्या एकमेकीत बोलतात, तो वल्लभ खूप देखणा व शक्तीमान आहे आणि आपली सैरंध्रीसुद्धा लावण्यवती आहे त्यामुळें त्यांच्यात कांहीं असले पाहिजे असा त्या संशय व्यक्त करतात. बायका त्यांच्या गोष्टी चांगल्या समजतात. त्या अंदाज बांधतात कीं, ते दोघे एकाच सुमारास राजाकडे आले आहेत ह्या गोष्टींचा त्या तसा अर्थ काढतात. राणी त्यांच्या त्या गप्पात सामील असते व माझ्यावर संशय व्यक्त करते कीं, आपला कांही संबंध आहे. वस्तुतः ते जरी खरे असले तरी तूर्तास त्या गोष्टींची वाच्यता होणे आपल्या योजनेच्या दृष्टीने घातक आहे. असें द्रौपदी भिमाला सांगत असते. द्रौपदी त्याला सांगते, युधिष्ठीराच्या भोंगळ काराभारामुळे मी आधीच त्रस्त झालेली आहे आणि अशांत हा नवीन संशय माझ्यामागे लागत आहे. त्यात आता हा मूर्ख किचक मध्ये अडमडत आहे. ती भिमाला सांगते मला आता जगण्याची इच्छा राहीलेली नाही. अशा जगण्यात काय हशिल आहे, तुम्ही सांगा?

माझा नवरा जो एका रथातून सगळे जग जिंकत होता तो नृत्य करत आहे, हा काय प्रकारचा भोग समजावयाचा. ज्याने खांडव वन अग्नीला मिळवून दिले तो गाणे शिकवत आहे, मला हे सगळे सहन होत नाही. आणि हे सगळे कां तर त्या मोठ्यांने द्युत खेळण्याचा उद्योग सुरू केला. माझ्या आपत्तीना कांहीं अंत आहे कां? कां हे असेच होत रहाणार? मला कांहीं समजत नाही. अर्जुनाला त्याचे वळांनी भरलेले हात लपवण्यासाठी हातभर बांगड्या घालाव्या लागत आहेत. काय ही दुर्दशा झाली आहे पांडवांची. वीराला जे हातावरील वळ दाखवण्यात अभिमान असतो तेच वळ त्याला लपवावे लागत आहे.

शूरात मिरवणारा माझा पती आज बायकांत बसून गाणी बजावणी करत आहे. हे किती मी सहन करावयाचे सांगा वृकोदरा. जो योद्धा सगळी आयुध चालवण्यात प्रवीण आहे तो आज बायकांत बांगड्या घालून आणि कानांत

मोठ्या मोठ्या आकाराची कुंडल घालून मिरवत आहे. तसा त्या राणीवसातील बायकांत बसला आहे. ह्या अज्ञातवासाच्या खेळाचा अंत कधी होणार आहे. अहो भिमदेव मला अर्जुनाच्या ह्या अवस्थेमुळें रडू फुटते व मी सतत रडत बसते. कारण त्या परिस्थितीला मी कांहींच करू शकत नाही. एका सामान्य पुरूषालासुद्धा अशाप्रकारे बायकांच्या कपड्यात बसणे लाजिरवाणे असते मग हे तर कितीतरी मोठे पराक्रमी, त्यांच्यावर अशी पाळी यावी हे कोणते दुर्भाग्य मी समजावे? मला वाटते कुंतीमातेला ह्यातील कांहींच माहीत नसावे. जर त्यांना हे समजले तर त्यांची काय गत होईल त्याची मी कल्पनासुद्धा करू शकत नाही. अजातशत्रूचे जुगाराचे व्यसन ह्या सगळ्या गोष्टींना कारणीभूत आहे. आपले सहदेव पहा, हल्ली ते गुरांचे वैद्य बनून सगळी गुरं पहात आहे. त्यांच्या सारखा शूर योद्धा गुरांच्या मागे धावत आहे ते पाहून माझा जीव तुटतो. ह्या अशा सगळ्या गोष्टींमुळें हल्ली मला झोपसुद्धा येत नाही. कांही कांहीं म्हणून सुचत नाही. आता मला सांगा, त्या सहदेवांनी आणि नकूलांनी काय पाप केले म्हणून त्यांने ही कामं करावी. कोठे फेडेल तो अजातशत्रू ह्या सगळ्या पापाची फळं मला समजत नाही. जेव्हां मी सहदेवाला विराटापुढे खाली मान घालून उभा पहाते तेव्हां माझा तोल जातो. सहदेव गुराखी झाला हे मला सहन होत नाही. कुंतीमातेला आपण काय जाब देणार अहात, किंवा युधिष्ठीर त्याच्या मातेची कशी समजूत काढणार? वनात आपण निघालो तेव्हां मी पाहिले आहे कुंतीमाता सहदेवाला कशी मिठी मारतात. त्यांना कदाचित माहितसुद्धा नसेल त्यांच्या ज्येष्ठ पुत्राचे पराक्रम ज्यामुळे, सगळे पांडव देशोधडीला लागले आहेत. वनवासात आपण निघाले तेव्हां त्यानी माझ्यावर सहदेवाची व नकूलाची जबाबदारी सोपवली होती, म्हणाल्या होत्या कीं, ते दोघे त्यांचे फार लाडके आहेत तेव्हां त्यांची काळजी आता मी पहावी म्हणून. त्याची ही अवस्था मी नाही केली पण जाब मला द्यावा लागेल. सांगा मी त्यांना कोणत्या तोंडाने जाब देणार? नकुलाचेच पहा, तो जगातील सर्वात सुंदर पुरूष आज घोडे सांभाळत आहे. नांव काय तर ग्रंथिक! ज्याच्या समोर कोणीही शत्रू उभा रहात नसें तो आता घोडे सांभाळत आहे. विराट राजापुढे

जेव्हां नकूल घोडे दाखवत फिरतांना मी पहाते तेव्हां मला लाज वाटते. ह्या सगळ्या परिस्थितीला जो माणूस जबाबदार आहे त्याला त्याची क्षिती नाही. तो आरामात राजाच्या बाजूला बसून त्याचे व्यसन चालवत आहे. मला सांगा वृकोदर, हे सगळे पुन्हा पुन्हा नजरे समोर येत असतांना मी कशी शांत राहू? मला सर्वात जास्त कष्ट होतात जेव्हां मला समजते कीं आपण सगळे प्रचंड सामर्थ्यवान आहोत तरी हे सगळे भोगावे लागत आहे. ह्याला दैवगती म्हणावयाचे कीं कर्मगती ते मला सांगा. दैवगती सांगून जर कोणी कर्मगती लपवण्याचा प्रयत्न करत असेल तर ते मी मान्य करणार नाही. तो सरासर खोटेपणा होईल.

अशारितीने किचक वध पर्व विराट पर्व भाग एकोणीसावा संपला.

## किचक वध पर्व

## भाग विसावा

त्या नालायक जुगारड्या पतीमुळें मी सुदेश्नाची नोकर बनली आहे. त्या सामान्य अशा राणीवसात रहावे लागत आहे. अज्ञातवास माझ्या माथ्यावर लादला गेला आहे. मला त्या दाश्यांची दया येत असे ज्या आपल्या वाड्यात काम करत असतं, आता दैवयोग पहा कसा झाला आहे, मीच एक दासी बनून रहात आहे. मला हा अज्ञातवासाचा काळ कधी एकदाचा संपतो असें झाले आहे. सर्वात जास्त त्रास मला होत आहे. यश, विजय, पराजय, हे माणसासाठी सदैव लिहीलेले आहेत त्याच्या दैवात. त्यापासून सुटका नसते हे

मी जाणते. तरी मी अशी अपेक्षा करते कीं हे सगळे अखेरीस चांगल्या समृद्धीत परावर्तीत होईल, तो दिवस खरा. उत्कर्ष आणि र्हास हे आळीपाळीने येत असतात. माझ्या सगळ्या पतींच्या प्राक्तनात उत्कर्ष असेल तर हे सगळे सहन करण्यास मी तयार आहे. ज्यामुळें यश येते त्याच कारणाने अपयश सुद्धा येत असते. अरे माझ्या भिमा, मला तू मारून कां टाकत नाहीस. ते तुझ्या सारख्याला किती सोपे आहे. आजवर किती मोठे मोठे राक्षस तू मारले आहेस मग मला एका छोट्या स्त्रीला मारणे तुला कितीतरी सोपे आहे. असें मी सांगते कारण मला आता हा अज्ञातवास सहन होत नाही. असें म्हणतात, जे दुसर्यांना मारतात ते प्रायः दुसर्याकडून मारले जातात, जे दुसर्याला भीक देतात ते कधी तरी स्वतः भीक मागतात, जे दुसर्याला पराजित करतात ते स्वतः पराजित होतात. दैवाला कांहीं अशक्य नसते व कोणीही दैवाला आव्हान देऊ नये. मी त्या शुभदिवसाची वाट पहात आहे जेव्हां हा अज्ञातवास संपेल, आणखीन दोन महिने उरले आहेत ते कसे जातात त्याची चिंता मला कात आहे. आपल्यावर हा जो प्रसंग गुदरला आहे त्यामुळें कुरु घराण्याची सर्वदूर नालास्ती होत आहे. गृहकलहात कुरूवंशाचे लोक जे स्वताला फार हूशार समजतात ते अडकले आहेत हे पाहून सगळे जग आपल्याला हसत आहे. सगळे मजेत रहात आहेत व आपण येथे पिचत पडलो आहोत. जेवढा विचार करावा तितके जास्त दुःख होते. मला वाटते मी माझ्या बालपणी धात्रीचा उपमान केला असेल नकळतपणे म्हणून मला हे सगळे भोगावे लागत आहे, असें वाटते. कारण कोणतीही गोष्ट विनाकारण होत नाही. आपले सुख व दुःख आपल्याच कर्माची फळं असतात असें नितीशास्त्र सांगते. मी तुला सांगते भिमा, आपण जेव्हां अरण्यात रहात होतो तेव्हां मला फारसे वाईट वाटत नव्हते, कधी कधी मला मजाच वाटत होती परंतु, हे माणसात रहाणे व तेसुद्धा अशारितीने मला फार अवघड जात आहे. जो भिम सर्वस्वी माझा होता तो आता एका राजाचा नोकर झाला आहे अहो दुर्भाग्य. तो महाप्रतापी धनंजय जो अनेक क्षत्रियांना लोळवत असें तो स्वताच मुलींमध्ये पडलेला आहे. माणसाला त्याचे भविष्य समजत नाही त्यामुळें आपण

एकाद्या अंधाप्रमाणे जगत असतो. भविष्यातील खांचखळगे समजत नसल्यामुळें आपण धक्के खात जगत असतो. कदाचित म्हणूनच दामोदरसुद्धा आपल्याला मदत करू शकत नाही. आपले भोग आपल्यालाच भोगावे लागतात. मला माझे राणीपदाचे दिवस आठवतात. माझ्या पुढे व मागे अनेत सेविका सतत माझ्या सेवेसाठी तयार होत्या आणि आज काय तर मींच राणी सुदेश्नाच्या मांगे मांगे धावत आहे. अरे कौंतेया, हे आणखीन एक दुःख मी तुला सांगितले. जिने कधी कोणासाठी चंदन सहाणीवर उगाळले नाही ती आज रोज सुदेश्नासाठी चंदन उगाळत असते. जी कधी कोणाला घाबरली नाही अगदी तिच्या नवर्यांनासुद्धा ती आज त्या विराटाच्या पुढे गुलामासारखी उभी असते. त्या राजाला माझ्याच हातचे गंध लागते पुजेसाठी, काय जबरदस्ती आहे पहा.

वैशंपायन पुढे सांगतात, अशाप्रकारे आपले दुःख भिमाला सांगत असतांना ती मानीनी रडू लागते. त्यानंतर ती जे हालते त्यामुळे भिमाला विशेष त्रास होतो. ती बोलते, जो कांही माझा दोष असेल त्यासह मी आज जीवंत आहे. मला मेलेच पाहिजे.

वैशंपायन पुढे सांगतात, भिमाला सुद्धा गहीवरून येते, तो त्याचे तोंड त्याच्या दोनही पंजात लपवून अश्रू ढाळू लागतो.

अशारितीने किचक वध पर्व विराट पर्व भाग विसावा संपला.

## किचक वध पर्व

## भाग एकविसावा

भिम तिला सांगतो, माझ्या बाहूबलाची आणि अर्जुनाच्या गांडीवाची छीःथू आहे जर आमच्या असूनही तुला असुरक्षित वाटत असेल. मला अजातशत्रूने

थांबवले नसतं तर त्याचवेळी मी भर सभेत त्या मूर्खाची वाट लावली असती. त्याने मला खुणवले किं असे कांहीं मी केले तर दुर्योधनाचे जे हेर त्या सभेत आहेत त्यांच्या कडून ती वार्ता हस्तिनापुरात जाईल. म्हणून मी गप्प झालो व तेथून काढता पाय घेतला. आपले युधिष्ठीर विराटाच्या सभेत कौरवांचे कोण हेर आहेत त्याचा अंदाज घेत असतात. किंबहुना त्यासाठीच तो दरबारात ठाण मांडून बसलेला असतो. द्युताचा निव्वळ बहाणा आहे. किचकाची मस्ती उतरवण्यास मला फार वेळ लागणार नाही, परंतु, ते जरा जास्त सावधपणे करावे लागेल. तुझ्या भावनिक प्रभावाखाली जर आम्ही गेलो तर आपण सगळे सांपडले जाऊ. ते चांगले होणार नाही. आपल्याला पुनः वनवासात जावयाचे नाही, आधीच भरपूर काळ वाया गेला आहे, आता आपल्याला फार सावध रहावयाला पाहिजे. जर मी त्या किचकाला तेव्हांच ठार मारले असते तर ती वार्ता कौरवांकडे निश्चितच गेली असती. आपल्याला हे वर्ष म्हणजे आता कांहीं दिवसच फक्त सावध रहावयाचे आहे म्हणून त्या किचकाला इतर गुप्त मार्गाने ठार मारावे लागेल. तू मला जे बोललीस ते जर त्या इतर तुझ्या नवर्यांना सांगितलेस तर तेसुद्धा त्याचा खत्मा करण्यास तयार होतील परंतु, आपल्याला डोके ठिकाणावर ठेवून हे काम करावयाचे आहे. असें भावनाविवश होऊन चालणार नाही. तुझ्या अपमानाचा प्रत्येक वेळी आम्ही वचपा काढला आहे, मग ते राजा जयद्रथ सिंधचा असो, दुःशासन असो. ह्याचासुद्धा नाश मी करणार आहे पण युक्तीने ते करावे लागेल. तुझ्या गंधर्व नवर्याने सुड उगवला असें पसरावे लागेल. पण तू असा जीव देण्याच्या गोष्टी कृपया करू नकोस. तू जर गेलीस तर मला सुद्धा जगता येणार नाही. म्हणून अशी भाषा नको.

फार पूर्वी होऊन गेलली एक गोष्ट मी तुला सांगतो, सर्जति नांवाच्या राजाला एक सुंदर कन्या असते, तिचे नांव असते सुकन्या. ती भृगूच्या वंशातील ऋषी च्यवनशी लग्न करते व त्याच्यासह वनात जाऊन राहू लागते. च्यवन मोठा तपस्वी व वैराग्यपूर्ण जीवन जगत होता. त्याच्या ध्यानस्थ रहाण्यामुळें त्याच्या भोवती मुंग्या वारुळ बनवतात. त्याची पत्नी त्याच्याबरोबर हजार वर्षे रहाते. त्याच प्रमाणे रामाची बायको जान्हवी त्याच्या बरोबर वनात जाऊन

रहाते, तेथे तिला राक्षस राजा त्रास देत असतो हे सगळे तुला सांगण्याचे कारण जे तुझ्या बाबत होत आहे ते इतर तुझ्यासारख्या तेजस्वी असलेल्या बायकांच्या बाबतसुद्धा आधी झालेले आहे. हा इतिहास आहे. अगस्त्य ऋषीची पत्नी लोपामुद्राचे उदाहरण घे, तेसुद्धा तुझ्या सारखेच आहे. म्हणजे फक्त तुझ्याबाबतच असे होत आहे असें समजण्याचे कारण नाही. सावित्रीचे उदाहरण घे, तिने तिच्या नवर्याला, तिच्या सासर्याला व स्वतःच्या पित्याला अशा सगळ्यांना तिच्या पातिव्रत्याने मोठ्या संकटातून बाहेर काढले आहे. अशी महान बायकांची तर्हा आपल्याकडे आहे. म्हणून तू जसा विचार करतेस ते अयोग्य आहे. आता फक्त पंघरा दिवस उरले आहेत अज्ञातवास पूर्ण व्हायला, तेवढ्यासाठी तू घाई करू नकोस. एकदा कां हां काळ संपला कीं नुसती पहात रहा त्या कौरवांचे काय होते ते.

ते भिमाचे बोलणे ऐकल्यावर द्रौपदीला मोठा दिलासा मिळतो. ती त्याला बोलते, "मी त्या दुःखाच्या कारणाने रडत होते. परंतु, तू त्या महान स्त्रियांची आठवण मला करून दिली व मला धीर आला. राणी कैकेयीसुद्धा माझ्या देखणेपणाला घाबरते. ती तिचा नवरा माझ्यापासून दूर ठेवत असते. मी युधिष्ठीराला आता दोष देण्याचे सोडून देईन. त्यात कांहीं अर्थ नाही हे मला समजले आहे, तुझ्या सांगण्यावरून. परंतु, ह्या किचकाचा बंदोबस्त करावयालाच पाहिजे. मी एकदा त्याला बजावले आहे कीं, माझे पांच गंधर्व पती त्याचा नाश करतील. तेव्हां तू त्यातील एक गंधर्व बनून ते काम केलेल तर बरे होईल. त्यानंतर कोणीही माझ्याकडे पहाणार सुद्धा नाही. परंतु, त्या मुर्खाला त्याच्या ताकदीचा एवढा गर्व आहे कीं, तो मला म्हणतो, किं, तो माझ्या गंधर्व नवर्यांना भित नाही. तो म्हणतो कीं, तो असें शंभर गंधर्व एका झटक्यात ठार मारेल. ते ऐकल्यावर मी त्याला सांगितले, कीं, माझे गंधर्व पती कोणाला मारू इच्छित नाहीत पण जर तू तुझी मर्यादा ओलांडलीस तर मात्र तुझे कांहीं खरे नाही. ते ऐकून तो नीचात्मा जोरजोरांने हसू लागला.

त्याच्या बहिणाने मला त्याच्याकडे दारू आणण्यासाठी पाठवले व त्यानंतर जे घडले ते तुला माहित आहेच. त्याच्या तावडीतून सुटण्यासाठी मी थेट दरबार

गृहाकडे धावण्यास सुरूवात केली. तेथे तुम्ही दोघे होता. त्याठिकाणी मात्र सूर्याने नेमलेल्या अदृष्य राक्षसांने त्याला जोरांने माझ्यापासून दूर फेकून दिले. हे सगळे सभेत उपस्थित असलेल्या सगळ्यांने पाहिले आहे. एवढे झाले तरी राजांने त्याच्या मेव्हण्याला जाब विचारला नाही व उलट मलाच प्रश्न विचारू लागला. त्याचे कारण मला त्या किचकानेच सांगितले कीं, राजा विराट गादीवर आहे कारण त्याला किचकानेच तेथे बसवले आहे. म्हणून त्याचे सगळे अपराध राजा डोळेझाक करून विसरतो. दरबारातील मानकर्यांनी मात्र माझी बाजू घेतली होती. म्हणून मी सांगत्ये तुला, जर तू त्याचा जीव घेतला नाहीस तर मी माझा जीव देईन. त्याचे पातक तुला लागेल. एका पाप्याकडे कानाडोळा करणे खर्या क्षत्रियाला न शोभणारे आहे हे तू जाणतोस. जसें पतीने पत्नीला सांभाळावयाचे असते तसेंच पत्नीनेसुद्धा पतीला सांभाळावयाचे असते. ही दुहेरी जबाबदारी असते. हे सगळे मी माझ्या पित्याच्या मांडीवर बसून ब्राह्मणांच्या तोंडून ऐकले आहे. त्या नराधमाने माझ्या कमरेत लाथ मारली ती यूधिष्ठीर पहात होते. पण त्याने मलाच दोष दिला, हे मी कसे विसरेन बरे"? "तुम्हीसुद्धा पहात होता पण मला सावरण्या ऐवजी तुम्ही कोठेतरी गायब झालात". "आपण मला जटासुराच्या हातून वाचवले आहे हे मी कधीच विसरणार नाही. जयद्रथाच्या पासून तुम्ही दोघांनी मला वाचवले पण युधिष्ठीराने त्याला जीवनदान केले. काय न्याय आहे तुमच्या मोठ्या भावाच्या राज्यात"? "जर तुम्ही किचकाचा काटा नाही काढला तर मी विष प्राशन करून जीव देईन. कारण तुम्हाला माझी गरजच नाही, मग मी का रहावयाचे"? हा विषय हसण्यावर नेण्याचा नाही हे मी तुम्हाला निक्षून सांगत आहे.

वैशंपायन पुढे सांगतात, असें बोलून ती तिचा चेहरा भिमाच्या छातीत घुसवून रडू लागते. भिम तिची समजूत काढण्याचा प्रयत्न करत असतो. तो तिचा चेहरा त्याच्या हाताने पुसत असतो. शेवटी तो समजतो कीं, किचकाला ठार मारण्याशिवाय आपली पत्नी मानणार नाही. तेव्हां तो तिला आश्र्वासन देतो कीं, तो किचकाला ठार मारेल.

अशारितीने किचक वध पर्व, विराट पर्व भाग एकविसावा संपला.

## किचक वध पर्व

## भाग बाविसावा

भिम तिला बोलतो. मी किचकाला त्याच्या सगळ्या हितचिंतकांसह मारून टाकीन, कांहीं काळजी करू नकोस, यज्ञसेने. आता माझी योजना नीट समजून घे, उद्या तू त्याला रात्री एकांतात त्या नृत्यगृहाकडील शांत ठिकाणी भेटण्यास येण्यास सांग. असा वेळी किं तेथे त्या अंधारात कोणीही नसेल. कारण दिवसा त्यामुली नाचगाणी करतात व रात्री ते निर्मनुष्य असते. ती जागा त्याचा समाचार घेण्यासाठी उत्तम आहे. तेथे त्याला मी त्याचे सगळे पितर दाखवणार आहे. एक सावधानकता तुला बाळगावी लागेल कि, जेव्हां तू त्याला तो निरोप देशिल तेव्हां तेथे कोणाही नाही.

वैशंपायन पुढे सांगतात, अशारितीने ती योजना आखल्यानंतर ते दोघे त्या रात्रची प्रतिक्षा करत असतात. ती रात्र तशीच जाते व दुसर्या दिवशी किचक पुन्हा तिला भेटायला राणीवशातील तिच्या खोलीकडे येतो. तेथे तो तिला मोठ्या घमेंडीत आवाज देतो कीं, "पहा तुझ्या राजाकडे तक्रारीचान कांहीं परिणाम झाला कां"? "अग सुंदरी तो नांवापुरता राजा आहे. खरा राजा मींच आहे. मला फार काळ तू झिडकारू शकणार नाहीस जर तुला मत्स्यदेशात रहावयाचे असेल तर. मी तुला अखेरचे नीटपणे विचारत आहे, बर्या बोलांने माझ्या शयन कक्षात येतेस कीं तुला उचलून घेऊन जाऊ? मी तुला खूप सुख देण्याच्या इराद्याने आज येथे आलो आहे. मी तुझा दास बनण्यास तयार आहे. मी तुला हजार निष्कत बक्षिस देईन व अनेक मुली व पुरूष तुझ्या सेवेसाठी ठेवीन. तुझ्यासाठी खेचराने ओढले जाणारे तीन रथ देईन". ते ऐकल्यावर द्रौपदी त्याला बोलते, "अशा गोष्टी इतक्या मोठ्याने करावयाच्या नसतात. हळू बोलावयाचे असते आणि कोणाला समजणार नाही अशा प्रकारे ह्या भेटी ठरवावयाच्या असतात. जर मोठ्याने बोलणार असशिल तर मी येणार नाही. आपण जर भेटावे असे तुला वाटत असेल तर ती गोष्ट अजिबात गुप्त राहीली

पाहिजे. आम्हा बायकांना असे संबंध नेहमी गुप्त राखावयाचे असतात, चवाठा करणार असशिल तर मी येणार नाही. माझ्या गंधर्व नवर्यांना ते समजता कामा नये अशाप्रकारे सगळे तू गुप्तपणे करणार असशिल तर माझे ऐक. जर तू हे मान्य करत असशिल तर मी तुझ्याबरोबर कोठेही येण्यास तयार आहे". ते द्रौपदीचे आश्र्वासक बोलणे ऐकून किचक पार पिघळून जातो. त्याच्या आनंदाला पारावार रहात नाही. आपला हर्ष आवरणे त्याला अशक्य होत असते. ज्या गोष्टीची त्याला प्रतिक्षा होती ती इतक्या सहजपणे प्राप्त होत आहे त्यामुळे तो हर्षभरित झालेला, तिला बोलतो, कामातूर झालेला तो नराधम तिच्या सगळ्या गोष्टी मान्य करत बोलतो, "सांग आपण कोठे भेटायचे"?

द्रौपदी समजते कीं, मात्रा लागू पडत आहे, त्यामुळें विशेष समाधानात ती त्याला सांगते कीं, रात्री अंधार पडल्यानंतर त्या नृत्यशाळेच्या आत जेव्हां तेथे कोणीही नसते भेटावयाचे. परंतु, जर तू तुझ्या बहिणाला किंवा इतर कोणाला त्याचा सुगाव लागू दिलास तर ते मला समजेल व मी तेथे येणार नाही. तू तेथे पोहोचलास कीं मला समजेल मग मी तेथे येईन", असें द्रौपदी त्याला सांगते.

वैशंपायन पुढे सांगत असतात, त्या संभाषणानंतर तो कःपुरूष तेथून निघून जातो. त्यानंतर तो संबंध दिवस कृष्णेला कांहीं महिन्या इतका लांब असल्याचे वाटत होते. तो मूर्ख किचक मोठ्या तयारीने त्याच्या साक्षात मृत्यूकडे मोठ्या रुबाबात जाण्याची व्यवस्था करत होता. तो मोठी रंगतदार स्वप्न रंगवत होता. सैरंध्री आपल्याला मिळाली म्हणून तो फार खूष झाला होता. त्याला माहित नव्हते कीं, तो त्या रात्री त्याच्या कर्दनकाळाला भेटणार होता. तशा शुषीत तो त्याच्या घरी जातो. मदांध असां तो, त्याचा विवेक हरवून बसलेला होता. त्या रात्री जाण्यासाठी तो खास तयार केले सुगंधी द्रव्य, विशेष तयार केलेले उंची कपडे, गळयात घालण्यासाठी महागड्या माळा, अशी सगळी तयारी करत असतो. त्याच्या दृष्टीने त्यांने एकादी मोठी लढाई जिंकल्यानतर करावा असा जामानिमा केला होता. त्याच्या उत्साहाला मर्यादा

नव्हती. द्रौपदीला आपले वैभव दाखवण्याची त्याची ती नतयारी होती, ज्यामुळें ती सुंदरी त्याला कायम आपला समजेल अशी त्याची समजूत होती. त्यात रमलेल्या त्या पुरूषाला तो दिवस कधी संपावयाला आला तेसुद्धा समजले नाही.

त्याच सुमारास ती पांडवांची पत्नी भिमाच्या पुढे त्याच्या भटारखान्यात उभी होती. ती बोलली, "अरे शत्रूंचा नाश करणार्या माझ्या नवर्या, मी तुझ्या सांगण्याप्रमाणे त्याला त्या नृत्यशाळेत रात्री भेटण्यास बोलावले आहे. आम्ही त्या नृत्यगृहातील नृत्यशाळेत भेटणार आहोत, असें मी त्याला सांगितले आहे. तो तेथे एकटान येणार आहे. तो सुताचा मुलगा गंधर्वांना मानत नाही. तो तेथे आला कीं, तू त्याला पकडून ठार मारशिल. ज्याप्रमाणे कृष्णाने कालिया नागाला उंच उचलून आपटले होते तसे तू ह्याच्याशी करावयाचे आहे. तरच माझे समाधान होईल. असें केल्याने तुझा माझा व कुरुवंशाचा मोठा सन्मान होणार आहे".

भिम तिला बोलतो, "तुझे स्वागत असो, तुला प्रसंन्न करण्यासाठी मी हे करणार आहे. तू त्याला तेथे येण्यास तयार केले हे एक चांगले सांगितले आहेस मला. जर तो खरोखरच तेथे आला तर परत जाणार नाही तेथून ह्याबद्दल तू निर्धास्त रहा. जसें हिडींबाला उचलून आपटून मारले अगदी तसेंच ह्याला मी ठार मारणार आहे. समाजात नैतिकता राखावयाची असेल तर अशा लोकांचा नाश होणे अगत्याचे असते. त्यात पाप नाही. जसें इंद्राने वृत्राला मारले व जगातील पाप कमी केले तसे मी आज करणार आहे. जर मत्स्यदेशाचे लोक त्याची बाजू घेतील तर मी त्यांनासुद्धा ठार मारीन. त्यानंतर मी दुर्योधनाला मारणार आहे. तो पर्यंत आपला भाऊ त्या विराटाची नोकरी करत राहू दे". भिमाचे ते बोलणे ऐकून द्रौपदी त्याला आठवण करूम देते किं, तो हे गुपचुपपणे करणार आहे. कोणालाही समजता कामा नये कीं, तू हे केले आहेस". भिम तिला सांगतो, "ह्या योजनेतील गुप्तता फार महत्वाची आहे व त्याचे चांगले भान मला आहे. मी त्या किचकाचे डोके असें

फोडणार आहे जसे हत्ती नारळाचे फळं फोडतो. त्याने जी आगळीक केली आहे त्यासाठी अशी शिक्षा त्याला होणे आवश्यक आहे".

वैशंपायान पुढे सांगतात, ठरल्या प्रमाणे भिम त्या नृत्यशाळेत अंधारात जाऊन बसतो. तेथे तो किचकाची वाट पहात असतो. जसें सिंह हरणाच्या शिकारीसाठी दबा धरून बसतो. अपेक्षे प्रमाणे तो विराटाचा मेव्हणा साजशृंगार करून ठरलेल्या वेळी त्या अंधार असलेल्या नृत्यशाळेत येतो. तेथे अंधार असतो. तो द्रौपदीला आवाज देतो, "सैरंध्री, सैरंध्री, चालत चालत तो अनाहूतपणे भिमाच्या जवळ येतो. जसें एकादे लहान जनावर सिंहाच्या जवळ जावे तसे ते होत असते. भिमाला त्याचा राग येत असतो. त्यामुळें त्याचे हात शिवशिवत असतात. तो त्या सुतपुत्राचा मृत्यू तेथे बसलेला होता. वासनेच्या आहारी गेलेला तो किचक हात हलवत हलवत कोठे सैरंध्री हाताला लागते कां ते पहात असतो. किचक बोलतो, "अहो सुंदरी मी तुझ्यासाठी बोलल्या प्रमाणे सगळे तयार ठेवले आहे. त्या अनेक दास्या, ते नोकर, तो सजवलेला वाडा असें सगळे तयार करूनच मग मी येथे आलो आहे. तू कोठे लपली आहेस? मी त्यांना सांगितले आहे आपल्या विवाहाबद्दल व त्यामुळें ते सगळे फार खूष झाले आहेत. ते तुला सजलेली पहाण्यास आतूर आहेत. तरी तू कोठे आहेस ते सांग. मी तुला घेऊन जाणार आहे आपल्या वाड्यात".

भिम त्याला धरतो व बोलतो, "तू फार सुंदर आहेस, तुला आजवर असा स्पर्श अनुभवाला आला नसेल. तुला बायकांशी मजा करावयाला फार आवडते नाहीं कां"? तुझ्यासारखा लंपट माणूस दुसरा नसेल", असें बोलून तो त्याला त्याच्या जबरदस्त पंजात पकडून आवळायला लागतो. भिम त्याला ऐकलतो कीं तुझी बहीण तुला मेलेला पहाणार आहे. कारण तिनेच सांगितले आहे की, मत्स्य देशात बायकांशी हरकत करणार्याला ठार मारण्याची शिक्षा असते. तुला मारल्यानंतर तिची सैरंध्री सुखाने येथे राहू शकेल. तुझ्या मृत्यूने तुझा बहिणीचा नवरासुद्धा सुखाने राज्य करू शकेल. थोडक्यात तुझे मरणे सगळ्यांना फायद्याचेच आहे. भिमाने त्याचे केस पकडले होते ते किचकाने त्याच्या तावडीतून सोडवले ल भिमाचा हात पकडला. त्यानंतर त्यांच्यात द्वंद्व

सुरू झाले. हातापायी होती. जसें दोन हत्ती झुंजावेत असे ते होत होते. ती लढाई वली आणि सुग्रीवाच्या द्वंद्वाची आठवण करून देत होती. ते त्याची नखे, दांत वापरत होते. किचकांने एक जोराचा फटका भिमाला मारला. परंतु, त्याचा कांहीच परिणाम भिमावर झाला नाही. दोन बैल झुंझावेत असें ते होत होते. त्यांच्या त्या हातापयीचा आवाज बाहेर जाऊ लागला. त्या शांततेत तो विशेष जाणवत होता. पण ती जागा वाड्या बाहेर लांब होती. त्यांची मारामारी फारकाळ चालणारी नव्हती कारण लवकरच किचक थकल्याचे भिमाला समजले. एक दोनदा तो भिमाला जमिनीवर आदळते पण त्याचा भिमावर विशेष परिणाम झालेला दिसत नाही. त्या एकांत जागी त्यांची झुंज होत होती. सुरूवातीला किचकाचा जोर फार होता परंतु, कांहीं वेळानंतर तो थकल्याचे समजू लागले. त्या मारामारीत ते एकमेकांना आव्हान देत होते. त्यांच्या त्या झुंजीमुळें ते नृत्यगृह हादरून निघाले. किचक पुरता थकला आहे हे समजल्यावर भिमाने त्याला आवळण्यास सुरूवात केली. भिम त्याने दिलेले फटके शात होता पण त्यामुळें त्याला कांहींच होतक नव्हते. परंतु, त्या जोरदार फटक्यांमुळे किचक थकत होता. त्याला ऊसंत मिळणार नाही इतकी दक्षता भिम घेत होता. ती भिमाची कुस्ती करण्याची पद्धत होती. किचक पूर्णपणे थकला आहे ते समजल्यावर भिमाने त्याचे फटके मारावयाला सुरूवात केली. ते इतके जोरदार होते कीं किचकाला भोवळ आली व तो बेशुद्ध झाला. भिमाने त्याला ऊचलून जोरात जमिनीवर आदळावयाला सुरूवात केली. त्यांमुळें तो आणखीनच खलास होत होता. किचकाच्या घशातून घर घर ऐकू येऊ लागली. तो आवाज जास्तच मोठा होता म्हणून भिमाने त्याचा गळा आवळायला सुरूवात केली. किचकाचा श्र्वासोंश्र्वास बंद झाला होता. भिमाच्या फटक्यामुळे त्याची सगळी हाडं तुटलेली होती. शरीराचा चोळामोळा झाला होता. किचक मेला होता. भिम त्याला वळकटी गुंडाळतात तसे गुंडाळतो त्याला समजते कीं किचकाचा खेळ संपला आहे. त्यावेळी वृकोदर स्वगत बोलतो, "कृष्णाची चिंता आता संपली". तो द्रौपदाला बोलावतो, जी तेथे अंधारात राहून ते सगळे पहात होती. "कृष्णा, पहा तुझा शत्रू मेला आहे. मी

माझे कर्तव्य पूर्ण केले, तुला दिलेला शब्द पूर्ण केला आहे". किचकाचे कपडे फाटलेले असतात व त्याचे सगळे मौल्यवान दागिने इतस्ततः विखरूलेले असतात त्या नृत्यशाळेमध्ये. तो तिला बोलावतो दाखवतो त्याचे काय झाले आहे. भिम अजूनही रागाच्या भरात थरथरत होता. कृष्णा त्याला शांत करण्याचा प्रयत्न करत असते. अधारात कांहींदिसत नव्हते म्हणून तो मशाल पेटवतो व ते दोघे त्या अंधूक प्रकाशात पहातात किचकाचे तुकडे झालेले शरीर. जर कोणी तुला त्रास देईल तर मी त्याला अशारितीने ठार मारीन. त्यानंतर तो तेथून निघून जातो व तिलासुद्धा तेथे न थांबण्याचे सांगतो.
दुसर्या दिवशी सगळ्यांना समजते कीं किचकाचा नाश झाला आहे. ते समजल्यावर सगळे विराट नगरीचे लोक सुटकेचा श्र्वास घेतात. द्रौपदी सगळ्याना सांगत सुटते कीं तिच्या गंधर्व पतीने त्याला शासन केले आहे. अनेकांच्या सुंदर बायकांना तो बळजबरीने नेत असें त्यामुळें त्याच्या मृत्यूने सगळे नगरवासी आनंद व्यक्त करतात. किचकाच्या शरीराचे असे हाल झाले होते कीं,त्याचे डोके कोठे व हात कोठे आणि पाय कोठे त्याचा पत्ता लागत नव्हता. लोक समजू लागले कीं, त्याला सैरंध्रीच्या गंधर्व पतीनेच मारले असणार. ज्या प्रकारे त्या देहाच्या चिंधड्या झाल्या होत्या ते कोणी राक्षस किंवा गंधर्वच करू शकतो असें लोक बोलू लागले.
अशारितीने किचक वध पर्व, विराट पर्व भाग बाविसावा संपला.

## किचक वध पर्व
## भाग तेविसावा

वैशंपायन सांगत असतात, किचकाचे आप्त तेथे जमले व शोक करू लागले. किचकाच्या देहाची जी अवस्था झालेली होती तू पाहून त्याचे नातेवाईक घाबरून गेले. त्याच्या अंगावरील केस ताठ उभे राहीले. एकाद्या दानवाला इंद्राने मोडून तोडून एक गठ्ठा असें गोळा केलेले त्याचे रुप पोहून ते गर्भगळीत झाले. त्यांना कांहीं सुचेना. त्याचे ते गाळा झालेले शरीर घेऊन ते त्याच्या अंत्यविधीसाठी निघाले. ते सगळें राजाला सांगतात, ही तुमच्याकडे काम करणारी सैरंध्री अशुभ आहे. तिला मारून चाकले पाहिजे नाहीतर तिला राज्यातून बाहेर काढून टाकले पाहिजे. एक बोलतो तिला ठार मारण्या ऐवजी आपण तिला ह्याच्या बरोबर बांधून जीवंत जाळून टाकू. असें केल्याने किचकाच्या आत्म्याला शांती मिळेल. ते सगळे किचकाचे आप्त विराट राजाला सांगतात, "अहो राजा, ह्या बाईमुळें आपला सेनानी मारला गेला, ती चेटकीण

असावी. म्हणून तिचा कायमचा बंदोबस्त केला पाहिजे. त्यासाठी आमचे मत असें आहे कीं, ह्या सटवीला त्याच्या चीतेवर बांधून ती चीता पोडवून दिली पाहिजे. राजाला त्या सुतांच्या ताकदीची पूर्ण कल्पना होती म्हणून तो त्याला परवानगी देतो. त्यामुळें द्रौपदीला त्या मढ्याबरोबर जाळून टाकण्याचे ठरते. ते समजल्यावर घाबरून गोठून गेल्यासारशी एका जागी गप्प उभी असलेली द्रौपदी पुढे काय होणार त्याचा विचार करत होती. त्या किचकाच्या नातेवाईकांनी द्रौपदीला त्याच्या प्रेताबरोबर बांधले व ते स्मशानात जाऊ लागले. त्यावेळी ती कृष्णा मोठ्याने ओरडून तिच्या पांच पतींच्या नांवांने आक्रोश करू लागते. "अहो जय, जयंत, विजय आणि जयत्सेन, जयद्बल आपण सगळे कोठे अहात. हे पापी सुत लोक मला जाळण्यासाठी स्मशानात नेत आहेत, मला वाचवा". "अहो तेजस्वी गंधर्वांनो मला वाचवा".

वैशंपायन पुढे सांगतात, भिम त्यावेळी निजलेला होता तो तिच्या आक्रोशामुळें जागा होतो व तिला बोलतो, "अहो सैरंध्री, मी तुझी हाक एकली आहे व मी तुला त्या सुतांच्या पासून वाचवणार आहे".

वैशंपायन पुढे सांगतात, सगळ्या सुतांना मारून टाकण्याची इच्छा असलेला तो पवनपुत्र त्याचे शरीर फुगवू लागतो व त्याचा आकार खूप मोठा होतो. त्याच्या अंगावरीन कपडे तो बदलतो व वाड्यातून दुसर्या वाटेने बाहेर पडतो. तो ते किचकाचे नातेवाईक कोणत्या दिशेने गेले त्याचा अंदाज घेत त्यांच्या मागून जाऊ लागतो. ते स्मशानात चीता रचत असतांना भिम एक मोठे झाड उपटतो व ते अवाढव्य आकाराचे झाड घेऊन साक्षात यम असावा असा तो त्याच्या विचित्र रुपात त्या लोकांवर धावून जातो. ते झाड गदेप्रमाणे तो फिरवत त्या सुतांवर हल्ला करतो. सुतांना तो दिसतो, ते समजतात कीं, ह्या सैरंध्रीचा कोणी गंधर्व पती आपल्यावर तुटून पडत आहे. ते पाहून त्यांची तारांबळ उडते व ते स्मशान सोडून सैरावैरा धावू लागतात. ते एकमेकांना सांगतात, तो पहा तिचा गंधर्व पती आपल्यावर चाल करून येत आहे. ते प्रेत तेथेच टाकून ते पळून जातात. त्यांना भिमाच्या हातातील तो प्रचंड झाड दिसत असते. त्याचा प्रमुख आदेश देतो कीं, ह्या बाईला सोडून द्यावे नाहीतर

तो भयंकर गंधर्व आपणा सर्वांना ठार मारेल जसे किचकाचे झाले. ते द्रौपदीला मोकळे करतात. आणि तिच्या पतीकडे जाण्यास सांगतात. ते सुताचे नातेवाईक आपापल्या घरी धुम ठोकून पळतात. त्यांना मागे वळून पहाण्याची सुद्धा इच्छा रहात नाही. द्रौपदी भिमाला भेटते, तो तिला सांगतो, जा तू राणीवशात जा, मी छुप्या मार्गाने भटारखान्यात पोहोचतो. भिम त्यांच्यापैकी कांहींना त्या वृक्षाच्या फटक्यांने ठार मारून यमाकडे पाठवतो. जणू इंद्र दानवांना मारत आहे असें ते होते. द्रौपदी तिच्या खोलीत जाते व भिम छुप्या वाटेने त्याच्या भटारखान्यात जातो.

वैशमपायन पुढे सांगतात, एक लक्ष सुत तो त्यावेळी मारून टाकतो. त्या मेलेल्या सुतांचे छिन्नभिन्न झालेली प्रेते रस्त्यावर पडलेली होती. त्यांच्या अंगावर झाडांच्या मोठ्या मोठ्या फांद्या पजलेल्या होत्या, ते दृष्य असें होते, जनमेजया, जणूकाय मोठे वादळ आले होते व त्यात ते मेले आहेत. ते पाहून विराट नगरीचे रहीवासी आश्र्चर्य करत होते. त्यांच्या आयुष्यात असा प्रकार त्यांनी कधी पाहिलेला नव्हता.

अशारितीने किचक वध पर्व, विराट पर्व भाग तेविसावा संपला.

## किचक वध पर्व

## भाग चोविसावा

वैशंपायन सांगत असतात, ते पाहिलेले नागरीक राजाला भेटतात व जे घडले ते सांगतात. ते सांगतात, "अहो राजा, ते सुतांचे मजबूत शूर योद्धे त्या गंधर्वाने एका झटक्यात नारून टाकले. त्यांची प्रेते तेथे विखरून पडली आहेत. त्या सैरंध्रीला त्या लोकांना सोडून दिले आहे. ती राजवाड्याकडे येतच असेल. लोक तिचे अप्रतिम सौंदर्य पहात असतात. ते राजाला विनंती करतात कीं, ती बाई फारच सुंदर आहे व तिच्यामुळें आपले राज्य संकटात पडू शकते. लोकांचे ते ऐकून राजा सांगतो, "प्रथम त्या सगळ्या सुतांचे अंत्यविधी

उरकून घेऊ मग विचार करू त्या बाईचे काय करावयाचे त्या विषयी. त्यांच्या चीतेवर सुगंधी द्रव्य शिंपावे म्हणजे त्यांच्या प्रेताची दुर्गंधी पसरणार नाही".

त्यानंतर घाबरलेला राजा आपल्या राणीला बोलावून घेतो व सांगतो, जशी तुझी दाई घरात येऊल तिला सांग, "तुझे भले हो, आता तू आमच्या राज्यात राहू नकोस. आमच्या राज्याला तुझ्यामुळें धोका होऊ शकतो, असें सगळे लोक सांगत आहेत. म्हणून तू आमचे राज्या सोडून कोठेही निघून जा". "तुझे गंधर्व पती आमचे राज्य नष्ट करू शकतील. कारण तुझ्या सौंदर्यामुळें पुन्हा असा प्रकार होणार नाही असें सांगता येणार नाही. म्हणून राजाला तो धोका पत्करावयाचा नाही".

वैशंपायन सांगत असतात, त्या प्रकारानंतर कृष्णाला कोणाची भिती वाटेनाशी झाली. तिने तिचे पाय व कपडे पाण्यात धुतले. तशी ती एकटी नगराकडे जाऊ लागली. तिला पाहून त्या नगरातील रहिवासी घाबरून तिच्या पासून दूर रहात होते. कांहीं नागरीक त्यां गंधर्वाच्या भयाने गांव सोडून दूर पळून गेले. कांहींनी त्यांचे डोळे घट्ट मिटून घेतले होते.

अरे जनमेजया, त्या भटारखान्याच्या दरवाजात ती कृष्णा भिमाला पहाते, तो अजूनही भयंकर चिडलेला दिसत होता. जणू साक्षात काळ तेथे उभा आहे असे एकाद्याला वाटावे. ती त्याच्या जवळ जाऊन बोलते अशा आवाजात की तो फक्त त्या दोघांनाच समजेल. "अहो गंधर्व महाराज, आपण मला वाचवल्या बद्दल मी आपली ऋणी राहीन". तिचे ते बोल ऐकल्यावर भिम तिला सांगतो, "आपले गंधर्व पती आपली सेवा करण्यासाठी नेहमीच तयार असतात".

धनंजय त्या नृत्यशाळेत राजाच्या मुलीला नृत्य शिकवत असतो तो कृष्णेला भेटतो. ते एकमेकांशी बोलतात, "सुदैवाने हे सगळे चांगले झाले. तू सुरक्षित आहेस हे पाहून बरे वाटले. तू निरपराध असूनही तुझ्यावर उलट बालंट आणणार्या सुतांचा नाश झाला हे एकापरीने उत्तम झाले. नंतर बृहन्नला तिला विचारते, "आता तू कशी आहेस? मला ते सगळे एकदा तुझ्या कडून ऐकावयाचे आहे". मी माझा समय मजेत घालवत आहे. तू सुद्धा कां नाही

येत नृत्यगृहात? कोणाला कांहीं वाटणार नाही". सैरंध्री तिला सांगते, "तुझं देव भलं करो, परंतु, तुला माझे दुःख कसे समजणार, तू येथे मुलींत मजेत असतोस. मला वाटते तू माझी मस्करी करत आहेस. सुखात असलेले नेहमी दुःखात असलेल्यांची अशीच चेष्टा करतात". बृहन्नला तिला सांगते, "तुला माझे दुःख कसे समजणार? त्यासाठी नपुसक व्हावे लागते. आपण नेहमी एकत्र राहिलो आहोत, मग मी तुझी मस्करी करीन असें तुला कसे वाटते? तुला वाटते कां कीं मी इतका दुष्ट आहे कीं, तुझी अशाप्रकारची मस्करी करीन? जेव्हां तू दुःखात तेव्हां आम्ही सगळे दुःखात असतो हे तुला कधी समजणार? म्हणतात नां कोणीही दुसर्याचे मन पूर्णपणे समजू शकत नाही. हेंच खरे".

वैशंपायन सांगत असतात, त्यानंतर द्रौपदी इतर मुलींसह राजवाड्यात जाते. ती सुदेश्ना राणीसमोर उभी रहाते. सुदेश्ना राजाच्या आदेशाचे वाचन तिच्यापुढे करते. व सांगते ह्यापुढे तू येथे रहावयाचे नाही. तुला जेथे जावेसे वाटते तेथे तू निघून जा, तुझा पगार मी तुला ताबडतोब देऊन टाकण्यास तयार आहे. राजाला तुझी भिती वाटते कारण तू तुझ्या गंधर्वांबरोबर असतेस. आम्हाला ते दिसत नाहीत म्हणून हा प्रकार किचकाबद्दल झाला. तो दुसर्या कोणाबरोबर होणार नाही ह्याची शाश्र्वती कोण देणार? म्हणून ह्यात सगळ्यांचे भले आहे कीं, तू येथून निघून जावे. तू खूप सुंदर आहेस, तुझा स्वभाव सुद्धा खूप चांगला आहे, सर्व कांहीं छान आहे तरी आता आम्हाला तुझी भिती वाटू लागली आहे". ते ऐकल्यावर द्रोपदी राणीला विनंती करते कीं, दुसरीकडे जागा मिळे पर्यंत ती तेथेच राहू इच्छिते. निदान आणखीन फक्त तेरा दिवस मला येथे रहाण्याची परवानगी द्या, त्यानंतर मी स्वतःहून येथून निघून जाईन. कारण ह्याबद्दल मला माझ्या नवर्यांना सांगावे लागेल, त्याला थोडा अवधी लागतो. मी स्वतःसुद्धा येथे रहाण्याच्या मनस्थितीत नाही. म्हणून राजाला सांगा व मला तेवढी सवलत मिळवून द्यावी. माझ्या पतींना आपण घाबरता पण ते फार चागले आहेत, त्यांच्याशी जर तुम्ही चांगले संबंध प्रस्थापित केलेत तर त्यात तुमच्या राज्याचा फायदा होऊ शकतो. किचकाला

जे भोगावे लागले ते त्याच्या कर्माचे फळ होते. त्यासाठी राजानी घाबरण्याची आवश्यकता नाही.

अशारितीने किचक वध पर्व, विराट पर्व भाग चौविसावा संपला.

**किचक वध पर्व (संपले)**

**भाग पंचविसावा**

वैशंपायन सांगत असतात, किचकाची हत्या व त्याबरोबर त्याच्या लाखापेक्षा जास्त नातेवाईकांचा संहार हे वृत्त सर्वदूर पसरते. अशा वृत्तेमुळे लोक घाबरून जातात. आश्र्चर्य व भिती अशी दुहेरी प्रतिक्रीया सगळे लोक देत असतात. कौरवांनी मत्स्य देशातील आणखीन माहिती मिळवली त्यांना समजते कीं, त्या राज्यात किचक हा सुत वंशाचा सरसेनानी प्रबळ परंतु, बायकांबद्दल वाईट नजर असलेला म्हणून कुप्रसिद्ध होता, त्याचप्रमाणे त्या राजाचा स्वयंपाकी, वल्लभ नांवाचा फार शक्तीमान होता इतका कीं तो हत्तीशी झुंज देत असे. ह्या नंतर किचकाचा वध गंधर्वाने केला अशासाठी कीं, त्या राजाच्या राणीच्या सैरंध्रीची तो छेड काढतो, जिचे पांच गंधर्व पती आहेत. ह्या कथा सगळ्या प्रदेशात वार्या सारख्या पसरल्या व कौरवांपर्यंत येऊन पोहोचल्या. त्यावेळी कौरवांचे गुप्त हेर सर्व देशांत पांडवांना शोधत फिरत होते. ते गांवोगांवी, वनोवनी, दर्याखोर्यात, नद्यांच्या तटांवर, तिर्थक्षेत्री, नगरोनगरी ते पांडवांना हुडकण्याचा प्रयास करत होते परंतु त्याना त्यांचा थांगपत्ता लागत नव्हता. परंतु त्याना यश येत नव्हते.

धृतराष्टाराचे पुत्र व त्यांचे मित्र कर्ण, शकूनी, दुःशासन, द्रोण, कृप असें सगळे सभेत बसले होते व दुर्योधनाला चिंता खात होती कीं, एक वर्ष संपण्यास कांहींच दिवस राहिले आहेत व अजून त्याच्या शत्रूंचा शोध लागत नाही. ते बोलत असतात, आपण सगळे प्रदेश शोधले आहेत पण त्यांचा जरासासुद्धा सुगाव लागत नाही, काय कामाची अशी गुप्तहेर व्यवस्था जी त्यांना शोधण्यात अपयशी होत आहे. असा एकही प्रदेश आपण सोडला नाही किं तेथे आपले हेर गेले नाहीत. दुःशासन पुन्हा बोलतो, "कांही म्हणा पण पांडवांचे दैव बलवत्तर ठरत आहे". कर्ण बोलतो, "कदाचित ते मेले असावेत. कारण त्यांची एकही खूण कोठेही मिळत नाही". द्रोण सांगतात, "त्यांचा नाश होणे शक्य नाही कारण, ते सामान्य माणसे नाहीत, ते दैवी जन्माचे आहेत. असे लोक त्यांचे विदीत कार्य केल्याशिवाय मरत नसतात". अशाप्रकारे त्यांची चर्चा होत असतांना त्यांना किचकाच्या मृत्यूची अजब कहाणी ऐकावयाला मिळते. कांहीं हेर द्वारकेला जाऊन पहातात त्यांना वाटत असते कीं, पांडव

प्रिशताच्या पांचालात नाहीतर कृष्णाच्या द्वारकेत ते लपले असणार पण तो शोधसुद्धा व्यर्थ जातो.
किचकाने कौरवांच्या सैन्याचा वेळोवेळी पराभव केला होता त्या राज्याकडून जी बातमी येते त्यांने त्या सगळ्याची झोप उडते. किचकाला एका गंधर्वाने मारले ही बातमी कौरवांच्यासाठी मोठी आनंदाची होती कारण त्यामुळें आता मत्स्य देश पादाक्तांत करणे सोपे होणार होते.
किचक वधाच्या वृत्तातील तपशिलामुळें मात्र ते सावध होतात कारण, अंधारात एक गंधर्व त्याचा चेंदामेंदा करतो व तो एका सैरंध्रीचा पती आहे आणि त्या सैरंध्रीचे पांच गंधर्व पती आहेत, हे सगळे कांहीतरी त्यांच्या शत्रूची माहीती असावी असे शकूनी व कर्णाला खात्रीने वाटू लागते. ते समजतात कीं, त्यांना पांडवांचा सुगाव लागला आहे. परंतु, आता फक्त चार दिवस उरले आहेत. ते संपले व पांडवांना आपण पकडले नाही तर आपला सगळा खेळ व्यर्थ जाईल. ह्या विचारांने दूर्योधन बेचैन झाला होता. आता काय करावयाचे त्या पांडवाना वेळीच पकडण्यासाठी असा प्रश्न तो त्याच्या मित्रांना विचारतो.
अशारितीने किचक वध पर्व संपले, विराट पर्व भाग पंचविसावा संपला.

# गो हरण पर्व (सुरू)

## भाग सव्विसावा

वैशंपायन पुढे सांगत असतात, दुर्योधनाला त्याच्या हेरांकडून किचक वधाची बातमी समजल्यावर तो त्याच्या मित्रांना बोलतो, "काळाचा महिमा कोणालाही समजत नाही. पंडुची मुलं अज्ञातवासातील मोठा काळ यशस्वीपणे व्यतीत करत आहे. आता फार थोडा काळ उरला आहे. त्या कांहीं दिवसाच्या काळात जर आपण त्यांना उघडे पाडले नाही तर ते मुक्त होणार आहेत व त्यानंतर आपल्याला त्यांच्या क्रोधाला सामोरी जावे लागणार आहे. त्यांच्या भंयकर प्रतिक्रियेला आपल्याला तोंड द्यावे लागणार आहे. म्हणून शक्य तितक्या लवकर आपल्याला त्यांना हुडकणे जरूरीचे आहे. त्याशिवाय आपल्याला असें कांही केले पाहिजे कीं, ते पंडुचे पुत्र पुनः वनवासात जातील. तेसुद्धा अशाप्रकारे आपल्याला साध्य करावयाचे आहे कीं, कोणताही कौटूंबिक वाद उत्पन्न होणार नाही. लोकांना सुद्धा योग्य वाटेल असे कांहीं करून ते साध्य करावे लागेल त्यासाठी कोणती उपाय योजना करावयाची त्याचा आता विचार करा. आपल्या ताब्यात जो प्रदेश आहे तो आपल्याकडेच कसा राहिल ते सुद्धा पहावयाचे आहे. ह्यासाठी कर्णासारखा फक्त युद्ध जाणणारा उपयोगाचा नाही तर त्यासाठी विदूर काकासारखा मुत्सद्दी पाहिजे व माझे दुःख हेंच आहे कीं असा कोणीही मातबर मुत्सद्दी माझ्याकडे नाही.

दुर्योधनाचे ते उद्गार ऐकल्यावर कर्ण त्याला सुचवतो, "माझ्या मते, चतूर आणि कावेबाज असा गुप्तहेर आपण मत्स्य देशात धाडू व त्याच्याकडून त्या सैरंध्रीची माहीती मिळवू. कारण जर ती द्रौपदी आहे हे सिद्ध झाले तर आपले काम झाले व पांडवांना आपण पुन्हा वनवासाला पाठवू शकू. जर द्रौपदी आपल्याला मिळाली तर ते पांडव जेथे लपले असतील तेथून तिच्यासाठी पुढे येतील ह्याबद्दल मला विश्र्वास आहे". दुःशासन बोलतो, "आता किचक मेला आहे तेव्हां आपण मत्स्य देशावर आक्रमण करू व तो प्रांत आपल्या राज्याला जोडून टाकू, कारण ते आपले एक स्वप्न होते. जर पांडव तेथे लपलेले असतील तर ते आयतेच आपल्या ताब्यात येतील".

त्यांचे सगळे सांगून झाल्यावर दुर्योधन त्यांना विचारतो, "तुम्हाला इतका कसा विश्र्वास वाटतो कीं आपले हेर त्यांना हुडकून काढू शकतील. गेली एक वर्ष ते प्रयत्न चालू आहेत, तुम्ही कांहीं नवीन सांगू शकत नाही. कदाचित ते समुद्राच्या पलिकडील प्रदेशात गेले असतील. तेथे कोणाला पाठवणार"? शकूनी सुचवतो, "मुळात ते आज जीवंत आहेत हे सिद्ध झाले पाहिजे. एकाद्या अपघाताने किंवा रोगांने ते केव्हांच मेले असतील. जर ते जीवंत असतील तर ते हे वर्ष संपल्यावर आपला वाटा मागण्यासाठी येतील तेव्हां आपण त्यांना पुन्हा द्युताचे आव्हान देऊ, ते आव्हान तो मूर्ख युधिष्ठीर खात्रीने स्वीकारेल, मग मी पुन्हा त्याला तसेंच हरवून पुन्हा वनवासात पाठवीन. जोपर्यंत तो मूर्ख दैववादी पांडव त्यांचा मुख्य आहे व ते शूरयोद्धे त्याच्या आज्ञेत आहेत, आपल्याला कशाचीच काळजी करावयाचे कारण नाही. कारण ज्यांचा नेता मूर्ख ते सगळे मूर्ख ठरतात".

दुर्योधनाचा मामा त्याला अशाप्रकारे दिलासा देत असतो.

अशारितीने गो हरण पर्व, विराट पर्व भाग सव्विसावा संपला.

# गो हरण पर्व
## भाग सत्ताविसावा

वैशंपायन सांगतात, सामर्थ्यवान आणि दूरदृष्टी असलेले द्रोण गुरू नंतर बोलतात, "मुलांनो, पांडव असें सहजासहजी मरणारे नाहीत. किंवा ते कमजोर होणारे नाहीत. असें शूर लोक ज्यांच्याकडे शस्त्र, अस्त्र आणि मंत्रविद्या आहे ते कोणत्याही संकटाला सहजपणे तोंड देणार म्हणून तुम्ही हे मनातून काढून टाका कीं, ते मेले असावेत. पांडवांचे एकमेकाशी असलेले संबंध, त्यांची परस्परांवर असलेली भक्ती व श्रद्धा, त्यांचे सत्याशी असलेले नाते, युधिष्ठीराची तत्त्वनिष्टा, सत्यशिलता, व्रतस्थ जीवन पद्धती हे सगळे त्यांना कोणत्याही संकटापासून वाचवण्यास पुरेसे आहेत. म्हणून मला वाटते कीं, ते योग्य संधीची वाट पहात कोठेतरी बसलेले आहेत. तेरा वर्षे पूर्ण होण्यास थोडाच अवधी बाकी आहे. त्यानंतर ते हस्तिनापुरात येऊन आपला वाटा मांगणार, ह्याबद्दल मला पूर्ण विश्र्वास आहे. त्यासाठी तुम्ही असें कांहीं करा कीं, ते हे वर्ष पूर्ण होण्या आधी उघडे पडतील. आज फक्त चार दिवस उरलेले आहेत. त्या वेळांत तुम्ही त्यांना सोधून काढण्यात यशस्वी झाला नाहीत तर तुमचे कांहीं खरे नाही".

"पांडवाचे सामर्थ्य, त्यांचे तपोबळ, त्यांची शरीराची ताकद, आत्मविश्र्वास, धडाडी पहाता ते लवकरच हस्तिनापुरात येणार हे निश्र्चित. कांहीं ब्राह्मणांना व चरणांना देशोदेशी धाडून त्यांचा सुगाव काढण्यावर भर द्या. नुसत्या गप्पा मारण्यात वेळ फुकट घालवू नका". दुर्योधन सांगतो.

दुर्योधन व त्याचे सवंगडी द्रोणांची भविष्यवाणी ऐकून आणखीनच त्रस्त होतात.

कर्ण पुन्हा सांगतो की, "ते मस्त्य देशाच्या राजधानीतच असणार म्हणून आपण त्या विराट नगरीकडे आपले ब्राह्मण पाठवावेत. युधिष्ठीराला ब्राह्मणांचे वेड आहे, त्यामुळे अशा डावात तो निश्र्चितपणे फसेल".

दुःशासन त्याला अनुमोदन देतो. दुर्योधन मात्र विलक्षण बेचैन झालेला असतो.
अशारितीने गो हरण पर्व, विराट पर्व भाग सत्ताविसावा संपला.

## गो हरण पर्व
## भाग अठ्ठाविसावा

वैशंपायन पुढे सांगत असतात, त्यानंतर भिष्म पांडव कौरवांचे पितामह वेदाचे ज्ञान असलेले, ज्याना काल व स्थळ ह्याच्या मर्यादा चांगल्याप्रकारे जाण आहे, ज्याचे नैतिक शास्त्राचे ज्ञान पूर्ण आहे, असें भिष्माचार्य बोलू लागले. त्यानी सांगितले कीं, "द्रोण जे सांगतात ते जणू मीच बोलत आहे असे होते, कौरवांचे कशात हित आहे ते आता आपल्याला पहावयाचे आहे. कारण, युधिष्ठीराच्या गुणांकडे पहाता आतापर्यंत जे झाले ते पुष्कळ झाले आहे व आता सगळ्यांच्या भल्याचे जे आहे ते सांगतो". भिष्माने निःपक्षपाती असें त्यांचे मत त्यावेळी तेथे भर सभेत सांगितले. ते सांगतात कीं, "द्रोणांनी जो मार्ग सांगितला तोच धृतराष्टाराने स्वीकारला तर त्यात कुरू वंशाचे व त्यांच्या प्रजाजनांचे भले होणार आहे. पांडव त्यांच्या नैतिक जीवनाचे पक्के आहेत. त्यांचे अध्यात्मशास्त्राचे ज्ञान पूर्ण आहे, ते त्यांचा क्षत्रिय धर्म कसोशीने आचरत आहेत, ते केशवाशी प्रामाणिक आहेत. ते अवतारी पुरूष आहेत, त्यांचे भाग्य उज्वल आहे, ते ठरलेल्या नियमांचे पालन प्रामाणिकपणे करत असल्याने न्याय त्यांच्याच बाजूने होणार हे विधीलिखीत खरे होणार आहे. त्यामुळे ते नष्ट होणे कदापिही शक्य नाही. माझे मन मला सांगते कीं, ते जेथे कोठे आहेत सुरक्षित आहेत. म्हणून आता तुम्ही तुमचा कपटीपणा बाजूला ठेवून जे आधी ठरले होते त्याप्रमाणे त्यांना ते आल्यावर त्यांचे राज्य देऊन टाकावे. त्यातच सगळ्यांचे भले होणार आहे. त्यांच्याशी दोन हात करण्याची दुर्बुद्धी वाढवू नये असें माझे मत आहे. ह्या अवस्थेत जेव्हां सगळा काळ होऊन गेला आहे, नव्याने हेर कामाला लावून त्यांना शोधण्याचा प्रयत्न

करणे केवळ निरर्थक आहे. आता त्यांना हस्तिनापुरात येऊ द्यावे व ठरलेल्या प्रमाणे आपला शब्द पाळावा हेंच सर्वांच्या हिताचे आहे. त्यात आपण हरल्याचे समजण्याची भूल करू नका. तुम्ही तुमच्या परीने जे खेळ खेळावयाचे ते खेळलात, आता ते थांबवावे. जर तुम्ही पुन्हा तसल्या गोष्टी करत राहीलात तर जे परिणाम होतील त्याची जबाबदारी कोण घेणार? सगळी जनता त्यांच्या बाजूने आहे. तेरा वर्षे तुम्ही त्यांचे राज्य वापरले परंतु, त्यांचे व हस्तिनापुराचे लोक तुम्ही जिंकू शकला नाहीत ह्याचा अर्थ अरे धृतराष्ट्रा, तू व तुझी मुलं खर्या अर्थाने प्रजेच्या नजरेतून हरलेले आहात. कोणाचाही मत्सर न करणारा, कोणाचे अहित न करणारा, दुरभिमानी, ज्याच्या भोवती ब्राह्मणांचे सदैव अस्तित्व आहे, ज्याच्या सानिध्यात सदैव वेदघोष होत असतात, जो विविध यज्ञ करत असतो, ज्यांने सगळ्या सृष्टीच्या कार्यकारी देवतांना {इंद्र, अग्नी, वरूण, वायू, यम, वैश्रावण (कुबेर अथवा अरिहंत)} प्रसन्न केले आहे, त्याचे कसे बरे कोणी वाईट करू शकेल"? ब्राह्मणांना दानं आणि भेटी देणारा, ज्याचे अर्घ्य शेवटी होत असतेच, ज्याच्या राज्यात कधी दुष्काळ पडला नाही, ज्याच्या राज्यात समृद्धी सतत वाढत होती, अशा पांडवांना कोणीही कितीही प्रयत्न केले तरी नष्ट करू शकणार नाही. तुम्ही त्यांचा द्वेष करत होता परंतु, तो तुम्हाला क्षमा करत होता हा त्यांच्यातील व तुमच्यांतील फरक तुमच्या लक्षात येत नाही ह्याचे आश्र्चर्य वाटते. त्याने सदैव स्नेहभाव वाढवण्याचा प्रयास केला, लोकांचा नैतिकतेवरील भरवसा वाढवला, ज्याच्या राज्यात कोणीही भुकेला झोपला नाही, ज्याने चांगुलपणा व भूतदया लोकांत वाढवली, ज्या पांडवानी लोकांत आत्मविश्र्वास वाढवला, दुर्बलांना बळ दिले, ज्याच्या राज्यातील देवता त्याच्या चांगुलपणावर संतुष्ट झाल्यामुळें दुध दुपते, दहीलोणी, कधी कमी झाले नाही, दाणागोटा कधी अपुरा पडला नाही. अशा राज्याचा तो एकेकाळी राजा होता. त्याच्या राज्यात पापाला थारा नव्हता. सगळीकडे आनंदी आनंद होता, ज्या कोठे ते रहात असतील तेथे असलेली दैवते संतुष्ट असतील. आणि जेव्हां दैवते संतुष्ट असतात सगळे उत्तम होत असते. देव आणि अतिथी ह्यांचे सन्मान करणारा

तो युधिष्ठीर व त्याचे बंधू नेहमी देवांकडून संरक्षित केले जात असतात, त्यांचे कोण व किती वाईट करू शकेल"? तुम्ही त्यांचे व इतरांचे वाईट करण्याच्या योजना आखत अहात, त्याच वेळी ते पांडव सगळ्यांचे चांगले करण्यात गुंतले आहेत. तुम्ही त्यांचे कितीही वाईट करण्याचा प्रयत्न करा ते तुमचे सुद्धा भले कसे होईल ते पहात असतात. कारण ते स्वतःसाठी जगत नाहीत, ते विधात्यासाठी, त्याला जे आवडेल ते करण्यासाठी जगत आहेत. तुम्ही विधात्याला विसरला अहात व जगता फक्त स्वतःच्या फायद्यासाठी. त्यांचे सगळे लक्ष फक्त आणि फक्त पुण्यप्रभाव वाढवण्याकडे असते. वास्तविकतेतील फायदा तोटा तो युधिष्ठीर पहात नाही. अध्यात्मिक फायदा व तोटा तो पहात असल्यामुळें बर्याच वेळा त्याच्या वागणूकीबद्दल, त्याच्या स्वकीयांतसुद्धा मतभेद होत असलेले मी पाहिले आहे. अरे मुलांनो, पार्थाच्या ज्या मुलांत बुद्धीमत्ता व दयाबुद्धी आहे, ज्यांच्यात नम्रभाव, शालिनता, ओतप्रोत भरलेली आहे, त्यांना अखेरीस किर्ती मिळणार ह्याबद्दल मला कोणतीही शंका नाही. अशा लोकांना शोधण्याचा प्रयत्न केला तरी त्यात यश मिळण्याचा संभव नसतो. ब्राह्मणांनासुद्धा ते सांपडणार नाहीत. तेव्हां आता तरी शहाणे व्हा व त्यांच्या मागे लागणे बंद करा". तुमच्या भल्याचे करा ज्यात दुसर्यांचे अहित होत नाही. जर तुमचा माझ्या अनुभवावर भरवसा असेल तर माझे ऐकाल, नाहीतर तुमच्या कर्मगतीने जे करावयाचे आहे तुम्हाला ते करा व नंतर पश्र्चात्ताप करत बसा".

अशारितीने गो हरण पर्व, विराट पर्व भाग अठ्ठाविस संपला.

## गो हरण पर्व भाग
## एकोणतिसावा

वैशंपायन सांगतात, त्या नंतर शरदवताचा मुलगा कृपाचार्य बोलतो, "वयोवृद्ध भिष्माचार्य जे सांगत आहेत त्यात तथ्य आहे, प्रसंगानुरूप आहे त्यांचे सांगणे. हित, आणि पुण्य ह्याचा त्यात मेळ बसतो. त्यांचे सगळेच सांगणे नेहमीच पटण्यासारखेच असते. त्याशिवाय मला कांहीं सुचवावयाचे आहे तेसुद्धा ऐका. तुझे हेर जे करत आहेत ते तू चालू ठेव. तसेंच ज्यात तुमचे हित आहे ते सुद्धा तुम्ही लक्षात घेतले पाहिजे. ज्याला स्वतःचे संरक्षण करावयाचे आहे त्यांने अगदी क्षुल्लक शत्रूकडे सुद्धा दुर्लक्ष केले नाही पाहिजे. येथे तर ज्यांना तुम्ही तुमचे शत्रू समजता ते पांडव, सर्व शस्त्र, अस्त्र, मंत्रविद्या अशा सगळ्या आयुधाने सज्ज आहेत, अशांशी तुला मुकाबला करावयाचा आहे. तू घातलेल्या अटी पार करून जेव्हां ते त्यांचा अज्ञातवास संपवून येतील, तू फार सावधगिरीने त्यांच्याशी वागले पाहिजेस. ते अज्ञातवासात असतांना तू तुझे सामर्थ्य तपासले पाहिजेस. ते पांडव आता येऊन पोहोचणार हे निश्र्चित, त्याच्याशी तू समोरासमोर राहू शकशिल कां? हा मुख्य प्रश्र्न आहे. शत्रूशी लढावयाचे असते अथवा करार करून वेळ

भागवावयाची असते हा नियम आहे. त्यातील कोणते तुझ्या हिताचे आहे ते तुला पहावे लागेल. तुझी ताकद, तुझ्या मित्रपक्षांची ताकद असे सगळे तुला आता अजमावयाचे आहे. कोणाला तू दुखवले आहेस, त्यांचा तुला आता त्रास होणे अपेक्षित आहे कारण, त्यांना आता पांडव हा पर्याय उपलब्ध होत आहे. गेली तेरा वर्षे तू निर्धास्त होतास तसे आता राहिलेले नाही. म्हणून ज्यांना तू दुखवले आहेस त्यांच्याशी गोडीने वागण्याचे धोरण तुला स्वीकारावे लागेल. असें केल्याने ते पांडवांकडे खेचले जाणार नाहीत. सगळे जाणतात कीं, पांडवांचे आधिपत्य नेहमीच सुखकर असते. म्हणून सगळी प्रजा त्यांच्या बाजूला रहाणार आहे ते तुझ्या लक्षात येते कां? माझे ऐकणार असशिल तर तू पांडवांशी दोन हात करण्यापेक्षा त्यांना अशा करारात बांधून घे कीं, भविष्यात ते कौरवांना त्रासदायक ठरणार नाहीत. साम आणि दाम मार्ग मी तुला सांगत आहे. येथे दंड आणि भेद वापरण्याचा प्रयत्न करशिल तर ते तुला महागात जाईल हे लक्षात ठेव. ज्यामुळें हस्तिनापुराची संपत्ती वाढेल व तुझ्या पुत्रांना सुखाने जगता येईल असे धोरण तू अमलात आणले पाहिजेस असें मला सुचवावयाचे आहे. केवळ वैरभाव वाढवत गेलास तर तुला पश्र्चात्ताप करण्यासाठी सुद्धा सवड मिळणार नाही. पांडवांना पराभूत करणे कौरवांना शक्य नाही कारण तू ज्या वडीलधार्यांच्या युद्ध कौशल्यावर अवलंबून रहाण्याचे ठरवत आहेस ते (भिष्माचार्य, द्रोण आणि कृपाचार्य स्वतः) पांडवांवर प्रेम करत आहेत. तू आत्ताच पहात आहेस त्यांचे विचार म्हणून, एक कर्ण किती तुला पुरा पडेल, जर युद्धाचा भडका उडाला तर कौरव कोठवर टिकाव धरू शकतील त्याबद्दल मला शंका आहे. त्याकरतां माझ्यामते शांततापूर्ण करार करणे ह्यासारखे धूर्तपणाचे धोरण तुला स्वीकारावे लागेल. त्यात तुझ्या मुलाबाळांचे हित आहे. तुझे दुखावलेले दोस्त तुला साम, दाम, दंड आणि भेद ह्या मार्गाने आपलेले करावे सागतील. परंतू जर तू शांततापूर्ण करार करू शकलास तर हे सगळे खर्चिक उद्योग करण्याची आवश्यकता उरत नाही. तो करार कसा करवा त्याच्या अटी कोणत्या असाव्यात, त्यामुळें तुझा किती फायदा होणार आहे व त्या अटी युधिष्ठीराला मान्य होतात कां, ते

सगळे तुला योग्य प्रकारे आयोजित करावे लागणार आहे. त्यासाठी तुला उच्च दर्जाची मुत्सद्देगीरी असावी लागेल. त्यातल्या त्यात तुझ्यासाठी एक गोष्ट सोयिस्कर आहे ती म्हणजे युधिष्ठीर क्षमाशील आहे. तो तुम्हाला तुम्ही जे कांहीं वाईट त्यांच्याशी केले ते विसरून त्या कराराला मान्यता देईल असें मला वाटते. गोड बोलण्याने बर्याच गोष्टी सोप्या होतात. त्यांना न दुखवता तुझा मतलब त्यांच्या कडून काढण्यात तुझी खरी परीक्षा आहे. असें केल्याने तुझी ताकद वाढेल व तू तुझ्या इतर शत्रूंशी मुकाबला सहजपणे करू शकशिल. तशा कामात तुला पांडवांची मदतसुद्धा होईल. इतका युधिष्ठीर साधा आहे. त्याचा फायदा करून घे. पांडवाशी वैर करण्यापेक्षा त्यांना आपलेसे करण्यात तुझ्या भविष्यातील पिढ्यांचे भले होणार आहे, त्यांच्यासाठी तू हे केले पाहिजेस असे मला वाटते".

अशारितीने गो हरण पर्व, विराट पर्व भाग एकोणतीस संपला.

## गो हरण पर्व

## भाग तिसावा

वैशंपायन सांगत असतात, शल्य व मत्स्य लोकांच्या सैन्यापुढे मार खाणारे त्रिगर्तचे राजे शुशर्मन तेथे त्या सभेत उपस्थित होते. ते त्या कुरु लोकांचे संभाषण ऐकत होते. वस्तुतः त्याला पांडव कौरव वादात अजिबात रस नव्हता परंतु, राजशिष्टाचारा नुसार ते तेथे होते. त्याने योग्य संधी पाहून आपला मुद्दा मांडला, ज्याचा संबंध फक्त दुरान्वयाने पांडवांशी होता. तो राजा शुशर्मन बोलतो, "किचकाच्या नेतृत्वाखाली व सुत लोकांच्या शौर्यामुळें आम्ही मत्स्य देशावर यशस्वी आक्रमण करू शकत नव्हतो. परंतु, आता त्यांचा सेनानी किचक गंधर्वा कडून मारला गेला आहे व त्या बरोबर त्याचे लाखावर योद्धेसुद्धा त्या गंधर्वाने मारले आहेत. त्यामुळें विराट राजाची ताकद कमी झाली आहे. माझ्या मते आपण ह्या परिस्थितीचा फायदा उठवला पाहिजे.

आता जर आपण विराटाच्या राज्यावर चाल करून गेलो तर तो आपल्याला हटवू शकणार नाही. असे बोलतांना शुशर्मन सुचक पद्धतीने कर्णाकडे त्याचे अनुमोदन मिळेल ह्या आशेने पहात असतो. त्याचा अंदाज खरा ठरतो कारण, कर्ण ताबडतोब त्या प्रस्तावाला त्याची मान्यता दाखवतो. दुर्योधन बोलतो, "त्या विराटाच्या शल्य व सुत ह्यांच्या सैन्यानी किचकाच्या नेतृत्वाखाली आम्हालासुद्धा फार त्रास दिला आहे. तो किचक जबरदस्त सेनानी होता, त्याच्या सैन्य व्यवस्थेपुढे कोणाची सेना टिकत नसे. त्याचे क्रौर्य भयानक होते. तो आमचे हेर पकडून त्याना ठार मारत असें त्यामुळें, आम्ही आमचे हेर पांडवांना शोधण्यासाठी त्याच्या राज्यात धाडू शकत नव्हतो. ते एकच राज्य आम्ही पांडवांना शोधण्यात हेरू शकलो नाही व आता समजते कीं, पांडव प्रायः तेथेच ठाण मांडून बसले आहेत. त्यासाठी मलासुद्धा वाटते कीं त्रिगर्तचे शुशर्मन जे सुचवत आहेत त्याचा विचार झाला पाहिजे. जर आत्ता आपण सगळ्यानी मिळून मत्स्य देशावर आक्रमण केले तर विराटाचा आपण पराभव करू आणि जमल्यास पांडवांचासुद्धा सुगाव लावू असें मला वाटते. कर्णाने त्या प्रस्तावाला आधीच  अनुमोदन दिले होते. सगळे कौरव त्या प्रस्तावाला मान्यता देतात. ते बोलतात, किचकाच्या मृत्यूचा आपण चांगला फायदा करून घेतला पाहिजे. सगळे एकदिलाने ओरडतात, चला मत्स्य देशावर चाल करू. त्या देशांत आता चांगले धान्याचे पीक आले आहे,  ते लुटू, त्यांच्याकडे उत्तम पशुधन आहे ते वाटून घेऊ. त्याची गांवं आपण वाटून घेऊ. त्याला आपल्या बरोबर असा तह करावयाला भाग पाडू कीं, त्याची सगळी आवाजी बंद करू. आतापर्यंत जो मार आम्ही त्या किचकाच्या हातून खाल्ला त्याचा वचपा काढू. एकदा ते राज्य काबीज झाले कीं, आपण सुखाची झोप घेऊ  शकू. असें शुशर्मन सगळ्यांना आवाहन करतो. त्यानंतर कर्ण त्याचे मत मांडतो. तो बोलतो, "शुशर्मन जे बोलत आहे ते खरे आहे. तसेंच आपण केले पाहिजे. अशी संधी पुन्हा येणार नाही. कारण एकदा पांडव त्यांच्या अज्ञातवासातून बाहेर आले कीं, आपल्याला कोणत्या नवीन

परिस्थितीला तोंड द्यावे लागणार आहे ते माहीत नाही. म्हणून जास्त वेळ न दवडता, आपण आपल्या फौजा तयार करण्याचे आदेश देऊ".
कर्ण सुचवतो कीं, ह्या मोहिमेचे नेतृत्व कृपाचार्य किंवा द्रोण करतील तर बरे. ह्याबद्दलचा निर्णय आपण भिष्माचार्यांवर सोडू. पुढे तो सुचवतो कीं, ह्या मोहिमेचे नांव "गो हरण" असें असेल. आता वेळ घालवण्यात अर्थ नाही. आपल्याला पांडवांच्याशी तसे पाहिले तर कांहीं कर्तव्य नाही, फक्त दुर्योधनावरील प्रेमामुळें आपण त्यांच्या कौटूंबिक गोष्टीत बोलत होतो, ते थांबवून आपण आपल्या क्षात्र कर्तव्याकडे लक्ष देऊ. पांडव आता निर्धन, लाचार झाले आहेत ते कोणालाही त्रास देणारे नाहीत. त्यांचा मोठा भाऊ फारच शांत आहे, तेव्हां त्यांना त्यांच्या कर्मावर सोडून देणे हेंच सगळ्यासाठी श्रेयस्कर आहे. ते आले तर काय करावयाचे ते कौरव ठरवतील, आपण कशाला त्यात पडावयाचे, असा पोक्त विचार सगळे मांडतात. आपल्यासाठी विराटाचा र्‍हास जास्त महत्वाचा आहे. सगळे त्या मताशी एकमत होतात.
वैशंपायन पुढे सांगतात, कर्णाचे ते विचार प्रमाण मानून दुर्योधन त्याच्या धाकट्या भावाला आदेश देतो कीं, त्यांने सैन्याची जमवाजमव करण्यास सुरूवात करावी. त्याच प्रमाणे, शुशर्मन त्याच्या फौजा घेऊन आघाडीला जाईल असें ठरते. मत्स्य देश हस्तिनापुराहून चांगला पांच दिवसाच्या अंतरावर आहे त्या प्रमाणें सगळी व्यवस्था करण्याचे आदेश त्यांच्या दलपतींना दिले जातात. त्यात त्रिगार्तचे सैन्य पुढे असेल असें ठरले. त्रिगार्तच्या फौजा विराटच्या गुराख्यांशी लढतील व त्यांचे पशुधन ताब्यात घेतील. बाकीच्या दोन तुकड्या मत्स्य देशातील इतर भागांवर हल्ला करतील व तेथे लूट सुरू करतील.
वैशंपायन पुढे सांगतात, अरे जनमेजया, ते लढवय्ये त्या प्रमाणे आक्रमक होऊन मत्स्य देशाकडे निघतात. त्यानंतर दोन दिवसानी शुशर्मनचे सैन्य लुट करण्याच्या इराद्याने निघतात. शुशर्मन नंतर कौरव त्यांच्या फौजा घेऊन विराटाचे पशुधन लुटण्यासाठी निघतात.
अशारितीने गो हरण पर्व, विराट पर्व भाग तिसावा संपला.

## गो हरण पर्व

## भाग एकतिसावा

वैशंपायन पुढे सांगतात, आपले सामर्थ्यवान पांडव विराटाच्या पशुधनाचे संरक्षण करण्यासाठी होते त्याची कल्पना ह्या लोकांना नव्हती. त्या सुमारास पांडवांचा अज्ञातवासाचा काळ संपला. ते आता उघडपणे वावरण्यास मुक्त होते. पांडवांनी विराटाच्या राजाला त्यांचे खरे रुप काय ते सांगितले होते. ते ऐकून राजा बोलला कीं, त्याला तशी शंका पहिल्या दिवसापासून होती. माझा अंदाज

चुकला नव्हता. सगळे पांडव आणि त्यांची पत्नी त्याच्यापुढे हजर होतात. राणी द्रौपदीचे औक्षण करते व कांहीं कमी जास्त बोलली असेल तर त्याबद्दल दिलगिरी व्यक्त करते. द्रौपदी सांगते कीं, "ही आमची परीक्षा होती त्यामुळें आम्हाला समजले सामान्य माणसाला जगतांना किती त्रास होतो. किंबहूना तेंच शिकवण्यासाठी विधात्याने हे रचले असावे".

त्यानंतर, राजा जो वृद्ध होता पांडवांना सांगतो कीं, आता किचकाला मारले असल्यामुळें माझ्या राज्याच्या संरक्षणाची जबाबदारी मी तुमच्यावर सोपवतो. हे सगळे जे घडत होते  त्याची कौरव कंपुला माहिती नव्हते. ते त्यांच्याच मस्तीत मत्स्य देशावर चाल करून येत होते. त्यांच्यापुढे दैवाने काय वाढून ठेवले आहे ते त्यांना माहित नव्हते. शुशर्मनने विराटाचे दूरवर पसरलेले पशुधन घेरतो. ते होते त्या दिवशी जेव्हां अज्ञातवासाचा शेवटचा दिवस संपलेला असतो. विराटाचे गुराखी त्वरेने राजसभेत धावत पोहोचतात व तेथे झालेल्या आक्रमणाचे सांगतात. राजा त्याच्या कारभार्यां बरोबर सभेत बसलेला असतो. त्याच वेळी राजाला युधिष्ठीर त्यांच्या अज्ञातवासाबद्दल तेथे सांगत असतो. पांडव त्यांच्या मुळ रुपात तेथे उभे असतात. तेथे आलेले गुराखी राजाला सांगतात, "अहो राजा, कधी नाही ते घडले आहे, आपले पशुधन त्रिगर्ताचे लोक पळवत आहेत. किचक मेल्यामुळें आपल्या शत्रूंत जोर आला आहे. कांहीं तरी करा नाहीतर ते आणखीन पुढे येतील. त्यांना थांबवले पाहिजे". ते ऐकल्यावर विराट राजा त्याच्या फौजेला तयार होण्याचा हुकूम करतो. विराटाचा भाऊ सतनिक उच्च दर्जाचे पोलादी चिलखत अंगावर घालतो. त्या चिलखतावर सोन्याचे नक्षीकाम केलेले होते. विराटाच्या सैन्याचा रुबाब पहाण्यासारखा होता. मदिराक्ष त्याचा धाकटा भाऊ तसेंच सोनेरी चिलखत नेसतो. त्या चिलखतांतून कोणताही बाण भेदू शकत नव्हता. विराट राजाच्या चिलखताचे कांय सांगावे, त्याच्या सारखे अभेद्य चिलखत क्वचितच कोठे असेल. त्यावर अनेक चक्र होती जी सूर्यासारखी चमकत होती. सूर्यदत्तच्या चिलखाताचे वर्णन कांहीं वेगळे होते त्यावर अनेक कमळांचे रेखीव नक्षीकाम होते. विराटाच्या ज्येष्ठ पुत्राचे चिलखत चमकणार्या पोलादाचे होते.

त्यावर सोन्याचे शंभर डोळे बसवलेले होते. ते अभेद्य होते. अशाप्रकारे अभेद्य चिलखतांने सुरक्षित असें मत्स्यचे सैन्य युद्धासाठी सज्ज झाले. त्या प्रतेयक सैनिकाच्या घोड्यांनासुद्धा पोलादी जाळीचे आवरण होते ज्यामुळें ते घोडे कोणत्याही बाणाने घायाळ होणार नाही. विराटाचे सगळे रथ सोन्याने मढलेले होते. त्यांच्या रथावर त्यांचे झेंडे फडकत होते. त्यांचे रथ सगळ्या प्रकारच्या आयुधानी सज्ज होते. राजा विराट त्याच्या धाकट्या बंधूला, सतनिकाला बोलतो, "अरे सतनिका, मला वाटते ब्राह्मण कंक, स्वयंपाती, वल्लभ, तंत्रिपाल, ग्रंथिक हे सुद्धा आपल्या बरोबर लढतील असें वाटते, तरी त्यांना आपल्या फौजेत घेण्याबद्दल तुझे काय मत आहे"? त्यानासुद्धा रथ आणि इतर शस्त्र दे व आपल्या समरात सामील होण्यास सांग. त्यांना आपल्या सारखीच अभेद्य शिरस्त्राणं व चिलखतं द्यावीत. ह्या निमित्ताने मला त्यांचे युद्ध कौशल्य पहाता येईल. राजाची इच्छा ऐकल्यावर ताबडतोब सतनिक त्याची व्यवस्था करतो. राजाची आज्ञा झाल्यावर ते सगळे कुंतीचे पुत्र युधिष्ठीर, भिम, सहदेव आणि नकूल त्यात मोठ्या आनंदाने सामील होतात. त्यांना त्यांच्या पसंतीच्या रथांची व्यवस्था केली जाते. ते त्याना दिलेले अभेद्य चिलखत आणि शिरस्त्राण नेसतात. अशारितीने अरे जनमेजया, तुझे पूर्वज मोठ्या हिरीरीने युद्धासाठी निघतात. विराटाच्या सैन्याचा भाग असें ते पांडव मत्स्य देशासाठी लढण्यासाठी निघतात. त्यांच्या सहायासाठी सहा वर्षे वयाचे चांगले तरूण हत्ती सज्ज असतात. असें सज्ज सैन्य घेऊन राजा विराट त्याचे गोधन सुरक्षित करण्यासाठी निघतो. राजाच्या मागोमाग आठ हजार रथ असलेला फौजफाटा चालत असतो. त्यांच्या पुढून व मागून पायदळीचे सैनिक चालत असतात. ते त्यांच्या पळवलेल्या गुरांच्या पायाच्या ठशांचा मागोवा घेत जात असतात. ते सगळे दृष्य पहाण्यासारखे होते.
अशारितीने गो हरण पर्व, विराट पर्वाचा एकतिसावा भाग संपला.

## गो हरण पर्व

## भाग बत्तिसावा

वैशंपायन पुढे सांगतात, विराट नगरातून बाहेर आल्यावर लवकरच ते त्रिगर्ताच्या लोकांना गाठतात. तेव्हां दुपारची वेळ होती. त्रिगर्ताचे व विराटाचे सैनिक ह्यांच्यात जोरानी झुंज सुरू होते. सैनिक व त्यांचे घोडे आणि हत्ती ह्यांच्या ओरडण्याने सगळी पृथ्वी दुमदुमून निघते. विराटाचे हत्ती त्यांच्यावर बसलेल्या माहूताच्या आज्ञेने त्रिगर्ताच्या सैन्यात मुसंडी मारतात तेव्हां त्रिगर्ताच्या सैन्याची त्रेधातिरपीट कशी उडते ते पहाण्यासारखे होते. दोनही सैन्यं व त्यांतील पशु ह्यांच्या ओरडण्याने कोलाहल माजला होता. काटेदार गदा, भाले, कुर्हाडी अशा हत्याराने ते एकमेकांना मारत होते. त्यावेळी सूर्य उतरणीला लागला होता. ती लढाई जुन्या जमान्यातील देव आणि दानवांच्या लढाई सारखी होती. दोनही बाजू आपापल्या परीने शिकस्त करत होते. अंगावर कांटा उभा राहील असें ते दृष्य होते. त्यांनी यमाच्या घराचे जणू दरवाजे उघडले होते. कारण अनेक योद्धे मरत होते, दोनही बाजूंचे. पण कोणीही हार मानायसा तयार नव्हते. त्यांच्या त्या रणधुमाळींमुळें वातावरणात मोठ्या प्रमाणात धुळींची ढगं उठलेली होती. त्यामुळें कोणालाही नीटपणे कांहीं दिसत नव्हते. रानातील पक्षी, आणि इतर पशु पळून गेले होते. आता सूर्यसुद्धा त्या तेथे मारल्या गेलेल्या बाणांच्या वर्षावामुळें आकाशात झालेल्या अंधारमुळें, दिसत नव्हता. अग्नी बाणांमुळें आकाशात प्रकाश पसरलेला होता. रथार्थी रथार्थ्यांशी व पायीक पायीकांशी असें लढत होते. घोडेस्वार घोडेस्वारांशी, हत्तीवरील हत्तीवरच्यांशी अशी लढत होत होती. तलवारी, फरशा, भाले, गदा असें सगळे वापरले जात होते. परंतु, कोणालाही हार मानावयाची नव्हती असें दिसत होते. मातीत अनेक डोकी, कापलेले हात, पाय, असें सर्वत्र विखुरलेले पसलेले दिसत होते. कोणाचे कान तर कोणाचे डोळे कोणाचे नाक असें सुद्धा पडलेले दिसत होते. माती रक्तांनी माखलेली होती. मातीत पडलेले कित्येक चेहरे फार सुंदर होते. त्यांच्या केसांनी जमीन झाकलेली होती. चंदनाच्या गंधानी माखलेले हात, कपाळाला भलेमोठे लावलेले गंध असें जखमानी भरलेले रक्ताळलेले चेहरे इतस्ततः पडलेले होते. त्याशिवाय त्यांच्या अंगावरील दागिन्यांचा खच पडला होता तो वेगळा. ती

रणभूमी अशा आभूषणांनी जणू सजली होती. बरेच योद्धे त्यांना झालेल्या जखमांमुळें भोवळ येऊन खाली पडत होते. तेथे माणूसकी मारली जात होती. हे उघडपणे दिसत होते. मित्र, नातेवाईक मारले जात होते. संध्याकाळ सुरू होणार होती तसे गिधाडं जमिनीवर उतरू लागली होती. सतनिकाने शत्रूचे शंभर योद्धे मारलेले असतात. विशालाक्षाने चारशे मारलेले असतात, ते दोघे त्रिगार्तच्या सैन्यात घुसतात. तेथे ते समोरासमोर युद्ध करू लागतात. ते अंगाला भिडतात. एकमेकांचे केस खेचू लागतात, नखांनी ओरबडू लागतात कारण त्यांची लढण्याची साधन मोडलेली असतात. राजा विराट आणि सूर्यदत्त त्यांच्या रथात आणि मदिराक्ष त्याच्या रथात असें, त्रिगार्तावर तुटून पडतात. शेकडो लढवय्ये ते मारतात. त्यांचे युद्ध कौशल्य वाखाणण्या सारखे होते. विराटराजा आणि शुशर्मन समोरासमोर येतात, ते लढू लागतात. ते बाणांचे वर्षाव करू लागतात. पावसासारखे ते बाण पडत होते. विराट राजा शुशर्मनला दहा बाणाने घायाळ करतो. त्यात त्याचे घोडेसुद्धा जखमी होतात. शुशर्मनच्या बाणांनी विराटाचे सुद्धा नुकसान होत असते. त्या लढाईत धूळीमुळे इतका गोंधळ उडालेला असतो कीं ते एकमेकाचे शत्रू कोण ते ओळखू शकत नव्हते. अशारितीने गोहरण पर्व, विराट पर्वाचा बत्तिसावा भाग संपला.

## गो हरण पर्व

## भाग तेहतिसावा

वैशंपायन पुढे सांगतात, अरें जनमेजया, जेव्हां अंधार पडला व कोणी कोणाला पाहू शकेना तेव्हां, ते दोन्ही बाजूचे लोक लढावयाचे थांबवतात. तेवढी विश्रांती त्यांना मिळते. मशालीच्या प्रकाशात ते त्यांच्या जखमा बांधण्याचे काम करतात. थोड्या वेळानंतर आकाशात चंद्र उगवतो. त्यामुळें त्या युद्धपिपासू क्षत्रियांना आनंद होतो कारण ते आजुबाजूचे पाहू शकतात. त्या बरोबर पुन्हा ते मारामारी सुरू करतात. त्या चंद्राच्या मंद प्रकाशात ते एकमेकांना नीटपणे पाहू शकत नव्हते तरी युद्ध करत होते. त्रिगार्ताचा राजा व त्याचा धाकटा भाऊ असें दोघे विराटावर चाल करून जातात. ते रथातून उतरतात व हातात गदा घेऊन विराटाकडे जातात. तेथे त्यांचे राजाशी लढणे चालू होते. त्यामध्ये तलवारी, खंजिर असे सगळे ते वापरतात. लढवय्ये लहान शलाक फेकून सैनिकांना घायाळ करत असतात. त्यांने त्याच्या सैनिकांच्या मदतीने मत्स्य सैन्याचा पराभव केलेला असतो. ते पाहिल्यावर तो शुशर्मन उत्स्फुर्तपणे विराटाकडे जातो, त्याचे दोनही घोडे मारले गेलेले असतात. नंतर त्याला तो कैदी करतो. जे त्यांचे बर्याच दिवसाचे स्वप्न असते. ते त्या वृद्ध राजाला छळू लागतात जसे एकाद्या सापडलेल्या मुलीला वासनांध माणसे करतात. विराटाला कैदी केल्यावर त्याला शुशर्मन स्वताच्या रथात घेतो व त्वरेने तेथून निघतो. जसे मत्स्य लोकांना समजते कीं त्याचा राजा कैदी झाला आहे, ते लढाई सोडून सैरावैरा धावू लागतात. ते त्यांचे घाबरून पळून जाणे युधिष्ठीर पहातो व भिमाला बोलतो, "अरें बंधू, आपण त्याच्या राज्यात एक वर्ष मजेत राहीलो आहोत. त्यांनी आपला चांगला मान राखला होता अशा राजाला वाचवणे आपले काम आहे असे मला वाटते. तू काय करणार आहेस त्याला सोडवण्यासाठी? आपल्यावर उपकार करणारा अशारितीने अपमानीत होणे हे आपल्याला शोभत नाही. त्याला त्याच्या शत्रूंच्या हातून सोडवणे आपले कर्तव्य आहे". भिम त्याला बोलतो, "जर आपली तशी आज्ञा असेल तर मी ते त्वरित करीन. पहा माझ्या बाहूंची

ताकद आज. तुम्ही सगळे माझे बंधू तसेच उभे रहा आणि पहा मी काय करतो ते, पहा हे भलेमोठे झाड मी उपटतो व त्याची गदा करतो आणि त्याच्या फटक्याने शत्रूला गारद करतो, पहा कसे मी हे करतो".

वैशंपायन पुढे सांगतात, भिम त्याची नजर त्या मोठ्या झाडावर टाकतो व एकाद्या पछाडलेल्या हत्ती सारखा तो त्या झाडाकडे पहात असतो. त्याच वेळी युधिष्ठीर त्याला थांबवतो व सांगतो, "अरे वृकोदरा, जर सगळ्यांच्या पुढे ते तू केलेस तर येथे असलेल्यांना तू भिम आहेस ते समजेल व ते आपल्याला आता योग्य नाही. त्यासाठी तू मानवी पद्धतीने तुझे शौर्य दाखवावे. बाण नाहीतर भाला असे कांहीं वापरून तू राजास मुक्त करावेस असें मला वाटते. आपले सहदेव आणि नकूल तुझा रथ सांभाळतील. तुम्ही तिघे मिळून राजाला मुक्त करावे".

वैशंपायन पुढे सांगतात, त्याप्रमाणे, भिमाने एक धनुष्य घेतले व त्यातून बाणांचा वर्षाव करण्यास सुरूवात केली. त्यानें बेजार झालेला शुशर्मनच्या धावत्या रथाकडे तो वेगांने गेला. तेथे विराटाला त्यांने खुणवले कीं आम्ही आलो आहोत, भिम त्रिगार्ताच्या राजाला सांगतो, थांब, थांब, त्यावेळी भिम यमासारखा वाटत होता. तो शुशर्मनला द्वंद्वाचे आव्हान देतो. तो बोलतो, "एकतर आमच्या राजाला मुक्त कर नाहीतर माझ्याशी द्वंद्व करायला तयार हो". ते बोलत असतांना भिम शुशर्मनचा रथ मोडून टाकतो. त्यात त्याचे बंधू त्याला मदत करतात. त्यानंतर भिम विराटाच्या समक्ष शत्रूचे असंख्य रथ, सैनिक, हत्ती, घोडे उधळून लावतो. शुशर्मन भिमाला दाद देत नाही ते पाहून भिम व त्याचे भाऊ शुशर्मनच्या सैन्याचा उच्छाद मांडतात. ते मत्स्यचे सैनिक पहातात व आपल्याला कोणी मजबूत आधार आहे हे समजल्यावर ते पळणारे सैनिक पुन्हा लढण्यासाठी येतात. त्यांचे तुंबळ युद्ध सुरू होते. त्रिगार्ताच्या सैन्याची धुळधाण उडवली जाते. विराटाच्या मुलांत त्यामुळे जोर येतो व तेसुद्धा आश्र्चर्य वाटावे अशाप्रकारे शुशर्मनच्या सैन्यावर तुटून पडतात. युधिष्ठीर स्वतः त्रिगार्ताच्या शेकडो योद्ध्यांना ठार मारतो. जणू यमाचे तांडव तेथे सुरू झाले आहे. नकूल सातशे सैनिक मारतो. सहदेव तीनशे मारतो.

अशारितीने मोठ्या संख्येने शत्रूपक्षाचे योद्धे मारल्यावर तो शुरवीर योद्धा युधिष्ठीर शुशर्मनवर जातीने हल्ला करतो. शुशर्मन त्याचे नऊ बाण युधिष्ठीरावर फेकतो. त्याचे घोडे तो घायाळ करतो. भिम शुशर्मनचे घोडे मारून टाकतो. शुशर्मन व त्याचा सारथी जायबंदी झाल्याचे पाहून मदिराक्ष तेथे त्याच्या वडिलांना घेण्यासाठी येतो. तेव्हां विराट राजा गदा घेऊन शुशर्मनच्या मागे धावू लागतो. जरी ते वृद्ध होते, एकाद्या जोरदार तरुणासारखे ते त्याच्यावर हल्ला करतात. शुशर्मनला पळतांना पाहून भिम बोलतो त्याला उद्देशून, "अरे शूरा असा पळू नकोस. अजून युद्ध संपलेले नाही. अशारितीने एकाद्याचे गोधन पळवणे क्षत्रियांना शोभत नाही हे तुला माहित नाही कां? तुझ्या सैनिकांना तसेंच सोडून तू कोठे पळत आहेस"? भिमाचे ते बोलणे शुशर्मनच्या वर्मी लागते. तो परत फिरतो व बोलतो, थांब, थांब, त्यानंतर मोठ्या वेगांने तो भिमावर चाल करतो. भिमाला तेंच पाहिजे होते. तो त्याला ठार मारण्याचे ठरवतो. भिम शुशर्मनचे केस पकडतो. त्यांनेच तो त्याला उचलतो व जमिनीवर आपटतो. शुशर्मन त्या मारामुळें जोरांने ओरडतो. वाघाने छोटे हरण मारावे तसे होत होते. भिम त्याच्या डोक्याला लाथ मारतो. त्याच्या छातीवर तो त्याचा गुडघा दाबतो. त्याचा श्र्वास बंद करतो. त्रिगार्ताचा राजा निपचित पडलेला असतो. ते पाहून त्रिगार्ताचे सगळे सैनिक पळून जातात.

विराटाला त्यांनी मुक्त केले होते. त्याशिवाय त्यांचे गोधन सोडवले होते, त्याशिवाय इतर धन जे ते लुटत होते तेसुद्धा पांडव सुरक्षितपणे राजाला मिळवून देतात. ते केल्यावर ते पांडव, जे निती नियमांचे कसोशीने पालन करतात व जे व्रतस्थ जीवन जगतात असें राजापुढे उभे रहातात. भिम राजाला सांगतो, "हा बदमाष सोडून देण्याच्या योग्यतेचा नाही. तरी भिम त्याला उचलतो व त्या अवस्थेत रणभूमीच्या मध्ये घेऊन येतो व युधिष्ठीरापुढे उभा करतो. त्याची अवस्था पाहून युधिष्ठीराला हसू येते. भिम त्या हरलेल्या राजाला बोलतो, "तुला एका अटीवर आम्ही सोडणार आहोत परंतु, त्यासाठी तुला सगळ्यांच्या पुढे जाहीर करावे लागेल कीं, तू एक चोर

आहेस. जर तू तसे कबूल करणार नाहीस तर मी तुला आत्ताच्या आत्ता मारून टाकीन". ते ऐकल्यावर युधिष्ठीर भिमाला विनंती करतो कीं, "अहो भिम, जर आमच्या मताला कांहीं किंमत आपल्या कडे असेल तर ह्याला एकदा माफ करावे कारण, आता तो विराटाचा दास झाला आहे, त्याचे जे करावयाचे ते विराट राजाला करू द्यावे". शुशर्मनला ते मुक्त करतात व ताकीद देतात कीं अशा हरकती त्यांने पुन्हा करू नयेत.
अशारितीने गो हरण पर्व, विराट पर्वाचा तेहतिसावा भाग संपला.

## गो हरण पर्व

## भाग चौतिसावा

वैशंपायन पुढे सांगतात, युधिष्ठीराचे ते बोलणे ऐकून तो हरलेला राजा प्रभावित होतो. त्याची मान शरमेने खाली जाते. मुक्त झालेला तो राजा विराटाकडे पहातो. त्याला सलाम करतो व तेथून निघून जातो. पांडव शुशर्मनला मुक्त केल्यानंतर तेथेच त्या रणभूमीवर ती रात्र काढतात. विराट त्या महाबली योद्धांच्या कृपेमुळें सुटला म्हणून तो त्यांना भरपूर धन दौलत प्रदान करतो. तो त्यांना सांगतो, "हे राज्य जसे माझे तसे तुमचेसुद्धा आहे असें समजावे. माझी सगळी दौलत तुमच्या करता उपलब्ध आहे. तुम्हाला मनाला वाटेल तितके दिवस आपण सगळे येथे मजेत राहू शकता. तुम्हाला हव्या तेवढ्या सुंदर मुली, रत्न, दागिने, इतर संपत्ती जे पाहिजे ते घ्यावे असें मला वाटते. आपले माझ्यावर मोठे उपकार झाले आहेत. तुमच्यामुळें मी आज राजा म्हणवून घेत आहे ह्याची मला जाणीव आहे".
वैशंपायन सांगतात, जसें राजा विराट ते बोलतो, ते कुरुवंशाचे ज्याचा प्रमुख युधिष्ठीर होता, त्याला उत्तर देतो, "अहो मत्स्य देशाचे राजा, आमच्या वर आपण कितीतरी कृपा गेले एक वर्ष केली आहे. आम्हाला संतोष होत आहे कीं, आम्ही तुमच्या कृपेची कांहीं परतफेड करण्यात यशस्वी झालो. आज आपण तुमच्या शत्रू पासून मुक्त झाला अहात. ते ऐकल्यावर भावना विवश झालेला विराट राजा युधिष्ठीराला जवळ बोलावतो व सांगतो कृपया आपण या व ह्या सिंहासनावर विराजमान व्हावे. त्याशिवाय मी तुम्हाला अनेक अशी रत्न

बहाल करणार आहे जी कोणाला मिळत नाहीत. त्याशिवाय जे आपल्याला येथून पाहिजे तेसुद्धा घ्यावे.

ते ऐकल्यावर तो पंडुचा मुलगा त्याला हात जोडून सांगतो, "आम्हाला आधीच बरेच कांहीं आपण दिले आहे. आपल्या मदतीने आम्ही येथे खुशाल रहात आहोत, त्या बदल्यात आम्ही आपल्याला आपल्या वैर्यापासून मुक्त केले आहे. वस्तुतः आपण दोघांनी एकमेकाला पुरक असें सगळे केले आहे. एवढे बोलणे झाल्यानंतर राजा आपल्या संदेशवाहकांना सांगतो, "राजधानीकडे जा व शुभवार्ता सांगां कीं, आपण जिंकलो आहोत व आपले सगळे गोधन व इतर लुटलेली संपत्ती सुरक्षित आहे. त्यांना सांगा कीं आमच्या स्वागताची जय्यत तयारी करावी. त्यासाठी नृत्यांगनांना आमंत्रित करावे. चांगले दागदागिन्याने सजून आमच्या स्वागतासाठी यावे. वाजंत्र्यांना त्यांची वाद्ये घेऊन ती वाजवत आमचे स्वागत करण्याची तयारी करावी. नगराचे दरवाजे तोरणं लावून चांगली सजवावीत".

अशारितीने गो हरण पर्व, विराट पर्वाचा चौतिसावा भाग संपला.

## गो हरण पर्व

## भाग पस्तिसावा

वैशंपायन सांगत असतात, जेव्हां विरीट राजा त्याची पळवली जाणारी गुरं मिळवण्यासाठी प्रयास करत असतो तेव्हां दुर्योधन विराटाच्या सत्ता केंद्रावर चाल करून जातो. त्याच्या बरोबर भिष्म, द्रोण, कृप, कर्ण, असें सगळे त्याच्या मदतीला असतात. त्यांच्याकडे उत्कृष्ट शस्त्रं होती. त्यांच्या बरोबर अश्र्वत्थामा, सुवलाचा मुलगा शकूनी, दुःशासन, विविंगसती, कौरव विकर्ण, चित्रसेन असें मोठे बलशाली योद्धे होते. त्यांनी त्या सत्तास्थानात असलेली गुरं पळवण्यास सुरूवात केली. कौरवाने त्या गो हरण कारवाईत साठ हजार पशु पळवले. त्यांच्याकडे अनेक रथ, गाड्या होत्या. त्यांचा आवाज फार मोठा होता. त्यांच्या शस्त्रांचा सुद्धा आवाज खूप मोठा होता. त्या गुरांच्या संरक्षणार्थ असलेल्या धनगरांनी त्यांच्याशी चांगली लढाई केली. परंतु, त्याना समजले कीं शत्रू फार प्रबळ आहे. त्याबरोबर ते राजधानीकडे निघाले. ते त्यांच्या रथातून थेट राजवाड्यात आले व विराटाच्या मुलाला, भूमिंजयाला भेटतात. त्याला सगळे जे झाले ते सांगतात. कौरवांनी तो हल्ला केला आहे ते समजले. किती पशु कौरवांनी पळवले ते सुद्धा सांगतात. ते भूमिंजयाला सांगतात कीं, तो ताबडतोब ती जनावरं परत मिळवण्यासाठी कारवाई करेल. भूमिंजय वेळ न दवडता निघतो. त्यामुळें आता राजधानी पूर्णपणे असुरक्षित होते. राजा त्याची स्तुती करत असे. माझा मुलगा माझ्यासारखाच योद्धा

आहे. तो घराण्याचा तारा आहे असें राजा त्याच्या बद्दल बोलत असें. आता जा व कौरवांना हरवून त्यानी पळवलेली गुरं परत मिळव असें त्याला सांगतात. तुझ्या सैन्याच्या बाणांनी कौरवांचा पराभव करून ये. हत्तीसारखा त्यांच्यावर चाल करून जा असें त्याला सांगतात. लवकर रथ जोड आणि निघ. तुझ्या रथातील स्तंभावरील पताका जी सोन्याच्या सिंहाचे चिन्ह धारण करून आहे, त्यामुळें तुझे शत्रू पराजित करून तू येशिल. सगळ्या कौरवांना पराजित करून आपली गुरं घेऊन ये. असें सांगतात. तूंच एकमेव ह्या राज्याचा वारस आहेस. जसा पंडुचा अर्जुन तसा तू विराटासाठी आहेस. ह्या सत्तास्थानाला तुझाच आधार आहे. तूंच आमचा अंतिम आधार आहेस. असें सगळे प्रजाजन भूमिंजनाला बोलतात.

वैशंपायन पुढे सांगतात, राजवाड्यातील बायकांच्या पुढे ते गुराखी राजपुत्राला लढण्यास येण्यासाठी सांगतात. त्या बायकांच्या पुढे तो स्वताची स्तुती करत असतो.

अशारितीने गो हरण पर्व, विराट पर्वाचा पस्तिसावा भाग संपला.

## गो हरण पर्व

## भाग छत्तिसावा

भूमिंजन त्याला बोलते, मी धनुर्विद्येत तरबेज आहे. मी ताबडतोब निघालो असतो पण माझा सारथी गेल्या युद्धात मारला गेला आहे. मला माहीत नाही कीं, येथे कोणी चांगला सारथी मला मिळू शकेल. त्यासाठी माझ्याकरतां चांगला सारथी मिळवा. म्हणजे मी युद्धासाठी निघू शकेन. माझ्या रथावर माझी पताका फडकवण्यास सांगा. शत्रूच्या सैन्यात मी माझा रथ घुसवीन जेथे हत्ती व घोडे आणि पाईक सैन्य असेल आणु त्यांचा फडशा पाडीन. त्याच्या त्या वल्गनाने तेथे असलेल्या मुली त्याच्यावर फार खूष होतात. मी आपले पळवलेले गोधन परत मिळवीन त्याबद्दल निश्र्चिंत असा. त्या दुर्योधनाला व त्याच्या सैन्याचा पुरता बिमोड करून मी येईन. जसे इंद्राने दानवांना हरवले तसे मी कौरवांचा पराभव करीन. मी तेथे असतो तर कौरवांची हिम्मत झाली नसती असे करावयाची. तेथे कौरवांचे महारथी, भिष्म, द्रोण, कृपाचार्य कर्ण असें सगळे असले तरी मी त्यांचा पराभव केला असता. पण माझा सारथी नाही. जर तुम्ही चांगल्या सारथ्याची व्यवस्था करत असाल तर मी ताबडतोब निघण्यास तयार आहे. त्या कौरवांना दाखवून देईन शौर्य म्हणजे काय असते. अशाप्रकारे तो विराटाचा लहान मुलगा

राजवाड्यातील महिलांच्या पुढे शेखी मिरवत असतो. त्याना समजेल कीं, साक्षात अर्जुनाशी त्यांची गांठ पडली आहे.

वैशंपायन पुडे सांगतात, ते भूमिंजनाचे बोलणे ऐकल्यावर अर्जुनाला काय परिस्थिती झाली आहे त्याचा अंदाज येतो. तो त्याच्या प्रिय पत्नीला गमतीने हळूच बोलतो, "त्या राजपुत्राला सांग कीं, बृहन्नला रथाचे सारथ्य उत्तम करते. तिला घेऊन जावे. ती इंद्रप्रस्थात अर्जुनाचा रथ बर्याच वेळी चालवत असे. पाहिजे असेल तर तिला विचारावे. अनेक लढायांत तिने अर्जुनाच्या रथाचे सारथ्य केले आहे".

वैशंपायन पुढे सांगतात, त्या मुलाची ती बडबड पुन्हा पुन्हा ऐकून त्रासलेली द्रौपदा त्या बायकांच्या सभेत तिला अर्जुनाने जे सांगितले ते बोलते. ती सांगते त्या बायकांच्या मेळाव्यात ज्यांच्यात तो राजपुत्र बसलेला असतो, "अहो, ती नृत्य शिक्षिका जी आपल्याकडे मुलींना नाच गाणे शिकवते ती बृहन्नला, एके काळी इंद्रप्रस्थात धनंजयाच्या रथाचे सारथ्य लिलया करत असल्याचे मी पाहिलेले आहे. अगदी युद्धात सुद्धा ती त्याच्या बरोबर रथ चालवण्यासाठी जात असें, तिला कां नाही विचारत? त्या काळी मी त्यांच्या कडे राणी द्रौपदीची सैरंध्री होते. म्हणून मला ते माहीत आहे. मी जेव्हां पांडवांच्या कडे होते तेव्हा अर्जुनाला फार जवळून पाहिलेले आहे. त्यावेळी जेव्हां खांडव वनात अग्नीला अर्जुन व कृष्ण मदत करत होते तेव्हा हींच तर त्याच्या रथाचे सारथ्य करत होती. तिच्या सारखा सारथी मिळणे अशक्य".

भूमिंजन विचारतो, "तो तर नपुसक आहे तो कसा सारथ्य करणार"? पुढे तो बोलतो, "मला हरकत नाही जर ती माझ्या रथाचे सारथ्य करण्यास तयार असेल. तिला जाऊन विचारा ती येण्यास तयार आहे कीं"?

द्रैपदी बोलते, "मला खात्री आहे ती तुमच्या रथाचे सारथ्य करण्यास तयार होईल". ते ऐकल्यावर राजकन्या उत्तरा जी आपल्या भावाचा मोठा अभिमान बाळगत असते बृहन्नलाकडे तिला विचारण्यासाठी जाते. बृहन्नला नृत्यशाळेत बसलेली असते.

बृहन्नलेला ती सभेत घेऊन येते.

अशारितीने गो हरण पर्व, विराट पर्वाचा छत्तिसावा भाग संपला.

## गो हरण पर्व
## भाग सदोतिसावा

वैशंपायन पुढे सांगतात, मोठ्या भावाने पाठवल्यानंतर ती नाजुकशी राजकन्या जिचे नांव उत्तरा होते बृहन्नलाच्या ठिकाणी पोहोचते. त्या राजकन्येचे सौंदर्य वाखाणण्यासारखे होते. ती साक्षात लक्ष्मी असावी अशी दिसत होती. मोरपिशी रंगाजे कपडे तिने घातलेले होते. तिच्या कमरपट्ट्यात मोती बसवलेले होते. तिच्या पापण्या बाकदार होत्या. एकंदर तिची अंगकांति तेजस्वी व बांधा डोलदार होता. ती धावत नृत्यशाळेकडे गेली. तिचे दांत शुभ्र होते, अशी विराटाची शुभलक्षणी कन्या तेथे बृहन्नलाला भेटते तेव्हां तो अर्जुन तिला बोलते, "असे काय झाले कीं, तू अशी धावत माझ्याकडे आलीस"? "तुझा चेहरा असा पडलेला कां आहे"? ती त्याला सांगते कि, राजाचे सगळे पशुधन कोरवांनी पळवले आहे व ते आता नगरावर हल्ला

करण्यासाठी येत आहेत. त्यांच्याशी लढण्यासाठी तिचा मोठा भाऊ भूमिंजन जाऊ पहात आहे परंतु, त्याच्यासाठी सारथी उरलेला नाही. सैरंध्री सांगते कीं, तू चांगले सारथ्य करू शकतेस व तू पूर्वीच्या काळी साक्षात अर्जुनासाठी अनेक युद्धात त्याच्या रथाचे सारथ्य यशस्विपणे केले आहेस म्हणून मी तुला बोलावण्यास आले आहे. धापा टाकत टाकत ते सगळे एकादमात उत्तरा सांगते बृहन्नलाला. "तुमच्यामुळे अर्जुन त्या लढाया जिंकू शकला असें ती सांगते. म्हणून आपण माझ्या भावाच्या रथाचे सारथ्य करण्यासाठी तयार व्हावे. म्हणजे आमचे पशुधन माझा भाऊ परत मिळवू शकेल". ते ऐकल्यावर तो सव्यसाची धनंजय त्या बृहन्नलेच्या रुपात त्या सगळ्या बायकांत बसलेल्या राजपुत्राला भेटते. त्याच्या पाठोपाठ ती विराटाची सुस्वरुप कन्या उत्तरा, तेथे बायकांच्या मेळाव्यात पोहोचते. राजपुत्र तिला बोलतो, "सैरंध्री सांगते कीं, तू अर्जुनाच्या रथाचे सारथ्य केले होतेस जेव्हां त्या शूरवीराने खांडववन जाळण्यात अग्नीदेवाला मदत केली होती. म्हणून, मला सांग आता तू माझ्या रथाचे सारथ्य करण्यास तयार आहेस कां? आमचे पशुधन कौरवाने पळवलेले आहे. ते परत मिळवण्यासाठी मला जावे लागत आहे. सैरंध्रा असेसुद्धा सांगत आहे कीं, अर्जुनाने जेव्हा राजसूय यज्ञात पृथ्वी जिंकली होती तेव्हासुद्धा तूंच त्याची सारथी होतीस, हे खरे आहे कां"? राजपुत्राचे ते ऐकल्यावर बृहन्नला बोलते, "बृहन्नला त्याला बोलते, "अहो मी एक नाचणारी, गाणारी मी काय रथाचे सारथ्य करणार"? उत्तरा तिला बोलते, तू नाचणे व गांणे करतेस त्याच प्रमाणे रथसुद्धा उत्तम चालवत आहेस हे आम्हाला समजले आहे तेव्हां वेळ न दवडता सारथ्य करण्यास तयार व्हावे असें ती राजकन्या अर्जुनाला सांगते.

वैशंपायन पुढे सांगतात, त्या तेथे बसलेल्या बायकांना खरे वाटावे म्हणून अर्जुन तिने दिलेले सारथ्याचे कपडे घालतांना कांहीं गमतीशीर चुका करतो, त्यामुळें तेथे जमलेल्या राणीवशातील सगळ्या बायकांची चांगलीच करमणूक होते. त्यानंतर उत्तरा त्याला ते कपडे नेसवते. ते नेसल्यावर ती बृहन्नला विशेष देखणी दिसू लागते. त्यानंतर त्याचे चिन्ह, ओरडणारा सिंह, असलेली

पताका तो घेतो. त्यानंतर उत्तरा व तिच्या मैत्रिणी बृहन्नलेला बोलतात, "बृहन्नला आता घोड्याच्या लगामी नीट पकड, आमचे पशुधन परत आणण्यात आमच्या भावाला, भूमिंजनाला, योग्य सदत कर. तेथे मोठे मोठे महारथी कौरवांच्या बाजूने आहेत, त्यात भिष्म, द्रोण असें सगळे आहेत". आणि हसू लागतात. ते ऐकल्यावर अर्जुन गालातल्या गालात हसत जोरांने ओरडून तिला होकार देतो.
तो त्या मुलींना सांगतो, "जर हा भूमिंजन त्यांना हरवू शकला तर निश्र्चितपणे आम्ही तुमचे पशुधन परत मिळवू". त्यानंतर राजवाड्यातील महिला व ब्राह्मण राजपुत्राची रितसर युद्धासाठी जाण्याची आरती करतात. त्यात अर्जुनाचीसुद्धा आरती होते. सारथी बृहन्नला राजपुत्राला शुभेच्छा देत त्यान रथाला एक प्रदक्षिणा घालते. सगळ्या बायकां मोठ्याने ओरडून बोलतात कीं, जसे पांडवांचा अर्जुन जिंकून येत असें तसेंच तुम्ही दोघे जिंकून याल अशी प्रार्थना त्या करतात. तो रथ युद्धाकडे निघतो.
वैशंपायन पुढे सांगतात, त्यानंतर अर्जुन तो रथ भूमिंजनासह त्या युद्धाच्या जागेकडे नेतो. तेथे ते पहातात कीं, असंख्य पताका फडफडत असलेले विविध प्रकारचे रथ तेथे जमा झालेले होते.
अशारितीने गो हरण पर्व, विराट पर्वाचा सदोतिसावा भाग संपला.

## गो हरण पर्व

## भाग अडतिसावा

वैशंपायन पुढे सांगतात, नगरातून ते निघाल्यावर युवराज भूमिंजन अर्जुनाला सांगतो, रथ कौरवांच्या समोर घेऊन जा. त्याप्रमाणे बृहन्नला तो रथ त्या दिशेने नेते. पुढे तो तिला बोलतो, त्यांना झपकन हरवून आपण आपले पशुधन घेऊन परत नगराकडे जाऊ. ते ऐकून बृहन्नला स्मित करते पण कांहीं बोलत नाही. बृहन्नला तो रथ पटकन कौरवांच्या जवळ नेऊ लागते. ती

जागा स्मशाना कडे होती ज्या ठिकाणी पांडवांनी त्यांची अस्त्र, शस्त्र आपट्याच्या वृक्षावर लपवलेली असतात. कौरवांचे प्रचंड सैन्य सावकाशपणे त्या स्मशानभूमीच्या दिशेने सरकत असते. जणू त्यांना कोणतीही घाई करण्याची आवश्यकता वाटत नव्हती. ते कौरवांचे सैन्य एकाद्या मानवी सागरासारखे दिसत होते. तेथे असलेल्या प्रचंड वृक्षांमुळें त्यांचे दर्शन नीटपणे होत नव्हते. त्या सैन्याच्या चालण्यामुळें हवेत धूळ उडत होती. त्यांच्या सैन्यातील भलेमोठे हत्ती, घोडे, अवजारांच्या गाड्या ह्यांच्या आवाजामुळें प्रचंड गोंधळ उडाला होता. तेथे पुढे येणार्या लोकांचे चेहरे हवेत उडालेल्या धुरळ्यामुळें नीटपणे दिसत नव्हते. अर्जून त्यात कर्ण, दुर्योधन, दुःशासन पहातो. त्या मागे द्रोण, भिष्म तो पहातो, अश्र्वत्थामा सुद्धा तो पहातो. ते सगळे पाहून भूमिंजन घाबरून जातो. त्याच्या अंगावर काटा उभा रहातो. तो घाबरून अर्जुनाला सांगतो, "मी ह्यांच्या बरोबर नाही लढू शकणार, ते सगळे खूप आहेत. ते भयंकर दिसत आहेत. त्यांना हरवणे मला जमणार नाही. त्यांना देवसुद्धा हरवू शकणार नाहीत. मी अशा लष्करात शिरण्याचे धाडस करणार नाही. ते सगळे ख्यातनाम शूर योद्धे आहेत, त्यांच्याशी मी कसा लढणार"? ते हत्ती, घोडे, पाईक सैनिक हे सगळे मी कसा एकटा हरवणार, ते मला शक्य नाही. आपण परत फिरले पाहिजे. तेथे पहा, भिष्म, कृप, द्रोण, कर्ण, विविंगसती, अश्र्वत्थामा, विकर्ण, वल्हिक असें सगळे आहेत. त्याशिवाय कितीतरी दुसरे योद्धे आहेत. माझे केस कसे उठले आहेत ते पहा. मी फार घाबरलो आहे. युद्ध असे असते ते मला माहीत नव्हते. मी जास्तवेल येथे राहीलो तर बेहोष होईन.

वैशंपाय.न पुढे सांगतात, तो लहान मुलगा, भूमिंजन रडू लागतो. तो अर्जुनाचा हात पकडतो व सांगतो, "आपण परत फिरू. माझे बाबा त्रिगार्ताच्या सैन्याशी लढण्यासाठी सगळे आमचे सैन्य घेऊन गेले आहेत. त्यामुळें आपले नगर असुरक्षित झाले आहे. मला युद्धाचा अनुभव नाही. मी एक केवळ मुलगा आहे. त्या घरातील मुलींसमोर मी हुशारी केली पण मी तसा युद्धासाठी तयार नाही. म्हणून मी तुला सांगतो कीं, आपण पुढे जाऊया नको". ते

ऐकल्यावर बृहन्नला त्याला बोलते, "अरे मुलां इतका घाबरू नकोस, त्यामुळे आपले शत्रू जास्त ताकदवान होतील. घाबरणे हा सर्वात मोठा दोष समजला जातो क्षत्रियांसाठी. तू एक राजा होणार आहेस तेव्हां असा घाबरू नकोस. लक्षात घे, तू मला युद्धात बोलावले आहेस आता परत फिरता येणार नाही. तूच बोलत होतास कीं तुला मी कौरवांच्या पुढे न्यावे. म्हणून मी तुला येथवर आणले आहे. अरे मत्स्य देशाच्या भावी राजा, कौरवांशी लढून पहा. कारण ते तुमच्या पशुधन खाण्यासाठी नेत आहेत जसे गिधाडं मेलेल्यांचे मांस खातात. माझ्यामते तेंच खरे कारण आहे, त्यांच्या येण्या मागील. तुझे राज्य जिंकण्यासाठी ते आलेल नाहीत. नाहीतर ते असें सावकाशपणे पुढे सरकले नसते. तुझ्या घरातील बायकांपुढे तू मोठ्या मोठ्या गप्पा मारत होतास. जर तू तुझे पशुधन न मिळवता परत गेलास तर तुझी नाचक्की होईल त्या बायकांपुढे त्याचा विचार कर. माझ्या बद्दल बोलशिल तर मी सुद्धा ते पशुधन न मिळवता जाणार नाही. तुला माझ्याबरोबर यावे लागेलच. सैरंध्रीने माझे किती कौतुक सगळ्यांच्या समक्ष केले आहे त्याचे काय होईल? पाहिजे तर तू नुसता गप्प बस, माझ्या बरोबर, मी त्यांच्याशी लढणार आहे".

भूमिंजन म्हणतो, "त्या कौरवांना माझे राज्य लुटावयाचे असेल तर लुटू दे, त्या बायकांना व इतर लोकांना मला हसावयाचे असेल तर हंसू दे, पण मी ह्यांच्याशी लढू शकणार नाही. तुला माझे हसे वाटत असेल तर वाटू दे, माझे बाबा मला दोष देतील ते मला चालेल पण मी ह्यांच्याशी लढू शकणार नाही. ते त्याचे बालिश बोलणे ऐकून बृहन्नला त्याला हसते.

वैशंपायन पुढे सांगतात, असें बोलून तो लहान मुलगा रथातून उडी मारून खाली उतरतो व नगराच्या दिशेने पळू लागतो. त्याला मान सन्मानाची नसते, तो जीवाला घाबरत असतो. ते पाहून बृहन्नला त्याला उद्देशून बोलते, "असे शूरवीर करत नाहीत. क्षत्रिय प्राणापेक्षा सन्मानाला जास्त जपतात. तुझे हे वागणे त्यात बसत नाही. असें बोलून धनंजय त्याच्या मागे धावत जातो व त्याला पकडतो. तिचे लाब पसरलेले लाल रंगाचे कपडे त्यामुळे हवेत

फडकतात. ते कौरवांच्या लक्षात येते. ते पाहून ते कौरवांचे लोक त्या दोघांतील धडपड पाहून हसू लागतात. एकमेकांत चर्चा सुरू होते.

"कोण हा आहे बायकांच्या लाल कपड्यातील इसम? हा पुरूष आहे कां बाई? अरे नपुसक किन्नर असावा असें वाटते".परंतु, त्याच्या हालचाली अर्जुनासारख्या वाटतात! तो धनंजय असावा असें वाटते. जसा देवांत इंद्र तसा हा अर्जुन माणसात आहे. ह्या जगात दुसरा कोण आहे जो एकटा आपल्याबरोबर लढण्यासाठी येण्याचे धाडस करील"?

विराटाने त्याचा एकुलता एक पुत्र नगरात ठेवला होता व सगळे सैन्य घेऊन तो शुशर्मनशी सढण्यासाठी गेला होता. ते विचार करतात, तो लहान मुलगा भूमिंजन असला पाहिजे. दुसरा कोण अशणार? त्याचे सारथ्य ही बाई करत होती. कदाचित पार्थ बाईच्या वेषात अज्ञातवासात रहात असण्याची शक्यता वाटते. परंतु, आपले सैन्य. पाहून तो लहान मुलगा धाबरून पळत होता व त्याला तो बाईच्या पेहेरावातील पार्थ अडवत होता असें एकंदर होत होते असेम वाटते. अशी चर्चा कौरवांच्या ज्येष्ठांत होत असते.

वैशंपायन पुढे सांगतात, त्या बाईच्या वेषातील पांडवाला पाहून कौरवांच्या कल्पना रंगू लागल्या. परंतु, ते कोणताही खात्रीचा निष्कर्ष काढू शत नव्हते. त्या सुमारास, धनंजय त्या भूमिंदनाला त्याचे केस पकडून रथापर्यंत आणतो. त्याच्या घट्ट पकडीतून त्या मुलाची सुटका होत नव्हती. तो दुःखाने व घाबरल्यामुळें अर्जुनाकडे करुणामागत असतो. तो सांगतो, "मी तुला शंभर सोन्याची नाणी देईन, मी तुला एक रथ देईन जो सोन्याचा असेल. मी तुला दहा हत्ती देईन. पण मला ह्यातून सोड". अशाप्रकारच्या गोष्टी तो करू लागतो पण अर्जुन तेथे दुर्लक्ष करत त्याला रथात बसवतो व सांगतो चल आपण प्रथम त्या स्मशानाकडे जाऊ. त्यानंतर मी कौरवांशी लढीन, तुला चिंता करण्याचे कारण नाही". तू असा घाबरू नकोस, तू एक उच्च कुलिन क्षत्रिय आहेस. मी त्यांच्याशी लढणार आहे व आपली सगळी गुरं परत मिळवणार आहे, तू फक्त रथ चालवण्याचे काम करं. त्यानंतर नाईलाजाने तो राजपुत्र रथात बसतो.

अशारितीने गो हरण पर्व, विराट पर्वाचा अडतिसावा भाग संपला.

## गो हरण पर्व

## भाग एकोणचाळीसावा

वैशंपायन सांगतात, अर्जुन जो कधीही हरत नाही तो त्याच्या बरोबर त्या स्मशानाकडे निघतो. ते आपट्याच्या त्या वठलेल्या वृक्षाकडे जातात. कौरवांना ते दिसत नाहीत कारण तेथे घनदाट झाडी असते.

कौरवांच्या अड्ड्यात भितीचे वातावरण पसरते, जर हा खरोखरच धनंजय असेल तर मोठीच पंचाईत होणार आहे हे ते ओळखून असतात. त्या हतबल झालेल्या कौरव सेनानीना अशुभलक्षणं दिसू लागतात. भारद्वाजाचा मुलगा, द्रोण बोलू लागतात, "वारे चुकीच्या दिशेने वहात आहेत, आकाशातून मातीचे कण पडत आहेत, आकाशात कोळोखी पसरत आहे, आकाश पाणी नसलेल्या कोरड्या ढगांने भरलेले आहे. कोल्हांची ओरड त्यांना ऐकू येऊ लागते. आकाशात गिधाडं घिरट्या घालू लागतात. आपले घोडेसुद्धा अश्रू ढाळत आहेत, वारा पडलेला असतांना आपले रथावरील ध्वज कां थरथरत आहेत"? ते बोलतात, "हि सगळी अशुभ लक्षणं आहेत आपल्यासाठी. आपल्यावर मोठी आपत्ती कोसळणार आहे हे निश्च्चित". असें ते सांगत असतात. "आपल्याला फार सावध राहिले पाहिजे. आता स्वताला वाचवण्यासाठी शिकस्थ करावी लागणार आहे. फार मोठ्या प्रमाणेत आपला संहार होण्याची शक्यता आहे असें द्रोणाचार्य बोलत असतात. जर हा इसम जो हिजड्याच्या सोंगात आला आहे तो खरोखरच पारंथ असेल तर मोठी अवघड परिस्थिती आपल्या पुढे ऊभी रहाणार आहे. कृपाचार्य बोलतात. तो आपल्याला हरवून सगळी गुरं परत घेऊन जाणार आहे. भिष्म बोलतात, "हा कुंतीचा मुलगा सव्यसाची आहे. तो कोणापुढेही विजयींच होणार आहे. त्यांने देव, असूर, राक्षस असें सगळे पराजित केले आहेत. त्याला दुर्योधनाच्या मूर्खपणामुळें फार हाल अपेष्टा सहन कराव्या लागल्या आहेत. त्याचा राग तो आपल्यावर काढणार. त्याला त्याच्या जन्मदात्यांने शस्त्र विद्या शिकवली आहे. तो दुसरा इंद्रच आहे. म्हणून अरे कौरवांनो त्याच्याशी मुकाबला करणारा सेनानी तुमच्याकडे नाही

हे लक्षात घ्या. साक्षात महादेवांनी त्याला त्याची शस्त्र, अस्त्र विद्या प्रदान केली आहे. जेव्हां ते दोघे हिमालयात एकमेकांना भिडले होते".
भिष्माचार्यांचे ते कुंतीपुत्र स्तुती कथन ऐकून कर्ण वैतागला व बोलला. "आपल्याला फक्त कुंतीच्या मुलांचेच कौतुक असते. आम्ही कोणीच नाही कां? मी सांगतो, मी ह्या तुमच्या अर्जुनापेक्षा सोळापट जास्त शूर आहे. आमच्यातील दुर्योधनसुद्धा कांहीं कमी नाही".
त्यावर दुर्योधन बोलतो, "जर हा खरोखरच पार्थ असेल तर आपला प्रश्न सुटतो कारण, त्यांना आपण पुन्हा वनवासाला आणि त्यानंतर अज्ञातवासाला पाठवू शकू". आणि जर हो कोणी दुसरा असेल तर त्याला आपण आपल्या बाणांच्या मारांने चारीमुंड्या चीत करून जमिनीवर झोपवू. त्यावर कृपाचार्य त्याला सांगतात, अरे दुर्योधना कालच ते अज्ञातवासाचे वर्ष संपले आहे, ते आता बाहेर येण्यास मुक्त आहेत. त्यामुळें आता त्याना तू पुन्हा वनवासाला आणऩि नंतर अज्ञातवासाला पाठवू शकणार नाहीस. त्यावर भिष्म, द्रोण आणि कृप एकदम हसू लागतात.
अशारितीने गो हरण पर्व, विराट पर्वाचा एकोणचाळीसावा भाग संपला.

# गो हरण पर्व
## भाग चाळीसावा

वैशंपायन सांगत असतात, तेथे अर्जुन व भूमिंजय त्या आपट्याच्या झाडाकडे पोह्रोचतात. अर्जुनाला समदते कीं, तो विराटाचा पुत्र फारच नाजूक आणि युद्धासाठी निरुपयोगी आहे. तो त्याला भूमिंजयाला सांगतो, "जा, त्या झाडावर चढ. त्या झाडावर कांहीं धनुष्य बाण आहेत ते घेऊन खाली ये. कारण तुझे धनुष्य माझी ताकद पेलण्यास योग्य नाहीत. मी जेव्हां ते घोडे व हत्ती आणि शत्रूचे सैनिक ह्यांचा चुराडा करीन तेव्हां तुला समजेल मी काय म्हणतो आहे. म्हणून तू तेवढे काम करपावयाचे आहे". भूमिंजय त्या झाडावर चढतो ज्यावर घट्ट पानोळा होता.

युधिष्ठीर, भिम आणि विभत्सु व दोघे जुळे ह्यांचेसुद्धा धनुष्य व बाण आहेत त्यात ठिकाणी, अर्जुन भूमिंजयाला सांगत असतो. त्यात एक मोठे गांडीव आहे. ज्याची ताकद अनेक धनूष्यां सारखी आहे. त्याच्या जोरावर अनेक राज्ये जिंकता येतील. असें ते आहेत. त्यांच्यावर सुंदर जरीमध्ये नक्षिकाम केलेले आहे. फार मजबूत आहेत ती सगळी शस्त्रं. अर्जुन त्या लपवलेल्या शस्त्रां बद्दल भूमिंजयाला सांगत असतो.

अशारितीने गो हरण पर्व, विराट पर्वाचा चाळीसावा भाग संपला.

# गो हरण पर्व
## भाग एकेचाळीसावा

भूमिंजय बोलतो, "आम्ही ऐकत होतो कीं, ह्या झाडावर एक प्रेत टांगलेले आहे. ते त्या झाडाचे संरक्षण करत असते. आम्ही कधी खेळण्यासाठी येथवर येत असू. परंतु मी राजपुत्र असल्यामुळे क्षत्रिय शास्त्रानुसार मी ह्या झाडाला कधी स्पर्श केला नव्हता. तू मला हे अशुभ काम करावयाला लावत आहेस"? बृहन्नला त्याला सांगते, "तू कांहीं काळजी करू नकोस, तेथे तसे कांहीं नाही. फक्त कांहीं शस्त्र आहेत ती आपल्याला उतरवायची आहेत. आता तेथे कोणतेही प्रेत राहिलेले नाही. अरे मत्स्य देशाच्या भावी राजा, मी तुला असें कांहीही करावयाला सांगणार नाही ज्यामुळें तुझे पावित्र्य ढळेल".

ते ऐकल्यावर भूमिंजय रथातून उतरतो व झाडावर चढण्यास सुरूवात करतो. बृहन्नला बोलते, "लवकर चढ, आपल्याला फार वेळ नाही. वर गेल्यावर तेथे झाकलेली शस्त्रं तुला दिसतील. ते झाकण काढून त्यातील सर्वात मोठे धनुष्य उचलून तू खाली सोडशिल. ते मी खाली धरेन. त्या बरोबर दोन भाते आहेत त्या मोठ्या धनुष्याला लागून ठेवलेली आहेत. ते दोन भातेसुद्धा खाली सोड. अशारितीने बृहन्नला त्याचा सांगत असते. तो त्या प्रमाणें करत असतो. भूमिंजय ती पहातो, ती सूर्यासारखी चमकत होती. त्याला त्याचा अचंबा वाचत होता. त्यांना हात लावल्यावर तो विराटाचा मुलगा घाबरला व त्याच्या अंगावर कांटा उभा राहिला. तो मत्स्य देशाचा राजपुत्र अर्जुनाला बोलतो.

अशारितीने गो हरण पर्व, विराट पर्वाचा एकेचाळीसावा भाग संपला.

# गो हरण पर्व
## भाग बेचाळीसावा

भूमिंजय बोलतो. "ही शस्त्र कोण्या शूर योद्ध्याची आहेत? त्यावर शंभर सोनेरी गुच्छ बसवलेले आहेत. आणि ते इतके तेजस्वी आहेत? त्यावर हत्तीच्या मुद्रा बसवलेल्या आहेत. जे धरायला चांगले आहेत. त्यावर साठ इंद्रगोप बसवलेल आहेत. हे असे धनुष्य कोणाचे आहे? त्यावर बसवलेले सूर्याचे चिन्ह किती चमकते पहा. हा कोणाचा आहे ते सांगा. त्यावर रत्न जडवलेली आहेत. हे दोन भाते जे सोन्याचे आहेत ते कोणाचे आहेत? हे बाण किती लांब आहेत, ते कोणाचे आहेत? त्या बाणांना गिधाडाच्या पंखा सारखे पिवळे पंख बसवलेले आहेत. त्याची टोक किती धारदार आहेत पहा. आणि हे सगळे लोखंडाचे बनवलेले आहेत. हे सात हजार बाण कोणाचे आहेत"? ते जर लागले तर शत्रू निश्चितच मरून जाईल. हे चंद्रासारखे दिसणारे बाण कोणाचे आहेत, त्यांना पोपटाच्या पंखासारखे सोनेरी पंख लावलेले आहेत. तेसुद्धा पोलादाचे आहेत. ही तलवार पहा. किती सुंदर दिसते. त्याच्या मुठीवर बेडकाचे चिन्ह कां आहे? ही वाघाच्या चामड्याची चिलखत कोणाची आहेत? ह्या धारदार समशेरी कोणाच्या आहेत"? ह्या चिलखतावर सुंदरशा छोट्या घंटा कां बसवलेल्या आहेत. हे खड्ग किती धारदार आहे पहा. कोणत्या देशातून ही सगळी शस्त्र आली आहेत? ती निशाधांच्या देशांत बनली आहेत कां"? ही सुंदर तलवार कोणाची? ह्या तलवारीला गाईच्या कातड्याची म्यान आहे, किती सुंदर दिसते. ह्या इतर तलवारी बोकडाच्या कातड्याच्या आहेत, त्यासुद्धा किती सुंदर दिसत आहेत. हे सगळे शस्त्र कोणाची आहेत व येथे कां ठेवली आहेत? ही तीस बोटा एवढी लांब समशेर कोणाची"? त्यांची धार पहा किती आहे व हे सगळे वापरले गेलेले आहेत हे त्यांच्या मुठीवरील लकाकीने स्पष्ट होते आहे. त्याने जर वार केला तर तो माणूस जगण्याची शक्यता नाही. अशा आयुध असतील तर शत्रूचा नाश निश्चित होणार. अहो बृहन्नला मला सांगा

असें शस्त्र येथे कोणी व कां लपवून ठेवले आहेत आणि आपल्याला ते सगळे कसे समजले" ?

अशारितीने गो हरण पर्व, विराट पर्वाचा बेचाळीसावा भाग संपला.

## गो हरण पर्व

## भाग त्रेचाळीसावा

बृहन्नला सांगते भूमिंजयाला, जे पहिले धनुष्य तू पाहिलेस ते अर्जुनाचे आहे. त्यांलाच गांडीव म्हणतात. त्याच्या मदतीने असंख्य शत्रूंचा विनाश केला जातो.ते एक हजार धनुष्यांइतके बलवान आहे. त्याच्या मदतीने अर्जुनाने अनेक राज्ये काबिज केली आहेत. पार्थाने देव आणि पृथ्वीवरील अशा सगळ्यांना त्याने ह्याच्या मदतीने पराजित केले आहे. त्याचे कौतुक देव आणि दानव दोघेही करत असतात. हे दुसरे धनुष्य तू पाहिलेस ते शिवाचे आहे. त्याला पिनाक म्हणतात. त्याच्यावर असंख्य रंग आहेत. ते धनुष्य शिवाने एक हजार वर्षे धारण केले होते. त्यानंतर ते ब्रह्माने तेच धनुष्य पांचशे तीन वर्षे धारण केले होते. त्यानंतर ते इंद्राने पांचशे वर्षे धारण केले होते, त्यानंतर ते वरुणदेवाकडे गेले. त्याने ते चारशे वर्षे धारण केले होते. त्यांने ते मला दिले, मी ते पांच ते सहा वर्षे ठेवले आहे. त्याचे धारण करण्यामुळे मला श्र्वेतवाहन असेसुद्धा म्हणतात. हे सर्वात जास्त शक्तीमान धनुष्य आहे. त्याची पुजा करतात देव आणि दानव. तेसुद्धा पार्थाला वरुणदेवाकडून मिळाले. हे दुसरे धनुष्य भिमाचे आहे. हे इंद्रगोप असलेले माझ्या मोठ्या भावाचे, युधिष्ठीराचे आहे. ते सूर्याचे चिन्ह असलेले चमकणारे नकूलाचे आहे. हे सोनेरी चमक असलेले धनुष्य माझा धाकटा भाऊ सहदेवाचे आहे. त्यावर सोन्यात नक्षिकाम केलेले आहे. हे धनुष्य व त्याचे बाण जे शत्रूवर फेकले कीं त्याचा नाश करूनच परत मागे येतात. ते सगळे भिमाचे आहेत. हा भाता ज्यावर पांच वाघांच्या मुद्रा आहेत, ज्याचा रंग पिवळा आहे, ते नकुलाचे आहेत. मांद्रीच्या मुलाचे ते दुसरे भाते आहेत, जेव्हां तो राजसूय यज्ञाच्या वेळी पश्र्चिमे कडे मोहीम घेऊन गेला होता. हे चमकणारे बाण ज्यांच्यावर विविध रंगाचे काम केले आहे ते सहदेवाचे आहेत. हे छोटे परंतु

धारदार बाण युधिष्ठीराचे आहेत. ही लांब पात्याची धारदार तलवार अर्जुनाची आहे. त्याचे म्यान वाघाच्या चामड्याची आहे व जिच्या मुठीवर बेडकांची मुद्रा काढलेली आहे. त्या तलवारीने अर्जुनाने अनेकांना यमाकडे पाठवले आहे. ही दुसरी तलवार ज्याला दुधारी पाते आहे ती भिमाची आहे. ही सोन्याची मुठ असलेली, तलवार न्याय प्रेमी युधिष्ठीराची आहे. ही बोकडाच्या कातड्याचे म्यान असलेली समशेर नकुलाची आहे. आणि हे भलेमोठे खड्ग सहदेवाचे आहे.

अशारितीने गो हरण पर्व, विराट पर्वाचा त्रेचाळीसावा भाग संपला.

# गो हरण पर्व
## भाग चव्वेचाळीसावा

भूमिंजय विचारतो, "ही सुंदर तेजस्वी आयुध पार्थाची आहेत. परंतु, ते कोठे आहेत? ते सगळे कोठे गेले ते कोणालाही माहीत नाही असें सगळे बोलतात. त्यात ते सगळे म्हणजे मोठा युधिष्ठीर, त्यानंतरचा भिम, अर्जुन, व नकुल आणि  सहदेव कोठे गेले ते कोणालाही माहीत नाही असे सगळे सांगतात. द्युतात त्यांचा भाऊ हरला व त्यानंतर ते परागंदा झाले असेंच सगळे बोलतात. जे अशा हत्त्यारानी शत्रूचा नाश करत होते तेंच गायब झाले आहेत व त्यांची शस्त्र येथे आहेत हे कसें"? असे सांगतात, त्यांची रुपवती पत्नी त्यांच्यान बरोबर गेली तीसुद्धा गायब झाली आहे. सगळळ्यांना फार वाईट वाटत असते. कारण ते खूप चांगले राजे होते असें माझे बाबा आम्हाला नेहमी सांगतात".

ते ऐकल्यावर बृहन्नला त्याला सांगते ऐक राजपुत्रा मी सांगतो ते कोठे आहेत तुला. हे पहा मी अर्जुन आहे, तुझ्या बाबांच्या बरोबर जे ब्राह्मण कंक बसतात ते आमचे मोठे बंधू युधिष्ठीर आहेत, तुझ्या आईची सैरंध्री ही खरेतर द्रोपदी आहे, तिच्या मागे किचक लागला म्हणून तो मारला गेला. तुमचा स्वयंपाकी वल्लभ हा खरा भिम आहे, तुमच्या घोड्यांची निगा पहाणारा नकुल आहे व पशुंची काळजी घेणारा सहदेव आहे. आम्ही सगळे तुमच्या कडेच लपून रहात आहोत.

ते ऐकल्यावर भूमिंजय बोलतो, "मी तुझ्या बोलण्यावर विश्र्वास कसा ठेवणार, त्यासाठी तू मला तुझी दहा नांव कोणती व ती तशी कां आहेत ते सांगावे लागेल".

अर्जुन त्याला सांगतो, "विराटाच्या युवराजा, तुला मी माझी सगळी नांव व त्यांचा अर्थ सांगतो. प्रथम माझी नांव ऐक, अर्जुन, फाल्गुनी, जिश्नु, किर्ती, श्र्वेतवाहन, विभत्सु, विजय, कृष्ण, सव्यसाची, धनंजय अशी ती माझी दहा नांव आहेत".
भूमिंजय विचारतो, "अर्जुन व कृष्ण अशी विविध नांव कां तुला आहेत"?
अर्जुन सांगतो, "ते मला धनंजय बोलतात कारण जेथे मी तेथे धन असते. मी सगळ्या राज्यांचा पराभव करून त्यांचे सगळे धन मिळवले होते. ते माला विजय बोलतात कारण मी जेव्हा लढण्या जातो नेहमी जिंकूनच येतो. मला श्र्वेतवाहन बोलतात कारण माझ्या रथाला नेहमी शुभ्र रंगाचे घोडे लावलेले असतात. ते मला फाल्गुनी म्हणतात कारण मशा जन्म फाल्गुन महिन्यातला उत्तरा फाल्गुन नक्षत्राच्या उदय काळात झाला आहे. मला किर्ती म्हणतात कारण, दानवांशी मी लढलो तेव्हां इंद्राने माझ्या शिरावर तो मुकूट घातला होता. मला विभत्सु म्हणतात कारण, मी देवांशी व माणसांशी लढतांना कधीही कोठलेही गैर वर्तन केलेले नाही. अरे भूमिंजया मी माझ्या दोनही हातांनी आयुध चालवू शकतो म्हणून मला सव्यसाची असें म्हणतात. मला अर्जुन म्हणतात कारण माझ्या शरीराचा रंग त्या प्रकारचा आहे. तसेंच माझे वर्तन शुद्ध आहे. माणसात मी स्वर्गीय आहे म्हणून मला जिश्नु म्हणतात. तसेंच मी कधी पराजित होत नाही व माझ्या प्रतिस्पर्ध्यांना मी चोख उत्तर देत असतो. मला कृष्ण सुद्धा म्हणतात कारण, माझ्या पित्याने मला त्या रंगावरून ते नांव दिले. अशा रितीने मला ही दहा नांवं मिळाली आहेत".
वैशंपायन पुढे सांगतात, विराटाचा मुलगा अर्जुनाला सांगतो, "माझे नांव भूमिंजय आहे व त्याच पर्माणे मला उत्तर असेसुद्धा अक नांव आहे जे माझ्या धाकट्या बहिणीच्या उत्तरा नांवाशी जुळते. हे माझे भाग्य आहे कीं, मी आपल्याला भेटत आहे. आपले आमच्या कडे नेहमीच स्वागत असो. अहे धनंजय, आपल्या सारख्या सामर्थ्यवान माणसांने मला माफ करावे जर मी काही चुकीचा वागलो व बोललो असेन. आता आपल्याला मी चांगलाच

ओळखत असल्याने माझी भिती फार निघून गेली आहे. मी आपल्या सहवासाची अपेक्षा करत आहे.
अशारितीने गो हरण पर्व, विराट पर्वाचा चव्वेचाळीसावा भाग संपला.

## गो हरण पर्व
## भाग पंचेचाळीसावा

भूमिंजय पुढे बोलतो, "अहो महाबली मला सांगा मी आपला सारथी होतो व मला सांगा शत्रूच्या कोणत्या फळीमध्यें आपला रथ मी घालू? त्याप्रमाणे मी करेन". अर्जुन त्याला सांगतो, "मला संतोष होत आहे कीं, तुझी भिती नाहीशी झाली आहे. तू मोठा पराक्रम करणार आहेस तुझ्या शत्रूंचा पराभव करून. मी तुला तुझ्या शत्रूंना हरवण्यात मदत करणार आहे. आता लवकर ते भाते माझ्या रथाला बांध. त्यातील ती सोन्याची मुठ असलेली धारदार तलवार घे.
वैशंपायन पुढे सांगतात, अर्जुनाची ती आज्ञा झाल्या बरहुकूम तो युवराज सगळी भिती फेकून देऊन कामाला लागतो. अर्जुनाची हत्यारं तो रथात आणतो. ते पाहून खूष झालेला अर्जुन त्याला बोलतो, "मी तुझा सगळी जनावरं जी कौरवांनी पळवली आहेत ती तुला मिळवून देईन. असें समज कीं, माझ्या रथाचे छप्पर तुमचा किल्ला आहे. ह्या रथातील वाटा तुझ्या नगराच्या वाटा, रस्ते आहेत, माझे हात तुझ्या नगराचे दरवाजे आहेत, रथाचा मधला खांबा आणि माझे भाते तुझ्या शहराचे संरक्षण कर्ते आहेत, माझा ध्वज

आणि त्यावरील चिन्ह तुझ्या शहराप्रमाणे आहेत असें समज. माझे धनुष्य व त्यातून बाहेर येणारे बाण शत्रूचा पाडाव करणार आहेत. माझ्या रथाच्या चाकांचा आवाज युद्धातील रणवाद्ये आहेत असें समज. मी लढत असतांना आपल्याला कोणीही पराजित करू शकणार नाही. ती तुलना ऐकून भूमिंजय बोलतो, "मला आता कशाचीही भिती वाटत नाही. तुझे शौर्य केशवा सारखे, इंद्रासारखे आहे. मी घाबरले होतो त्याचे मला सरम वाटते. असे घाबरून कसे चालेल एका राज्याच्या युवराजाला? माझ्यासाठी आपण साक्षात महादेव अहात. किन्नराच्या पोषाखात अहात एवढेंच.

अर्जुन त्याला बोलतो, "मी असा फक्त एक वर्ष रहाणार आहे, जे आता संपत आले आहे. तुला मसजणार नाही अशा धार्मिक कारणासाठी मी हे नपुसकाचे सोंग घेतले आहे".

भूमिंजय बोलतो, "आपण माझ्यावर मोठी कृपा केली आहे. नसते संशय घेण्याचे मी सोडून दिले आहे. आपल्या सारखा शूरवीर नपुसक असणे केवळ अशक्य आहे. मी समजतो कीं आता माझ्या बरोबर एक दोस्त राष्ट्र आहे आपल्या रुपाने. मी आपल्या मदतीने देवांनासुद्धा जिंकू शकेन. मला आता कशाचीही भिती राहिलेली नाही. आता मला सांगा मी काय करू ह्यापुढे"? मला आज्ञा करा, एकाद्या तरबेज सारथ्यासारखा मी आता तुमचा रथ चालवणार आहे. मी वासुदेवाच्या सारथी दारुकासारखा रथ चालवून दाखवतो. ह्या आपल्या रथाचे चारही घोडे खास आहेत. त्यांचा वेग उत्तम आहे. त्यांची तुलना मेघपुष्पाशी करता येईल. त्यांचा वेग वलहकाच्या घोड्यांशी तुलना करता येईल असा आहे. आपल्या सारख्या शूरासाठी असा रथ शोभतो.

वैशंपायन बोलतात, अर्जुन त्याच्या दोनही हातात घातलेल्या बांगड्या काढून टाकतो व त्या जागी चिलखत नेसतो. त्याचे काळे कुरळे केस शुभ्र फडक्याने तो मागे बांधतो. रथात तो पूर्व दिशेकडे तोंड करून बसतो. त्यानंतर लढण्या आधीची प्रार्थना तो करू लागतो. त्याच्या आयुधांची तो पुजा मनाने करतो व त्यांच्या देवतांना आवाहन करतो. त्यांना त्याला मदत करण्याचे आवाहन करतो. माझ्या मनात आपण सगळे रहा व मला साथ द्या असें तो त्यांना

सांगतो. ती प्रार्थना केल्यानंतर अर्जुन ताजा झाल्यासारखा वाटतो. त्यानंतर तो गांडीवाला त्याचा दोर बांधतो. त्याचा मोठा टणात्कार तो काढतो. त्या आवाजाने सगळी पृथ्वी थरथरते. जणूकाय अशनी आकाशातून कोसळणार आहेत. सगळे पक्षी कोठेतरी पळून जातात. असा तो आवाज भयंकर होता. त्या आवाजामुळें कौरवांना खात्री होते कीं तो धनंजयच आहे. परंतु, तो त्या एवढ्या सगळ्या जबरदस्त योद्ध्यांबरोबर कसा एकटा लढणार? उत्तर विचारतो. कांहींही झाल तरी मी आपल्या बरोबर रहाणार असें तो सांगतो. ते ऐकून अर्जुनाला त्याचे हसूं येते व तो जोराजोराने हसूं लागतो. धनंजय त्याला बोलतो, कांहीं घाबरण्याचे कारण नाही. घोष यात्रेच्या वेळी मी एकटाच सगळ्या गंधर्वांना तोंड देत होतो. खांडव वनाच्या वेळीसुद्धा मी एकटाच लढत होतो. मला असे एकट्याने लढण्याची सवय आहे. निवात कवचाला मी मारले तेव्हां कोण होते मला मदत करावयाला? पांचालाकडे जेव्हां स्वयंवर झाले तेव्हां सुद्धा मी एकटाच होतो. द्रोणांच्या कडे शिकलो आहे. त्यांनी मला चांगले शिकवून तयार केले आहे. मला त्याशिवाय इंद्र, वैश्रावण, यम असें गुरू लाभलेले आहेत. माझ्याकडे शिवाचे पिनाक आहे. त्या सगळ्यांचे शिक्षण मी स्वर्गात घेतले आहे. मला लढण्यासाठी कोणाच्या मदतीची गरज नसते. आता बिनधास्तपणे रथ रणभूमीत घुसव.

अशारितीने गो हरण पर्व, विराट पर्वाचा पंचेचाळीसावा भाग संपला.

## गो हरण पर्व

## भाग सेहेचाळीसावा

वैशंपायन बोलतात, भूमिंजयाला त्याचा सारथी करून तो पांडव त्या आपट्याच्या झाडाला एक प्रदक्षिणा घालतो. त्याची सिंहाचे चिन्ह असलेला ध्वज काढून तो त्या झाडाखाली ठेवतो. त्यानंतर तो त्याचा ध्वज रथाच्या खांबावर लावतो. त्या ध्वजावर मारुतीचे चिन्ह असते. त्याला सिंहाची शेपटी असते. तसें चिन्ह स्वतः विश्र्वकर्माने दिले होते त्याला. त्यानंतर तो पांडव मारुतीची प्रार्थना करतो व त्याला आवाहन करतो, कीं, तो मारुती रुपी महादेव त्याच्या ध्वजावर बसून त्याला साथ करेल. त्या बरोबर आकाशातून ती अद्वितीय शक्ती त्याच्या रथावरील ध्वजावर येऊन बसते. त्याबरोबर अर्जुन त्या ध्वजाला एक प्रदक्षिणा घालतो व अभिवादन करतो. त्याच्या हाताचे पंजे चामड्याच्या मोजाचे होते जसे सगळे धनुर्धारी घालतात. आता युद्धाला निघण्या आधी तो श्र्वेतवाहन त्याचे शंखू जोराने वाजवतो. त्याच्या आवाजाने

सगळी पृथ्वी दणाणून निघते. तो शंखू ध्वनी झाल्या बरोबर त्या रथाचे घोडे त्यांच्या गुडघ्यांवर बसतात. भूमिंजय त्यामुळें दचकतो. त्याच्या जागी खिळल्यासारखा बसतो. ते पाहून धनंजय स्वतःच घोड्यांच्या लगामी पकडतो व रथाला पुढे नेऊ लागतो. त्यानंतर अर्जुन उत्तराला मिठी मारून सांगतो कीं, "आता लढाई सुरू होणार आहे, तेव्हां असे सारखे सारखे दचकत राहून चालणार नाही, तुला सारथ्य करावयाचे आहे. खर्या क्षत्रियाला शोभेल असे तू वागले पाहिजेस. शत्रूंच्या मध्ये जर तू असा हतबल झालास तर कसे होणार? तू आधी कधी शंखनाद, घोड्यांचे खिंकाळणे, हत्तींचे चित्कार, तुतार्यांचे आवाज ऐकले नाहीस कां? असा एकाद्या सामान्य माणसाप्रमाणें तू आता वागला, तर कसें होईल"?

उत्तरा त्याला सांगतो, "मी ते सगळे ऐकले आहेत पूर्वी, पण आजची वेळ वेगळी आहे. आपल्या शंखनादात कांहीं वेगळेपण मला जाणवले. तुमच्या गांडीवाचा टणत्कार सुद्धा इतर धनुष्या पेक्षा वेगळा आहे. मला हे सगळे नवीन आहे म्हणून कदाचित मी बावरलो असेन. तुमच्या ध्वजातून कांहीं विलक्षण ओरडण्याचे आवाज येत आहेत ते पृथ्वीवरील प्राण्यांचे नाहीत त्यामुळें मी भेदरून गेलो आहे. मला दिशा समजेना मी फार अस्वस्थ झालो आहे. मला असें दिसते कीं, सगळे आकाश तुमच्या ध्वजाने व्यापलेले आहे. मला कांहीं दिसत नाही. तुमच्या गांडीवाच्या टणत्काराने माझे कान बधीर झाले आहेत". अर्जुन त्याला धीर देत सांगतो, "धीराने रथात उभा रहा आणि घोड्यांचे लगाम पकडून ठेव".

वैशंपायन सांगतात, त्या नंतर अर्जुन पुनः एकदा ते शंख वाजवतो. त्या आवाजाने शत्रूंचा थरकाप होतो व मित्रांचा आनंद द्विगुणित होतो असा तो आवाज होता. त्या दिशा भेदणार्या आवाजाने सभोवारचे डोंगर दर्यांतून तो घुमून परत येत होता. अर्जुन त्यांचे ध्वनी पुनः पुन्हा करत होता व त्या द्वारा तो त्याची युद्धाची तयारी करत होता. त्यामुळें भूमिंजय फार घाबरलेला दिसत होता. धनंजय पुनः पुन्हा त्याला धीर देत होता. ते सगळे कौरवांचे लोक दुरून पहात होते.

द्रोण म्हणाले, "ज्या प्रकारचे रथाच्या चाकांचे आवाज येत आहेत, आकाशात धुळीची ढगं उठत आहेत, आणि पृथ्वी थरकापत आहे, हा दुसरा कोणीही नसून साक्षात आपला सव्यसाची असला पाहिजे असें वाटते. पहा आपली शस्त्र कमजोर झाली आहेत. आपले घोडे अस्वस्थ झाले आहेत. आपले अग्नी त्यात सरपण घातले तरी नीटपणे पेटत नाहीत. ही सगळी अशुभ लक्षणं आहेत आपल्यासाठी". आपल्या उजवीकडे घारी व गिधाडं फिरत आहेत, हे कांहीं चांगले लक्षण नाही. कोल्हेसुद्धा ओरडू लागले आहेत, आपल्या डावीकडील भागांतून. ही सगळी मोठ्या संकटाची लक्षणं आहेत. मोठ्या प्रमाणात क्षत्रियांचा संहार होणार अशी ही लक्षणं आहेत. गिधाडं आपल्या वरील आकाशात घिरट्या घालत आहेत ही चांगली लक्षणं नाहीत आपल्यासाठी. पार्थाच्या बाणांपुढे तुमची सेना टिकणार नाही. आपल्या शूरांना लढण्याची इच्छा राहिलेली नाही. विराटाची गुरं पाठवून आपण येथेच थांबावे असे मला वाटते. आपल्या योद्ध्याना पार्थाच्या बाणांना तोंड देण्यासाठी सज्ज रहावयाला सांगा.
अशारितीने गो हरण पर्व, विराट पर्वाचा सेहेचाळीसावा भाग संपला.

## गो हरण पर्व
## भाग सत्तेचाळीसावा

वैशंपायन नंतर सांगतात, राजा दुर्योधन रणभूमीवर भिष्मांना बोलतो, "द्रोण व कृप दोघांनाही खात्री वाटते कीं हा पांडवच आहे. मला व कर्णाला सुद्धा तेच वाटते. पांडवांनी अट मान्य केली होती कीं, जर ते ठरलेल्या काळात सांपडले तर त्यांना पुन्हा वनवासात व अज्ञातवासात जावे लागेल. तरीसुद्धा तो काळ पूर्ण झालेला नसतांना तो अर्जुन लढण्यासाठी पुढे येतो त्यामुळें ते त्यांच्या अटीनुसार पुन्हा वनवासात जाणार कां"? "त्यांचे अशारितीने उघड होण्या

मागील कारण कांहींही असू शकते. त्याने कांहीं फरक पडत नाही. त्यासाठी काळाचे योग्य मोजदाद ब्रह्माला करावे लागेल. जेव्हां इच्छा अपूरी रहाते त्याच्या पूर्ततेसाठी कांहींही कारण सांगण्यात येते. त्याचे अर्थ अनेक काढले जातात. मोठे मोठे नितीशास्त्रीसुद्धा त्यात योग्य निर्णय घेत नाहीत. कारण माणसाचे उद्देश त्या नितीच्या नियमांपेक्षा जास्त महत्वाचे ठरतात. जो तो आपापल्या मतलबानुसार मते मांडतात, एक वर्ष म्हणजे किती त्याची व्याख्यासुद्धा ते बदलत असतात! त्याला आपण कसे जबाबदार रहाणार"?

"आपण येथे त्रिगार्ताला मदत करण्यासाठी आलो. मत्स्याने त्यांच्यावर अनेक अन्याय केले असे आपल्याला सांगितले व म्हणून आपण त्यांना मदत करण्यासाठी येथे आलो आहोत. प्रथम ते विराटाची गुरं पळवणार व त्यानंतर दुसर्या दिवशी आपण पहाटे उरलेली जनावरं पळवावयाची असें ठरलेले आहे. ज्यावेळी विराटाचे लष्कर त्रिगार्ताच्या मागे असेल. कदाचित त्रिगार्ताचे लोक आपल्याकडे येत असतील. किंवा विराटाच्या सैन्याने त्यांना घालवून त्यातील कोणी लढवय्या आता आपल्यावर चाल करून येत आहे. नेमकी काय परिस्थिती आहे ते समजत नाही. हा राजा विराट स्वतः असू शकतो पण वर वर पहाता तो विभत्सु असावा असा आपला केवळ अंदाज आहे. तो कोणी कां असेना, आपल्याला त्याच्याशी लढावे लागणार आहे. कारण तसे आपण त्रिगार्ताच्या राजाला शुशर्मनला वचन दिले आहे".

"मला कळत नाही, आपलें महान योद्धे, भिष्म, द्रोण आणि कृप असें मख्खपणे बसले आहेत कांहीं समज नाही. तूर्त आपल्याला जो येईल त्याच्याशी लढावयाचे आहे हे निश्चित". "जी जनावरं आपण पळवली आहेत त्यांना संरक्षण देण्यासाठी आपल्याला जो कोणी येईल त्याच्याशी मुकाबला करावा लागणार आहे. मग तो अर्जुन असेल नाहीतर साक्षात यम असेल. ह्या घनदाट जंगलातून आपले पाईक सैनिक कसे वाट काढणार ते समजत नाही. ते शत्रूच्या बाणांची शिकार होणार आहेत. आपले घोडदल सुद्धा अशा जंगलात फसू शकते. म्हणून जेवढे करता येईल तेवढे करणे आपल्याला जरूरीचे आहे. आपल्याला माहित आहे, कीं, पांडवांना आपल्याला घाबरवण्याची सवय आहे.

त्यात आपले वडीलधारे त्यांच्या पक्षाचे आहेत. त्यांच्या गोष्टीत न येता आपण आपल्या फौजा सज्ज ठेवल्या पाहिजेत". केवळ घोड्याच्या खिंकाळण्यावरून कोणी अंदाज करत नाहीत. ते नेहमीच खिंकाळतात, वारे नेहमीच वहात असतात, कोल्हेकुई काय तर जंगलात ऐकू येणारच, ढगांचा गडगडाट पावसाळ्यात होणारच, तसे ऐकू आले म्हणून भलते सलते अंदाज मांडण्यात काय अर्थ आहे. पण ते त्यांच्या बाजूचे आहेत व म्हणून ते अशा गोष्टी करत असतात. मुख्य कारण म्हणजे, त्या तिघांना पांडवांशी लढावयाचे नसते, त्यासाठी कांहीं तरी बहाणे शोधत असतात. आपले गुरू निष्पाप आहेत ते दयाळू आहेत परंतु, म्हणून त्यांचा सल्ला अशा संकटाच्या समयी घेणे मूर्खपणाचे ठरेल. आरामशीर काळात त्यांच्या गोष्टी एक करमणूक म्हणून ऐकायला हरकत नाही पण ह्यावेळी नाही. परंतु, जेव्हां ते शत्रूची स्तुती करू लागतात, त्यांच्या बोलण्याकडे लक्ष देणे घातक ठरेल. म्हणून अशा परिस्थितीत त्यांच्या बोलण्याकडे दुर्लक्ष करून आपण आपली फौज युद्धासाठी सज्ज केली पाहिजे. आपल्या रक्षकांना मोक्याच्या जागी तयार रहावयाला सांगा. हे युद्ध आपल्याला जिंकावयाचे आहे.

अशारितीने गो हरण पर्व, विराट पर्वाचा सत्तेचाळीसावा भाग संपला.

## गो हरण पर्व

## भाग अठ्ठेचाळीसावा

दुर्योधनाचे ते ऐकल्यावर त्याला अनुमोदन देण्यासाठी कर्ण बोलतो, "मला दिसते कीं, आपले हे सगळे श्रेष्ठी घाबरल्याचे दाखवत आहेत, बहुतेक करून त्यांना लढण्याची इच्छा नसावी. जो येत आहे तो विराट असेल किंवा अर्जुन

असेल मी त्यांच्याशा लढणार आहे. माझे सोनेरी पंख असलेले बाण त्यांच्या लक्ष्यावर लागणार हे निश्चित. माझे बाण पार्थाला चहोबाजूने घेरणार आहेत. माझ्या धनुष्याचे दोर मोढा आवाज करू शकतातच. विभत्सु माझ्यावर हस्सा करील पण फार जोरदार तो नसेल असा माझा अंदाज आहे. ते कुतीचे पुत्र ब्राह्मण झाले आहेत त्यामुळें ते फार शांत सुद्धा झाले आहेत. त्यामुळें माझे हजारो बाण त्यांना घेरण्यात यशस्वी होतील. अर्जुन तिनही जगात त्याच्या विद्येसाठी ख्यातनाम आहे पण मी कांहीं कमी नाही. माझे गिधाडाच्या पंखाचे बाण अर्जुनाचा वध करतील असें मला वाटते. मी तो माझा उद्देश साध्य करू शकेन असें वाटते. दुर्योधनाला मी दिलेले वचन त्यामुळें पुरे केल्याचे होईल. माझ्या कडून मारलेले सरळ बाण कोणीही अडवू शकत नाही. मला माहीत आहे, तो इंद्राचा वज्र घेऊन आहे तरी माझे आयुध कांहीं कमी नाही. मला माहीत आहे कीं, तो जबरदस्त योद्धा आहे तरी मी त्याला पुरून उरेन. जसें गरूड सर्पाला पकडतो तसे मी त्याला माझ्या बाणांनी घेरून जायबंद करून टाकीन. इतराना भारी जाणारा हा पांडव माझ्या बाणाच्या वर्षावापुढे फार काळ तग धरू शकणार नाही. अनेक गाड्या ज्या माझ्या सांगण्यानुसार जातात त्यांच्या आवाजाने सगळी आकाशं दणाणून जातील. माझे विषारी बाण पार्थाच्या शरीरात घुसून त्याचा अंत करतील ह्यात मला खात्री वाटते. अरे दुर्योधना, तू पहात रहा, मला जमदाग्नीने दिलेली आयुध मी वापरून तुझ्या चुलत भावाचा कसा खत्मा करतो ते. माझ्या भाल्याने मी त्याच्या रथावर बसलेल्या दैवी शक्तीला खाली पाडणार आहे. त्या भयंकर दैवी प्राण्यांच्या चिंचाळ्या तुला ऐकावयाला मिळतील. तो ध्वज खालीकोसळला कीं ते सगळे पळून जातील. अर्जुनाला रथातून खाली पाडून मी तुझ्या हृदयातील काटा कायमचा काढणार आहे. पार्थ खाली कोसळलेला  कौरव आज पहाणार आहेत. कौरवानो तुम्ही ते पशुधन घेऊन जा, परंतु, जर त्याना मी अर्जुनाला कसा मारतो ते पहावयाचे असेल तर ते त्यांच्या रथात बसून मजा पाहू शकतात".

अशारितीने गो हरण पर्व, विराट पर्वाचा अठ्ठेचाळीसावा भाग संपला.

# गो हरण पर्व

## भाग एकोणपन्नासावा

आता अरे जनमेजया कृपाचार्य बोलू लागतात, "अरे राधेया, तुझ्या विकृत मनात फक्त युद्ध असते. तुला गोष्टींचा चांगला अंदाज करता येत नाही हेंच खरे, कोठल्याही गोष्टीचा त्या घडल्यानंतरचा परिणाम तू कधी लक्षात घेतच नाहीस. आपल्या पूर्वजानी जे नियम सांगितले आहेत त्याचे भान तुला नसते. पहिली गोष्ट अशी कीं, युद्ध विघातक असते व ते शक्यतर टाळावयाचे असते. अगदी नाईलाज झाला तरच ते करावयाचे असते. जेव्हां काळ व प्रसंग उचित असतात तेव्हांच फक्त युद्ध उपयोगाचे असते. जेव्हां केव्हां लढत रहावयाचे नसते. म्हणून क्षत्रियांना युद्ध कले बरोबर मुत्सद्देगिरीसुद्धा शिकावयाची असते, ज्याच्या मदतीने युद्ध न करता तो त्याचे उद्देश साध्य करू शकतो. क्षात्रतेजाचे महत्व तेव्हांच असते. उगाचच शौर्य आहे म्हणून लढत रहावयाचे हे निर्बुद्धपणाचे लक्षण मानले गेले आहे. म्हणून आजच्या घडीला पार्थाबरोबर लढणे आपल्या हिताचे नाही हे प्रथम लक्षात घे. पार्थाने कौरवांना गंधर्वांपासून वाचवले होते, अग्नीपासून वाचवले होते ह्या गोष्टी विसरून कौरवांना चालणार नाही. एरवी ते पांडव लढण्याच्या गोष्टी न करता ब्रह्मचर्य पालन करून त्यांचा अध्यात्मिक उद्धार करण्यात त्यांचा समय कारणी लावतात, ते खर्या कुलिन क्षत्रियाचे लक्षण मानले जाते. त्यांने सुभद्रा कृष्णाच्या रथातून नेली पण न लढता तो परत यादवांना भेटला व सगळ्या गोष्टी सुंदर रीत्या घडवून आणल्या, तो रुद्राशी लढला. त्याशिवाय तो मानव असूनही स्वर्गात पांच वर्षे तपस्या करत सगळी दैविक आयुध शिकून आला हे तू लक्षातच घेत नाहीस. तू फक्त दुर्योधनाला खूष करण्यासाठी वाटेल ते बरळत असतोस. त्याने द्रौपदीला जयद्रथाच्या कचाट्यातून आणले पण त्याला नंतर सोडून दिले त्या मागील नैतिकता तू पहात नाहीस. तो सुद्धा त्या कुरु वंशाचा आहे हे सुद्धा तू विसरतोस. अर्जुनाने कितीतरी युद्ध एकट्यानी केली आहेत व त्यात नैतिकता सांभाळली आहे. गंधर्वाचा राजा चित्रसेनाला त्याने हरवले आहे. निवात कवचाचा वध केला आहे. कलखंचाचा वध केला आहे. जे देवांनासुद्धा भारी गेले होते. मला सांग तू अशा किती लढाया एकट्याच्याने केल्या आहेस कीं, तुझी अर्जुनाशी आम्ही तुलना

करावा"? "जेथे इंद्रसुद्धा जिश्नुशी लढण्यास तयार होत नाही तेथे तुझी काय गत. म्हणून तू जरा शुद्धीवर ये व बोल. मला नाही वाटत, तुझ्या ह्या वल्गनानी दुर्योधन तुझ्यावर खूष होईल. कारण त्याला माहीत आहे तुझ्यात व अर्जुनात किती फरक आहे. तुझ्या बाता अशा आहेत की, हत्तीवर बसून डुकराची शिकार करावी. तुझे बोलणे असे आहे कीं, अंगाला तेल, तूप लावून आगीतून जाण्याच्या गोष्टी कराव्यात. अंगाला धोंडा बांधून पाण्यात तरंगण्याचा प्रयत्न करण्या सारखे तुझे बोलणे आहे. अशा वल्गना करण्यात कोणता पुरूषार्थ आहे"? कोणीही पार्थाशी लढण्याच्या गोष्टी करणे केवळ मूर्कपणाचे आहे पण तुझ्या लक्षात ते येत नाही. कौरवांनी त्यांना कपट कारस्थानाने वनवासात धाडले आहे. त्याचा राग त्यांच्यात असणे स्वाभाविक आहे. तशा रागावलेल्या पांडवाशी लढण्याच्या गोष्टी करणे केवळ हास्यास्पद ठरते. ते कौरवांचा संहार करण्याच्या तयारीने आलेले आहेत. ते तू व दुर्योधन समजत नाहीत. आपण अनवधानेने त्याच्या तावडीत सापडत आहोत त्यात आपल्याला मोठा धोका आहे. तरीसुद्धा जर वेळ आली तर आपल्याला त्याच्याशी दोन हात करावे लागणार आहेत पण जितके शक्य तितके ते टाळणे हेंच आपल्या हिताचे आहे. ही लढाई आपली नव्हती, ती शुशर्मनची आहे त्याक आपण उगाचच गुंतत आहोत. युद्ध सुरू झाले तर आपण सगळे लढणार आहोत. परंतु, उगाचच तू त्या युद्धाला स्वताहून सुरूवात करू नकोस. त्या लढाईची तुलना दानव आणि वसवाच्या युद्धा करता येईल".

अशारितीने गो हरण पर्व, विराट पर्वाचा एकोणपन्नासावा भाग संपला.

## गो हरण पर्व
## भाग पन्नासावा

अश्र्वत्थामा नंतर त्याचे मन मोकळे करतो. "पशुधन अजून आपण पळवलेले नाही. ती जनावरं त्यांच्या मालकाच्या क्षेत्रातच आहेत. असें असतांना अरे कर्णा, तू कां फुकटच्या फुशारक्या मारकत आहेस"? खरे योद्धे स्वताची स्तुती स्वताच कधी करत नाहीत. सूर्य चमकतो पण त्याबद्दल कांहीं बोलत नाही. लोक समजतात जे त्यानी समजावे. पृथ्वीसुद्धा किती जणांना जगण्यासाठी मदत करते पण कधी त्या बद्दल बोलत नाही. स्वयंभूने त्यांना नेमले आहे कारण ते त्या योग्यतेचे आहेत. ब्राह्मणांने स्वताचे यज्ञ स्वतः करावयाचे असतात. क्षत्रियाने त्याचे शौर्य स्वतः दाखवावयाचे असते. ब्राह्मणाने कधी दुसर्याचे यज्ञ करावयाचे नसतात व क्षत्रिय दुसर्यासाठी लढणार नाही. शुद्र द्विजांची मदत करतो. जे मांस विकतात ते दुसर्यासाठी प्राण्याना मारू शकतात, त्यातून धन कमवू शकतात, त्यात कांहीं दोष सांगितलेला नाही आपल्या ग्रंथात. पांडवांनी त्यांच्या क्षात्र कर्तृत्वाने एकेकाळी पृथ्वी जिंकली होती त्यात त्यांनी कधीही खोटे काम केलेले नाही. द्युतासारख्या पाप कर्माने त्यांनी ती मिळवलेली नाही. द्युता सारख्या गोष्टी करून धन संपत्ती मिळवणे मांस विकणार्यां सारखे हलके काम ठरते ते त्यांनी कधी केले नाही. ते त्यांच्या क्षात्रधर्मात प्रामाणिक होते व आहेत. तसे तुम्ही नाही. कोणी जुगार खेळावा व कोणी संपत्ती ठेवावी हे सगळे मांस विकणार्यांच्या योग्यतेचे काम आहे".

[ह्या विवेचनात खाटीक हा शुद्रापेक्षा हलका मानलेला आहे]

"त्यांचे धन कुमार्गाने कौरवानी लुटलेले आहे त्यांनी कोणत्या नैतिकतेच्या गोष्टी कराव्यात? कोणता कौरव एका हाती धनंजय, नकुल अथवा सहदेवाला हरवू शकतो ते दाखवा. कौरव खाटकांपेक्षा हलके झाले आहेत व त्यांनी

पांडवाच्या जीवनाबद्दल चुका शोधण्याचा प्रयत्न करावा हे अन्यायकारक आहे असें मी समजतो". त्यांच्या पत्नीला भर सभेत खेचणारे कोणत्या क्षात्रतेजाच्या गोष्टी आज करत आहेत. कौरव लुटेरे आहेत पांडव लुटेरे नाहीत ह्या त्यांच्यातील फरक आपण लक्षात घेतला पाहिजे. आम्ही ब्राह्मण असून कुलिन क्षत्रिय पांडवांच्या विरुद्ध आहोत खाटकांपेक्षा नीच अशा कौरवांसाठी हे मोठे पाप कर्म आम्ही करत आहोत. त्यात मी, माझे तात व कृपाचार्य असें सगळे येतात. आपण इंद्रप्रस्थ जिंकलेले नाही. ते अजूनही नितीशास्त्राप्रमाणे पांडवांचेच आहे. पांडवांच्या चंदनासारख्या पवित्र वृक्षाला ठार मारण्याचा प्रयत्न करणारे त्यांना गुलाम करण्याचा प्रयास करणारे त्यांच्या कर्माचे कोणते समर्थन करत आहेत येथे? आपण कोणत्या युद्धात युधिष्ठीराला, भिमाला हरवले आहे? नीचपणा करण्या व्यतिरीक्त कोणते कर्म आपण कौरव करत आहेत"? फुकटच्या संपत्तीसाठी आपण जे केले ते क्षात्रधर्मात येत नाही. तरी तुम्ही स्वताला कुलिन क्षत्रिय समजण्याचे धाडस करत असता. विदूर काका काय बोलले ते पहा, आठवत असेल तर. ते बोलले होते, क्षुद्र जीसुद्धा त्यांच्या कुवतीनुसार प्रतिस्पर्ध्याला क्षमा करत असतात. पण पांडव त्यांच्या पत्नीचा अपमान माफ करणार नाहीत. तो आला आहे धृतराष्ट्राच्या मुलांना ठार मारण्यासाठी. व ते तो करील असें मला वाटते. कारण आपण सगळे त्यांचे अपराधी आहोत. व त्यांना आपल्याला शिक्षा करण्याचा नितीशास्त्राप्रमाणें हक्क आहे. ज्यांनी गंधर्व, राक्षस असुर असे सगळे मारले त्याला कौरवांच्या सैन्याला ठार करण्यास कितीसा अवधी लागणार आहे? तुमच्या सगळ्यांच्या हिम्मतीपेक्षा त्यांचा राग जास्त बलवान आहे हे लक्षात केव्हां तुमच्या (हे कर्णाला उद्देशून आहे) येणार? त्याच्या कडील दैवी अस्त्र, शस्त्र व मंत्र तू कसा उलटवणार"? शास्त्र सांगते शिष्य मुलासारखा असतो, त्या प्रमाणे अर्जुन माझ्या पित्याला मुलासारखा आहे.

ज्याने तुमच्यासाठी त्यांचे राज्य व संपत्ती हडपली त्याला आता अर्जुनाबरोबर लढावयाला पाठवले पाहिजे. तो शकुनी गांधारचा युवराज. त्याला ते बाण झेलायला सांगा. त्या गांडीवातून मारलेले बाण पर्वतालासुद्धा भेदू शकतात.

मृत्यूदेव आणि वायू, घोड्याचे मुख असलेला अग्नी शत्रूला थोडे ठेवतात परंतु, हा रागावलेला पांडव तसे ठेवणार नाही. संपूर्ण नष्ट करणार हे निश्चित. जर भिष्माने ह्याठिकाणी युद्ध करण्याचे ठरवले तर मी धनंजयाशी लढणार नाही. आपण फक्त मत्स्य देशाच्या राजाशी लढण्याचे बोललो आहोत". अश्र्वत्थामा त्याचे मत सांगतो.

अशारितीने गो हरण पर्व, विराट पर्वाचा पन्नासावा भाग संपला.

## गो हरण पर्व

### भाग एकावन्नावा

भिष्म बोलतात, "द्रोणाचा पुत्र जे बोलला ते सगळे योग्य होते. कृपाचे निरीक्षणसुद्धा उचित होते. कर्णाचे मत केवळ आपल्या लष्कराला दक्ष करण्यासाठी होते असें मी समजतो. तो क्षत्रियाच्या युद्धाबद्दलच्या धोरणासाठी चांगले होते. परंतु, कोणीही माझ्या बद्दल कांहीं सांगितले नाही. माझ्यामते आपण युद्ध केले पाहिजे. काळ व प्रसंग पहाता ते जरूरीचे आहे असें मला वाटते. नुकत्याच त्रासातून बाहेर पडलेल्या व म्हणून संतापलेल्या पांडवांना पाहून कोणीही माणूस घाबरून जाईल. नैतिकते पेक्षा स्वार्थ सगळ्याना जास्त प्यारा असतो. त्याप्रमाणे हे होत असते. ते कांहींही असें आपल्यापुढे जे वाढलेले आहे ते फार गंभीर स्वरुपाचे आहे हेसुद्धा मान्य केले पाहिजे. आपल्याला कुंतीच्या त्या बलाढ्य पुत्राशी लढावयाचे आहे म्हणून प्रथम आपण आपली एकी सांभाळली पाहिजे. भले आपल्यात कितीही मतभेद असले तरी ते ह्यावेळी बाजूला ठेवून लढण्यास तयार होणे हे तूर्त आपले प्रथम कर्तव्य समजून वागावे असें मी सांगतो. द्रोणांनी व कृपानी हे विशेष लक्षात घ्यावे. आपल्यामध्ये सगळ्या युद्ध कलेचे ज्ञान आहे. जसे चंद्रापासून त्याचे सौंदर्य वेगळे करता येत नाही, वेद व ब्रह्म कसे एकरुप असतात तसे ते आहे. वेदाचे ज्ञान आणि क्षत्रिय वृत्ती एकाच ठिकाणी नांदत असलेली आपण कधी पहात नाही. परंतु, तुम्ही दोघे त्याला अपवाद अहात. प्राचीन कथांमधून

जमदाग्नी बद्दल जे सांगतात ते तुम्हाला लागू होते. त्यात ब्रह्मज्ञान व शस्त्रविद्या एकाच ठिकाणी आहेत असें तुम्ही दोघे अहात". त्यानंतर भिष्म अश्र्वत्थामाकडे वळून सांगतात, "अरे द्रोणाचार्याच्या सुपुत्रा, तू कांही काळासाठी दुर्योधनाला क्षमा कर व ह्या चढाईत एकदिलाने सामील हो. आपली एकजूट त्यांना दिसू दे. इंद्राच्या मुलाबरोबर लढण्यासाठी हे जरूरी आहे असें मी समजतो. जर सैन्याच्या नेत्यात एकवाक्यता नसेल तर ते सैन्य कितीही शूर असले तरी ते साधी लढाईसुद्धा जिंकू शकत नाही".
ते भिष्माचे ऐकून अश्र्वत्थामा उठून बोलतो, "ते मला शिकवण्याचे कारण नाही. आपण अर्जुनाच्या गुणांचे फार कौतुक करत असता". ते ऐकून भिष्म रागाने बोलतात, "शत्रूच्यासुद्धा गुणांचे कौतुक झाले पाहिजे कारण कोणत्याही गुणाचे कौतुक झाले कीं त्याचे अनुकरण इतर लोकसुद्धा करतात. त्याच प्रमाणे दोषांचासुद्धा अभ्यास झाला पाहिजे. अगदी मुख्य नेत्याच्या दोषांचासुद्धा अभ्यास झाला पाहिजे".
त्यावर दुर्योधन बोलतो, "आता एवढे पुरे, भिष्म त्याला माफ करतील असें आपण समजू. आता जास्त वेळ न दवडता पुढे काय करावयाचे ते पहाणे अगत्याचे आहे असे माझे मत आहे".
वैशपायन सांगतात, अरे जनमेजया, दुर्योधन कर्ण व कृपाचार्य ह्यांच्या मदतीने भिष्म वद्रोण ह्यांचे मन शांत करतात.
द्रोण बोलतात, "भिष्माचार्यांच्या बोलण्याने माझे समाधान झाले आहे. आता कामाचे बोलायचे तर माझ्या मते अशी व्यवस्था सैन्याची केली पाहिजे कीं, अर्जुन दुर्योधनाला इजा करणार नाही. कारण त्यांचा सगळा राग त्याच्यावर आहे. अर्जुन कालमर्यादा संपण्या आधी उघड झाला आहे कां नाही, ते अजून आपल्याला माहित नाही. तरीसुद्धा तो आपल्याला आपल्या आगाऊ पणाबद्दल माफ करेल असें वाटत नाही. माझ्यामते गांगापुत्राने त्या बाबतीत आपले मत सांगावे कीं, त्यांची अज्ञातवासाची कालमर्यादा पूर्ण झाली आहे कां नाही आणि जर ती पूर्ण झाली असेल तर तो पांडव विशेष धोक्याचा आहे धृतराष्टराच्या मुलासाठी.

अशारितीने गो हरण पर्व, विराट पर्वाचा एकावन्नावा भाग संपला.

## गो हरण पर्व

## भाग बावन्नावा

भिष्म त्यावर सांगतात, "काळाचे चक्र त्याच्या आंसाच्या भोवती फिरत असते. ते कोल, कस्थ, मुहूर्त अशा संज्ञाने आपण पहात असतो. त्याशिवाय आठवडा, पंधरवडा, महीना आणि वर्ष असें विभाग आपण करत असतो. नक्षत्र, राशी ह्यांच्या आकाशातील व्यवस्थेवरून आपण ते ठरवत असतो. त्या मापांच्या अर्धांशांच्यामुळें कारण त्याचे गोळाबेरीज करता येत नाही, असें आढळते कीं, प्रत्येत वर्षी साधारणपणे प्रति पांच पर्षांनी दोन मह्निने वाढत जातात. त्या प्रमाणें मोजमाप केल्यास आजच्या घडीला एकंदर तेरा वर्षापेक्षा पांच महिने व बारा रात्री त्यांचा कालमर्यादा संपून झाले आहेत. म्हणजे त्यांना पुन्हा वनवासात पाठवता येणार नाही. त्याबद्दल विदूरांनी जे कालघट ठेवले आहेत ते पहा म्हणजे मी जे सांगतो ते लक्षात येईल. त्यासाठी अर्जुन योग्य वेळी आपल्याशी लढण्यासाठी येत आहे. ते दिलेले शब्द कधी मोडणार नाहीत, कारण ते युधिष्ठीराच्या आज्ञेनुसार वागत असतात. जर त्यांना नियम मोडावयाचे असते तर ते त्यांनी द्युताच्या खेळाच्या वेळीच केले असते. त्यांनी एक मोठी अग्नी परीक्षा उत्तीर्ण केली आहे. त्यांनी कधीही क्षत्रिय धर्म मोडला

नाही. त्यांना दोष देणारे भविष्यात नष्ट होणार आहेत. जेव्हां वेळ येईल ते शक्रासारखे पराक्रमी वीर त्यांचा हक्क मिळवणार ह्यात शंका नको. आता आपल्याला प्राप्त युद्धात आपल्या प्रतिस्पर्ध्याला हरवण्यासाठी काय करावे ते पहावे लागेल. म्हणून आपण योग्य व्युहरचना करण्यावर भर दिला पाहिजे. नाहीतर आपला शत्रू आपल्याला हरवेल. युद्धात हार व जीत असणारच. त्यात पुण्यमार्गाने जिंकणे पुढील जीवनासाठी आवश्यक असते. जे पापमार्गाने जिंकतात ते नंतरच्या जीवनात (मृत्यूनंतरच्या) फार हालअपेष्टा भोगत रहातात. त्या दृष्टीने युद्धा कडे दूरदृष्टीने पहावयाचे असते. केवळ ताबडतोबीचा फायदा पहावयाचा नसतो, हे युधिष्ठीर चांगले समजतो. त्याच्या आज्ञेत ते सगळे पांडव आहेत. दुर्योधन बोलतो, "अहो आजोबा, म्हणता तर, त्या पांडवांना त्यांचा हिस्सा देऊन टाकू. परंतु, आताच्या लढाईचे काय करावयाचे ते बोला".

भिष्म त्यानंतर बोलतो, "मला जे योग्य वाटते ते सांगतो ते ऐका, मी नेहमी तुझ्या भल्याचेच सांगत असतो, म्हणून तुम्ही कौरव तुमच्या राजधानीकडे निघा. तुमच्या बरोबर सैन्याचा पाव हिस्सा घेऊन जा. दुसरा पाव हिस्सा सैन्य जनावरांना वळवण्याचे काम करतील. उरलेत्या सैन्यानी मी पांडवाना तोंड देईन. मी, द्रोण, कर्ण, कृप, अश्र्वत्थामा विभत्सुला किंवा जो कोणी तो असेल त्याला तोंड देऊ. त्याला आम्ही जनावरं नेणार्या फौजांपासून दूर ठेवू". वैशंपायन सांगत असतात, भिष्माचे ते बोलणे सगळ्यांना पसंत पडते. त्याप्रमाणें कौरव सगळी व्युहरचना करतात. भिष्म सैनिकांची फौज तयार करतो. नंतर द्रोणाला सांगतो, तुम्ही मध्यभागी असा. अश्र्वत्थामा तुमच्या डावीकडे असेल. कृपाचार्य उजवीकडे असतील, राधेय, सुतपुत्र वाटेत थांबेल. मी स्वतः सगळ्या सैन्याच्या मागे राहीन.

अशारितीने गो हरण पर्व, विराट पर्वाचा बावन्नावा भाग संपला.

## गो हरण पर्व

## भाग त्रेपन्नावा

वैशंपायन बोलतात, कौरवांनी त्याप्रमाणे व्युहरचना केल्यानंतर, तेवढ्यात अर्जुन मोठा आवाज करत त्यांच्या जवळ पोहोचतो. कौरव त्याच्या रथाचा आवाज ऐकतात, त्यांना त्याच्या गांडीवाच्या टणत्कारांचा सुद्धा आवाज ऐकू येत असतो. त्याला येतांना द्रोण पहातात व ते त्याच्या रथावरील ध्वज ओळखतात. द्रोण मोठ्याने बोसतात, "अरे हा तर अर्जुनाचा झेंडा आहे. त्यावरील वानराचे चिन्ह व त्यातून येणारे भयंकर घाबरवणारे आवाज त्यांच्या चांगल्याच परिचयाचे असतात. ते पाहिल्यावर कौरवांच्या सौन्यात एकच भितीचे वातावरण निर्माण होते. द्रोण भावुक होऊन त्यांच्या आवडत्या शिष्याचे कौतुक करू लागतात. तेवढ्यात त्यांचे दोन बाण द्रोणांच्या बाजूने जातात, ते पाहून ते सांगतात, "पहा माझ्या शिष्यानी मला पहिली सलामी दिली". "आम्हा सर्वांचा लाडका, पंडुचा मुलगा तुझ्या दर्शनाने मी संतुष्ट झालो आहे". द्रोण त्याचे कौतुक करण्यात दंग होतात.

वैशंपायन सांगत असतात, अर्जुन पहातो कीं, कौरव लढण्यासाठी सज्ज आहेत. ते पाहिल्यावर तो भूमिंजयाला प्रसंगोचित सांगतो तीं, "अहो सारथी, आपला रथ अशा ठिकाणी उभा करावा म्हणजे माझे बाण त्यांच्या पर्यंत पोहोचतील. ते तू करत असतांना मला पहावयाचे आहे तो बदमाश ह्या सैन्यात कोठे लपला आहे. ह्या इतर सगळ्यांकडे दुर्लक्ष करून मी त्याला पहिला गाठू इच्छितो. कारण त्याचा पराजय म्हणजेच ह्या सगळ्यांचा पराजय असें आहे". तेथे द्रोण आहेत, त्यांच्या मागे त्यांचा पुत्र अश्र्वत्थामा आहे, त्यानंतर तो महान धनुर्धारी भिष्म, त्यांच्या बाजूला कृप व नंतर कर्ण मला दिसत आहेत. मला तो त्यांचा राजा कोठे दिसत नाही"? मला वाटते ते जनावरं घेऊन दक्षिणेच्या दिशेने हस्तिनापुरी गेले असावेत. आणि त्यांच्या बरोबर तो त्यांचा बदमाष राजासुद्धा गेला असावा. तू असं कर भूमिंजया, त्या सगळ्या सैन्याला डावलून तू आपला रथ दुर्योधन जेथे असेल त्या ठिकाणी नेऊन ठेव. त्याला प्रथम आपण मारू व त्यानंतर जनावरांचे पाहू.

वैशंपायन सांगत असतात, धनंजयाच्या सांगण्याप्रमाणे, तो त्या रथाला दुर्योधनाच्या ठिकाणी नेतो. ते कृप पहात असतात, त्यांना समजते कीं, अर्जुनाचा उद्देश काय आहे. ते त्यांच्या साथीदारांना बोलतात, "हा विभत्सु दुर्योधनाच्या मागे आहे, जसे मी अपेक्षिले होते. चला आपण त्या अर्जुनाच्या मागे जाऊ, तो काय करतो ते पाहू कारण त्याचा राग फार आहे व त्या अवस्थेत त्याच्याशी जगातील कोणीही लढू शकणार नाही. जर त्याने दुर्योधनालाच मारले तर बाकीच्या गोष्टीत काय अर्थ आहे"? अर्जुन त्या दिशेने जात असतांना बाणांचा प्रचंड वर्षाव कौरवांच्या सैन्यावर करत होता. त्यामुळें त्या सैन्याला कांहीं नवीन हालचाल करता येत नव्हती. त्याच्या बाणाच्या वर्षावाची तुलना टोळ धाडीशी करता येत होती. त्या टोळधाडीमुळें कौरवांचे सैन्य असहाय झाले, त्यांना कांहीच करता येईना. त्यांना कांहीं दिसेना. सगळा आसमंत त्यानी व्यापला होता. ते कौरवांचे सैनिक इतके गोंधळून गेले कीं, त्याना समजेना आता काय करावयाचे. परंतु, पार्थाच्या त्या कौशल्याचे ते मनातल्या मनात कौतुक करत होते. दुर्योधनाच्या नजिक

येत असतांना अर्जुन त्याचा शंख पुन्हा वाजवतो, त्यामुळें तेथे जमलेल्या लोकांच्या अंगावर कांटा उठला. त्या शंखनादाने त्याच्या ध्वजावरील विलक्षण प्राण्यांना ओरडण्याचे स्फुरण येते व तेसुद्धा ओरडू लागतात. त्या कर्णकर्कश आवाजांने तेथे असलेल्या सैनिकांचे कान फुटतात कीं काय असें होते. त्यांच्या औरडण्याने सगळी पृथ्वी थरथरू लागली. त्यामुळें पळणारी जनावरं आपल्या शेपट्या उभारून उलट्या दिशेने धावू लागली. त्यामुळे त्यांना हाकणार्या सैनिकांना समजेना काय करावयाचे.
अशारितीने गो हरण पर्व, विराट पर्वाचा त्रेपन्नावा भाग संपला.

## गो हरण पर्व
## भाग चौपन्नावा

वैशंपायन जनमेजयाला सांगत असतात, केवळ त्या भयंकर आवाजांच्या मदतीने अर्जुन ती विराटाची जनावरं परत फिरवतो. ते साध्य केल्यावर अर्जुन दुर्योधनाकडे वळतो. विराटाची ढोरं मत्स्य देशाकडे जोरांने धावत असल्याचे पाहून कौरवांच्या बाजूचे जाणकार समजतात कीं, धनंजयाने त्याचा मुख्य उद्देश साध्य केला आहे. आता तो दुर्योधनावर चाल करून जाणार हे त्यांना समजते. ते होत असतांना ते एकदम अर्जुनावर चाल करून जातात. अर्जुन ते पहातो व शांतपणे त्याच्या सारथ्यास सांगतो कीं त्यांने रथ वेगांने पुढे चालत ठेवावा. त्यांना आपला पाठलाग करायला लावावयाचे आहे असें धनंजय उत्तराला सांगतो व त्याप्रमाणें तो रथ वेगांनी पुढे जात रहातो. ते पहातात कीं, अर्जुनाशी लढण्याच्या तीव्र इच्छेने प्रेरीत झालेला राधेय त्याचा

रथ वेगांनी अर्जुनाच्या रथाकडे आणत असतो. अर्जुनाचा रथ आता त्या सगळ्या कौरव सेनेच्या मध्ये आलेला असतो. कर्णला मदत करण्यासाठी चित्रसेन, सांग्रामजीत, शत्रूसह, जय वगैरे तेथे वेगांने येतात. दोनही बाजूंनी बाणांचा वर्षाव होत असतो. त्यांच्या युद्धाने ते जंगल पेटले होते. विकर्ण त्याच्या धनुष्याने लांब बाण अर्जुनावर फेकू लागतो. त्या बरोबर अर्जुन त्याच्या रथावर हल्ला करतो व त्याला जमिनीवर खाली पाडतो. तो पडल्यामुळें त्याच्या आजूबाजूलाअललेले सुद्धा खाली कोसळतात. अर्जुन पुढे जातो. विकर्ण पडलेला पाहिल्यावर रागावलेला शत्रूंतप अर्जुनावर हल्ला करतो. अर्जुनाभोवती सगळे जमा धालेले असतात. त्यांच्यात बाणांचे युद्ध जोरात चालू असते. शत्रूंतप व धनंजयात जे युद्ध होते त्यात शत्रूंजप मारला जातो. तो रणभूमीवर कोसळतो. त्या नरवीरांच्या गणधुमाळीत सगळे जंगल हादरून निघत होते. त्यात पार्थाच्या प्रतिकारापुढे त्यांचे कांहीच चालत नव्हते. अनेक वीर धारातीर्थी पडले. पार्थाचे गांडीव मोठ्या वेगांने शत्रूचा नाल करत होते. अर्जुनाचे प्रतिस्पर्धी धडाधड खाली कोसळत होते. संग्रामजीताच्या रथाचे लालरंगाचे घोडे तो मारतो. त्यानंतर त्याचे शीर तो कापून टाकतो. त्याच वेळी विकर्णाच्या मुलांने पार्थावर टोकदार बाणाने मारा केला. अर्जुनाने प्रतिहल्ला केला. जसे गरुड सापावर तुटून पडतो. ते द्वंद्व मोठे प्रेक्षणीय होते. दोघे त्यांच्या विद्येत तरबेज होते. परंतु, अखेरीस अर्जुनापुढे तो टिकत नाही. ती लढाई पहाण्यासाठी कौरव ती पहात राहिले. ते पाहून कर्णाला उत्तेजना होते व तो मध्येच घुसण्याचा प्रयत्न करू लागतो. ते पाहून अर्जुनाला चीड येते. तो त्याचे घोडे, रथ, त्याचा सारथी, ह्यांना अदृष्य पद्धतीने घाबरवून सोडतो. त्याला समजत नाही हे काय होत आहे. त्यामुळें कर्णाला धास्ती वाटू लागते. त्याचा अतिहुशारी करण्याचा इरादा तो सोडून देतो. भिष्माची फौज त्यातील हत्ती, घोडे, रथ ह्यांना अर्जुनाच्या बाणाने उध्वस्त होते. त्यामुळें त्या सैन्यातील लोक मोठमोठ्याने ओरडू लागतात. ते पाहून कर्ण पुन्हा पुढाकार घेऊन पार्तावर चाल करून जातो. त्या बरोबर कौरवांच्या फौजा टाळ्या वाजवून कर्णाचे कौतुक करतात. ते जिंकल्याच्या थाटात शंखनाद, तुतार्या व

नगारे वाजवू लागतात. विकर्णाच्या धनुष्याचा व गांडीवाचा असें आवाज एकमेकांशी जणू चुरस करत होते. जसें गांडीवाच्या आवाजाने आकाशात निनाद होत होते, अर्जुनाच्या ध्वजावरील वानराने त्याची सिंह शेपटी उंच उचलली. कर्णाने सुद्धा मोठा आवाज केला तेव्हां, अर्जुनाने बाणाचा वर्षाव त्याच्यावर करण्यास सुरूवात केली. एकाच वेळी विकर्ण, भिष्म, कृप आणि द्रोण ह्यांनी अर्जुनावर बाणांचा वर्षाव सुरू केला. जसे मुसळधार पाऊस असावा. कर्णाने अर्जुनाच्या घोड्यांवर, सारथ्यावर, आणि ध्वजावर तीक्ष्ण बाण मारावयाला सुरूवात केली. त्यामुळे पार्थाला राग येतो. त्याच्या गांडीवाने तो कर्मावर जोराचा हल्ला करतो. कर्ण त्याला प्रतिकार करतो त्याच्या बाणांनी. त्याबरोबर अर्जुनाच्या अमानवी सिद्धीने तो त्याला थांबवतो. कर्णाच्या अंगावर तो छोटे असंख्य शर असें मारतो कीं त्याचे शरीर त्याने भरून जाते. त्यामुळें कर्माचे शरीर जखमानी भरून जाते. त्याप्रमाणे विकर्णाचा मुलगासुद्धा जखमांनी भरतो. तो युद्धातून निघून जातो.
अशारितीने गोहरण पर्व, विराट पर्वाचा चौपन्नावा भाग संपला.

## गो हरण पर्व

## भाग पंचावन्नावा

वैशंपायन सांगतात, जखमा सहन न झाल्याने कर्ण युद्धभूमी योडून पळून जातो. दुर्योधनाच्या सेनेतील इतर योद्धेसुद्धा एकेक करून पलायन करतात असे दिसते. प्रत्येक वेळी अर्जुना त्यांच्यावर चाल करून जात असें तो ते पाठी सरकून पराभव स्वीकारत असतं, त्यानंतर तो त्यांना त्रास देत नसे व ते नुसते उभे राहून युद्धाची मजा पहात रहात. गांडीवाचे दर्शन घेणे त्या योद्ध्यांना महत्वाचे होते कारण ते इंद्राचे शस्त्र होते. जसे सूर्य त्याच्या

प्रकाशाने सगळी भूमी भरून टाकतो तसें गांडीवातून फेकलेले बाण सगळ्या दिशात भरलेले होते. तेथे असलेल्या प्रत्येक लढवय्याच्या शरीराची चाळणी झाली होती. अर्जुनाला विरोध करणे केवळ अशक्य होते. अर्जुनाचे युद्ध कौशल्य ते पहात होते आणि त्याचे कौतुक करत होते. त्याबरोबर भूमिंजयसुद्धा रथ सारथ्य करण्यात तयार झाला होता. त्याची युद्धा बद्दलची भीती संपली होती. जस जसें शत्रूपक्षाचे लोक मागे हटत होते, भूमिंजयाचा उत्साह वाढत होता. त्या युद्धामुळें ते अरण्य पेटलेले होते. त्या मोडलेल्या रथांच्या पताका हवेत भिरभित होत्या जसें पतंग वार्यावर भरकटत असतात. रथातून मोकळे झालेले घोडे इकडे तिकडे पळून जात होते. कोणाचा पायपोस कोणाच्या पायात अशी गत कौरवांची झाली होती. मरून पडलेल्यात माणसांबरोबर हत्ती, घोडे, खेचरं असे सगळे जे युद्धात सामील होते त्यांची प्रेते विखरून पडलेली होती. पार्थाच्या शस्त्रांपुढे कोणाचेही कांहीं थरत नव्हते. सगळे शत्रू मारले जात होते. अर्जुनाच्या कौशल्या बरोबर त्याच्या ध्वजावर असलेले भयंकर दैवी प्राणी व त्याच्या किंचाळ्या आणि त्यांचे सर्वदूर फिरणे अशा सगळ्या गोष्टी त्या युद्धात काम करत असल्याचे जाणवत होते. ते भयंकर दैवी प्राणी त्या ध्वजातून बाहेर येत आणि चौफेर फिरत तेथील सैनिकांच्या अंगावर जात आणि त्यांना चावत व पुन्हा ध्वजात निघून जात, त्यामुळें कौरवांचे सैन्य लढू शकत नव्हते. पुन्हा ते अतिमानवी असल्यामुळें त्यांचा प्रतिकार करणे केवळ अशक्य होते. दुर्योधनाच्या सैन्यात एक विचित्रप्रकारची घबराट पसरली होती. अर्जुनाला पहाताच ते योद्धे गारद होत होते. त्यामुळें लढाई धनंजयासाठी सोपी झाली होती. अर्जुन केवळ समोरील बाजूशी लढत नव्हता, तो पाठीमागच्या शत्रूवरसुद्धा मारा करत होता. तेथे असलेल्या सगळ्यांच्या अंगात अर्जुनाचे लहान मोठे बाण घुसले होते. त्या बांणांच्या माराने कित्येक यमाला प्यारे झाले होते. हजार फणे असलेल्या वासुकी सारखा तो कौरवाच्या सैन्यात मुसंडी मारत होता. अर्जुनाचे निशाण पक्के होते. त्याचा नेम चुकत नव्हता. ते युद्ध पाहून वाटत होते, साक्षात इंद्र लढत आहे. ते युद्ध स्वर्गातील देव ऋषी पहात होते. स्वर्गातून आल्यानंतर

प्रथमच धनंजय तेथे शिकलेल्या विद्येचा उपयोग करत असल्यामुळें त्या छोट्याशा युद्धात तो किती उत्तमरित्या त्या विद्या शिकला आहे ते अजमावले जात होते. अर्जुनालासुद्धा तो नवीन अनुभव होता. त्याच्या नविन कौशल्याची ती परीक्षा होती व त्यात तो उत्तमरित्या उत्तीर्ण झाला होता. शेतकरी पिकाची कापणी करतो तशी तेथे माणसांची कापणी झालेली होती. अर्जुनाच्या शत्रूंच्या रक्ताने ती भूमी लालकाळी झाली होती. आकाशात उडालेल्य रक्तरंजित धुळीमुळें तो परिसर तांबूस झाला होता. त्याचे तेथे भेटलेले शत्रू कांहीं कमी नव्हते. परंतु, त्याच्यापुढे ते कमी छरले होते.

पुढे द्रोणावर अर्जुन त्र्याहत्तर बाण फेकतो. दहा दुःशासनावर, आठ अश्र्वत्थामावर, त्यांनतर भिष्मावर एक बाण तो मारतो. दुर्योधनावर शंभर बाण मारतो. त्यानंतर कर्णाच्या कारात एक बाण तो मारतो. कर्णाची ती अवस्था पाहून त्याचे सैन्य युद्धभूमी सोडून निघून जाते. शत्रूचे सैन्य पळून जात आहे ते पाहून भूमिंजय पार्थाला विचारतो, "अहो पार्थ, आता सांगा आपण कोणत्या फौजेकडे जायचे"? आपण सांगाल त्या दिशेने मी रथ घेऊन जाईन. अर्जुन त्याला सांगतो, "तो पहा शुभलक्षणी योद्धा तेथे त्याच्या रथात उभा आहे, ज्याचे घोडे लाल रंगाचे आहेत, ज्याच्या अगावर वाघाच्या चामड्याचे चिलखत आहे, ज्याच्या रथावर नीळा झेंडा आहे. ते माझे शिक्षक कृपाचार्य, त्यांच्याकडे जाऊ. त्यांना माझी धनुर्धारी विद्येतील चपळाई दाखववायाची आहे. त्या बाजूला जे आहेत ते माझे गुरू आहेत ह्या विद्येतील, द्रोण, ज्यांच्या रथावर कलशाचे चिन्ह आहे. त्यांनासुद्धा मला भेटावयाचे आहे. मी त्या दोघांचा फार आदर करतो. त्यांच्या रथाला आपल्याला प्रदक्षिणा घालावयाच्या आहेत. त्यांच्या रथाला प्रदक्षिणा करतांना उत्तरा आपण आपले डोके त्यांच्याकडे लवून ठेवले पाहिजे. गुरूला शिक्षकाला नेहमी सलाम करावयाचा असतो. जर द्रोणांनी माझ्यावर बाण मारला तर मी मारणार नाहीतर नाही. ते काय करतात ते पहावयाचे आहे. द्रोणांच्या बाजूला जो आहे त्याच्या पताकेवर धनुष्याचे चिन्ह आहे तो अश्र्वत्थामा, माझा गुरूबंधू. मला त्याच्या बद्दल फार आदर आहे. आपण त्यांना भेटत भेटत जावयाचे आहे.

तेथे पहा तो योद्धा, ज्याच्या अगावर सोन्याचे चिलखत आहे, ज्याच्या भोवती सैन्य उभे आहे, ज्याच्या रथावरील ध्वजावर गज चिन्ह आहे तो आमचा खरा शत्रू व चुलत भाऊ, दुर्योधन आहे. आमच्या काकांचा, धृतराष्ट्राचा चिरंजीव. त्यापुढे जो आहे तो द्रोणांचा परम शिष्य कर्ण, ज्याच्या धनुर्विद्येतील चपळाईची कोणीही बरोबरी करू शकत नाही. त्याच्या पासून सावध रहावयाचे कारण तो मला नेहमी आव्हान देतो परंतु, अजून पर्यंत कधी मला हरवू शकलेला नाही. तो पहा थोर योद्धा, ज्याच्या झेंड्यावर सूर्य मध्यभागी व त्याच्या भोवती पांच तारे असें चिन्ह आहे, ज्याच्या हातात भलेमोठे धनुष्य आहे, ज्याच्या अंगावर सोनेरी रंगाचे चिलखत आहे, ज्याच्या भोवती मोठे सैन्य उभे आहे, ज्याच्या शिरावर शुभ्र छत्री आहे, ज्याच्या डोक्यावर सोनेरी शिरस्राण आहे. जे सूर्याच्या प्रकाशात चमकत आहे. ते आमचे आजोबा, भिष्माचार्य आहेत त्यांना मी फार भितो लहानपणापासून. त्यांच्या पुढे आम्ही पांडव कधी उभे रहात नाही. तो आमच्या पितरांचे, शंतनुचे पुत्र आहेत. ते दुर्योधनाबद्दल विशेष पक्षपाती असतात. त्याला आपण शेवटी पाहू कारण, ते मला धोका करू शकतात. म्हणून त्यांच्याशी जर लढत झाली तर तुला विशेष दक्ष रहावयाचे आहे". ते ऐकल्यावर विराटाचा मुलगा त्यांचा रथ प्रथम कृपाचार्यांच्या जवळ नेतो. कोण प्रथम हल्ला करतो ते पहावयाचे असते, अर्थात, अर्जुन प्रथम हल्ला करणार नाही हे ठरलेले असते.

अशारितीने गो हरण पर्व, विराट पर्वाचा पंचावन्नावा भाग सपला.

## भाग छप्पन्नावा

वैशंपायन पुढे सांगतात, कौरवांचे सैन्य जशी काळी  ढगं हळू सरकतात तसे युद्धभूमीवरून निघून जात होते. त्यामध्ये घोडदळ, पायदळ असें सगळे होते. त्याशिवाय प्रचंड आकाराचे हत्ती सुद्धा त्या भागातून दूर नेले जात होते. म्हणजे कौरवांचेसैन्य हटत होते, अशावेळी अरे जनमेजया, आकाशातून एका सुंदर रथात बसून साक्षात शक्र यत होते, त्यांच्या सानिध्यात स्वर्गीय ऋषी होते. वसु, मरुत, यक्ष असें बरेच खाली पृथ्वीवर उतरत होते. त्यांच्या जोडीला येत होते, गंधर्व, नाग, आणि बरेच देव सुद्धा होते. ढगं नसलेल्या आकाशात जसे नक्षत्र पसरलेली दिसतात तशी ती सगळी दिसत होती. ते त्यांच्या रथातून आलेले होते. त्यांना पहावयाचे होते कीं, पृथ्वीवर माणसांच्या लढाईत त्यांची आयुध किती कार्यक्षम ठरतात. त्यांना भिष्म आणि धनंजयांच्या द्वंद्वाचा अनुभव घ्यावयाचा होता. इंद्राचा रथ ज्याचे छत सोन्याच्या हजारो खांबावर बसवलेले होते व त्यांत अनेक रत्न, माणिक हिरे बसवलेले होते. तो रथ त्या आकाशात स्पष्ट दिसत होता. त्यांच्या भोवती तेहतीस प्रकारचे देव उभे होते त्यात अग्रणी होते इंद्र. त्याशिवाय असंख्य यक्ष, राक्षस, नाग आणि पितर त्यांच्या बरोबर आलेले दिसत होते. त्याशिवाय राजर्षी जसें, वसुमन, वलाख्य, सुप्रतर्दन, अष्टक, सिवी, ययाति, नहुष, गय, मनु, पुरू, रघू, भानू, कृष्व, सागर आणि नल होते. त्या बरोबर सूर्या प्रमाणे कमकणारा अग्नीदेवाचा रथ होता. इसा व सोम सुद्धा होते. वरुण, प्रजापति, धात्र आणि विधात्र होते. कुबेर, यम, अलम्वुष, उग्रसेन होते. गंधर्वात तुंब्रू, सिद्ध, साधू, संत होते. ते सगळे अर्जुनाचे कौतुक पहाण्यासाठी आले होते. त्यांच्या गळ्यातील स्वर्गीय फुलांचा सुगंध सगळीकडे दरवळत होता. त्यांच्या रंगीबेरंगी छत्र्या, चामर, दिसत होत्या, ते सगळे जनमेजया फारच सुंदर वाटत होते. स्वर्गीय प्रकाशाने सरळा आसमंत उजळून गेला होता. सगळीकडे प्रसंन्नता वाटत होती. त्या सगळ्या जामानिम्यात इंद्र उठून दिसत होता. इंद्र त्याचा मुलाकडे एकटक पहात होता. परंतु, त्यानी त्याचे समाधान होत नव्हते असें दिसत होते.

अशारितीने गो हरण पर्व, विराट पर्वांचा छप्पन्नावा भाग संपला.

## गो हरण पर्व

## भाग सत्तावन्नावा

वैशंपायन बोलतात, ते सगळे त्या अदृष्य जगात होत होते व पृथ्वीवरील नेहमीच्या दृष्य जगात काय होत होते ते सांगतो. कौरवांचे प्रचंड सैन्य पाहून पार्थ विराटाच्या पुत्रास बोलतो, "आता तू आपला रथ जेथे कृपाचार्य आहेत त्या जागी ने. त्याच्या ध्वजावर सोनेरी वेदीचे चिन्ह आहे".

वैशंपायन पुढे सांगतात, धनंजयाची ती आज्ञा ऐकल्यावर तो मत्स्य देशाचा राजपुत्र त्याच्या रथाचे चंदेरी रंगाचे घोडे ज्यांच्यावर सोनेरी झालर नेसवलेली होती, त्या दिशेने हाकतो. उत्तर कुरु सैन्याच्या त्या भागात येतो. त्यासाठी त्याच्या सारथ्याची परीक्षा होत असते. कारण ते भाग रथ हाकण्याच्या दृष्टीने अवघड होता. तरी तो त्याचे सारथ्य कौसळ्य पणाला लावून अर्जुनाने सांगितलेल्या जागी रथ आणून ठेवतो. आता ते दोन रथ एक कृपांचा व दुसरा अर्जुनाचा समोरा समोर उभे असतात. अर्जुन त्याचा प्रभावी शंख देवदत्त जोरांने फुंकतो. त्याच्या मोठ्या आवाजाने सगळ्या दिशा दणाणून निघतात. ते ऐकल्यावर कौरवांचे सैन्य त्याची तारीफ करण्याच्या उद्देशांने टाळ्या वाजवतात. तो शंखनाद म्हणजे अर्जुनाने कृपाचार्यांना एका प्रकारे आव्हान दिले होते. त्यामुळे शांतपणे बसलेले कृपाचार्य चिडतात. त्यांना ते आव्हान आवडत नाही. त्याची तशी अपेक्षा नव्हती धनंजया कडून. कृपाचार्य त्यांचे धनुष्य उगारतात. त्यानंतर अर्जुनाला प्रत्युत्तर म्हणून तो त्यांचे शंख वाजवतात. जणू त्यांना ते आव्हान स्वीकारले आहे. त्यांच्या शंखनादाने पुन्हा एकदा चारही दिशा दणाणून निघतात. कृपाच्या शंखनादा बरोबर अर्जुन दोन बाण मारतो कीं, कृपाचे घोडे दचकून मागे फिरतात. त्या अचानक होणार्या धसक्याने कृपाचार्य त्याच्या रथात कोसळता. कृपांबद्दल असलेल्या आदर भावामुळें तो पांडव बाण मारण्याचे थांबवतो. परंतु, योग्य संधी मिळतांच कृपाचार्य अर्जुनावर दहा बाण फेकतो. ते पहाताच अर्जुन कृपाचार्यांच्या धनुष्याला मोडून टाकतो. कृपाचार्यांना तो जायबंद करतो पण जखमा करत

नाही. कृप त्याचा दुसरे धनुष्य काढतो पण तेसुद्धा धनंजय मोडून टाकतो. कृप आणखीन एक धनुष्य काढतो तर तेसुद्धा अर्जुन मोडून टाकतो. अशारितीने कृपाची सगळी आयुध तो निष्प्रभ करून टाकत असतो. परंतु, कृपाच्या शरीराला इजा करत नाही. सगळी धनुष्यं संपल्यावर कृपाचार्य भाला काढतात. तो सोन्याचे वर्ख असलेला भाला अर्जुन एका फडक्यात तोडून टाकतो. त्यानंतर कृप आणखीन एक छोटा तिरकमटा काढतो व त्याने छोटे शलाक अर्जुनावर फेकू लागतो. कृपाचार्य दबत नाही ते पाहिल्यावर अर्जुन कांहीं अग्नीबाण त्याच्यावर फेकतो. त्यातील एका मुळें कृपाच्या रथाचा घोडे धरणारा दांडा मोडला जातो. त्यानंतर चार बाणांने तो कृपाच्या चारही घोड्यांना यमाकडे पाठवतो व पांचव्या बाणांने त्याच्या सारथ्याला पोहोचवतो. कृपाची दैना होते. त्याचा ध्वजसुद्धा खाली पाडला जातो. शेवटी मिस्किलपणे हसत तो कृपाच्या छातीत एक बाण फेकतो. तरी कृपाचार्य हार मानत नाहीत. ते गदा घेऊन अर्जुनापुढे उभे रहातात. तो ती गदा जिश्नुच्या दिशेने फेकतो. अर्जुन त्या गदेवर असें बाण मारतो कीं, ती गदा उलट त्याच्याच अंगावर परत जाते. ते पाहिल्यावर कृपाच्या फौजेतील योद्धे अर्जुनाला चारही बाजूने घेरतात व त्याच्यावर बाणांचा वर्षाव करतात. त्यानंतर विराटाचा मुलगा त्यच्या रथाच्या घोड्यांना वळवतो व यमक नांवाचे चक्र तयार करतो. त्यामुळें तो बाणांचा वर्षाव त्याच्या रथाला कांहीं बाधा करू शकत नाही. त्यानंतर ते कृपाच्या फौजेचे सैनिक कृपाचार्याला अर्जुनापासून दूर नेतात, त्यामुळें कृपाने हार मानली असे युद्ध नितीनुसार सिद्ध होते.
अशारितीने गो हरण पर्व, विराट पर्व भाग सत्तावन्नावा संपला.

## गो हरण पर्व
## भाग अठ्ठावन्नावा

वैशंपायन पुढे सांगत असतात, अशाप्रकारे कृपाचा पाडाव झाल्यावर अजिंक्य समजला गेलेला कर्ण त्याच्या तांबूस रंगाच्या घोड्यांच्या रथाने अर्जुनापुढे येतो. अर्जुन द्रोणांना त्याच्या रथाकडे येत असतांना पहातो. अर्जुन उत्तराला सांगतो, "मुला, आपला रथ त्या माणसाच्या रथाकडे घेऊन जा. त्याच्या रथावर सोनेरी वेदी (यज्ञकुंड) दाखवलेली आहे. त्या वेदीतून सहा ज्वाळा येत असल्यासारखे दिसत आहे. त्याशिवाय त्या ध्वजाखाली अनेक लहान मोठे इतर झेडे आहेत. ज्याच्या रथाला लाल रंगाचे मजबूत घोडे लावलेले आहेत. त्या उंच्यापुर्या लांब हात असलेल्या माणसाबद्दल मला फार आदर आहे. कारण तो माझा गुरू आहे. ते ऋषी उशनासारखे दिसतात. प्रजापतीसारखे बुद्धीमान आहेत, त्यांच्या हिम्मती साठी व धाडसासाठी ते ख्यातनाम आहेत. त्यांचे वेदाचे ज्ञान पूर्ण आहे. त्यांच्या ब्रह्मचर्य पालनाची सगळीकडे महती आहे. दैवी व मंत्रयुक्त अशा सगळ्या शस्त्रविद्येत ते प्रवीण आहेत. क्षमाशिलता, संयमन, सत्यप्रेम, अहिंसा, असें सगळे उत्तम गुण त्यांच्यात स्वाभाविकपणे आहेत. मी आता त्यांच्याशी दोन हात करणार आहे. कारण अरे भूमिंजया, ते आज माझ्यापुढे शत्रू म्हणून उभे आहेत".

वैशंपायन पुढे सांगतात, तसे सांगितल्या बरोबर भूमिंजय त्यांचा रथ भारद्वाजाच्या पुत्रापुढे आणून ठेवतो. त्याच प्रमाणें द्रोणसुद्धा त्यांचा रथ घाई घाईने अर्जुनाच्या रथाकडे आणत असतो. जणू काय एकादा चिडलेला हत्ती धावावा. ते योग्य अंतरावर एकमेकांपासून आल्यावर द्रोण त्यांचा शंखनाद करतात व अर्जुनाला आव्हान देतात. त्या शंखनादाने सगळे सैन्य हादरून निघते. द्रोणांचे लाल रंगाचे अश्र्व आणि धनंजयाचे शुभ्र रंगाचे अश्र्व

एकमेकांशी जणू बोलत आहेत असे दिसत होते. पार्थ द्रोणाच्या रथा समोर आल्यावर तो अजिंक्य असा द्रोणाचा पट्टशिष्य त्यांना प्रथम अभिवादन करतो व सांगतो, "अहो गुरूदेव, आम्ही आमचा वनवास व अज्ञातवास यशस्वीपणे पूर्ण केला आहे व आता झालेल्या अपमानाचा वचपा काढण्यासाठी आम्ही तयार होत आहोत. त्याबद्दल आपल्याला राग असण्याचे कांहीं कारण नसावे". अहो निष्पाप गुरूदेव मी मात्र प्रथम तुमच्यावर वार करणार नाही. जर आपण माझ्यावर वार केला तर मात्र सच्च्या क्षत्रियाप्रमाणे मी तुमच्यावर प्रतिवार करणार आहे. कारण ते नियमांत बसते". ते ऐकल्यावर द्रोण त्याच्यावर वीस बाण फेकतो व द्वंद्व सुरू करतो. पार्थ ते सगळे बाण मध्येच तोडून टाकतो. द्रोण त्यांची धनुर्विद्येतील चपळाई दाखवू लागतात. लवकरच त्यांच्या बाणानी पार्थाचा रथ घेरला जातो. पार्थाला चिडवण्यासाठी कीं काय द्रोण पार्थाचे शुभ्र घोडे बाणांनी बांधून टाकतो. ते झाल्यामुळें पार्थाला कांहीं इलाज उरत नाही व तोसुद्धा प्रतिक्रिया त्याच चपळाईने देण्यास सुरूवात करतो. दोघो तोडीस तोड असें योद्धे तो खेळ करत रहातात. दोघेही एकमेकांना इजा होणार नाही तसेंच नुकसान होणार नाही अशा बेतांने ते द्वंद्व खेळत असतात. तेथे जमलेले योद्धे व स्वर्गीय प्रेक्षक जे आकाशातून ते द्वंद्व पहात होते आश्र्चर्य करत असतात कीं, त्यांच्या कौशल्याची तारीफ करत असतात. त्यांचे युद्ध होत असतांना अधून मधून द्रोण आपल्या शिष्याचे कौतुक करत असतात. अर्जुन अशारितीने स्वताच्या गुरूशी लढत असतो. कोणीही कोणाला हरवू शकत नसते. त्यांचे विविध प्रकारचे बाण ते एकमेकांवर फेकत असतात आणि एकमेकांना जेरीस आणण्याचा प्रयत्न करत असतात. कांहीं वेळांनी अर्जुन त्याच्या गांडीवातून बाण सोडू लागतो. तेथे बाणांचा सडा पडत असतो. परंतु, कोणीही जखमी होत नसतो किंवा हरतही नसतो. परंतु, हे असें कायम चालू शकत नाही. केव्हातरी निर्णायक चाल कोणा एकाला तरी खेळावी लागणार असते. त्या द्वंद्वात ते एकमेकांना त्यांचे बाण चातुर्य दाखवत होते. एकाने एक कसब दाखवली कीं, ताबडतोब दुसरा दुसरी कसब दाखवून प्रेक्षकांना चकीत करत असें. त्यांच्या बाणाच्या

आवाजाने सगळे आसमंत दणाणून जात होते. त्यांच्या कडून फेकले गेलेले बाण आसमंतात इतके फैलावलेले होते कीं, सूर्याचा प्रकाश खाली धरतीवर पोहोचत नव्हता. त्या बाणांच्या आघाताने तेथे असलेले रथ मोडत होते व त्याचा जीवघेणा आवाज सगळीकडे पसरत होता. त्या बाणांच्या रांगा आकाशात अशा दिसत होत्या जणू पक्षी रांगेत जात आहेत. त्या द्वंद्वामुळें कित्येकांना वृत्र आणि इंद्र ह्यांच्यातील द्वंद्वाची स्मृती होत होती.
आता अर्जुन त्याच्या कडील ऐंद्र, वायव्य आणि अग्नेय ही आयुध वापरू लागतो. त्याचा उद्देश होता कीं, त्याचा गुरू त्याची कसब पाहिल. अर्जुनाच्या आयुधांच्या आघातामुळें वज्रासारखा परिणाम होत होता. त्या रणभूमीत कित्येक हत्ती, घोडे रक्ताने माखलेल्या सिथीतीत पडलेले होते. त्या द्वंद्वामुळे ते दोघे सोडून इतर कौरव सेनाच जास्त मारली जात होती. त्यामुळें ते भयभीत झाले. त्या त्याच्या परिणामामुळें त्यान दोघांतील द्वंद्वं इतर सगळ्यांसाठी मोठे प्राणघातक ठरत होते. जसें वली व वसवांतील द्वंद्वांत झाले होते.
ते युद्ध पहाणारे स्वर्गीय द्रोणाचौ कौतुक करत होते. कारण तो इंद्राच्या मुलाला तोडीस तोड उत्तर देत होता. पार्थाची बिनचूक निशाणेबाजी पाहून इंद्र संतुष्ट झाले होते. पार्थ आता अधिक वेगांने त्याचे बाण मारू लागतो. त्याचे लाखो बाण एकाच वेळी द्रोणांच्या रथावर पडू लागतात. त्या हल्ल्यामुळें द्रोण प्रथमच बावचळतात. त्यानंतर ते स्वतःला सावरून अर्जुनावर त्यांच्या बाणांचा हल्ला सुरू करतात. त्या गांडीवाच्या प्रतापामुळें ते युद्ध पहात असलेले कौरव हताशपणे नाराजीचे उद्गार काढतात. देवलोकात मात्र सगळे इंद्र अप्सरा, गंधर्व धरून त्या युद्धातील पार्थाच्या कौशल्याचे कौतुक करत असतात. मनाने अर्जुनाचे कौतुक करत असतांना शरीराने तो त्याच्या पित्याच्या मदतीला धावून जातो. ते झाल्यावर अर्जुन अश्र्वत्थामाकडे आपला मोर्चा वळवतो व त्या द्वारा द्रौणाला तेथून निसटण्याची संधी देतो. कारण त्याला त्याच्या गुरूला हरवण्याची इच्छा नसते. तशा परिस्थितीत जखमी झालेले द्रोण त्यांच्या घोड्यांवर बसून पळ काढतात.
अशारितीने गो हरण पर्व, विराट पर्व भाग अठ्ठावन्नावा संपला.

## गो हरण पर्व

## भाग एकोण साठावा

वैशंपायन पुढे सांगतात, आता अश्र्वत्थामा व अर्जुन ह्यांच्यात द्वंद्व सुरू होते. अश्र्वत्थामा एकाद्या वादळासारखा मध्येच घुलेला असतो. तो पार्थावर बाणांचा वर्षाव करू लागतो. त्यात कित्येक प्रकारचे बाण असतात. त्यांतील द्वंद्व देव आणि दानवातील युद्धाची आठवण करून देत होते. त्यांच्या बाणांमुळें त्या अरण्याला आग लागली होती. सगळीकडे धूर व जळत्या बांबूंचा दर्प पसरलेला होता. अरे जनमेजया, अश्र्वत्थामाच्या घोड्यांची दुर्दशा झाली होती. ते रथाचे चालवणे करू देत नव्हते. त्यामुळे अश्र्वत्थामाला लढणे दुरापास्त झाले होते. तरी तो त्याचा बाणांचा हल्ला अर्जुनावर चालूच ठेवतो. अश्र्वत्थामा त्याच्या नालबाणानें गांडीवाची दोर कापतो. ते पाहून स्वर्गीय प्रेक्षक टाळ्या वाजवून त्याला दाद देतात. शाब्बास, शाब्बास असें ते ओरडतात. सगळेच योद्धे जसें भिष्म, कर्ण, कृप अश्र्वत्थामाचे कौतुक करतात. त्यानंतर तोएक बाण अर्जुनाच्या छातीवर मारतो. ते पाहून ते योद्धे जोराजोराने हसत टाळ्या वाजवू लागतात. अर्जुन त्याच्या गाडीवाला नवीन दोर लावतो. त्या दोराला तो त्याच्या कपाळावरील घामाने भिजवतो. त्यामुळें

न दगमगता अर्जुन नव्या जोमांने त्याच्या प्रतिस्पर्ध्यावर हल्ला चढवतो. त्या नंतर जे युद्ध होते ते कमालीचे भयंकर होते. ते पहाणार्यांच्या अंगावर काटा उभा होत होता. दोन हत्ती झुंजावे तसे ते होते. सर्पबाणाने ते दोघे एकमेकांवर हल्ला करत असतात. अर्जुनाचे दोन भाते कधीही न संपणारे असल्यामुळें त्याचा हल्ला चालूच होता परंतु, अश्र्वत्थामाचा भात संपत आला होता. त्यामुळें अर्जुनाला त्याचा फायदा होत होता. अश्र्वत्थामाला नाइलाजाने त्या लढतीतून बाहेर पडावे लागते. त्याच वेळी संधी मिळते कीं नाही असें पहाणारा कर्ण त्याच्या मोठ्या धनुष्याने अर्जुनावर चाल करून जातो. ते पाहून सगळीकडून जोरजोरानी प्रेक्षक ओरडू लागतात. अर्जुनाला त्या गोष्टीचा फार राग येतो. त्याला मुळातच कर्ण आवडत नसतो त्यामुळें तो अश्र्वत्थामाला सोडतो व कर्णावर प्रतिहल्ला करतो. कर्णाला पाहून त्याचे डोळे लाल झालेले असतात. तो कर्णाला उद्देशून बोलतो.
अशारितीने गो हरण पर्व, विराट पर्वाचा एकोणसाठावा भाग संपला.

## गो हरण पर्व

## भाग साठावा

अर्जुन कर्णाला उद्देशून बोलतो, "अरे राधेया, आता वेळ आली आहे हिशोब चुकता करण्याची. तुझ्या त्या सभेतील प्रत्येक शब्दाची किंमत तुला आता चुकवावयाची आहे. आता माझ्याशी लढतांना तुझी काय लायकी आहे माझ्यापुढे ते तुला समजेल. त्यानंतर तू इतरांचा उपमर्द करण्याचे बंद करशिल. सज्जनाला शोभणार नाही असें तू पांचालीला तेथे बोलला आहेस त्या प्रत्येक शब्दाचा तुला मी आता जाब विचारणार आहे. तू आम्हा पांडवांचासुद्धा वेळोवेळी विनाकारण अपमान केला आहेस ते सगळे तुला आता भोगावयाचे आहे. माझ्या ज्येष्ठ बंधूच्या आग्रहाखातर आम्ही तुला दुर्लक्षित होतो परंतु, अरे राधेया, त्या सगळ्यान रागाचे परिणाम तुला आता भोगावे लागतील. तुमच्या मस्तीमुळें आम्ही पांडवांनी खूप कांहीं सहन केले आह त्या काळात. त्या सगळ्याचे फळ तुला आता मी दाकलतो किती कडू आहे. चल माझ्या बरोबर दोन हात करून दाखव. तुझ्या कौरव मित्रांना पाहू दे कोण

किती पाण्यात आहे". ते अर्जुनाचे ऐकल्यावर कर्ण त्याला उत्तर देतो, "अरे, पार्था तू जे बोलतोस ते खरे करून दाखव जेव्हां आपण समोरासमोर लढू. जगाला माहित आहे कीं, तुझ्या वल्गना फार असतात व कृती फार कमी असते. जर तुझ्यात दम असेल तर आता माझ्याशी लढून ते सिद्ध कर. जर तू समजत असशिल कीं, आतापर्यंत जे तुमच्या बद्दल घडले ते केवळ नैतिक बंधनामुळें तर ती नैतिक बंधने आजही तुमच्यावर लागू आहेत. जरी तुम्ही स्वताला मुक्त समजत असलात, तरी खरे तर ते तसें नाही, हे समजून घे. जर तुम्ही वनात तपस्या करत होता तर आता माझ्याशी कशा करता लढू इच्छितोस? जरी तुझा पिता तुला मदत करण्यासाठी आला, तरी तुम्ही दोघे माझे कांहीं वाकडे करू शकणार नाही. जर तुझी इच्छा असेल तर हि लढाई होऊन जाऊदे. म्हणजे तुला समजेल मी काय चीज आहे".

ते आव्हानात्मक उद्गार ऐकून अर्जुन त्याला बोलतो, "माझ्याशी तू कधी लढलेला नाहीस म्हणून तू फुशारक्या मारत आहेस. तुझा धाकटा भाऊ मारला गेला होता तेव्हां तू त्याच्यासाठी लढत न रहाता तेथून पळून गेला होतास. त्यावरून तुझी हिम्मत किती आहे ते समजते".

वैशंपायन पुढे सांगतात, असें बोलून जिश्नु कर्णावर बाणांचा मारा करू लागतो. ते बाण तीक्ष्ण धारदार होते जे कर्णाचे चिलखत भेदू शकले असते. त्या मारामुळें घाबरून न जाता कर्ण त्याच्या बाणांनी प्रत्युत्तर देतो. पाऊस पडावा तसे ते बाण एकमेकांवर पडत होते. त्या बाणांच्या मारामुळें त्यांच्या घोड्यांवरील चिलखती आवरण फाटून गेले. त्यानंतर कर्ण एक बाण असा फेकतो किं, तो अर्जुनाच्या पंजाला लागतो असा किं, त्याची गांडीवावरील पकड ढिली होते. त्याबरोबर अर्जुन कर्णाचे धनुष्य तोडून टाकतो. तरी कर्ण छोटे शलाक धनंजयावर मारत रहातो. त्यानंतर कर्णाचे सैनिक जे त्याच्या बाजूने होते त्यांना अर्जुन मारून टाकतो. विभत्सु कर्णाचे घोडे मारून टाकतो. त्यानंतर कुतीपुत्र एक बाण असा मारतो की, ते कर्णाच्या छातीत घूसतो. त्या झटक्याने कर्णाची दृष्टी बधीर होते व तो मृच्छित होऊन तेथे पडतो. तो

पडतांना मोठ्याने विव्हवतो. त्याला इतर लोक उयलून नेतात. अशारितीने कर्णाचे आव्हान संपुष्टात येते.
अशारितीने गो हरण पर्व, विराट पर्वाचा साठावा भाग संपला.

## गो हरण पर्व

### भाग एकसष्ठावा

वैशंपायन पुढे सांगतात, अशाप्रकारे कर्णाचा पराभव केल्यानंतर, अर्जुन विराटाच्या मुलाला बोलतो, "अरे उत्तरा, आता मला त्या वृद्ध योद्ध्याकडे घेऊन जा. ते माझे आजोबा आहेत. ते देवासारखे आहेत आम्हाला. ते माझ्याशी मुकाबला करू इच्छित आहेत. त्यांच्या रथाभोवती अनेक हत्ती, घोडे आणि पाईक सैनिक उभे होते. उत्तराच्या अंगाला अनेक जखमा झालेल्या होत्या. तो सांगतो, "अहो बृहन्नला मी ह्यापुढे तुमच्या घोड्यांचे नियंत्रण करू शकणार नाही. माझ्या जखमा मला कांही करू देत नाहीत. माझे डोके गरगरा भिरत आहे असें वाटते. लवकरच मी बेहोष बोईम असें वाटते. मी आता पर्यंत कधीही अशा लढाया व योद्ध्यांचे पराक्रम पाहिलेले नाहीत. शंखनाद ऐकलेले नाहीत. जनावराच्या किकाळ्या ऐकलेल्या नाहीत. माझी मति बंद

झाली आहे, गांडीवाच्या आवाजाने मी पुष्कळ अस्वस्थ झालो आहे. पुन्हा पुन्हा रथ चक्राकार फिरवल्यामुळें माझे डोके गरगरायला लागले आहे. माझ्या मनात जीवाबद्दलची भिती उत्पन्न झाली आहे. मी जरी पहात असलो कीं, तुम्ही बाण काढता, धनुष्यावर लावता व लक्ष्यावर मारता पण ते सगळे पाहूही मला ते समजत नाही. अशी माझ्या मनाची परित्शिती झालवेली आहे. असच जर होत गेले तर मी बेशुद्ध होईम अशा मला भिती वाटते. माझ्यात चाबूक व लगाम पकडण्याची ताकद उरलेली नाही".

ते ऐकून अर्जुन त्याला सांगतो, "अरें मित्रा धीर सोडू नकोस, आता फारच थोडी लढाई उरलेली आहे. तुझ्यासाठी मी ती पार न लांबवता झटकन उरकून टाकतो. तू आतापर्यंत खूप चांगले काम केले आहेस. तू एक राजपुत्र आहेस म्हणून तुला अशी भाषा बोलण्याची परवानगी नाही. तू मत्स्य घराण्याची शान आहेस. थोड्या वेळासाठी तू सारथ्य चालू ठेव. कारण अजून थोडी लढाई बाकी आहे". वैशंपायन बोलतात, तसे सांगितल्यावर अर्जुन भूमिंजयाला त्याचा रथ भिष्माकडे नेण्यास सांगतो. आणि म्हणतो, "मी त्यांचे धनुष्याची दोरीच कापून टाकतो. म्हणजे ते युद्ध चटकन संपेल". स्वर्गीय आयुधांची कमाल पहात रहा युवराज. असें अर्जुन त्याला जोर यावा म्हणून बोलतो, "कौरवांना माझ्या गांडीवाची कमाल पहावयाची आहे. मी कोणत्या हातांने ते चालवत आहे त्यावर त्यांच्यात चर्चा होत राहील ते तू पहा. मी कसा रक्ताचे पाट वाहवतो ज्यामुळें ह्या जगातील माणसे त्या जगात जातील. नद्यातील सुसरींना हत्ती, घोडे आणि माणसांचे स्वादिष्ट खाणे मिळणार आहे ते पहा. माझ्या धसक्याने कौरवांचे सैन्य कसे गरागरा फिरत रहाते ते तू पहा. माझी धनुर्विद्या कशी आहे ते तू पहात रहा. त्यासाठी तू रथात घट्ट बसून रहा. कांहीं काळजी करू नकोस. माझे बाण सुमेरीपर्वताचे तुकडे करू शकतात ते पहा. इंद्राच्या काळात मी कितीतरी पौलम, कलखंज असें राक्षस मारलेले आहेत. मला इंद्राने ते शिकवले आहे. प्रजापतिने मला विविध आयुध कशी वापरावयाची त्याचे शिक्षण दिले आहे. त्यामध्ये संरक्षण करणे व हल्ला करणे अशा सगळ्या चाली मी शिकलो आहे. मी एकट्याने हिरण्यपुरात

असणार्या राक्षसांचा नाश केला आहे. मी आज कुरु लोकांचे हे जंगल जाळून टाकणार आहे. त्या सगळ्या कौरव सेनेला मी खाली पाडणार आहे. मला रुद्राकडून रौद्र अस्त्र मिळाले, वामन अस्त्र वरुणाकडून मिळाले, अग्नीकडून अग्नेय मिळाले, वायव वायूदेवाकडून मिळाले, आणि शक्र कडून वज्र मिळाले आहे. अशांच्यापुढे कोणीही तग धरू शकत नाही. कौरवाचे सौन्. कितीही शूरवीरांचे एसले तरी मी एकटा त्यांना पुरून उरणार आहे". वैशंपायन पुढे सांगतात, अर्जुनाचे ते उत्तेजक बोलणे ऐकल्यावर भूमिंजय रथ भिष्माच्या संरक्षणात असलेल्या कौरवांच्या फौजात जोराने घुसवतो. भिष्म मोठ्या कौतुकाने त्याचे ते शिरणे पहात असतो. अर्जुन सर्वप्रथम भिष्माच्या रथाचा दांडा तोडून टाकतो. त्यामुळें कौरवांचे चार योद्धे, दुःशासन, विकर्ण, दुःसह, विविंगसती भिष्माच्या मदतीसाठी धावतात. ते चार भयंकर योद्धे पार्थाच्या रथाला घेरतात. दुःशासन भूमिंजयावर बाण मारतो. त्याच्या छातीत बाण जातो. अर्जुन दुःशासनाचे धनुष्य तोडून टाकतो. त्यानंतर पांच बाण मारून तो त्याला जायबंदी करून टाकतो. दुःशासन पळून जातो. विकर्ण अर्जुनावर एक बाण मारतो पण त्याच वेळी अर्जुन असा बाण मारतो कीं, तो त्याच्या डोक्यात घुसतो. विकर्णसुद्धा पळून जातो. दुःसह आणि विविंगसती ह्यांच्यावर तो एकाच वेळी बाण मारून त्यांचे घोडे जायबंदी करतो. त्यांना इतर योद्धे तेथून घेऊन जातात. त्यानंतर तो विजयी पांडव चौफेर बाणांचा वर्षाव करू लागतो.

अशारितीने गो हरण पर्व, विराट पर्वाचा एकसष्ठावा भाग संपला.

## गो हरण पर्व

## भाग बासष्ठावा

वैशंपायन पुढे सांगतात, त्यानंतर शेवटचा प्रहार म्हणून कौरवांचे योद्धे अर्जुनावर चहू बाजूनी हल्ला करतात. त्या सगळ्यांना बेजार करणारे काटेरी बाण अर्जुन त्या कौरव सेनेवर सोडू लागतो. त्यात अनेक हत्ती मारले जातात. त्यांचे मृत देह सगळीकडे पडलेले असतात, त्यांमुळें सैन्याच्या हालचाली मुष्किल होतात. एकच गोंधळ उडालेला असतो. अर्जुनाच्या त्या चालीपुढे

कौरवसेना ङतबल झाली. मोठे मोठे वीर रणभूमी सोडून पळून जाऊ लागले. त्या रणभूमित मरून पडलेला प्रत्येक अर्जुनाच्या बाणाची शिकार झालेला होता. ते असे दृष्य होते कीं, अर्जुन त्याचे धनुष्य घेऊन त्या रथात नाचत होता, कारण त्याला कोणी विरोधक उरलेला नव्हता. गांडीवाच्या आवाजानेच बरेच योद्धे रणभूमि सोडून जात होते. कार त्यांना समजत होते कीं, त्याच्यापुढे कोणाचे कांहीं चालणार नाही. मेलेल्या सैनिकांची प्रेते व त्यांच्या गळ्यातील हार, दाग दागिने सर्वत्र विखूरलेले दिसत होते. त्यात माणसांचे तुटलेले अवयव पडलेले दिसत होते. त्या रणभूमिवर पार्थाची सत्ता होती हे स्पष्टपणे दिसत होते. धृतराष्ट्राच्या मुलांवर तो आग बरसत होता. ते दुर्योधन पहात होता. ते पाहून दुर्योधन त्याचा तोल घालवून बसला होता. पार्थाच्या ह्या नरसंहारामुळें त्या जंगलात रक्ताचे पाट वहात होते. जणू युगात आला आहे असे वाटत होते. तो पाहून कोणाही पहाणार्याच्या मनात भिती उत्पन्न होत होती. राक्षस आणि इतर नरमांस खाणारे तेथे फिरू लागले होते. तो मृत माणसांचा ढीग असा पडलेला होती कीं, त्यातून चालणे शक्य नव्हते. सगळे दृष्य भयंकर होते ज्याचे काय वर्णन करावे. शंखनाद व तुतार्या ह्यांच्या ध्वनीनी आसमंत भरून गेलेला होता. साक्षात यमाचे तांडव तेथे अनुभवास येत होते. अर्जुनाची तिरंदाजी अशी होती, कीं, तो केव्हा बाण भात्यातून काढते, धनुष्याला लावतो व नेम धरून मारतो ते समजत नव्हते. त्याचा झपाटा विलक्षण होता.
अशारितीने गो हरण पर्व, विराट पर्वाचा बासष्ठावा भाग संपला.

## गो हरण पर्व
## भाग त्रेसष्ठावा

वैशंपायन सांगतात, ते होत असतांना शंतनुचा पुत्र भिष्माचार्य त्यांच्या रथाने अर्जुनाच्या रथाकडे कूच करतात. त्यांच्या हातात मोठे धनुष्य होते, तो

अर्जुनावर तीक्ष्ण धारेचे बाण मारण्याच्या उद्देशाने पुढे सरकत होता. त्याच्या डोक्यावरील शुभ्र छत्रीमुळें ते रुप मोठे दिमाखदार दिसत होते. अर्जुनाच्या वर्मावर घाव घालण्यासाठी व त्याची घोडदौड बंद करण्यासाठी तो त्यांचा आजोबा मोठ्या तयारीने पुढे जात होता. भिष्म त्याचा शंख वाजवून कौरवांच्या शौर्याची ग्वाही देतो. तो पार्थाचा ध्वज फाडण्यासाठी त्यावर बाण मारतो. पार्थाची प्रगती थांबवणे हा त्याचा मुख्य उद्देश होता. अर्जुन त्यांना त्याच्याकडे येत असलेले पाहून खूष झाला होता. त्याला तेंच पाहिजे होते. शेतकर्याला जसा पाऊस पाहून आनंद होतो तसा आनंद त्याला होत होता. गंगापुत्र आठ बाण मारून अर्जुनाचा ध्वज फाडतो. त्या बाणाने त्या ध्वजावर असलेले ज्वलंत वानर रुप आणि ती भयंकर स्वर्गीय श्र्वापदं मोठ्याने किंचाळतात. ते झाल्यावर अर्जुन भिष्माची पांढरी छत्री एक भाला फेकून मोडून टाकतो. ती खाली कोसळते. त्यानंतर अर्जुन भिष्माच्या रथाचा झेंडा फाडून टाकतो. त्यानंतर भिष्माच्या दोनही बाजूस जे संरक्षक बसलेले असतात त्यांना मारून टाकतो. ते भिष्म सहन करू शकत नाहीत. तो वृद्ध योद्धा त्याच्या ठेवणीतील शस्त्र काढतो, ते पाहून अर्जुन त्याच्या कडील भारी पैकी असलेले दैवी शस्त्र त्याला प्रत्यूत्तर म्हणून काढतो. अशी जुगलबंदी चालू होते. त्यानंतर जे द्वंद्व होते त्या दोघात आजोबा व नातू, ते सगळे कौरव पहात बसतात. त्यांची हत्यारं आकाशातच एकमेकांनर आदळून मोठा आवाज करत होती. जणू पावसाळ्यात विजा चमकतात. पार्थ त्याच्या दोनही हातांने ती अवजारं हाताळत होता. एकाद्या यंत्रातून बाहेर पडावेत असे बाण त्याच्या धनुष्यातून येत होते. त्या शस्त्रांचा पाऊस जणू पडत होता. दोघे त्यांची कसब दाखवत होते. जणू दोघांची त्यांच्या शस्त्राबद्दलच्या ज्ञानाची परीक्षा होत होती. कोण अखेरीस उत्तीर्ण होणार ते पहावयाचे होते. त्या वापरलेल्या शस्त्रांचा ढीग त्यांच्या दोघांच्या रथाभोवती पडत होता. भिष्मांच्या क्षमतेला मर्यादा होत्या कारण त्याच्याकडे अनंत भाते नव्हते जे अर्जुनाकडे आहेत. तरी तो वृद्ध योद्धा माघार घेत नव्हता. पुन्हा पुन्हा ते त्यांची अस्त्र अर्जुनावर फेकत होते. पण व्यर्थ. अर्जुनाची क्षमता खूप जास्त होती. त्याच्यावर इंद्राचा वरदहस्त होता.

प्रत्येक वेळी भिष्म कांहीं खास चाल खेळत कौरव त्यांची वाहवा करत असत पण अर्जुनानी ती उलटवली कां ते गुपचुप असतं. त्या त्यांच्या वागण्याचे धनंजयाला हंसू येत होते. अर्जुन तरूण आहे व भिष्म, द्रोण आणि कृपा हे सगळे आता वृद्ध झाले आहेत अशी चर्चा होत होती. त्याप्रमाणे त्या लढतीचे मुल्यमापन होत होते. ते द्वंद्व हरवण्यासाठी नाहीतर एकमेकांना त्यांच्या कौशल्याचे दर्शन देण्यासाठी आहे हे सगळ्यांच्या लक्षात येत होते. इतर कोणी मध्येच आला तर अर्जुन त्याला थेट मारून टाकत असे पण भिष्मावर ते थेट हल्ला करत नव्हता. तसेंच भिष्मसुद्धा अर्जुनाला मारण्याच्या उद्देशाने लढत नव्हते हे सगळ्यांच्या लक्षात आले होते. वरुण, यम, इंद्र, वायू अशा देवांकडून मिळालेल्या आयुधांचे अर्जुन भिष्मांना प्रात्यक्षिक दाखवत होता हे ते समजतात. जर त्याला भिष्माला मारावयाचे असते तर ते द्वंद्व केव्हाच संपवले असते पार्थाने. पहाणारे आकाशातील व मानवी प्रेक्षक दोघांचे कौतुक करत असतात. असे द्वंद्व आधी कधी झाले नव्हते असें स्वर्गीय ऋषी सांगतात.

वैशंपायन पुढे सांगतात, त्यांच्या दैवी शस्त्रांचे प्रात्यक्षिक संपल्यावर ते पुन्हा बाणांच्या युद्धाला प्रारंभ करतात. जिश्नु भिष्माच्या तिरकमट्याचे दोर क्षणात कापून टाकतो. त्याबरोबर भिष्म दुसरा तिरकमटा हातात घेतात. त्यामुळें रागावलेले त्याचे आजोबा पार्थावर जोराचा मारा करतात त्यांच्या बाणांनी. परंतु, त्याचा कांहीं खास परिणाम त्याच्यावर झाल्याचे दिसत नाही. त्यांच्या बाणांनी दहाही दिशा भरलेल्या होत्या. त्यामुळें भिष्माचा संरक्षण देणारे सगळे ठार मारले जात होते. अर्जुनाने त्याच्या सारथ्याला बाणाच्या कवचाने एकाद्या पिंजर्याप्रमाणे संरक्षण दिले होते. त्यामुळें उत्तर त्या पिंजर्यात सुरक्षित होता. ते असें दृष्य होती कीं तो एक मोठा मोणसांची कत्तल करण्याचा खाटीकखानाच असावा. जिकडे तिकडे मेलेल्या माणसांचे अवशेष विखुरलेले दिसत होते. आकाशात बसलेले देव ते दृष्य पाहून आश्र्चर्य करत होते. अर्जुनाच्या कौशल्याचे कौतुक होत होते. पांडवांची खास गोष्ट अशी कीं, ते कधी थकत नसतं. त्यामुळें इतका काळ लढूनही अर्जुन ताजातवाना होता

परंतु, भिष्म थकत होते. ते थकणेच शेवटी ठरवणार होते कोण हार मानतो. बाणांची रोषणाई पहाण्यासारखी होती. चित्रसेन गंधर्व अर्जुनाच्या चपळाईवर संतुष्ट होता. अर्जुनाचे बाण आकाशात एका रेषेत जात होते जणू ती एक लांबलचक रेषा काढलेली होती. तो बोलतो माणूस अशाप्रकारे बाणांची रेघ काढू शकणार नाही. त्या प्राचीन आयुधांचे ते प्रात्यक्षिक पहावयाला मिळत होते व तेसुद्धा पृथ्वीवर ह्याचे ते गंधर्व आश्र्चर्य करीत होते. त्या दोनही योद्ध्याकडे पहाता येत नव्हते कारण ते सूर्यासारखे चमकत होते. दोघे तोडीसतोड ठरत होते. भिष्म वृद्ध असूनही त्याच्या तरूण नातवाला खेळवत होते त्याचे कौतुक होत होते. देवांनी त्यांच्यावर स्वर्गीय फुलांचा शिडकावा केला त्यांचे कौतुक करण्यासाठी ते दृष्य, अरे जमनेजया, पहाण्यासारखे होते. शंतनुच्या मुलांनी अर्जुनावर डावीकडून हल्ला केला जेव्हां सव्यसाची त्याला भोसकणार होता. भिष्माचा हल्ला अर्जुन परतवतो व भिष्माला दहा बाण मारून घायाळ करतो. त्या जखमांमुळें भिष्म विव्हळू लागतात. ते कोसळतात. रथाच्या एका खांबावर टेकून तो वृद्ध योद्धा तसाच रहातो. भिष्माचा सारथी त्या भोवळ आलेल्या योद्ध्याला त्या रणभूमितून बाहेर घेऊन जातो.

अशारितीने गो हरण पर्व, विराट पर्वाचा त्रेसष्ठावा भाग संपला.

## गो हरण पर्व

## भाग चौसष्ठावा

वैशंपायन पुढे सांगतात, भिष्म रणांगण सोडून गेल्यावर धृतराष्ट्राचा मुलगा दुर्योधन त्याची पताका उंच धरून अर्जुनाकडे जातो. मोठ्यानी ओरडतो व त्याच्या हातातील लांबपल्याचा बाण त्याच्या धनुष्याची दोर खूप ताणून अर्जुनावर फेकतो. अर्जुनाच्या कपाळाला तो लागतो. त्यामुळें क्षणभर त्याला चक्कर आल्यासारखे वाटते परंतु, तो सावरतो आणि त्याच्या कपाळावरील जखमेतून रक्त भळाबळा वाहू लागते. त्यामुळें संतापलेला तो पांडव दुर्योधनावर बाण मारून त्याला जखमी करतो. दुर्योधन मोठ्या जोरात अर्जुनावर प्रतिहल्ला करतो. दोघे अजमिदा घराण्याचे मुलगे अशारितीने एकमेकांशी लढू लागतात. त्यावेळी दुर्योधनाला मदत करण्यासाठी त्याचा एक भाऊ विकर्ण एका भल्यामोठ्या हत्तीवर बसून त्या ठिकाणी येतो. त्याला सहाय्य करण्यासाठी आणखीन चार रथ त्याच्या बरोबर येतात. असें सगळे एकदम धनंजयावर चालून जातात. धनंजय त्या पर्वतासारख्या प्रचंड हत्तीच्या गंडस्थानी लोखंडी बाण असा मारतो कीं तो बाण त्याच्या डोक्याक आरपार जातो. त्या हल्ल्याने तो अवाढव्य गज मरतो व खाली कोसळतो. त्याच्या वजनाने ते रथ मोडून जातात. विकर्ण कसाबसा वाचतो. तेथून तो पळत विविंसतीच्या कडे जातो. तेथे हत्ती मेल्यावर पार्थ दुर्योधनाच्या अंगावर वार करतो. त्या वाराने दुर्योधनाला भारी जखम होते. त्याच्या कळा सहन न झाल्याने दुर्योधन तेथून काढता पाय करतो. तो अक्षरशः पळत पळत अर्जुनापासून दूर जाऊ लागतो. ते पाहून इकर कौरवांचे सैनिकसुद्धा घारातीर्थ सोडून पळू लागतात. ती कौरवांची पळापळ पहाण्यासारखी होती. ते पाहून किर्ती त्याला उद्देशून मोठ्यान ओरडून बोलतो, "अरे मर्दा असा पळतोस कां? मला तुझी पाठ दाखवतांना तुला लाज वाटत नाहीं कां? तू आला होतास तेव्हां मोठे नगारे वाजत होते आता तू पळत आहेस तेव्हां ते नगारे कां नाही

वाजत? त्या पळण्यामुळें तुझी ख्याती कमी होत आहे त्याचा विचार केला आहेस कां? मी माझ्या मोठ्या भावाच्या आज्ञेत आहे त्याचा तुम्ही खूप वाईट उपयोग केला आहे. पाठी वळ आणि मला तुझा चेहरा दाखव. जर तू अशारितीने बळालास तर तुझे नांव जे सुयोधन ठेवले होते ते बलदून दुर्योधन होईल ते सुद्धा लक्षात ठेव. तुझ्या अशा रणागण सोडून पळून जाण्याने तुझ्या नांवाची नाचक्की होईल ते समजून घे. अरे भेकडा, तुझ्या जीवाच्या भितीने तू पांडवापासून पळत आहेस हे सगळे जग पहात आहे.

अशारितीने गो हरण पर्व, विराट पर्वाचा चौसष्ठावा भाग संपला.

# गो हरण पर्व

## भाग पासष्ठावा

वैशंपायन पुढे सांगतात, अर्जुन पुन्हा पुन्हा त्याला हांका मारत बोलवत होता, पण तो कौरव पाठी न बघता त्याच्या पासून दूर पळत होता. त्याला कर्ण अडवतो व सांगतो पार्थाचान अशाप्रकारे पाठ दाखवणे हे नामुष्कीचे होऊन, पुन्हा मागे फिर व मी आहे आपण त्याच्याशी दोन हात करू. ते धीराचे बोलणे ऐकल्यावर दुर्योधन चवताळलेल्या सापासारखा कर्णाबरोबर पुन्हा पार्थाशी लढण्यासाठी मागे फिरतो, तो जणू अर्जुनाचे आव्हान स्वीकारतो. भिष्म त्यांच्या रथातून पुन्हा अर्जुनाशी लढण्यासाठी परत येत असतोच त्यावेळी. त्याबरोबर इतर कौरव, द्रोण, कृप, दुःशासन, विकर्ण, विविंसती असें सगळे नव्या दमाने पुन्हा पार्थाला धडा शिकवण्यासाठी सज्ज होतात.

त्यांच्या बरबर त्यांच्या सेनासुद्धा परत फिरतात व ते सगळे पार्थाच्या रथाला घेरा घालण्याची व्यवस्था करतात. तो एक महासागर परत फिरत आहे असें दिसत होते. ते कौरव पार्थावर बाणांचा वर्षाव करू लागतात. ते मुसळधार पावसा सारखे वाटत होते. तेव्हां अर्जुन देवांचे खास संमोहन अस्त्र उपयोगात आणण्याचे ठरवतो. त्यासाठी तो एक विशिष्ठ शंखू वाजवतो, त्या संमोहन अस्त्रामुळें ते सगळे कौरव सैन्य बेभान होते. त्याना समजत नाही कीं, त्यानी काय. करावे. त्यांची मती सून्न होते. ते सगळे एका जागी स्थीर उभे रहातात. ते त्यांच्या हातातील शस्त्रं खाली टाकून देतात. ते झालेले पाहून पार्थ पिराटाच्या राजपुत्रास बोलतो, "अरे राजपुत्रा, त्या पुतळ्यासारख्या उभ्या असलेल्या कौरवांमधून तू आता मजेत फेरफटका मारू शकतोस. त्यांचे कपडे, शस्त्रं असें सगळे जरी तू काढून घेतलेस तरी ते तुला कांहीं करू शकणार नाहीत. जा आणि द्रोण आणि कृपांची आयुध घेऊन ये. द्रोणांचे कपडेसुद्धा

काढून आण, त्या कर्माचे पिवळे कपडेसुद्धा काढून आण. मला वाटते भिष्मांवर त्याचा परिणाम झालेला नाही कारण ते थोडी हालचाल करत आहेत. म्हणून त्यांच्या वाटेला जाऊ नकोस". ती आज्ञा मानून भूमिंजय लगाम टाकतो व त्या वीरांचे कपडे व शस्त्र आणण्यासाठी निघतो. ते सगळे कपडे काढून तो ते अर्जुनाच्या कडे आणून टाकतो. नागडे उघडे झालेले ते कौरव मात्र तसेंच उभे असतात. ते घेऊन अर्जुन त्या रणांगणातून बाहेर पडतो. त्या योद्ध्यांच्या बाणाच्या कक्षेतून ते दूर जातात. ते पाहताच भिष्म त्याच्यावर बाण मारण्याचा प्रयत्न करतो. अर्जुन सावध असतो तो भिष्माच्या घोड्यांना घायाळ करतो व भिष्मावर दहा बाण फेकतो. ते झाल्यावर पार्थ त्या युद्धभूमीतून बाहेर नीघण्याचे ठरवतो. जसे काळ्या ढगांनी भरलेल्या आकाशात सूर्य त्यातून डोकावत बाहेर यावा. थोड्या वेळांनी दुर्योधन सावध होतो. तो पहातो कीं, अर्जुन युद्धभूमी बाहेर येऊन आरामात उभा आहे. तो भिष्माला बोलतो, "हा कसा आपल्या तावडीतून सटकला. त्याला आपण कां अडवले नाही"? ते ऐकून भिष्म तिरस्कारयुक्त नजरेने दुर्योधनाकडे पहात बोलतात, "अरे शहाण्या, तू काय करत होतास जेव्हां तो आपल्या कचाट्यातून निसटत होता? तुझे आयुध सुद्धा तुझ्याकडे नाही, त्याचे काय? हा पांडव आहे, तो कधीही कोणतेही गैरकृत्य करणार नाही. ते सदैव नितीनियमांनेच वागत आहेत म्हणून तर तुमचे फावत आहे. तिन्ही जगाचे स्वामित्व मिळवण्यासाठी सुद्धा ते तसले करणार नाहीत, त्यांची तुमची तुलना होणार नाही. म्हणून आपण सगळे सतत त्याच्या हातून मार खात आहोत. आता हे मूर्खपणाचे कृत्य सोडून तुम्ही हस्तिनापुरात जा, व त्याला जाऊद्या जेथे त्याला जावयाचे आहे. बंद करा सगळे. आता तरी चांगल्या मार्गाने जाण्याचा प्रयत्न करा".

वैशंपायन पुढे सांगतात, आपल्या आजोबाचे ते शहाणपणा सांगणारे बोलणे ऐकल्यावर दुर्योधनाला त्याचा राग येतो. परंतु काय करणार? केवळ खोल श्वास घेण्या पलिकडे तो कांही करू शकत नाही. गप्प बसतो. त्याला माहित असते कीं, जे आजोबा सांगतात ते खरे आहे पण तो त्याच्या अहंकारावर

मात करू शकत नाही. त्याशिवाय त्याला भडकवणारे मित्र त्याचे कान सतत भरत असतात. त्यामुळें तो पांडवांच्या बद्दल चांगला विचार करू शकत नाही. त्यांनतर ते सगळे योद्धे समजतात कीं, जिश्नुशी ते लढू शकणार नाहीत, कर्ण कृपा, द्रोण अंगावरील वस्त्रं, शस्त्रं गेल्यामुळे उघडेबंब झालेले, नामुष्कीने शरमिंदे झाले होते. ते भिष्माचा आदेश मान्य करतात व परतीच्या प्रवासाला निघतात. ते पाहील्यावर धनंजयाला फार आनंद होतो. तो त्या कौरवांच्या परत जाणार्या योद्य़ांना सलाम करतो व त्याच्या शुभेच्छा भिष्म, कृपा व द्रोण ह्यांना देतो. ते करत असतांना तो दुर्योधनाच्या मुकूटाला एक असा बाण मारतो कीं त्याचा मुकूट खाली पडतो. ते पाहून कृपाचार्य,द्रोणाच्र्य आणि भिष्माचार्य हसून लागतात. त्यानंतर तो अजिंक्यतारा अर्जुन त्याच्या गांडीवाच्या टणत्काराने सगळे जग भारून टाकतो. त्याचे विजयी झाल्याचे दर्शक असें शंखनाद सुरू करतो. त्यामुळे दुर्योधन व कर्ण विशेष दुखावले जातात. त्यांचा नाईलाज असतो. गुपचुपपणे ते परतीच्या दिशेने जाऊ लागतात.

कौरव निमुटपणे परतत असतांना अत्यानंदाने फुललेला किर्ती उत्तराला बोलतो, "बघ तुझी सगळी जनावरं परत गेली आहेत. आणि आता बराच काळ हे चोर तुमची जनावरं चोरण्यासाठी येतील असें वाटत नाही. चल, आपणसुद्धा आपल्या घरी जाऊ".

आकाशात जमलेले देव सुद्धा परत जाऊ लागतात कारण, खेल संपलेला असतो. परत जातांना ते धनंजयाचे कोडतौतुक करत असतात. इंद्र समाधानी असतो कारण कीं, त्याच्या मुलांने जे शिक्षण घेतले त्याची प्रचिती त्याला आली होती.

अशारितीने गोहरण पर्व, विराट पर्वाच्या पासष्ठावा भाग संपला.

## गो हरण पर्व

## भाग सहासष्ठावा

वैशंपायन पुढे सांगत असतात, कौरवांचा पुरता बिमोड करून ते युद्ध जिंकून आणि सगळी जनावरं परत आणून ते येत होते. कौरव परत जात असतांना त्यांचे अनेक कौरवांचे सैनिक जे मृत्यूच्या भयाने वनात लपून बसले होते हळू हळू त्यातून बाहेर येतात व अर्जुनाच्या पुढे येऊन उभे रहातात. ते हात जोडून त्याला सांगतात कीं, ते आता त्यांचे गुलाम आहेत व जे त्याना आज्ञा करतील ती ते मान्य करण्यास तयार आहेत. त्यांचे चेहरे भयाने, भुकेने तहानेने व्याकूळ झालेले दिसत होते. त्यांच्या अंगावरील कपडे फाटलेले होते, त्यांचे केस विस्कटलेले होते. त्यांची ती अवस्था पाहून ते पांडवांना शरण आल्याचे दिसते. त्या परभूमित त्यांचे जे हाल झाले होते ते पहावत नव्हते. अर्जुन त्यांना शरणार्थी म्हणून अभय देतो. व बोलतो, "तुमचे स्वागत आहे. मी तुम्हाला माफ केले आहे व मुक्तसुद्धा केले आहे. तुम्हाला जेथे जावयाचे आहे तेथे न घाबरता जाऊ शकता.

वैशंपायन पुढे सांगतात, ते अभय मिळाल्यावर ते हजारो सैनिक धनंजयाचे अभिनंदन करतात. त्याला दुवा देतात कीं त्याचे सदैव भले हो. त्याला

दीर्घायुष्य मिळावे अशी स्वयंभूकडे मागणे करतात. धनंजय उत्तराबरोबर विराटाच्या नगरीकडे निघतो. मस्तवाल हत्तीसारखा तो रुबाबात त्याचा परतीचा प्रवास सुरू करतो. शत्रूचा पाडाव केल्यानंतर अर्जुन मत्स्य देशाच्या राजपुत्राला बोलतो, "अरे युवराज, हे फक्त तुली माहीत आहे कीं, मी कोण आहे. आम्ही सगळे पांडव जीवंत आहोत हे एक गुपित आहे. आम्ही तुमच्या कडे रहात हो, म्हणून तू पांडवांची स्तुती घरी गेल्यावर करण्यास सुरूवात करू नकोस. ते गुपित अजून कांहीं दिवस सांभाण्यासाठी मला तुझी मदत पाहिजे. घरी गेल्यावर तू तुझ्या बाबांना सांगशिल की, हे युद्ध तू खेळलास व तू कौरवांना हरवले आहेस. ती जनावरं सुद्धा तू परत आणलीस असेंच सांग". ते ऐकल्यावर थकलेला भूमिंजय बोलतो, "आपण बोलता ते जरी तुमच्या दृष्टीने बरोबर असले तरी ते सगळे जाणतात कीं असले कतृत्व माझ्यापाशी निश्र्चितपणे नाही. त्यामुळें ते सांगितले तर त्यांना पटणार नाही व माझ्यावर खोटे बोलल्याचे दुषण लागेल. परंतु, तुमचे गुपित राखण्यासाठी मी सत्य परिस्थिती वेगळ्या पद्धतीने मांडीन.

वैशंपायन पुढे सांगतात, ते कार्य व्यवस्थितपणे पार पाडल्यावर जिश्नु भूमिंजयासह त्या स्मशानाकडे निघतो. त्या वठलेल्या आपट्याच्या झाडाकडे ते जातात. त्या झाडावर युद्धात मारलेले बाण सगळीकडे पडलेले दिसत होते. तेथे गेल्यावर अर्जुन त्याच्या ध्वजावरील दैवी शक्तीला अभिवादन करतो कीं, आता त्यांनी जाण्यास हकरत नाही. ती शक्ती व तिच्याबरोबर असलेले दैवी हिंस्र प्राणीसुद्धा तो ध्वज सोडून जातात. विश्र्वकर्माने केलेले मायावी दृष्य निवळून जाते. त्या ध्वजाच्या ठिकाणी उत्तराचा ध्वज लागतो. पार्थाचे धनुष्य, बाण त्याचे भाते सगळे जातात व तेथे भूणिंजयाचे येतात. ते उत्तर पहात असतो व विस्मयचकीत होत असतो. त्याला समजते कीं ही बृहन्नला कोणी मानव नाही तर खात्रीने कोणी दैवी शक्ती आहे. सगळी आयुध जागच्याजागी ठेवल्यावर व उत्तराचा रथ त्याच्या प्रमाणे पूर्ववत केल्यानंतर ते दोघे विरीट नगरीकडे निघतात. अर्जुन पुन्हा बृहन्नला बनतो, रथाचे सारथ्य घेतो व उत्तर रथाचा मालक बनून त्याच्या आसनावर बसतो. ते दोघे मजेत विराट

नगरीकडे जातात. ते जातांना ज्या परिस्थितीत ते होते त्याच परिस्थितीत ते परततात.

वैशंपायन पुढे सांगतात, पूर्णपणे खजिल झालेले कौरव त्यांचे कपडेसुद्धा काढलेले होते म्हणून कर्ण, द्रोण, कृप लाजिरवाण्या अवस्थेत हस्तिनापुरी जातात.

फाल्गुनी उत्तराला बोलतो, तुझी जनावरं त्यांच्या गुराख्यांनी घरी नेली असतीलच तर आपण दुपारी शहरात जाऊ. आपल्या घोड्यांना दाणाचारा चारू व थोडी विश्रांती घेऊ असें मी म्हणतो. तुझे गुराखी राजाला जाऊन शुभवार्ता देतील अशी व्यवस्था आता तुला करावी लागेल. म्हणजे आपण जाण्या आधी आपल्या विजयाची वार्ता विराट राजाला मिळाली पाहिजे ज्यात तू लढाई केलीस व जिंकलास हे सांगितले जाणे जरुरूचे आहे". भूमिंजय ते करण्यास तयार होतो कारण तसे त्यांच्यात आधी ठरलेले होते.

अशारितीने गो हरण पर्व, विराट पर्वाचा सहासष्ठावा भाग संपला.

## गो हरण पर्व

## भाग सदुसष्ठावा

वैशंपायन पुढे सांगतात, शुशर्मनला हरवून राजा विराट त्याचे सैन्य घेऊन त्याच्या राजधानीकडे निघतो. त्याचे मन प्रफुल्लीत असते. त्याच्या बरोबर चार पांडव असतात. त्रिगार्ताच्या राजाचा पराभव करून आणि सगळी जनावरं परत मिळवून तो राजा फार संतुष्ट मनाने घरी परतत असतो. घरी परतल्यावर तो सभा घेतो. त्याच्या सिंहासनावर बसलेला असतो. त्याचे प्रजाजन ब्राह्मणांच्या मागे उभे असतात. राजा ब्राह्मणांना नमस्कार करतो. त्यानंतर शुभ वार्ता सांगून तो राजा त्या सगळ्यांना जायला सांगतो. त्यानंतर तो राजा त्याच्या मुलाबद्दल चौकशी करतो. तो विचारतो, "माझा एकुलता एक पुत्र कोठे आहे"? घरातील सगळ्या बायका त्याला अभिमानाने सांगतात कीं, तुम्ही गेल्यानंतर उत्तरेकडील गुराखी येऊन सांगतात कीं, त्या

भागातील त्यांची जनावरं कोरव पळवत आहेत. म्हणून भूमिंजय वृहन्नलाला घेऊन कौरवांशी लढण्यासाठी गेला आहे. तेथे सहा महान योद्धे कौरवांच्या सैन्यात आहेत, भिष्म, द्रोण, कृप, दुर्योधन, कर्ण, अश्र्वत्थामा. तो त्यांच्याशी लढण्यासाठी व आपली जनावरं परत मिळवण्यासाठी गेला आहे. वृहन्नला त्याच्यासाठी सारथ्य करणार आहे कारण तिला म्हणे सारथ्य चांगले येते व एका जमान्यात ती अर्जुनाचे सारथ्य करत होती असें सैरंध्री सांगत होती.
वैशंपायन पुढे सांगतात, ते ऐकल्यावर राजा मनाने सुन्न होतो. त्याला माहित असते त्याच्या मुलाची योग्यता किती आहे. राजा त्याच्या आमात्यांना आज्ञा करतो कीं, आपले जे सैनिक अजून लढण्याच्या तयारीत आहेत त्यांना घेऊन आपल्याला त्वरित त्या भागात गेले पाहिजे. माझ्या मुलाला जर कांहीं झाले तर ते मी सहन करू शकणार नाही. त्याप्रमाणे त्यांचे मोठे सैन्य पूर्ण तयारीने त्या दिशेने उत्तराला मदत करण्यासाठी तो पाठवतो. मला ताबडतेब कळवा माझा पुत्र हयात आहे कीं नाही. माझ्यामते त्याच सारथ्य एक नवुसक करत आहे तेव्हां उत्तराचे काय झाले असेल ते समजत नाही. असें बोलून राजा रडू लागतो.
वैशंपायन पुढे सांगतात, राजाला ब्राह्मण कंक सांगतो कीं, "अहो नृप मी बृहन्नलाला ओळखतो. त्याचे सारथ्य मी स्वतः पाहिलेले आहे म्हणून आपण निर्धास्त असावे, आपल्या मुलाला कांहींही होणार नाही ह्याची मी ग्वाही देतो. उलट तुमचा मुलगा जिंकून येईल ह्याची मला खात्री आहे. बृहन्नला असल्यावर तो देव असुर, राक्षस अशा सगळ्यांना हरवूनच येणार आहे त्याबद्दल निश्र्चिंत असा".
वैशंपायन सांगतात, नेमक्या त्याच वेळी उत्तराने पाठवलेला संदेशक तेथे पोहोचतो व सांगतो कीं, भूमिंजयाने कौरवांचा पराभव केला आहे व त्यांची सगळी जनावरं सुद्धा सुखरुपपणे त्याच्या जागी पोहोचला आहेत. आणि युवराज बृहन्नलाबरोबर राजधानीकडे येत आहेत. ते दुपार पर्यंत पोहोचतील असें तो संदेशक सांगतो. राजाला ते ऐकून कमालीचा आनंद होतो. राजा उत्तराच्या येण्याची वाट पहात रहातो. राजा आज्ञा देचो कीं त्याच्या मुलाच्या

स्वागतासाठी रस्तावर तोरणे पताका लावा. सर्व नगर सुशोभित करा. तेया संदेसकाला तो बक्षिस जाहीक करतो. राजा कमालीचा आनंदात असतो. सर्व देव देवतांची पुजा घालावयाला सांगतो. राज्यातील कसबिणी, नर्तिका, गाणारे सगळे बोलावले जातात व त्यांना युवराजाच्या स्वागताची तयारी करण्याचा हुकून दिला जातो. सर्वत्र आनंदीआनंद साजरा होऊ लागतो. तो सांगतो त्याच्या धाकट्या कन्येला कीं ती तिच्या मैत्रिणींसह तिच्या भावाचे स्वागत करण्यास जाईल. सगळे शहर त्यांचे सावागत करण्यासाठी अशारितीने सज्ज होते. प्रजाजन त्यांची वाद्ये घेऊन भूमिंजयाचे आगमनाची वाट पहात असतात. तो सांगितल्या प्रमाणे दुपारी येणार असतो. राजा सैरंध्रीला द्युताचे फांसे आणावयास सांगतो व कंकाकडे पहात तो खूषीत असलेला मत्स्य देशाचा राजा कंका कडे पहात म्हणतो, "ब्राह्मण, चला एक द्युताचा डाव खेळू". त्यावर कंक त्याला विनम्रपणे सांगतो, "अतिखूषीत असलेल्याने द्युत खेळू नये. मी असें सांगतो कारण ते आपल्या भल्याचे आहे. परंतु, जर आपली तशीच इच्छा आहे तर खेळू". विराट त्याला मजेत सांगतो, "अरे कंका, मी आज एवढा आनंदात आहे कीं जुगार जरी नाही खेळलो तरी ते स्त्री गुलाम, आणि पशुधन माझे मी आज तुझ्यावर लुटणार आहे".

कंक त्यांना पुन्हा सांगतो, "आपल्याला द्युत खेळण्याची काय गरज आहे"? जुगार हा चांगला छंद नाही. त्यांमुळें भल्या भल्यांचे नाश झाले आहेत. त्यामुळें पापाला उत्तेजन मिळते. म्हणून शहाण्या लोकांनी द्युत खेळू नये असे नितीशास्त्र सांगते. आपण पंडुपुत्र युधिष्ठीराचे ऐकले असेल, त्याचे काय झाले"? त्याला द्युताचा छंद होता. त्यात त्याने त्याचे राज्य घालवले ते सगळ्या जगाला ज्ञात आहे. म्हणून मी जुगार खेळण्याच्या विरुद्ध आहे, पण जर तुमची इच्छा असेल तर खेळू".

वैशंपायन पुढे सांगतात, त्यांचा खेळ सुरू होतोव तो खेळत असतांना, विराट त्याला सांगतो, "अरे कंक, पहा ते कौरव किती बलाढ्य, त्यांना माझ्या इवल्याशा पुत्राने हरवले. आता सांग, अशा प्रसंगी जर आनंद नाही व्यक्त केला कर केव्हां करावयाचा ते तू मला सांग"?

ती वार्ता ऐकून युधिष्ठीर बोलतो, "सगळी जनावरं परत आली आहेत व कौरवांचा नाश झाला आहे हे एक चांगले झाले आहे. माझ्यामते त्याचे सारथ्य बृहन्नलाने केले म्हणूनच तो ते करू शकला".

मत्स्य देशांचा राजा रागावून युधिष्ठीराला बोलतो, "अरे ब्राह्मणा तू माझा द्वेष करत आहेस असें दिसते. तू असे बोलण्याचे धाडस कसा करू शकतोस"? आपली दोस्ती आहे म्हणून मी तुला ह्यावेळी माफ करतो एरवी मला तुझे हे बोलणे अजिबात आवडलेले नाही. जर तुला जीवंत रहावयाचे असेल तर पुन्हा असे माझ्या मुला विरुद्ध कांहीं बोलण्याची तू हिम्मत करणार नाही".

युधिष्ठीर बोलतो, "तेथे भिष्म, द्रोण, कृपाचार्य, अश्र्वत्थामा आणि कर्ण असें दुर्योधनाच्या सैन्यात होते, तेथे ती लढाई पहाण्यासाठी इंद्र त्याच्या गोतावळ्यासह आला होता अशा वेळी केवळ बृहन्नला ते युद्ध जिंकू शकते असें मला बोलावयाचे होते, अहो महाराज". त्याच्या बरोबरीचा दुसरा कोणी योद्धा त्रिखंडात सापडावयाचा असें सगळे जाणतात. अशा समराने तो फार उत्तेजित होतो हो मला माहीत आहे. त्यांने त्या आधी अनेक राक्षस, असुर मारले आहेत. असा साथिदार माळाल्यानंतर तुमचा मुलगा जगसुद्धा जिंकू शकेल".

विराट त्याला ताकीद देतो कीं, "मी तुला सांगितले असतांना तू पुन्हा तेंच बोलत आहेस. जर अशा वागण्याला शिक्षा नाही झाली तर वेशिस्त वाढते".

वैशंपायन पुढे सांगतात, ते युधिष्ठीराचे ऐकल्यावर राजाला फार राग येतो व त्याच्या हातातील सोन्याच्या सोंगट्या तो जोरांने कंकाच्या तोंडावर मारतो. त्या जडभारी सोंगट्या लागल्यामुळे त्याच्या नांकातून रक्त वाहू लागते. युधिष्ठीर त्याचे नाकातून वाहणारे रक्त जमिनीवर पडू नये म्हणून नाकाला हातात धरतो. तेथे असलेल्या द्रौपदीला तो खुणवतो कीं कांहीं पात्र आणावे. त्याप्रमाणे ती एक सोन्याचा प्याला त्याला देते व त्यात ते रक्त तो साठवतो. असें करण्याचे कारण जर अर्जुनाला समजले कीं, राजाने विनाकारण त्याचा रक्तपात केला तर तो त्या राजाला क्षणभरसुद्धा जीवंत ठेवणार नाही. कारण अशी त्याची प्रतिज्ञा होती.

त्या सुमारास भूमिंजय सजलेल्या रुपात त्या नगरीत प्रवेश करतो. लोक त्याचे प्रचंड स्वागत करत असतात. त्या नगराची प्रजा उत्तमोत्तम कपडे नेसून त्याचे स्वागत करत असतात. तरुण मुली हातात पंचारती घेऊन त्याची आरती ओवाळत असतात. वाद्ये वाजत असतात. एकच धमाल होत होती. अशा त्या आगमनाची वार्ता राजाला सभेत मिळते. तो राजपुत्र राजवाड्यात प्रवेश करतो. राजाला निरोप येतो कीं, भूमिंजय व बृहन्नला आपल्याला भेटण्यासाठी येत आहेत.

राजा मोठ्या आनंदाने बोलतो कीं, तो त्या दोघांचे स्वागत करण्यासाठी उत्सुक आहे. त्यावेळी ब्राह्मण कंक कर्मचार्यांना सुचना करतो कीं, केवळ भूमिंजय प्रथम प्रवेश करेल. त्याप्रमाणे होते.

अशारितीने गो हरण पर्व, विराट पर्वाचा सदुसष्ठावा भाग संपला.

## गो हरण पर्व

## भाग अडुसष्ठावा

वैशंपायन पुढे सांगतात, त्याप्रमाणे भूमिंजय सभागृहात एकटाच प्रवेश करतो. आल्यावर पित्याचे पाय धरतो. त्यानंतर तो कंकाकडे पहातो तो ब्राह्मण सभागृहात एका बाजूस नाक धरून बसलेला तो पहातो. त्याच्या नाकातून रक्त वहात असलेले तो पहातो. त्याच्या बाजूला सैरंध्री उभी असते. ते पाहून तो

युवराज आपल्या पित्याला विचारतो, "ब्राह्मणाच्या नाकावर कोणी इजा केली आहे"? ते ऐकून तो रागावलेला पिता त्याच्या मुलांस सांगतो, "अरे ह्या निमकहराम ब्राह्मणाला मी जखम केली आहे. त्यांने नको ते बोलून माझा अपमान केला आहे. त्याच्याकडे पहाण्याची आवश्यकता नाही. खरे तर त्याला त्याहूनही मोठी सजा झाली पाहिजे. तो म्हणतो कीं, त्या युद्धात तो नपुसक बृहन्नला तुझ्या ऐवजी लढला म्हणून तू जिंकला आहेस. माझ्या मुला, असें उद्गार मी कसे सहन करणार"?

ते ऐकल्यावर भूमिंजय त्याच्या पित्याला बोलतो, "बाबा तुम्ही हे चांगले नाही केलेत. ब्राह्मणाचा शाप आपल्या सरळ्यांना नष्ट करू शकतो. आपला वंश संपू शकतो".

वैशंपायन पुढे सांगतात, ते आपल्या मुलाचे ऐकून राजा भानावर येतो. राजा कंकाला जवळ जाऊन त्याची क्षमा मांगतो. कंक त्याला सांगतो, "अरे राजा, जर माझे रक्त तुझ्या भूमिवर सांडले तर तुझ्या राज्याचा नाश निश्र्चित झाला असता. म्हणून मी सैरंध्रीला सांगून एक प्याला मागवला व त्यात ते धरलेले आहे. तरी मी तुला दोष देत नाही. तो तुझ्या पुत्रप्रेमाचा प्रभाव होता. मी तुला क्षमा केली आहे. तू एक सामान्य माणूस आहेस त्यामुळे असे होणे स्वाभाविक होते. तू तुझ्या सत्तेच्या मस्तीत ते केले आहेस. परंतु, खरा राजा कधीही आपली मर्यादा सोडत नाही. जर राजा असा वागून निष्पाप लोकांना शासन करू  लागला तर मग इतरांचे काय"?

रक्त वहाण्याचे थांबले होते व त्यावेळी सभेत बृहन्नला प्रवेश करते. तो राजाला व कंक ब्राह्मणाला वंदन करतो. त्यानंतर तो शांतपणे तेथे उभा रहातो. राजा त्याचे कौतुक करू लागतो. तो बोलतो, तुझ्यामुळे केकया घराण्याचा आनंद द्विगुणीत झाला आहे. असा मुलगा मला झाला ह्याचा मला रास्त अभिमान वाटत आहे. त्यानंतर तो त्याच्या मुलाचे कोतुक करू लागतो, त्याच्या शौर्याचे कौतुक होत असते अर्जुनाच्या समक्ष. राजा त्याच्या मुलाला विचारतो, "अरे उत्तरा, तू त्या कर्णाला कसे हरवलेस ते सांग. कारण त्याचा बाण परतवणारा आजवर कोणी झालेला नाही. मग तुला ते कसे जमले"?

"मला सांग तू त्या शूरयोद्धाचे कपडे कसे काढू शकलास? असें ऐकले कीं ते जवळ जवळ नागडे तू केले होतेस, ते कसे काय तू करू शकलास? ते द्विज द्रोण आणि कृप तुझ्यापुढे कसे वरमले ते सांग? ते सगळ्या क्षत्रियांचे गुरू समजले जातात त्याना तू हरवलेस कसे, काय कमाल केलीस तू ते मला समजून घ्यावयाचे आहे. तू अश्र्वत्थामाला चीत केलेस हे ऐकून मला खरोखरच समजत नाही ते कसे तू एकटा करत होतास"? सगळेंच अनाकलनीय वाटते मला. सांग खरे काय झाले ते मला समजून घ्यावयाचे आहे. आणि ती आपली जनावरं तू एकट्याने कशी वळवलीस आपल्या राज्याकडे. सगळेच अजब वाटते. तू त्या दुर्योधनाच्या मुकूटावर बाण मारून तो पाडलास, हे तुला कसे जमले"? माझ्या सगळ्या शत्रूंचा तू अशारितीने पराभव केला आहेस कीं, आता आपल्याला कांहीं काळासाठी तरी कोणाची भिती रहाणार नाही. उलट आपली भिती इतर राज्यांना वाटत राहिल. आपली सगळी संपत्ती तू एकट्याने राखलीस ह्याचा मला फार शंतोष होत आहे. हे सगळे तू एकट्याने कसे केलेस ते मला सांग.

अशारितीने गो हरण पर्व, विराट पर्व भाग अडुसष्ठावा संपला.

## गो हरण पर्व भाग

## एकोण सत्तरावा

आपल्या पित्याचे ते प्रश्न ऐकल्यावर बृहन्नलेच्या समोर भूमिंजय सांगू लागतो. "अहो तात, माझे नीटपणे ऐका, तुमचा कांहीं गैरसमज होत आहे. मी कांहींही केलेले नाही. अहो तात, आपण जाणता मी इतकासा मुलगा त्या रथीमहारथींचा पराभव कसा करू शकेन"? त्या सगळ्या मागे जे सत्य आहे ते मी तुम्हाला आता सांगतो. हे सगळे एका देवपुत्राने माझ्यावर पर्सन्न होऊन केले आहे. असें म्हणतात तो साक्षात इंद्राचा मुलगा होता. मला रणभूमितून पळून जातांना त्यांने कदाचित स्वर्गातून पाहीले असेल, व तो माझ्या मदतीला आला. त्यांने हे सगळे घडवले आहे. त्यांनी आपली सगळी गुरं आपल्या राज्याकडे किमयेने वळवली व म्हणून ती सुरक्षितपणे आपल्या राज्यात आली आहेत. त्यात माझे कांहींच कर्तृत्व नाही. त्या देवपुत्राने सगळ्या महाबली योद्ध्यांचा पराभव केला एकेकाला घेरून तो त्यांना चीत करत होता. मी ते पहात बसलो होतो त्या रथात. त्यांने आपल्या रथालासुद्धा बदलून वेगळे रुप दिले होते. सगळेच मोठे विलक्षण घडत होते. मी घाबरलेला होतो व तो देवपुत्र मला धीर देऊन सांभळत होता. जणू काय मी त्याचा पुत्र असावा. त्याने कर्णाचे, द्रोणांचे व कृपांचे कपडे उकरवून त्यांना नंगे केले माझ्या समोर. ते मी फक्त पहात होतो. शेवटी तो कुरु राजा दुर्योधन रणांगण सोडून पळून जात असतांना तो देवपुत्र त्यांला तंबी देतो कीं, तो दुर्योधन हस्तीनापुरातसुद्धा सुरक्षित राहू शकणार नाही कांहीं काळानंतर. तसे आव्हान दिल्यावर तो कौरव त्याच्या फौजा घेऊन परत आमच्यावर हल्ला करून आला पण त्याचा फारकाळ टिकाव लागला नाही. ते युद्ध पाहून माझ्या पायातील बळ नाहीसे झाले होते, मी बेहोष होणार होतो. परंतु, तो देवाचा मुलगा त्यांच्याकडे पहात हसत होता. ते पाहून मला धीर येत होता. बृहन्नसा रथ हाकत होती. ती एक हुशार सारथी आहे, अहो बाबा. त्या देवपुत्राने त्या सगळ्या सैन्याला मेहीरून (बधीर करून) टाकले असें कीं, त्यांचे कपडे मी काढत होतो तेव्हां ते मला विरोध करत नव्हते, त्याची मला गंमत वाटत होती. कर्ण, द्रोण, कृप अशा सगळ्यांचे कपडे मी माझ्या ह्या हाताने काढत होतो. त्यानंतर त्यांची सगळी आयुध त्या देवपुत्रानी मला

ताब्यात घ्यावयाला सांगितली व अशारितीने आम्ही त्या कौरवांचा शस्त्रहीन व वस्त्रहीन केले. तरी ते तसेंच मंतरलेल्या सारखे उभे होते. त्यानंतर त्यांचे प्रमुख भिष्म त्यांना बोलले कीं, आता झाली तेवढी बेइज्जती खूप झाली आता हस्तिनापुराला निघू. त्याप्रमाणे ते कौरव निमुटपणे त्यांच्या परतीच्या प्रवासाला सुरूवत करतात, मी अहो बाबा, ते सगळे पाहूनच मी थकून गेलो होतो". भूमिंजय त्याचे निवेदन संपवतो. त्यानंतर राजा त्याला विचारतो, "अरे उत्तरा, आपल्यावर अशी कृपा करणार्या देवपुत्राला तू आपल्या येथे आणलेस कीं नाही? मला त्याची पुजा करावयाची आहे. आपल्यावर त्याची कृपा झाली व आपण त्याचे ऋणी झालो आहोत".

उत्तरा त्याला सांगतो, "मी त्यांना आणणार होतो परंतु, ते युद्धा झाल्यावर व आम्ही परतीच्या प्रवासाला निघाल्यावर जेव्हां बृहन्नला रथ चालवत होती, तो देवपुत्र अंतर्धान पावला, कोठे गेला समजलेच नाही. पण त्यानी मला बृहन्नलेच्या समक्ष आश्र्वासन दिले आहे कीं, तो लवकरच मला पुन्हा भेटण्यास येणार आहे".

वैशंपायन सांगतात, विराटाला कधीच समजत नाही कोणी त्याच्या मुलाला मदत केली त्याचे पशुधन मिळवण्यात. तो अंजान राहीला कीं, तो देवपुत्र त्याच्याच वाड्यात गुप्तपणे रहात आहे.

पार्थाने स्वतः तयार केलेले उंची वस्त्र तो उत्तराला देतो कारण त्याच्या बहिणीला त्यांने आश्र्वासन दिले होते कीं, तो परत येतांना तिच्यासाठी भेट आणेल. त्या प्रमाणे ते कपडे भूमिंजय त्याच्या धाकट्या बहिणीला उत्तरेला देतो. ते पाहून ती खूष होते.

अशारितीने गो हरण पर्व, विराट पर्वाचा एकोण सत्तरावा भाग संपला.

## - अज्ञातवास पर्व पहिले संपले -

## वैवाहीक पर्व

## भाग सत्तरावा

वैशंपायन बोलतात, तिसर्या दिवशी त्यांची अज्ञातवासाची अट संपन्न करून झालेली असल्यामुळें आता ते मुक्त झालेले असतात. त्याप्रमाणे ते पांडव शुभ्र पोषाखात राजवाड्याच्या प्रवेशद्वारातून प्रवेश करतात. त्यांच्यात सर्वात पुढे युधिष्ठीर होते. अशाप्रकारे ते त्या राजसभेत येतात. त्या दरबारात ज्या जागा राजांसाठी आरक्षित असतात त्यांच्यावर ते जाऊन बसतात. नेहमीप्रमाणे राजा त्याचे नित्याचे काम करण्यासाठी सभेत येतो. तेथे त्या तेजस्वी पांच पांडवाना राजांच्या आसनांवर बसलेले पाहून तो चमकतो. त्यानंतर तो रागावून कंकाकडे पहात बोलतो, "तू द्युत खेळणारा आज असा कसा त्या आसनांवर जाऊन बसण्याचे धाडस करत आहेस"? आणि असें राजाचे कपडे आणि दागिने घालून तुम्ही सगळे माझे नोकर, हे काय करत अहात"?

वैशंपायन सांगत असतात, ते विराटाचे चिडून बोलणे ऐकल्यावर त्याची थोडी गंमत करण्याच्या अविर्भावात अर्जुन स्मित करत सांगतो, अहो हा तुमचा कंक इंद्राबरोबर बसण्याच्या योग्यतेचा आहे. ब्राह्मणांच्या सानिध्यात रहाणारा, वेदाचा अभ्यास करणारा, सुखोपभोगापासून विरक्त असलेला, ज्याचा आवाज कधी चढत नाही, जो साक्षात उत्तमगुणाचा पुतळा आहे, त्यांने आतापर्यंत अज्ञातवासाच्या अटीमुळें आपल्या दरबारात एका सामान्य सहायकाची भूमिका गेले एक वर्ष केली तो राजा युधिष्ठीर आहे. ज्याचे काय वर्णन करावे, त्याच्या दूरदृष्टीचे, वैराग्यपूर्ण जीवनाचे, त्याच बरोबर सगळ्या अस्त्र शस्त्र विद्येत पारंगत असण्याचे काय सांगावे. ह्याजगात ह्याच्या इतका शस्त्रविद्येत पारंगत तिनही जगांत कोणी नाही. देवांत व असुरात, यक्षात आणि गंधर्वात सुद्धा त्याची बरोबरी कोणी करू शकणार नाही. त्यांची बरोबरी महाशक्तीमान उरुगसुद्धा करू शकत नाहीत. प्रजाहित दक्ष म्हणून प्रसिद्ध असलेले पंडुचे ते

ज्येष्ठ पुत्र आहेत. अनेक यज्ञ करणारे, नैतिकतेचे आदर्श जपणारे, संयमी, जे राजर्षी सारखे आहेत, त्यांचे सगळे कौतुक करत असतात, सत्यवादी, इंद्राच्या सारखे, जगाचे संरक्षक जणू दुसरा मनू, प्रेमळ, दयाळू, भूतदयावादी, असें कुरु वंशाचे युधिष्ठीर आहेत. जेव्हां तो इंद्रप्रस्थाचा राजा होता तेव्हां त्यांच्याकडे दहा हजार हत्ती होते, हजारो रथ होते, त्याची स्तुती करण्यासाठी आठशे भाट स्तुतीसुमनं गात असतं, कौरव व इतर राजे त्यांची आज्ञा मानत असतं. शेतकरी, मजूर, स्नातक त्यांच्या कृपेने जगत होते. अपंग, गरीब, अनाथ असें सगळे त्याच्या कृपेने रहात होते. असें हे आमचे ज्येष्ठ बंधू युधिष्ठीर आहेत. असें युधिष्ठीर त्या आसनावर बसण्यासाठी योग्य आहेत. असें सांगून धनंजय थांबतो. अशारितीने वैवाहीक पर्व, विराट पर्वाचा सत्तरावा बाग संपला.

## वैवाहिक पर्व

## भाग एकाहत्तरावा

ते ऐकून विराट त्याला बोलतो, "जर हे युधिष्ठीर आहेत मग ह्यांतील अर्जुन कोण"? कोण भिम आणि कोण ते जुळे बंधू"? आणि द्रौपदी कोण"? त्यांचा पराजय त्या खोट्या द्युतात झाला त्यानंतर मी त्यांच्या बद्दल कांहींच ऐकलेले नाही. आम्हाला वाटले कीं आपण सगळे यमाच्या घरी गेला अहात.

ते ऐकल्यावर अर्जुन सांगतो, हे वल्लभ भिम आहेत. त्यानेच अनेक राक्षसांना यमाकडे पाठवले आहे. गंधमादन पर्वतावर त्याने कुबेराच्या राक्षस सैन्याचा पराभव केला होता. कृष्णासाठी स्वर्गीय फुलं आणण्यासाठी तो जेव्हां गेला होता. त्याच गंधर्वाने तुमच्या किचकाचा वध केला आहे. तोंच तुमची करमणूक करण्यासाठी वाघ, सिंह, वराह ह्याच्याशी कुस्ती करत होता. तुमच्या घोड्यांची काळजी घेण्याचे काम करणारा नकूल हा येथे बसला आहे. तुमच्या जनावरांची काळजी करणारा हा सहदेव येथे बसला आहे. ते आमच्या दुसर्या आईचे मुलगे आहेत. ते देखणे दोघे हजार योद्ध्यांना भारी जातात. अशी शस्त्रविद्या त्यांनी संपादन केली आहे. त्या लक्ष्मीसारखी दिसणारी सुहास्यवदना लावण्यवती आहे आमची पत्नी द्रौपदी, पांचाल नरेशाची कन्या. त्या तुमच्याकडे सैरंध्री म्हणून रहात होत्या. किचकाने त्यांच्यावर नजर टाकली त्यामुळे त्याला मारावे लागले. मी अहो राजे, तुम्ही बोलत असलेला अर्जुन तुमच्या पुढे उभा आहे, मी कुंतीचा तिसरा मुलगा. मी तुमच्या घरात बृहन्नला बनून रहात होतो". ते ऐकल्यावर विराट अर्जुनाच्या सामर्थ्याचे कौतुक करू लागला. तेथे भूमिंजय येतो व सगळ्यांना ओळखतो. "अहो बाबा, ते सोन्यासारखे चमकत आहेत, ज्यांची देहयष्टी सिंहासारखी आहे, ज्यांचे नाक चांगले लांबसडक आहे, ज्यांचे नेत्र मोठे व तेजस्वी आहेत, ज्यांचा चेहरा रुंद

तांबट रंगाचा आहे, ते कुरू घराण्याचे मुख्य आहेत. ते दुसरे तेथे उभे आहेत ज्यांची देहयष्टी हत्तीसारखी विशाल आहे, ज्यांची अंगकांती तापलेल्या सोन्यासारखी आहे, ज्यांचे हात लांब व विशाल आहेत ते पांडवांतील दुसरे, वृकोदर अथवा भिमदेव आहेत. त्यांच्या बाजूला उभे आहेत ते तरुण सावळ्या रंगाचे व अतिदेखणे जे दिसत आहेत ज्यांचे खांदे रुंद आहेत, ज्यांचे डोळे मोठे व सुंदर आहेत, ते त्यांच्यातील तिसरे, अर्जुन आहेत. ते दुसरा इंद्र आहेत, बाबा, त्यांनीच मला त्या युद्धात मदत केली होती. त्यांच्या बाजूला जे दोन सारखे दिसणारे तरुण आहेत ते त्यांचे जुळे बंधू आहेत, त्यांचे सौंदर्य पहा कसे मदनासारखे आहे, ते सहदेव आणि नकूल आहेत. त्यांच्या बाजूला उभ्या आहेत त्या त्यांची पत्नी कृष्णा, पांचाल नरेशाची कन्या आहेत. त्यांना आपण सगळे सैरंध्री म्हणून ओळखतो. त्यांच्या सौंदर्यामुळें किचक मामा बरबाद झाला. त्या स्वर्गीय अप्सरेसारख्या लावण्यवती आहेत. साक्षात लक्ष्मी सारख्या त्या आहेत". अशारितीने त्या सहाजणांचा औपचारीक परिचय करून दिल्यानंतर विराटाचा मुलगा धनंजयाची विशेष स्तुती करू लागतो, "जसें एका सिंहाने कोल्ह्या लांडग्यांचा कळप उधळून लावावा तशाप्रकारे ह्यांनी कौरवांचा धुव्वा उडवला होता जेव्हां मी त्या रथाचा सारथी झालो होतो. त्यांच्या बाणांचा वर्षाव आपण पाहिलेला नाही. तो मुसळधार पावसा सारखा होता. त्यातून कोणीही वाचू शकत नव्हते. त्याने त्यांच्या विविध आयुधांनी मोठे मोठे हत्ती मारून टाकलेले मी माझ्या डोळ्यांनी पाहिलेले आहे. त्यांच्या रथाच्या ध्वजावरील दैवी प्राण्यांच्या ओरडण्यामुळें आपली पळवलेली सगळी जनावरं पुन्हा आपल्या नगराकडे वळली म्हणून आपले पशुधन सुरक्षित राहीले. त्यांच्या शंखनादाने माझे कान फाटतात कीं काय अशी गत झाली होती. त्यानी एक एक करून भिष्म, द्रोण आणि कर्ण व कृप ह्याना पराजित केले. ते सगळे त्यांना केले, तुम्ही समजता तसे मी नाही केले".

ते विवेचन ऐकल्यावर राजाला शरम वाटू लागली कीं, तो युधिष्ठीराशी अपमानकारक रित्या वागला. तो राजा आपल्या मुलाला बोलतो, "मला वाटते कीं, आता वेळ आली आहे कीं, मी पांडवांची क्षमा मागावी. आणि तू समजत

असशिल योग्य तर मी माझी मुलगी, तुझी धाकटी बहीण उत्तरा, अर्जुनाला देण्याचे ठरवू".

भूमिंजय त्याच्या पित्याला सांगतो, "त्या आधी आपण ह्यांची रितसरपणे पुजा केली पाहिजे. त्यानंतर ते सांगतील त्याप्रकारे आपण आपली उत्तरा त्यांच्या घरात पाठवू".

विराट सांगतो, "जेव्हां मला शत्रूनी घेरले तेव्हां भिमाने मला वाचवले आहे. आमचे पशुधन अर्जुनामुळें सुरक्षित आहे, त्यांच्या शस्त्रविद्येमुळें आज आपण सुरक्षित आहोत. हे सगळे लक्षात घेता आपण सगळे माझ्या दरबारी कारभार्यांसह युधिष्ठीराचे अघिकृतपणे आभार मानण्याचे योजणार आहो. आपल्या सगळ्या भावांचे शतशः उपकार आहेत मत्स्यदेशावर". त्यानंतर तो मत्स्य देशाचा राजा हात जोडून पंडवांची क्षमा मागतो कीं, "अनवधानाने जर कांहीं कमीजास्त बोलले गेले असेल गेल्या वर्षात तर त्याबद्दल आम्हा सगळ्यांना आपण मोठ्या मनाने माफ करावे".

वैशंपायन पुढे सांगतात, विराट राजा युधिष्ठीराशी सहयोगाचा प्रस्ताव मांडतो. त्यामध्ये तो मत्स्य देशाचा राजा बोलतो कीं, त्याचे राज्य व त्याची सगळी संपत्ती तो पांडवांना अर्पण करत आहे. पुढे तो सांगतो कीं, त्याचे सुदैव आहे कीं, अर्जुनासारखा मित्र त्यांना मिळाला आहे. त्यानंतर तो वृद्ध राजा युधिष्ठीराला व भिमाला मिठी मारत असतो. नकूल व सहदेवाचे कपाळ हुंगत असतो. तो सारखा त्या तेजस्वी कुंतीपुत्रांकडे डोळे भरून पहात असतो. आपण वनातून सुरक्षितपणे आलात त्यात आपले सुदैव समजले पाहिजे. अज्ञातवास सुद्धा व्यवस्थितपणे झाला हे सगळे विधात्याच्या कृपेमुळें झाले आहे. दुसरा कोणी असतां तर तो त्या परीक्षेतून निभावला नसता. पुढे तो जाहिर करतो कीं, तो त्याचे सगळे राज्य पांडवांना देत आहे. त्यानी येथून आपले काम पहावे. तो पुढे विनंती करतो कीं, त्याची ही मागणी पांडवांनी नाकारू नये. तो सांगतो माझी कन्या मी धनंजयाला देत आहे. तिचा त्यानी स्वीकार करावा. माझ्या कन्येसाठी असा योग्य वर दुसरा मिळणार नाही. ते ऐकल्यावर अर्जुन त्याच्या भावांकडे व द्रौपदीकडे पहात सांगतो कीं, तो उत्तरा

त्याची स्नुषा म्हणून स्वीकारत आहे. अशाप्रकारे हा समझौता आम्हाला मान्य आहे.
अशारितीने वैवाहीक पर्व, विराट पर्वाचा एकाहत्तरावा भाग संपला.

## वैवाहीक पर्व
## भाग बाहत्तरावा

विराट राजा बोलतो, "आपण माझी मुलगी पत्नी म्हणून कां स्वीकारत नाही"? त्यावर अर्जुन त्याला समजावतात कीं, "मी बृहन्नलेच्या रुपात आपल्या अंतःपुरात नेहमी वावरत होतो. त्या सुमारास, मला उत्तराला भेटण्याचा अनेक वेळा योग आला आहे. त्यामुळें मी तिला फार चांगल्या प्रकारे ओळखत आहे. त्या काळात ती मला तिचा पिता समजत होती व आमचे संबंध त्या नात्याचे होते. म्हणून तेंच नाते ह्यापुढे मला चालवणे श्रेयस्कर वाटते. ती मला तिचा संरक्षक अशाप्रकारे सन्मान देत होती. ती वयात येत होती त्या गेल्या एक वर्षाच्या काळात मी तिला नृत्य शिकवत होतो. हे सगळे लक्षात घेऊन आपण तिचे पिता, माझ्या विनंतीचा मान ठेवतील असें मी समजतो. माझ्या मुलासाठी मी व माझ्या पत्नीने द्रौपदीने, तुमच्या उत्तरेला आमची सून म्हणून आधीच स्वीकारले आहे. माझा मुलगा अभिमन्यू माझ्या इतकाच शूर व गुणी आहे. उत्तरेसाठी आमचा अभिमन्यू विशेष योग्य आहे कारण, तो सगळ्या शस्त्र विद्यांत प्रवीण आहे व सध्या तो पांचाल देशात त्याच्या मामाच्या घरी त्याच्या आईसह रहात आहे. त्याचे

सौंदर्य, देखणेपण, नितीशिलता, शिष्टाचार संपन्नता, वेदाचा अभ्यास असें सगळे वाखाणण्यासारखे आहे. तो आमचा मामेभाऊ श्रीकृष्ण ह्याचा आवडता आहे. त्याची मी पसंती तुमच्या म्हणजेच आमच्या उत्तरेसाठी केली आहे ते समजल्यावर आपला आनंद द्विगुणीत होईल ह्याची मला खात्री आहे. तो विराटांचा जावई होण्यासाठी अगदी योग्य आहे तरी ते नाते आपण स्वीकारावे अशी मी आपल्याला विनंती करतो. तशी जोडी त्रिखंडात मिळणार नाही. असा तो जोडा शोभतो".

विराट ते ऐकून बोलतो, "आपला निर्णय मला मान्य आहे. आपल्या सारख्या सूज्ञ लोकांनी जर तसा निर्णय आधीच घेतला आहे तर तो मला शतशः मंजूर आहे. जर त्या मुलीला धनंजय सासरा असेल तर त्या मुलीच्या भवितव्याची मला चिंता करण्याचे कारण उरत नाही. मला हे नाते मान्य आहे".

वैशंपायन पुढे बोलतात, राजाने ते जाहिर केल्यावर युधिष्ठीर जो पांडवांचा प्रमुख आहे तो त्या नात्याला त्याची मंजूरी जाहिर करतो. त्यानंतर पांडव त्यांच्या आप्तांना त्या लग्नाचे आमंत्रण पाठवतात. त्याच प्रमाणे विराटाकडची माणसंसुद्धा त्यांच्या आप्तांना त्या लग्नाचे निमंत्रण पाठवतात. तेरा वर्षे संपल्याचे सिद्ध होते व त्यानंतर पांडव विराटाच्या मत्स्य देशातील एका नगरात आश्रय घेतात. त्या नगराचे नांव उपप्लव्य होते. विभत्सु वासुदेवाला व अभिमन्यूला घेऊन त्या ठिकाणी येतो. पांडवांचे नातेवाईक जे दशरथ आहेत ते सगळे त्यांच्याकडे वर्हाडी माणसं अनर्त देशातून जमा होतात. काशी व सैवदेशाचे राजे जे युधिष्ठीराशी खास संबंध राखून होते ते येतात. त्यांच्या बरोबर त्यांचे अक्षौहिणी सैन्यसुद्धा येते. पांचाल नरेश द्रुपद, दृष्यद्युम्न व शिखंडी त्यांची अक्षौहिणी सैन्य घेऊन येतात. त्यांचे सगळे नातेवाईक यज्ञ करणारे, ब्राह्मणांना सांभाळणारे, दानं करणारे, शूरयोद्धे आहेत. त्या सगळ्यांचे स्वागत राजा विराट मोठ्या आत्मियतेने करत असतो. ते सगळे पाहून त्याला अत्यानंद होत असतो. त्या सगळ्या वर्हाडी मंडळींची चोख व्यवस्था तो करत असतो. निरनिराळ्या भागातून राजे येत असतात. श्रीकृष्ण गळ्यात फुलांच्या माळा घालून तेथे पाहुण्यांचे स्वागत करत होता पांडवांच्यावतीने.

वर्हाडी मंडळींत हलयुध, किर्तीवर्मन, हृद्रीक, युयुधन, सत्यकी असें बरेच आलेले होते. अनध्रीष्टी, अक्रूर, शम्व, निषाध असें सगळे त्यांच्याबरोबर अभिमन्यूला व त्याच्या आईला, सुभद्रेला घेऊन येतात. इंद्रसेन जो एक वर्ष द्वारकेक राहीला होता तो सुद्धा येतो. ते त्यांच्या बरोबर महागड्या गाड्या भेटवस्तु म्हणून आणतात. हजारे हत्ती आलेले असतात. त्याच प्रमाणे हजारो रथ त्यांच्या घाड्यासह आलेले असतात. लक्षावधी पायदळाचे सैन्य आलेले असते. त्यांच्यात भोज, वृक्ष्नी आणि अंधक सैनिक असतात. तो रुबाब पांडवांचा पाहून राजा विराट संतुष्ट होतो. पांडवांच्या सेवेसाठी असंख्य बायका दास्या कृष्णाने आणलेल्या असतात. दागदागिन्यांची रेलचेल असते. अनेक वाद्ये त्या लग्नाच्या निमित्ताने वाजवली जात होती. विराटाच्या वाड्यात त्यांचा जलसा भरतो. सगळीकडे आनंदी आनंद साजरा होत असतो. त्यांच्या जेवणासाठी असंख्य हरण, गाई दररोज कापल्या जात होत्या तरी कांहीं कमी पडत नव्हते. मद्य पाण्यासारखे वहात होते. विविध पेये दिली जात होती त्यात अनेक झाडांच्या रसाचे स्वाद होते. जो तो विराट आणि पांडवांचे कौतुक करत होते. विशेष म्हणजे पांडव वनवासाच्या आणि अज्ञातवासाच्या परीक्षेतून पार झाल्याचे सगळे कौतुक करत होते.

सुमूहूर्तावर नवरी मुलगी सजून सावरून तिच्या माते बरोबर लग्न मंडपात येतात. तेथे जमलेल्या लावण्यवतीत कृष्णा उठून दिसत होती. उत्तरा इंद्राच्या मुलीसारखी सजवलेली होती. तिच्या अंगावर अमुल्य रत्नानी जडवलेले विविध प्रकारचे दागिने होते. त्यामुळे तिचे सौंदर्य उठून दिसत होते. विधीवत अर्जुन व सुभद्रा विराटाची कन्या त्यांची स्नुषा म्हणून स्वीकारतात व लग्न सोहळा संपन्न होतो. युधिष्ठीर उत्तराला त्याची सून म्हणून स्वीकारतो. त्यानंतर रिवाजानुसार राजा विराट लग्नात हुंडा म्हणून सात हजार अश्र्व जावयाला देतो. दोनशे हत्ती, त्याबरोबर असतात. त्याशिवाय अगणित धनदौलत दिली जाते. त्यानंतर अग्नीहोत्रात अर्घ्य दिले जाते त्यात वेदशास्त्र संपन्न ब्राह्मण भागस घेतात. वेदोच्चाराने सर्व सभामंडप भरून निघते. विराट युधिष्ठीराला त्याच्या राज्याचा एक भाग दान करतो. त्यानंतर युधिष्ठीर कृष्णाने आणलेले

धन ब्राह्मणांना दान करतो. युधिष्ठीर आणखीन भरपूर दानं करतो ब्राह्मणांना त्याच्या सवयीप्रमाणे. त्यात अनेक प्रकारची पेये वाटली जातात. त्याशिवाय तो ब्राह्मणांना जमिनी दान करतो. त्याशिवाय गुरं ढोर दान करतो. मत्स्य देशात ते लग्न म्हणजे एक अभूतपूर्व सोहळा होत होता.
अशारितीने वैवाहीक पर्व, विराट पर्वाचा बाहत्तरावा भाग संपला.

## - विराट पर्व संपले -

## भाषांतरकाराचा परिचय -

मी अशोक कोठारे, माझ्या वयाची ७६ वर्षे झाली आहेत. गेली कित्येक वर्षे मी विविध प्राचीन ग्रथांचा एक कुतुहल म्हणून अभ्यास करत असतो. त्या काळात मला समजले कीं, आपल्या प्राचीन शिक्षण पद्धतीत चार ग्रंथांचे महत्व होते. त्यात मनुस्मृती, महाभारत, रामायण आणि योगवासिष्ठ हे महत्वाचे होते. आपल्या पूर्वीच्या शिक्षण पद्धतीत ह्या ग्रंथांचे वाचन करण्याची प्रथा होती. नंतरच्या काळात इंग्रजांनी त्यांची शिक्षण पद्धती येथे रुजवली व आपली पाठशाळा पद्धती संपुष्टात आली. आपल्या शिक्षण पद्धतीत अक्षर ओळख, नितीशास्त्र, गणित एवढेच शिकवले जात. त्याशिवाय शिकतांना घोकंपट्टी करण्याचे महत्व होते. ते सगळे आता इतिहास जमा झालेले असले तरी त्याची उपयुक्तता नाकारता येणार नाही. म्हणून एक प्रयत्न मी करावयाचे ठरवले. मी एक अतिसामान्य अभ्यासक आहे तरी व्यासंग मोठा आहे. त्या

प्रमाणे, मनुस्मृती प्रथम ई-साहित्यच्या माध्यामाने तुम्हाला दिली. त्याचे चांगले स्वागत झाले आहे. त्यामुळें माझा उत्साह वाढला आणि महाभारताचे, 'जसे आहे तसे', अशाप्रकारचे भाषांतर आता देत आहे. त्याचे साधारणपणे ४० खंड होणार आहेत. संपूर्ण महाभारत येण्यास बराच अवधी लागणार आहे. इतर मंडळी महाभारताचे भाषांतर करतांना त्याचा आकार आटोपशीर करण्यासाठी त्यातील शिकवणूकीचा भाग व्यर्थ समजून सोडून केवळ कथाभागाचेच भाषांतर करतात त्यामुळे एक शैक्षणिक पुस्तक म्हणून असें भाषांतर रहात नाही. मी सगळ्या नितीशास्त्र शिकवणार्या कथा जशाच्या तशा ठेवल्या आहेत. कांहीं जागी विषय समजणे सोपे व्हावे म्हणून मी टीपा दिल्या आहेत कांही कंसात दिल्या आहेत, कारण मला माहित आहे किं, ह्याचे वाचन करणारे मराठी भाषिक सामान्य आहेत. कोणी विद्वान वाचक असेल तर त्याला त्या टीपांची गरज वाटणार नाही.

आता थोडे माझ्याबद्दल लिहीत आहे. तसे पाहता अशा कामात कोणी संस्कृतचा प्राध्यापक असला पाहिजे असें कोणाला वाटेल मग मी एक इंजिनीअर कां हे काम करत आहे असा प्रश्न पडेल पण त्याचे उत्तर असें आहे किं, एवढे मोठे काम करण्यास कोणी तयार होत नाही आणि ते सुद्धा फुकट करणारा विद्वान मला मिळाला नाही. ज्या कोणाला मी त्याचे महत्व सांगितले ते सगळे त्या कामासाठी भरपूर मानधन मागू लागले मग मी ठरवले आपणच ते करावे. गेली २५ वर्षे मी निवृत्त जीवन जगत आहे, बराच समय माझ्याकडे आहे मग आपणच हे करावे अशा विचारांने ते करावयास घेतले व प्रथम मनुस्मृती दिली आता महाभारत देण्याचा प्रयत्न चालू आहे. त्यासाठी दैवयोगांने ई-साहित्य सारख्या ध्येयवादी मंडळींची साथ मिळाल्यामुळें माझा उत्साह द्विगुणित झाला.

१९८५ पर्यंत मी माझा उद्योग करत होतो. कारखाना भाईंदरला व रहाणार चेंबूरला त्यामुळें येण्याजाण्याची दगदग माझ्या प्रकृतीला झेपली नाही व मी हृदयाच्या झटक्याने आजारी झालो. त्यानंतर डॉक्टराच्या सल्ल्याने मी सगळे

उद्योग बंद करून घरात बसलो. थोडी बचत केली होती त्याच्या जोरावर आज मी माझे साधे जीवन जगत आहे. पैशापाठी लागण्याचा स्वभाव माझा मुळातच नाही. सुरुवातीपासून वाचनाचा छंद होता त्यात कथा कादंबर्या वाचण्यात रस नव्हता. मी कांहीं माहिती देणारे ग्रंथच वाचत असें. त्यामुळें अनेक विषयांचा व्यासंग झाला त्यात ही चार पुस्तक पुढच्या पिढीस विशेष उपयुक्त ठरतील असे मला जाणवू लागले तेव्हा त्यांची भाषांतरे करण्याचे ठरवले. त्या व्यतिरीक्त माझे लिखाण शेती विषयांत बरेच आहे. कॉंटिनेंटलचे कै. रत्नाकर कुलकर्णी ह्यांनी आग्रहपूर्वक माझ्या कडून 'सेंद्रिय खत निर्मिती उद्योग', नांवाचे पुस्तक लिहून घेतले, मराठीतील हे पहिले खतविषयक पुस्तक आहे. त्याच्या चार आवृत्या झाल्या आहेत. बळिराजा मासिकाचे संपादक भोसले ह्यांच्या आग्रहामुळें त्यांच्या मासिकांत मी १९९२ ते २००५ पर्यंत शेतकर्यांना शेतीचे पद्धतशीर शिक्षण एका लेखमालेच्या द्वारा दिले आहे. त्यात ६५ लेख लिहीले. त्या शिवाय संपादक भोसल्यांच्या आग्रहामुळें निसर्गशेतीचे तंत्र शिकवणारा एक अभ्यासक्रम, 'व्यावहारिक निसर्गशेती अभ्यासक्रम' तयार करून तो स्वखर्चांने शेतकर्यांसाठी १९९४ साली उपलब्ध केला. त्यामुळें आपल्या महाराष्ट्रात निसर्गशेतीचा प्रचार झाला. आता ह्या उतारवयात जेव्हां शरीर साथ देण्यात कुचराई करू लागले आहे, माझे सगळे लक्ष आपल्या हिंदू मान्यतांचा मराठी माणसाला परिचय करण्यावर आहे. त्यासाठी महाभारत, रामायण व योगवासिष्ठ ह्यांचे 'जसे आहे तसें' अनुवाद करण्यावर भर आहे. माझे ज्योतिष शास्त्राचे ज्ञान चांगले आहे. त्याप्रमाणे जर गोष्टी होणार असतील तर मी २०२० नंतर नसेन. त्यासाठी हे सगळे उपक्रम लवकरात लवकर उरकण्याचा मानस आहे.

आता कोणाला प्रश्न पडेल कीं, हा इंजिनियरींगचा माणूस शेतीवर कसें लिहीतो? त्या बद्दल थोडे लिहीतो. माझ्या कारखान्यात बहुतेक कामगार उरण, अलिबाग, वसईचे होते. शिक्षण बेताचे पण एकादे अवजार कसें वापरावयाचे ते शिकवले किं, ते त्यात लवकरच निष्णात होत होते. त्या मुलांना मी विचारले

किं, ते एवढे हुशार असूनही शेती कां करत नाहीत? त्यांचे एकच उत्तर असें, मालक शेतीत भागत नाही. मग मी ठरवलें शेतीशास्त्राचा अभ्यास करावयाचा. अभ्यासाचाच छंद असल्यामुळें तो सुरु झाला. त्यात मला लवकरच समजले कीं, शेतीचा संबंध बॉटनी पेक्षा मायक्रोबायॉलॉजीशी जास्त आहे. मग मी त्या विषयाचा अभ्यास करून त्यात लवकरच पारंगत झालो. त्या अभ्यासाप्रमाणे मी कांहीं तंत्र विकसित केले व ते अजमावण्यास सुरुवात केली. त्यात अपेक्षेप्रमाणे परिणाम मिळू लागले त्याप्रमाणे एक शेतीतंत्र विकसित होत गेले. माझ्या कामगाराच्या शेतावर माझे प्रयोग होत होते, त्यात माझा पैसा लागत होता व त्यांचे कुटूंबिय काम करत होते. त्यावेळी मी चांगला तरुण होतो व उत्साहसुद्धा होता. माझ्या तंत्राने शेती उत्तम होते हे मी समजलो व ते सगळे तेथेच संपले. ते सगळे १९८२ ते १९८५ अशा सालात झाले होते. मीसुद्धा ते सगळे विसरून गेलो. परंतु, १९९२ साली मोठा दुष्काळ पडला होता महाराष्ट्रात त्यावेळी मी एक दृष्य टीव्हीवर पाहिले, त्यात एक ग्रामीण महिला एका खोल विहीरीत उतरून वाटीने पाणी काढून बालदीत भरत होती. त्यावेळी मला रहावले नाही व विचार केला, माझ्या ज्ञानाचा जर उपयोग होणार नसेल तर काय कामाचे ते ज्ञान. मी एक लेख लिहीला व दैनिक नवशक्तिला पाठवला. तो लेख त्यांनी प्रसिद्ध केला नाही. मग मी तो लेख बळीराजा मासिकात पाठवला. त्यात तो छापून आला. तसे पहाता नवशक्तिनेसुद्धा तो प्रसिद्ध केला. त्यानंतर बळिराजाच्या वाचकांची प्रश्न विचारणा सुरु झाली व मी माझे शेतीचे ज्ञान त्यांना त्या मासिकात लेख लिहून देऊ लागलो. अशारितीने माझे शेतीत लिखाण भरपूर झाले. त्याबद्दल आधी लिहीले आहे.

आता थोडे माझ्या ब्लॉगपोस्ट बद्दल लिहीतो. हिंदूस्तानात २००८ साली इंटरनेटवर ब्लॉग सुरु झाले व मी त्यात माझे ब्लॉग सुरु केले. माझ्या ख्रिस्ती धर्माबद्दलच्या वादग्रस्त परंतु शास्त्रशुद्ध विवेचनामुळें पहिले ब्लॉग बंद झाले. माझे पूर्वी पांच ब्लॉग होते. त्यात मी अभ्यासांने जे संशोधन करून शोधून काढत असें, ते लिहीतो. त्यात अनेक विषयावरील माझे संशोधित

साहित्य प्रसिद्ध करत असतो. त्यात ब्राह्मण धर्म, जैन धर्म, ख्रिस्ती धर्म, इस्लाम, अर्थ, न्याय, नितीशास्त्र, राजकारण अशा विषयांवर बरेच लिहीत असतो. ते तुम्ही वाचू शकता. एकच ब्लॉग मराठी आहे बाकीचे इंग्रजीत आहेत. सिलीकॉन मधील ब्लॉग इस्लाम बद्दलच्या माझ्या संशोधनाचे शास्त्रशुद्ध लिखाण आल्यानंतर बंद झाला आहे. गुगलवरील ब्लॉग मात्र जोरात चालू आहेत. माझे अशा विषयावरील विचार नाकारता येणार नाहीत असें सत्याला धरून असल्यामुळे जेव्हां मला कोणी विरोध करतो तेव्हां त्यांना मी नम्रपणे सांगतो, कृपया माझ्यावर अब्रुनुकसानीचा दावा करावा, ते झाले किं, ते लोक गप्प होतात. कारण, जर ते तसा दावा करतात तर त्यात तेंच हरण्याचा संभव जास्त असतो. एवढेच नाही तर त्यांच्या खोटेपणाचा जाहिर बभ्रा होईल ते त्यांना परवडण्यासारखे नसते. मी प्रचारकी थाटाचे लिखाण करत नाही. जे समजते ते विज्ञानाच्या आधाराने सिद्ध करूनच लिहीतो, आजच्या काळात असें लिखाण बर्याच गटांना आवडत नाही. बर्याच लोकांचे खूनसुद्धा झाले आहेत हे आपण जाणताच, म्हणून मी शक्यतर माझ्याबद्दल कांहीं लिहू इच्छित नाही. सत्यापेक्षा सोइस्करचा आज जमाना आहे. माझे जीवनातील अनुभव लिहीले तर ते एक वाचनीय पुस्तक होईल पण त्यात सर्व वादग्रस्त विषय पुढे येतील. मी मांडलेला कोणताही मुद्दा आजवर कोणालाही खोटा ठरवता आलेला नाही. जाता जाता, जैन धर्माबद्दलचा वाद सांगतो एक उदाहरण म्हणून, १९०२ मध्यें सर जगदीशचंद्र बोस ह्यांनी वैज्ञानिक पुरावे देऊन जे सिद्धांत मांडले त्याचा पुरावा देऊन मी लिहीले कीं, हल्ली जो जैन धर्म प्रचारात आहे तो तीन हजार वर्षापूर्वीच्या अडाणीपणावर आधारित आहे, त्यातील सगळेंच विचार अज्ञानाधारीत म्हणून खोटे आहेत. एवढेच नाही तर व्यवहारिक जीवनात तो धर्म पाळणे केवळ अशक्य आहे. त्यामुळें जैन उखडले पण सुदैवाने ते खूनखराबा करणारे नसल्यामुळें वाचलो.

शेवटी माझ्या तब्यती बद्दल लिहीतो. मुळातच माझी प्रकृती तोळामासा असते त्यात २०१० साली बेस्टच्या बसने मला ५० फूट लांब फेकल्यामुळें पुरता

जायबंद झालो होतो. मेंदूला आघात झाल्यामुळें माझी स्मरणशक्ती गेली होती. दोन बरगड्या तुटल्या होत्या. माझे शौंच व मुत्र ह्यांवर नियंत्रण राहिले नव्हते. दीड वर्ष तसेंच गेले. त्यावेळी माझे वय ६८ होते. केवळ दैव बलवत्तर म्हणून आज मी पूर्ववत झालो आहे तरी कोठल्याही वाहनाने प्रवास करण्यास परवानगी नाही. म्हणून मी कोठेही जात नाही. गेलेली स्मृति पुनः आली व आता सगळे बरे चालले आहे. त्या काळातील अनुभव विशेषकरून माझ्या ज्ञान साधनेचे, मोठे रोचक आहेत. तूर्तास एवढे पुरे.

ई-साहित्यच्या पदाधिकार्यांच्या आग्रहामुळें ही माझ्याबद्दली खरी माहिती सविस्तरपणे दिली आहे. जर शक्य असेल तर त्यातील मजकुरात बदल न करता तो प्रसिद्धीस घ्यावा.

अशोक कोठारे,

२३- २ -२०१८

ashokkothare@gmail.com ,

ashokkothare@yahoo.co.in

## ई साहित्य प्रतिष्ठान -

मराठी भाषा आता झेप घेण्याच्या मूड मध्ये आहे. रडणार्यांकडे लक्ष नका देऊ. मराठीत कधीच नव्हते इतके वाचक आहेत आता. पुर्वी पुस्तकाच्या एका आवृत्तीच्या हजार न हजार प्रती छापल्या जात. पांच हजार म्हणजे डोक्यावरून पाणी! आता ई पुस्तकांच्या जमान्यात एक एक पुस्तक पाच लाख वाचकांपर्यंत जात आहेत. वर्षाला अर्धा कोटी डाऊनलोड होतात. वाचक एकमेकांना परस्पर ऑर्डर करतात. व्हट्स अप, ई मेल, ऍप्प, ब्ल्यु टुथ, वेबसाईट, पेन्ड्राईव्ह, सिडी अशा असंख्य मार्गांनी पुस्तकं व्हायरल व्हायला लागली आहेत. सुसाट सुटल मराठीचं वारु. खेड्यापाड्यांच्या गल्लीबोळांपासून ते जगाच्या पाठीवरील प्रत्येक देशात. रॉकेटच्या वेगांने सुसाट सुटलेल्या मराठीच्या गाडीला आता कोणी थांबवू शकत नाही. या धूमधडक क्रांतीत साहभागी व्हा. आपल्या ओळखीच्या मराठी साक्षरांना यात ओढा. त्यांचे ई मेल पत्ते, व्हाट्सप नंबर आम्हाला पाठवा. तुम्ही कितीही वाचक आणा. ते शंभर आणतील आणि ते हजार आणतील. तुमच्या व्हाट्सप ग्रुपमधून याची जाहिरात करा. आपल्याला कुठली पुस्तकं वाचकांपर्यंत पोहोचवायची आहेत ते आपल्याला टिव्ही, पेपरची जाहिरात परवडत नाही. आमचे वाचक हेच आमचे जाहिरात एजंट. तेच आमची ताकद. मराठी भाषेची ताकद जगाला दाखवून देऊ.

ई साहित्यची पुस्तके www.esahity.com वरून डाऊनलोड करा.

esahity@gmail.com ला कळवून ई-मेलने मांगवा. किंवा 7710980841 हा नंबर सेव्ह करून ठेवा, या नंबरला तुमचे नांवाने Whatsapp करून पुस्तके whatsapp मार्गे मिळवा.
लिंक ई साहित्यचे
app.https://play.google.com/store/apps/details?id=com.
esahity.www.esahitybooks ह्या लिंकवर उपलब्ध आहेत. ते download करा.
हे सर्व मोफत आहेत.
धन्यवाद